६६३६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

शास्त्रज्ञा

अर्थात्

अंकल शॅम

मा. ज. कानेटकर.
बी. ए.

REFBK-0004606

शामकाका

अर्थात्

अंकल शॅम.

सेंट्रल प्रोव्हिन्शल लायब्ररी, नागपूर
REFBK-0004606

: लेखक :

श्री० कन्हयालाल गौबा, बॅरिस्टर-ॲट-लॉ, लाहोर.

— भाषांतरकार —

श्री० माधव जनार्दन कानेटकर, बी. ए. नागपूर.

प्रथम आवृत्ति] किंमत १॥ रुपया. [सन १९२२.

मुद्रक व प्रकाशक :-

रामचंद्र त्रिंबक देशमुख, बी. एजी.

सरस्वती प्रेस, कॉंग्रेस नगर, नागपूर.

ग्रंथकर्त्याची अर्पणपत्रिका.

युनायटेड स्टेटस्च्या जनतेला व विशेषें
करून ज्या वोस्टनच्या कुमारिकेनें माझी
अंकल सॅमशीं ओळख करून
दिली तिला हें पुस्तक
अर्पण असे.

सं.नि. 820
307/32

अर्पणपत्रिका.

(भाषांतराची)

ज्या आमच्या आर्यभगिनींनी विविध संस्कृतीच्या सतत
घाललेल्या झगड्यांतून आर्यस्त्री–संस्कृती कायम
राखून आमच्या देशाचें नाक अजून
शाबूत राखिलें त्या सर्व आर्य-
भगिनींस हें भाषांतर
आदरपूर्वक समर्पण
केलें असे.

सं. वि. ३८
३०१/३८

भाषांतरकर्त्याचे दोन शब्द

पुस्तकाच्या रूपानें जनतेपुढें येण्याचा हा माझा पहिला प्रयत्न. स्वतंत्र पण रद्दी लिखाण लोकांना देण्याऐवजीं भाषांतराशीं संलग्न असणारा कमीपणा पत्करून पण एका उत्कृष्ट पुस्तकाची कांस धरूनच लोकांपुढें येणें जास्त इष्ट वाटल्यामुळें हा प्रयत्न केला आहे. जनता यां माझ्या प्रथम प्रयत्नाकडे सहानुभूतीनें पाहील अशी आशा आहे.

ज्या धातकी इराद्यानें मिस मेयोनें आपलें " मदर इंडिया " नामक भलिच्छ लिखाण जगापुढें आणलें हें सर्वांना माहीत आहेच. त्यावेळीं सबंध हिंदुस्थानांत कोण हलकल्लोळ माजला हेंहि सर्वांच्या आठवणींत ताजे आहे. या मिस मेयोला देशाभिमानी हिंदवासियांकडून कैक प्रत्युत्तरें मिळालीं पण श्री. कन्हयालाल गौबा या लाहोरच्या तरुण व पाश्चात्य आयुष्यक्रमांतील मरूया जाणणाऱ्या अनुभवी बॅरिस्टरानें जें **Uncle Sham** च्या स्वरूपांत उत्तर दिलें त्यासारखें लगुडप्रहारात्मक उत्तर तिला अजून पावेतों मिळालें नाहीं. **Uncle Sham** पुस्तकाबद्दल ज्या पाश्चात्यांचे व हिंदी वृत्तपत्रांचे अभिप्राय प्रसिद्ध झालें आहेत त्यांनीं मुक्तकंठानें या पुस्तकाची स्तुतीच केली आहे; कांहीं अमेरिकन वृत्तपत्रांना रागहि आला पण इतर सूज्ञ पत्रांनीं टोमणाही दिला कीं मिस मेयोचें मदर इंडिया पुस्तक वांचतांना तुह्मांला गुदगुल्या झाल्याना ! मग त्याचा उताराहि आतां मर्दासारखा घशांतून कोंबा.

या अत्युत्कृष्ट पुस्तकाची ओळख मराठी जाणणाऱ्यांना होईल तर ते इष्टच आहे असें माझें प्रामाणिक मत आहे. पुस्तकाच्या रोंखाबद्दल व निर्भेळ दोषैक दृष्टिबद्दलचा खुलासा खुद्द पुस्तककर्त्याच्या प्रस्तावनेंतच पहावयास मिळेल त्याबद्दल मला वेगळयानें लिहिण्याची गरज नाहीं. पण या भाषांतरानें एक विशेष कार्य घडून येणार आहे.

आमच्याकडे अजूनहि पाश्चात्य संस्कृतीच्या श्रेष्ठपणाबद्दल कक भ्रामक कल्पना दृढमूल होऊन बसल्या आहेत. त्यांत अमेरिका हें राष्ट्र तर शिखरस्थानीं मानण्यांत येतें; त्यांत पुनः तेथें स्त्रियांना जें स्वातंत्र्य उपभोगावयास मिळत आहे त्याची फक्त एकच बाजू व तीहि कल्पनेनें रंगविलेली अशाच आमच्या विचारसृष्टीपुढें खेळतें; तेव्हां त्या संस्कृतीचें जें भेसूर व दुष्परिणामात्मक स्वरूप आहे तिचें प्रत्यक्ष चित्र जर आमच्या भगिनीवर्गाला समजेल तर ज्या मानवी उच्छृंखल मनोवृत्तींनां साहजिक बळी पडून स्त्रीस्वातंत्र्यादि बाबतींत भ्रमिष्टाप्रमाणें पाश्चात्यांच्या बेसुमार माकडचेष्टा करण्याच्या भरीस आपण पडतों त्या गोष्टीला आळा पडून आह्मांला आमची पौर्वात्य संस्कृती व पाश्चात्य संस्कृतीतींल इष्ट तेवढाच भाग यांचा उमदा मिलाफ करतां येईल व पौर्वात्य संस्कृती सरसकट टाकाबू ठरवून सोडण्याचा व पाश्चात्य कल्पना उराशीं बाळगण्याच्या मोह पडणार नाहीं. भाषांतर करण्याचा हा महत्वाचा उद्देश आहे. हा कितपत साध्य झाला हें जनतेकडेच सोंपाविणें बरें.

या पुस्तकाच्या प्रसिद्धीचें मूळ श्रेय श्री. कन्हयाला गौबा यांनाच आहे कारण त्यांनीं उदारमतानें कांहीं एक मोबदला न अपेक्षितां सदर्हू भाषांतराची परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहे. शेवटीं भाषांतराचे कामीं वेळोवेळीं हरतऱ्हेची मदत केली याबद्दल मी प्रसिद्ध लेखक व माझे मित्र रा. शंकर बाळाजी शास्त्री यांचा फार आभारी आहे.

वाचक माझ्या या प्रथम प्रयत्नाकडे सहानुभूतिपूर्वक पाहतील अशी आशा प्रदर्शित करून हे दोन शब्द आटोपतों.

सिताबर्डी नागपूर
६-८-३२

मा. ज. कानेटकर.

चवथ्या आवृत्तीची प्रस्तावना.



मला पुष्कळांनी विचारलें कीं "अंकल शॅम" हें अमेरिकेचें खरें चित्र आहे काय? अलीकडे एक प्रख्यात अमेरिकन हिंदुस्थानांत प्रवास करून महात्मा-गांधीपासून श्री जवाहरलाल पावेतों सर्व प्रकारच्या निरनिराळ्या मतमतांतरांचा अभ्यास करीत असतां मला भेटला व ह्मणाला कीं सदर प्रश्नाचें उत्तर प्रसिद्ध होणें अवश्य आहे; या प्रश्नाचें उत्तर या प्रस्तावनेंत देण्यास हरकत नाहीं.

ज्या पुस्तकानें हिंदी नपुंसकत्वाची प्रसिद्धी केली त्या पुस्तकाच्या जवळपास दोन वर्षांनीं माझें पुस्तक प्रसिद्ध झालें. "मदर इंडिया" ला अनेक उत्तरें मिळालीं तरी त्या पुस्तकाचें वाचन चालूच राहिलें. हिंदुस्तानांत जितकी जास्त दुष्कीर्ती तितक्याच प्रमाणांत जगांत इतरत्र मिस मेयो कीर्तिमान होऊं लागली. तिचा उद्देश काय होता अथवा ज्या अनेक प्रती फुकट वाटण्यात आल्या त्याला कोणाची मदत होती हें मला सांगणें कठीण आहे; इतकें मात्र निश्चयानें सांगतां येईल कीं त्या पुस्तकानें हिंदुस्थानांतील अनाथ विधवांना मदत करण्याऐवजीं हिंदी स्वराज्याच्या प्रश्नाला मात्र जबरदस्त धक्का दिला.

दोन वर्षें मिस मेयोनें आमच्यातील घाण दाखाविलेला मार्ग अनेक आपापल्या परी चोखाळूं लागले. मेयोपद्धतीनें सफाई केल्यास शेंकडों राष्ट्रांचें कल्याण होऊं शकेल पण सफाईच्या नळाची तोटी मुंबई कलकत्त्यावरच रोंखली होती. "अंकल शॅम" नें जशासतशा स्वरूपाचें उत्तर दिलें. या पुस्तकामुळें पैसे जरी पुरेसे आले तरी यांत पैशाचा विचार नव्हताच. ख्रिस्ती नीतिमत्तेला सुधारणें हाच "अंकल शॅम"चा मुख्य उद्देश आहे.

पण हें मूळ प्रश्नाला (अंकल शॅम अमेरिकेचें खरें चित्र आहे काय?) उत्तर नाहीं असें कोणी ह्मणेल. माझ्या मतें "अंकल शॅम" हें "मदर इंडिया" इतपतच खरें अगर खोटें आहे. अमेरिकेंतील हजारों लोकांच्या मतें "मदर इंडिआ" हें हिंदुस्थानचें प्रामाणिक चित्र आहे; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि हजारों लोक "अंकल शॅम" हें अमेरिकेचें खरें चित्र आहे

असें समजतात. "मदर इंडिआ"तील केक विधानांबद्दल मतभेद आहे तसा "अंकल शॅम" मधील एकाहि विधानाबद्दल नाहीं. पण "अंकल शॅम" हा **गटार-इन्स्पेक्टराचाच रिपोर्ट आहे.** या पुस्तकाची पहिली प्रत मिस् मेयोला "एका गटर इन्स्पेक्टराकडून आपल्या जातभाईस नजर" असा मसूदा लिहून नजर करण्यांत आली होती. या पुस्तकाचा उद्देश ह्मणजे अमेरिकेचें हित करणें, तेथील मिश्र पूजेचा दर्जा सुधारणें व खऱ्या कुमारिकांचें प्रमाण चाढवणें हा होय.

मिस मेयोनें पुस्तकाची पोंच दिली नाहीं. पण अमेरिकन वृत्तपत्रांनां अभिप्राय प्रसिद्ध केले. न्यूयॉर्क टाइम्स ता. २० आगस्ट २९ च्या अंकांत ह्मणतो:- "आमचे देशभक्त जर ह्मणतील कीं, आमचा देश मोठा आहे व श्री. गौबा यांचीं उदाहरणें थोडीं व अपवादवजा आहेत तर रा. गौबा यांचेंहि उत्तर (अंकल शॅममध्यें हें आलेंच आहे.) असें आहे कीं, हिंदुस्थानाहि फार मोठा देश असून त्याबद्दल सरसकट विधानें करणें चुकीचें ठरेल."

"The Charlotte"

"दि शॅरोलेट(N. C.) न्यूज" आपल्या १-९-२९च्या अंकांत ह्मणतो:-"

"हें खरें चित्र आहे काय? होय; मेयोच्या हिंदुस्थानविषयक लिखाणाइतकेंच हेंहि खरें आहे. हिंदुस्थानांतील कांहीं लोकासंबंधीं जसें "मदर इंडिआ" (Sexual) वैषयिक विषयांवरील लिखाण खरें आहे तसेंच या (अंकल शॅम) पुस्तकांतील लिखाणहि या देशांतील कांहीं लोकाविषयीं खरेंच आहे."

माझें जशास तसें लिखाण हातीं पोंचताच आपण दोघांच्याहि पुस्तकाची एकदम होळी करूं या अशी सूचना मिस् मेयोकडून येईल अशी मला आशा होती पण त्या बाईला हिंदी विधवांचा दुवा मिळत राहील असा अजून भरवंसा वाटत असावासा दिसतो; मला येशू ख्रिस्त धन्यवाद देईल असें वाटतें. दरम्यान बुकसेलर्स आमची दोघांचीहि पुस्तकें बरोबरीनेंच विकीकरितां मांडीत आहेत.

लाहोर
१५ नोव्हेंबर १९२९

कन्हय्यालाल गौबा.

सं. वि. ३२८
३०१/१२

प्रास्ताविक

विशिष्ट राजकीय अथवा सामाजिक उर्मीना ज्या देशांत त्या विशेष स्वरूपांत दृग्गोचर होतात त्या देशांचीं नांवे पडतात. उदाहरणार्थ प्राशिअनिझम् अमेरिकनिझम इ० प्रिन्स बिस्मार्कबरोबर प्राशेआनिझमचा उदय होऊन १९१४-१८ च्या जगद्व्याप्त लढाईंत तो शिखरास पोंहचला होता. अमेरिकनिझम जास्त तापदायक स्वरूपांत लढाईनंतर पासून भासूं लागला. गेल्या दहा वर्षांत पारिस्थित्यनुरूप या अमेरिकनिझमचा बोलबाला फारच झाला. या अमेरिकनिझमची मीमांसा करून त्याचा जगांतील एक शक्ती-अगर संकट ह्मणा पाहिजे तर—या दृष्टीनें स्पष्टीकरणाचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे. तत्व प्रतिपादन व प्रत्यक्ष आचरण किंवा प्रसिद्ध होणारी माहिती व वस्तुस्थिती यांतील तफावत दाखवून सुधारणेचा बेफामपणा या पुस्तकांत चित्रित केला आहे.

कायदे, रीतीभाती, आणि राज्यकर्त्यांचे धोरण या संबंधींचे या पुस्तकांतील विवेचन वाचून सामान्य अमेरिकनला विजेचा झटका बसेल. अशा प्रकारचे वर्णन अत्याचारात्मक असून अमेरिकेचे हे निःपक्षपाती चित्र नाहीं असेंही तो ह्मणेल. कांहीं लोक या पुस्तकाचीं जाहीर होळी सुद्धां करतील. पण या पुस्तकांत व्यक्तीं संबंधीचा विचारच केला नाहीं. कैक अमेरिकन व्यक्तींना यांतील वर्णन तिळमात्र लागू पडणार नाहीं. पण मला सामान्य स्वरूपाचे वर्णनच करणें शक्य आहे. याला अपवाद जर असतील तर त्यामुळें माझ्या सामान्य विधानांना पुष्टीच मिळेल, माझीं अनुमानें चूक असतील; माझे तर्क कांहीं ठिकाणीं चुकले असतील, कांहीं वर्णन केलेल्या गोष्टी अपुऱ्या अगर चुकीच्याहि असतील. असें असेल तर "Sham" मधील काढण्यास प्रत्यवाय नाहीं; पण निव्वळ भावनांना बळी पडण्यांत काय अर्थ आहे."

प्रत्येक राष्ट्रास दारू आणे उपरी लोकांस बंदी करण्याचा हक्क आहे; व ह्मणून स्कॉच व्हिस्की जर अमेरिकेंत वर्ज्य मानली जात असेल अथवा चीनी

माणसाला अमेरिकेचे जन्मजात हक्क मिळूं शकत नसतील तर तें ठीकच आहे; पण इतरांचीं भरमसाट बदनामी करण्याचीं जी नवी लेखनाची शक्कल काढण्यांत आली आहे तिचें समर्थन कसे करणार ? अटलांटिक समुद्राच्या पैल तीरावर राहून झुलूंची नीतिमत्ता, फिलिप्पिनोंचा ऱ्हास, हिंदूंचें नपुंसकत्व व जॉनबुलचा (इंग्लंडचें) ढोंगीपणा यांबद्दल भरकटणें हें एक नवे करमणुकीचें साधन समजावयाचें कीं काय !

म्हणून प्रथमच हें सांगून टाकलेलें बरें कीं सदर पुस्तक वर निर्देशिलेल्या प्रचाराला प्रत्युत्तर म्हणून आहे. ' नक्कल हा प्रशंसेचा अत्युत्कृष्ट प्रकार आहे या म्हणीनुरूप मात्र हीं नक्कल नव्हे कारण या उत्तरानें कांहीं लेखकांची जरी यांत प्रशंसा होत असली तरी अमेरिकेला (Uncle Sam) मात्र ती तशी वाटणार नाहीं. हा जबाब कडक असेल, रोखठोक असेल किंबहुना ओंगळहि असेल पण कसाहि असला तरी यांतील सर्व विधानां-बद्दल खुद्द अमेरिकन लोकच मुख्यत्वेंकरून जबाबदार आहेत.

जें सूर्यप्रकाशाइतकें कठोर सत्य होतें तें जाहीर करण्याचें मी टाळलेंहि असतें. पण मला ज्यां पासून इतर लेखकांना बचाव करण्यास वाव नव्हता अशा दोन आरोपापासून माझा बचाव करण्याची घाई पडली. पैकीं पहिला, चूक विधानांबद्दलचा; पण ज्याअर्थीं माझीं विधाने अमेरिकनांच्याच प्रसिद्ध मजकुरावरून घेतली आहेत त्याअर्थीं त्यांच्या खरेखोटेपणाबद्दल सर्व जबाबदारी त्यांजवरच आहे; दुसरा तिखटमीठ लावण्याबद्दलचा. पण हा मिस मेयोच्या बाबतींत क्षम्य मानला गेला. माझ्या बाबतींत हा जास्तच क्षम्य ठरला पाहिजे, कारण ज्या ओंगळ आयुष्यक्रमाचें वर्णन त्या पुस्तकांत आहे त्याला उत्तर देतांना जशास तसें झाल्याशिवाय होणार तरी कसें! पण माझ्या लेखनांत मत्सरबुद्धी कोठेंहि नाहीं. मिस मेयोला जसें हिंदुस्थान देशाला सत्य समजावून सांगण्याची इच्छा झाली तद्वतच अमेरिकेलाहि कठोर सत्य समजावे हीच माझी पण इच्छा.

प्रस्तुत पुस्तक लिहितांना खुद्द लेखकाला परिचित गोष्टी व अमेरिकेंत प्रसिद्ध असलेला मजकूर यांचेंच सहाय्य घेतलें आहे हें मुद्दाम सांगावें हें बरें.

फारच थोड्या इतर लेखकांचा हवाला क्वचित् देण्यांत आला आहे पण हे लेखक निर्विवादपणें निःपक्षपातीय असेच आहेत. "दि लिटररी डायजेस्ट" व "करंट हिस्ट्री" या दोन अत्युत्कृष्ट व तज्ञ अमेरिकन वृतपत्रांचा लेखक याचा मी फार आभारी आहे. त्याचप्रमाणें मेंकिनचे "अमेरिकाना," डॉ. एडिथ हुकरचे "लॉज ऑफ सेक्स" "जातींच्या परस्परसंबंधाविषयीं शिकागो कमिशनचा रिपोर्ट" व वूलॅस्टनचें "प्रास्टिटयूशन इन यूनायटेड स्टेट्स" या पुस्तकांचाहि फार आभारी आहे.

Sex संबंधींच्या माहितीबद्दल मॅक फॅडन पब्लिकेशन्स, जज्ज लिंडसेचें आधुनिक तरुणांचें बंड" व "कंपॅनिअनेट मॅरेज" यांचा लेखक फार आभारी आहे. स्टीफन ग्रॅहॅमचे "न्यूयार्कमधील रात्री" व व्हायकाऊंट ब्राइसच्या "मॉडर्न डेमॉक्रसी" व "अमेरिकन कॉमनवेल्थ" मधूनही पुष्कळ महत्वाची माहिती घेतली आहे.

(चित्रें अमेरिकन वृत्तपत्रांतली अथवा मित्रांनीं खास या पुस्तकाकरितां काढलेली आहेत. दोघांचाहि मी फार आभारी आहे.

सेसील हॉटेल
सिमला S. W. १-५-२९.

क. गौ.

[चित्रांचे ब्लॉक मिळूं शकत नसल्यामुळें भाषांतरांत चित्रें टाकतां आलीं नाहींत.]

भा. क.

अनुक्रमणिका.

प्रकरण.		विषय.		पृष्ठें.
१ लें		नीति पुतळा	...	१ – ८
२ रें		लोकशाहीचीं मूलतत्वें	...	९ – १२
३ रें		सूत्रधारांचें साम्राज्य	...	१३ – २७
४ थें		के. के. के.	...	२७ – ३४
५ वें		नीग्रो	...	३४ – ५३
६ वें		एक धादांत खोटी थाप	...	५३ – ६३
७ वें		अमेरिकेची कन्यारत्नें	...	६३ – ७५
८ वें		अमेरिकन अप्सरा	...	७५ – ७९
९ वें		अनीतिमान कामचेष्टाविहार		८० – ९३
१० वें		असें अपघात हे व्हायचेच	...	९४ – १०४
११ वें		देवाचे दारीं	...	१०४ – १११
१२ बें		विवाहवृक्षाचीं फळें	...	१११ – १४२
१३ वें		मेणकट डाग	...	१४२ – १६८
१४ वें		देव धर्म आणि कं. (इन्कार्पोरेटेड.)		१६८ – १९५
१५ वें		बंडखोरीचा एक प्रयोग	...	१९५ – २२२
१६ वें		युद्ध-बहिष्कार	...	२२३ – २४२
१७ वें		अंकल शॅम !	...	२४१ – २५२

शाम काका.

प्रकरण १ लें.

नीति पुतळा.

कांहीं दिवसांपूर्वीची गोष्ट. अमेरिकेचा प्रेसिडेंट होऊं पाहणाऱ्या एका होतकरू उमेदवाराच्या सन्मानार्थ मेजवानीचा थाट चालू होता. मद्याचे प्रवाह सुरू होते आणि होतकरू अध्यक्षाच्या उजवीकडे एक फटाकडी तरुणी व डावीकडे दारूविक्यांचा राजा बसला होता. अशा उदात्त (?) वातावरणांत, आणि जमलेल्या स्त्रीपुरुषांच्या टाळ्यांच्या कडकडाटांत स्वतःच्या सावकार राष्ट्राच्या वतीनें दिवाळखोर जगाला या होतकरू अध्यक्षानें पुढील आशिर्वादवजा संदेश दिला.

"अमेरिका हें जगांतील अत्यंत बलाढ्य राष्ट्र असून अमेरिका इतिहासांतील विराट नीतिपुतळा आहे. सर्व जगाचीं राज्यकारभाराचीं सूत्रें फारच लवकर सर्वस्वीं अमेरिकेच्या हातींच येणार. "

विश्व आणि व्यक्ती यांबद्दलच्या कल्पना सर्वत्र एकसारख्या नसतात. हवामान, परिस्थिती व इतिहास इत्यादींचा या कल्पनांवर परिणाम होतो. पौर्वात्य संस्कृतीचा उदय जुन्या काळच्या जंगलांतून झाला. इतिहासाच्या सुरुवातीपासून पौर्वात्य संस्कृतीचा निसर्गाशीं निकटचा संबंध आहे. पाश्चात्य संस्कृती विरुद्ध मार्गानें पुढें जात आहे. आधुनिक संस्कृतीचा उद्देश निसर्गावर विजय मिळवून निसर्गाला माणसाचा नोकर बनविणें हा आहे. या संस्कृतीप्रमाणें मनुष्य व निसर्ग या दोन जणु काय परस्पर विरोधी शक्ती असून प्रत्येक दुसरीवर विजय मिळविण्याचा कसून प्रयत्न करीत आहे. निसर्ग हा माणसापेक्षा श्रेष्ठ कीं माणूस निसर्गापेक्षां बलिष्ठ ? वस्तुतः मानव व निसर्ग हे पुष्प व पुष्पपराग यांजसारखे एकत्र वास करणारे असून एकाच महत्सत्याचीं हीं दोन अंगें आहेत.

कांहींचें असें म्हणणें आहे कीं पाश्चात्य संस्कृतीपुढें आज दोन मार्ग फुटलेले दिसत आहेत. मनुष्य, राष्ट्र व साम्राज्य या सर्वांना कधीं तरी पडता काळ येतोच. या काळांत व्यक्तींना ह्लातारपण येतें, राष्ट्रांचें पांगापांग होते व संस्कृती अधोगामी व अनीतिमान बनते. संस्कृती ठार बुडणार अशी जी ओरड आपण सर्वत्र ऐकतों तिचा आपणांस सध्यां विचार कर्तव्य नाहीं कारण या ओरडींत विशेष तथ्य नाहीं असें मला वाटतें. संस्कृतीचा कडेलोट होण्यास अजन निदान यूरोपांत तरी कांहीं अवकाश आहे.

पण सुवर्णमुद्रिकेवरचे प्रेम पूर्वजांच्या उज्ज्वल ध्येयांवरुल वाटणाऱ्या आदरापेक्षां वाढलें असेल, खासगी आणि लौकिक आयुष्यक्रमांत सर्वत्र सोनेरी नाण्याची छाप दिसत असेल, गिरिजाघरांचा उपयोग जर ब्रॉडकास्टिंग * स्टेशनां-सारखा होऊं लागला असेल, खून व अनैसर्गिक विषयोपभोग या जर पाद्र्यांच्या मजेच्या मामूली लीला बनल्या असतील, जर प्रौढ मुलें मुली अनीतिमान विषयसुख यथेष्ठ घेत असतील व लग्न ह्मणजे एक ठकबाजीचा प्रकार होऊन बसला असेल तर संस्कृती नरकाभिमुख बनली आहे असें ह्मणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं.

प्रस्तुत पुस्तक द्वेष बुद्धीनें प्रेरित होऊन लिहिलें आहे असा कोणी गैरसमज करून घेऊं नये. त्याचप्रमाणें हे कोणत्याहि राष्ट्रीय अगर आंतरराष्ट्रीय उद्देशानें प्रेरित होऊनहि लिहिलें नाहीं.

कोणत्याहि कर्जबाजारी देशाचा या पुस्तकाला पाठिंबा अगर अर्थ-सहाय्य नाहीं. यांतील विधानें पूर्वग्रह दूषित होऊन केलेलीं नाहींत. अमेरिकेच्या नीतिमत्तेच्या फुशारकीची गोष्ट तर दूरच राहो, पण कोणाच्या फुशारकीला विरोध करण्याचाहि या पुस्तकाचा उद्देश नाहीं. या नीतिमत्तेच्या विराट पुतळ्याचें सत्याच्या मदतीने मोजमाप काढून जगापुढें मांडावयाचे एवढाच

---

* गाणें, भाषण इ. बिनतारी दूरध्वनिवाहक यंत्रद्वारें दूरदेशीं ऐकण्या-करितां यंत्रद्वारा सोडण्याच्या जागा. उ० मुंबईचें ब्रॉडकास्टिंगचें ठाणें.)

या पुस्तकाचा उद्देश आहे. जर या प्रयत्नाचा निकाल समाधानकारक न निघाला तर मोजमापी करतां वापरलेल्या फुटपट्टीचा (विवानांचा) त्यांत मुळींच दोष नाहीं कारण ही फुटपट्टी (विवानें) अमेरिकन बनावटीचीच आहे.

सुरुवातीला उल्लेखिलेल्या होतकरू भावी अमेरिकन अध्यक्षाच्या मतें अमेरिका सर्व जगाचा राज्यकारभार पत्करणार आहे हें वर आलेंच आहे. मग काय विचारतां ! सर्वत्र जगांत अमेरिकन राष्ट्रगीताचाच ध्वनि ऐकण्यांत येईल. इंग्लंडच्या मुख्य प्रधानाला व्हाइट हौस (अमेरिकन अध्यक्षाच्या वसतिगृहांतून) मधून हुकूम सुटतील, फ्रेंच प्रधानाचा पगार डॉलर्समध्यें देण्यांत येईल व मुसोलिनीला कु-क्लक्स-क्लॅनचा मुख्य नेमण्यांत येईल. पण या अभूतपूर्व चमत्कारांची पर्वणी येण्यापूर्वीच आपण एकवार **शामकाकाचें (अंकल शाम)** जो सॅमकाका नीतिचा विराट पुतळा, लोकसत्ताक पद्धतीचा प्रणेता, सगळ्या जगाचा भावी अध्यक्ष, ख्रिस्ती मिशनचा आश्रयदाता व जगांतील शांतता प्रस्थापनाचा अध्वर्यू समजला जातो त्याचें आपण मोजमाप घेऊन थोडें निरीक्षण करूं या.

या शामकाकाला भरपूर मुलें मुलीहि आहेत पण या तारुण्यानें मुसमुसलेल्यांचे वर्णन जरा पुढें करूं.

मी आजपेक्षां तरुण व एका बोस्टन नगरवासी सुंदर तरुणीच्या प्रेमपाशांत असतांना हें पुस्तक लिहिलें असतें तर बरें झालें असतें. तिचा बाप अमेरिकेंतील श्रीमंतापैकीं व कोणत्या तरी धंद्यांतील- तांड्याच्या अगर शिड्याच्या- राजा होतो.

न्यूयॉर्क शहराची मोहिनी प्रथमदर्शनी ताबडतोब पडणारी अशी आहे. गगनचुंबी इमारती, अनंत अशा वाहनुकीची घरघर, वर्तमानपत्रविक्रयांचे विचित्र-विचित्र आवाज, डोकीवर व पायांखालून जाणाऱ्या आगगाड्या, यापुढे विचारें लंडन शहर कसें जुनाट वाटतें. खिडक्यांच्या झकपकाटांत, " फिफथ ॲव्हेन्यू " (न्यूयॉर्कमधील एक अत्यंत फॅशनेबल रस्ता) च्या खुशालचेंडूपणाच्या सौंदर्यांत, ब्राडवे रस्त्यावरील चकचकाटांत, हार्लेमच्या तालसुरबद्ध नृत्यगान-

नादांत प्रथमच न्यूयॉर्कमध्यें पाय ठेवणारा प्रवासी आपल्या अडचणीहि विसरतो व तारतम्यहि विसरतो. तुम्हीं जर यूरोपांतील एखादी प्रसिद्ध व्यक्ति असाल तर न्यूयॉर्कमध्यें पाय ठेवतांच शेंकडो फोटोग्राफर व वर्तमानपत्रांचे बातमीदार तुमचा फोटो व मतें लक्षावधी अमेरिकन लोकांच्या वाचनार्थ प्रसिद्ध करण्याकरितां सज्ज असे दिसतील. या शहरांत चैतन्य कसें उतूं जात आहे! सर्वत्र दुकानदार एक सारखा धंदा करून डालर्सची जणुं काय टांकसाळी प्रमाणें पैदास करीत आहेत. या शहरांत अत्यंत उंची मोटारगाड्या आजूबाजूंनीं उल्कापातासप्रमाणें भ्रमण करीत आहेत. यूरोपांतील लांबलांबच्या प्रसिध्द राजधान्याशीं टेलीफोनवर लीलेनें गप्पागोष्टी करतां येणें शक्य आहे, आणि नीग्रो नोकरांचा तांडा काय अथवा मनोहारी तरुणी काय सारख्याच सुसाध्य आहेत. सकाळ झाल्या बरोबर टेबलावर जगांतील सर्व प्रकारची बातमी बिनचुक हजर ठेवलेलीच. एकाच दृष्टिक्षेपानें कोणी कोणास सोडाचेठी दिली व शामकाका वेश्याव्यवसायाचें कसें निवारण करीत आहे या बातम्या वाचतां येतील. मॅनहॅटन येथें दिवसां नळांतून गरम पाणी चालू असतें व रात्रौ सर्वत्र मदिरेचे प्रवाह चालू असतात. गैरकायदेशीर दारूच्या गुत्त्यांत हळू बोलण्याची गरज नसते व निव्वळ सोड्यावरच तहान भागविण्याचीहि गरज नसते; कारण यथेष्ट मदिरापानहि अगदीं सुसाध्य आहे.

पलंगावरील चादरी दररोज बदलण्यांत येतात व निजतां वेळींचें पोषाख अत्यंत उद्दीपक असतात. "बॅचलर अपार्टमेंटांतून" - अविवाहितांचे राखीव अड्डे-निरानेराळे खेळ अर्धनग्नस्थितींत खेळले जातात व वॉलस्ट्रीट मधील श्रीमंतांच्या प्रासादांत जगांतील दूरदूरच्या व दुर्मिळ वस्तूंचा संग्रह असतो. उदाहरणार्थ निळ्या पोषाखाचे छोकरे व हिरव्या पोशाखांतील छोकऱ्या, टाटेनखामेनच्या खुर्च्या, नेपोलिअनी हॅटस, पिरॅमिडचे ममावशेष, स्फिंक्सचें नाक व प्रासादाच्या बगीच्यांत पिसाचा झुकता मनोरा व लंडनचा सिनोटाफ याच्याहि नकली हुबेहुब दिसतील. बौद्धकालीन चित्रें, पर्शियाचे गालीचे, बुखाऱ्याची उलांकिटें, डेरेडनचीं चिनीमातीचीं भांडीं, चांदीच्या पेट्या, हस्तीदंती मूर्ती व नक्षीदार रंगीबेरंगी पडदेहि आपणांस आढळतील. भोजनगृहांत अरबस्तानसारखीं चक-

चकीत टेबलें, मेणबत्यांचे चांदीचे स्टँड, मद्यपानाचे खास पेले, आकर्षक चेहरे व रत्नजडीत शर्टांचीं बटणें, इ. दिसतील असें हें न्यूर्याक शहर आहे. पण ही अर्थातच एक बाजू झाली.

दिव्यावर जसा पतंग झडप घालतो तद्वतच दिव्यांचा लखलखाट पाहिल्याबरोबर स्त्री.पुरुषाच्या झुंडीच्या झुंडी करमणुकीकरितां धडपडतात. झुंबरांचा प्रकाश सुंदर शरीरांवर खेळतांना दिसेल, इतःस्ततः फिरणाऱ्या उंचपुऱ्या पुरुषांच्या शर्टांची जडावाची बटणें, स्त्रियांचे वक्षःस्थलावरील दागीने, सुदर पाय या सर्वांवरून प्रकाशपरिवर्तन होऊन सर्वत्र प्रकाश किरण.बाणाप्रमाणें सुटतांना दिसतील. उंची मोटारगाड्या, कडक चंपीगृहें, नखांची जोपासना करणारीं दुकानें अशासारख्या अनेक चोचले पुरवेणाऱ्या साधनांवरून अमेरिकेची भरभराट, चैन, आराम, उधळेपणा व पैशाचें एकमेवाद्वितीय असें श्रेष्ठत्व सिद्ध होत आहे. त्याचप्रमाणें शहरांपासुन दूर अमेरिकेच्या राष्ट्रीय भरभराटींची व कर्तबगारीचीं दुसरींहि प्रत्यंतरें आहेत. डेट्रॉइट येथील मोटारींचा जंगी कारखाना, टेक्सास येथील तेलाचे प्रचंड कारखाने, कान्सास येथील राक्षसी गिरण्या हे शास्त्रकारांनें जगाच्या उद्योग धंद्याला दिलेले तीन जबरदस्त शह आहेत. भांडवलशाही मुळांतच वाईट पण दूरदेशींच्या व निसर्गानें जंगल व खनिज संपत्ती अलोट अशी दिलेल्या या अमेरिकन साम्राज्यांत भांडवलशाहीने मोठमोठाल्या भांडवलवाल्यांचे गट बनाविण्याची शक्कल काढून भांडवलशाहीचे वाईट परिणाम द्विगुणित केले आहेत. अंशतः इ. स. १९१४ च्या महायुद्धानंतरच्या परिस्थितीमुळें, कांहींसे निसर्गदत्त देणगीच्या भरंवशावर व अमेरिकनांचा जो सर्वांत मोठा गुण म्हणजे अखंड मेहनत यामुळें खुद्द इंग्लंडनें केलेल्या अजस्र कर्तबगारीला सुद्धां मागें सारून अमेरिका देश व अमेरिकॉनिझम हे सर्वांत पुढें आले आहेत. पण दुर्दैवें करून औद्योगिक बाबतींतल्या पाहिल्या नंबरावर अमेरिकन संतुष्ट न राहून आज जगाच्या संस्कृतीला ज्यामुळें अत्यंत धोका आहे अशा इतर गोष्टींतही उ० गप्पेबाजी, जुलुम, स्वार्थीपणा, कमालीचें आधिभौतिकत्व. निसर्गाचा विरोध व ईश्वराची थट्टा यांतहि अमेरिकेनें जगाला पुष्कळच मागें टाकले आहे.

डॉलरला अमेरिकन लोक सर्वशक्तिमान समजतात हें योग्यच आहे. डॉलर हा त्यांना जवळपास देवासारखा आहे. खासगी आयुष्यक्रम काय, किंवा

राजकारण काय, त्याचप्रमाणें स्त्री पुरुषांचे संबंध व चर्चे संबंधीं वागणूक, सर्वत्र धंदेवाईक बुद्धीचेंच वर्चस्व आढळून येईल. डॉलरच्या भरंवशावर कायदे वनू शकतात. आणि डॉलरमुळेंच अप्रिय कायद्यांपासून बचावहि करतां येतो. डॉलरनें सर्व नित्यनैमित्तिक चैनी आपल्याशा करतां येतात, डॉलरमुळेंच लग्न ह्मणजे थट्टा होऊन बसली आहे व मातबरदाला आपत्ति समजण्यांत येते. डॉलरच्या भरंवशावर स्वैराचाराला मुभा मिळूं शकते, युरोपांतील खानदानी तरुणी सहज मिळवितां येतात, किंवा इतर सुंदर तरुणीहि गळ्यांत पडतील. डॉलर प्रेमापुढें इतर भावनांना कोणी विचारीत नाहीं. अमेरिकन स्त्रीपुरुषापुढें डॉलर प्राप्तीपेक्षां उच्चतर ध्येय नाहीं; आंगमेहनतीनें व शेतीभाती करून डॉलर मिळत नसेल तर चोऱ्या व बँकफोडी आहेच. व्यभिचार अथवा खोट्या कंपन्यांची उलाढाल या मार्गानेंहि डॉलर मिळवितां येतात. सिनेमांत या सर्व गोष्टींचे शिक्षण मिळतें. डॉलर कसा मिळवावा हें सिनेमांतून शिकावें. त्रासदायक बापाचा कांटा कसा दूर करावा, भावांना विषप्रयोग कसा करावा, बहिणीचा विक्रय कसा करावा हे सर्व सिनेमांत पहावयास सांपडेल.

प्रत्यक्ष आईबाप डॉलर करितां स्वतःच्या पोटच्या गोळ्याला गोत्यांत आणताहेत अशा खऱ्या हकीकतीहि ऐकण्यांत येतील. इतरत्र जगांत मुलाबाळांची आबाळ करणारे व त्यांचे बाबतींत प्रामाणिक चुका करणारे आईबाप आढळतील. क्रूर सावत्र आई, आपमतलबी काका, हृदयशून्य सासू यांच्याहि गोष्टी सांपडतील. चुकत्याच जन्मलेल्या आपल्या अर्भकाला जगाच्या व देवाच्या भरंवशावर मलत्या [illegible] जागाहि मिळतील. भुकेल्या जाचातून सोडविण्याकरितां स्वतःच्या

तांना बायका मुलांची कत्तल करणाऱ्यांचीहि हकीकत नवी नाहीं; अज्ञान अगर मूर्ख पाल्याचा फायदा घेणारे स्वार्थी पालकहि सांपडतील; पण निव्वळ इष्टेट मिळावी या हेतूनें स्वतःच्या मुलीला पागल ठरवून पागलखान्यांत कोंबल्याचें उदाहरण फक्त अमेरिकेंतच आढळेल.*

सामान्यतः कोणत्याहि अमेरिकनला स्वतःच्या ख्रिस्ती धर्मावद्दल मोठा अभिमान वाटतो. पण ख्रिस्ती नीतिमत्ता व शिकवण हीं यूनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेंत जितक्या प्रमाणांत झुगारली जातात तितकीं कोठेच झुगारलीं जात

* "ट्रू स्टोरी मॅगझीनचा" जून १९२८ चा अंक पहा.

नाहींत. दररोजच्या आयुष्यक्रमांत अमेरिकन माणूस ख्रिस्तीधर्मांतील बागणुकीच्या नियमांची इतकीं सरासं पायमल्ली करीत असतो कीं त्याला मोझेसचा कायदा अगर येशूख्रिस्ताची शिकवण यांची आठवण राहणेंच शक्य नाहीं. जर सदसद्विवेक बुद्धीने टोचणी लावलीच तर चित्तशांती मिळविण्याकरितां डॉलरचा रामबाण उपाय आहेच. अख्रिस्ती लोकांना ख्रिस्ती बनविण्याच्या कार्याकरितां मदत म्हणून अमेरिकन माणसानें पैसे दिले म्हणजे त्या विचाऱ्याला खात्री वाटते कीं स्वर्ग साम्राज्यांत त्याच्याकरितां एक शानदार खोली नक्की राखून ठेवण्यांत येईल.

अमेरिकनाच्या या राहणीची तरफदारी केलेलीहि आपण कधीं कधीं ऐकतों; पण ही तरफदारी तिऱ्हाईत प्रेक्षकवर्गाकडून करण्यांत येते. खुद्द अमेरिकन माणसाला स्वतःच्या संस्कृतीची अशीं बचाववजा तरफदारी करण्याची गरज भासत नाहीं. त्याला स्वतःच्या मोठेपणाबद्दल अभिमान वाटत असतो; त्याला त्याच्या देशाच्या राज्यघटनेबद्दल व शक्तीबद्दलही घमेंड असते पण अमेरिकन नीतिमत्तेबद्दलही त्याला तसाच अभिमान वाटतो कीं काय हें सांगवत नाहीं.

सामान्यतः अमेरिकन माणूस पृथ्वीपर्यटणाचा मोठा शौकी. सॅन फ्रान्सिस्कोला वोटींत बसून अमेरिकन एक्स्प्रेस कंपनींत प्रथम हजार डॉलर जमा करावयाचे. नंतर होनोलुलूमध्यें एक दिवस, चीनमध्यें तीन दिवस, सीलोनमध्यें एक दिवस, इटालींत एक आठवडा, व लिव्हरपूलमध्यें एक दिवस अशा प्रकारें प्रवास करून सुमारें तीन महिन्यांत परत न्यूयार्कला पोंचावयाचे हा मामूलीचा प्रवासक्रम. प्रवासामध्यें या प्रवाशानें तोंडावर भिरकाविलेले डॉलर्स केरीवाले व उपासमार होणारे पुराणवस्तु विक्रेते हे आशाळभुताप्रमाणें उचलतात. प्रवास करून परत आल्यावर हा प्रवासी हटकून पुस्तक लिहितो, व प्रत्यक्ष पाहून आलेल्याच्या ऐटीनें मग हा म्हणतो कीं कॅलिफोर्निया सारखीं पींचेस (एक प्रकारचे मधुर फळ) दुनियेंत कोठें होत नाहीं, अमेरिकन संस्था सर्व जगांत उत्कृष्ट ठरतात, त्यानें देणग्या दिलेल्या मिशनसंस्था सर्वोत्कृष्ट काम करीत असतात, हूवर हा लाईड जार्ज पेक्षां श्रेष्ठ ठरतो, व पोपला अमेरिकेंत येऊन दररोज पांच हजार डॉलर्सच्या वेतनावर अमेरिकेंत व्याख्यानांचा दौरा काढण्याबद्दल निमंत्रण

दिल्याचोंहि तो सांगतो.सरतेशेवटीं अमेरिकेंतील दारुबंदीच्या यशास्वितेचा व सामान्यत: अमेरिकेची फुशारकी वर्णन करणारा उपसंहार पुस्तकाला जोडला ह्मणजे पुस्तक संपतें.

या पुस्तकांत अमेरिकनिझमच्या सर्व षोडष कलांचे वर्णन करणें अशक्य आहे. आजच्या अमेरिकन संस्कृतींतील कांहीं महत्वाचे भाग पुढील प्रकरणांतून वर्णन केले आहेत. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं निव्वळ क्षुद्रदोषदिग्दर्शनाच्याच इराद्यानें हें पुस्तक लिहिलें नाहीं. ज्या पूर्वजांचें स्मरण अमेरिकेंत प्रतिवर्षीं करण्यांत येतें त्यांच्या वंशजाकरितां हें लिहीलें आहे. या पूर्वजांनीं आपल्या मायदेशाच्या कटकटींला त्रासून समुद्र ओलांडला व या दूरवरच्या देशांत येऊन आपल्या स्वातंत्र्याच्या संस्था स्थापल्या, व सरते शेवटीं त्यांनी आपल्या मायदेशाला झुगारून दिलें पण हा फार फार जुना इतिहास आहे. या वद्दल मायदेशानें केव्हांच क्षमा केली असून या गोष्टीचा इंग्लंडला विसर सुद्धां पडला आहे.

या नव्या देशाची (अमेरिकेची) हवा या वसाहती पूर्वजांना मानवली असावी असें दिसतें. कारण आजचे अमेरिकन-त्यांचे वंशज-हे नीतिमत्तेचे पुतळे ह्मणून वावरत आहेत. त्यांच्यांत उत्कृष्ट दंतवैद्य आहेत. व चिलटें पिसवा मारण्याकरितां यांनी जगाला 'फ्लिट' दिलें आहे. दुखऱ्या दांतांना आराम व चिलटांपासून बचाव एवढ्या दोनच गोष्टी जरी अमेरिकेनें जगाला बहाल केल्या असत्या तरी जग अमेरिकेचें सदाचें ऋणी बनलें असतें. पण अमेरिका टिनाच्या शेवरोलेट गाड्या, स्वस्त तंबाखू, धर्मप्रचारक व नृत्यगानाच्या रेकर्डस (ग्रेटी) त्याच प्रमाणें गप्पाष्टक व ठकवाजी यांचाहि प्रसार करते. अमेरिका व अमेरिकन जिन्नसा यांची जाहिरात उत्तम देण्यांत येते व या जाहिरातीवर खर्चाहि बराच होतो. पण पुढील प्रकारणांतून सामान्यत: ज्यांची जाहिरात देण्यांत येते उ० जनरल मोटर्स, स्टँडर्ड ऑईल अगर यूनायटेडस्टेटस स्टील यांच्या व्यातिरिक्त इतर अमेरिकन मालांचें वर्णन येणार आहे.

प्रकरण २ रें.

लोकशाहीचीं मूलतत्वें.

आजच तावडतोब शक्य नसलें तरी लोकशाहीचें खरें व अंतिम उद्दिष्ट समता हें होय. १८ व्या शतकांत हें ध्येय सुसाध्य समजलें जाऊन लोकशाहीची मोठ्या उमेदीनें मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. लोकशाहीच्या तात्विक कल्पनेंत जन्मजात श्रेष्ठत्व व उच्चनीच भावनांना महत्व मिळणें शक्य नव्हतें. सर्वांना सारखा वाव व शिक्षण हीं लोकशाहीचीं मूलतत्वें. नव्या उमेदीच्या लोकशाहीच्या तत्वनिष्ठांनीं जोमानें सांगितलें कीं योग्यतेच्या व मेहनतीच्या माणसाला योग्य वक्षीस मिळेल, राजांना मागें खेंचलें जाईल, व सर्वत्र आर्थिक कारभारांत अधिकांचें अधिकांत अधिक सुख या धोरणानें काम करण्यांत येईल. लोकनायकांचें सोंवळेंपण, अल्पसंख्यांकांना संरक्षण, वारसदारीचा नायनाट, इ. गोष्टींबद्दलहि हमी देण्यांत आली. थोडक्यांत सांगावयाचें झणजे सर्व प्रकारें आर्थिक, व सामाजिकदृष्ट्या नव्या सुवर्ण युगाला प्रारंभ होईल असें आंश्वासन देण्यांत आले.

पण आज आपण काय पाहतों ? परिणाम काय झाला ? आश्वासित परिस्थिती कोठें आहे ? आणि प्रत्यक्ष परिणाम काय झाला ?

इतर देशांत लोकशाहीचा कसा बोजवारा उडाला हा विषय प्रस्तुत पुस्तकाचे मर्यादेबाहेरचा आहे. लोकशाहीचा प्रयोग निरनिराळ्या प्रमाणांत निरनिराळ्या दिशांनीं करण्यांत आला असून यशाचें प्रमाणहि भिन्न असेच आहे. १९ व्या शतकांत लोकशाही झणजे लवकरच उदय पावणारें भावी स्वर्ग साम्राज्य असें समजण्यांत येत असे. आज सर्वत्र जगांत लोकशाहीची टर उडविण्यांत येत असून अमेरिकेंत तर सर्वांत जास्त टर उडविण्यांत आहे. रा. मेकेन नांवाचा एक लेखक " नोट्स ऑन डेमॉक्रसी " या ग्रंथांत लिहितोः— " लोकशाहीची कल्पना अत्यंत खुळचट व झणूनच अत्यंत मनोरंजक अशी आहे."

पण खुद्द लोकशाहीच्या कल्पनेपेक्षां ज्या तत्वांकरितां लोकशाहीचा उदय झाला त्या तत्वांच्या अपेक्षेपणामुळें अमेरिकेंस जें नैराश्य दिसत आहे तें कदाचित जास्त मनोरंजक ठरेल. लोकशाहीला पुरेसा वाव मिळाला नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. जगांतील कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकेला लोकशाहीच्या तत्वाबाबत प्रयोग करून ती स्थापण्यास उत्तम परिस्थिती व संधी मिळाली. वेगळेपणा, स्वातंत्र्य, व आर्थिक स्वातंत्र्य, इत्यादिमुळें अमेरिकेला जगापुढें प्रगती, समता, व सामाजिक व राजकीय हितसंबंधांत प्रामाणिकपणा यांचा अनुकरणीय आदर्श मांडता आला असता. पण मि. अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी ह्मटल्याप्रमाणें कदाचित "आमच्या (अमेरिकेच्या) वातावरणांत प्रत्येक प्राण्याला (मग तो माणूस असो कीं जनावर) तुच्छ वनविणारा कांहीं तरी विशेष गुण असावा."

ज्या उदात्त तत्वांनीं अमेरिकन राज्यघटनेचे पहिले उत्पादक प्रेरित झाले होते व आज जी प्रत्यक्ष राज्यघटना ह्यात आहे तिचीं बिंगें यांच्यांतील तफावत या ठिकाणीं स्पष्ट करून सांगण्याची गरज आहे असें वाटत नाहीं. राज्यघटनेच्या पहिल्या कल्पकांचा इरादा खालील महत्वाचीं मूलतत्वें व हक्क राष्ट्राला मिळवून देण्याचा होता:—

(१) सर्व नागरिकांना हक्कांचे बाबतींत पूर्ण समता.

(२) लोकांची संपूर्ण व सर्वव्यापी सत्ता.

(३) गैरशिस्तीनें अधिकार बळकावणाऱ्या व अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या पासून बचाव.

वरील उदात्त ध्येयानें प्रेरित होऊन राज्यघटनेच्या मूळ लेखकांनी राष्ट्राचीं महत्वाचीं तीन खातीं—कार्यकारी मंडळ न्यायखातें व कायदेमंडळ—हीं अगदीं वेगळी असावी अशी योजना केली.

अमेरिकेची राष्ट्रीय राज्यघटना इ. स. १७८१ मध्यें लिहिली गेली. जीं तेरा स्वतंत्र संस्थानें या एकीकरणापूर्वी वेगवेगळ्यानें अस्तित्वांत होतीं त्यांच्या राज्यघटनाच्या सारांशांचा समावेश या राष्ट्रीय घटनेंत केला होता. इ. स. १७८१ मध्ये ज्या दोन बाबींबद्दल लोकमत नाराज होतें त्या बाबतींत फेरबदल करण्यांत

आला. प्रत्येकीं दोन दोन उपसूचना इ. स. १७९८ मध्यें व इ. स. १८०४ मध्यें अनुक्रमें पास करण्यांत आल्या व सोव्हेळ वारनंतर तेरा इतर दुरुस्त्या पास करण्यांत आल्या. चवदावी उपसूचना अत्यंत प्रसिद्ध आहे. कारण इच्या अन्वयें नीग्रोला नागरिकात्वाचे हक्क देण्यांत आले. इतर तीन महत्वाच्या उपसूचना पैकीं एकीनें सीनेटर्स निवडण्याचा हक्क प्रांतिक कायदेमंडळाऐवजीं जनतेस दिला, दुसरीनें स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यांत आला व तिसरीनें मादक द्रव्यें बनविणें व विकणें यांजवर बहिष्कार घालण्यांत आला.

अमेरिकेची राष्ट्रीय राज्यघटना पुढील प्रमाणें आहे:-

(अ) प्रेसिडेंट (अध्यक्ष) हा कार्यकारी मंडळाचा मुख्य असतो. हा चार वर्षांकरितां निवडला जातो व प्रत्येक छोट्या संस्थानांतून विशिष्ट लोकांनाच या निवडणुकीच्या मतदानाचा हक्क असतो.

(ब) कांग्रेस नांवाच्या मध्यवर्ती कायदेमंडळयांत दोन चेंबर असतात. एक लोकप्रतिनिधींची सभा व दुसरें सीनेट. लोकप्रतिनिधी दोन वर्षांकरितां निवडले जातात व यांची निवड प्रत्यक्ष जनता करते. प्रत्येक सरकारी खानेसुमारीनंतर या प्रतिनिधींची संख्या योग्य प्रमाणांत वाढविण्यांत येते. सध्यां या मंडळाचे सुमारे ४५० सभासद आहेत. इ. स. १८७० मध्यें ज्या उपसूचनेमुळें सर्वांना सारखा मतदानाचा हक्क देण्यांत आला तिची दक्षिणेंतील संस्थानांतून सर्रास पायमल्ली चालली आहे. कांहीं तरी निमित्तानें नीग्रोचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्यांत येतो. प्रत्येक संस्थानातून (मग तें कितीहि लहान मोठें असो) दोन प्रतिनिधी सीनेटमध्यें धाडण्यांत येतात. या मेंबरांना पगार असतो न हा हल्लीं दीड हजार डॉलर म्हणजे सुमारें सतवाचार हजार रुपये आहे. यूरोपांतील कायदेमंडळांच्या सभासदांच्या मानानें हा पगार भक्कम आहे.

(क) **कार्यकारी मंडळ**:-यांत निरनिराळ्या खात्यांचे मुख्य व अनेक लहान मोठे अधिकारी यांचा समावेश होतो. या सर्वांची नेमणूक अध्यक्ष करीत असून हे सर्वस्वी अध्यक्षाला जबाबदार असतात. अध्यक्ष व पक्ष यांच्या बदली बरोबर यांच्या नेमणुकीहि बदलतात.

(३) **न्यायखातें**:–दुय्यम दर्जाचीं कोर्टें सर्वत्र पसरलेलीं असतात व या सर्वांवरील एक सुप्रीम (वरिष्ट) कोर्ट असते. वरिष्ट कोर्टांतील न्यायाधीशांची निवड सीनेटच्या सल्यान्वयें अध्यक्ष करीत असतो. यांची नेमणूक आजन्माची असते. यांचेवर जर दोषारोप सिद्ध होऊं शकला तर यांना काढण्यांत येतें. या ठिकाणीं हें नमूद केलें पाहिजे कीं कैक न्यायाधीशांना अशा प्रकारें काढण्यांत आलेलें आहे.

अमेरिकेचीं जीं घटक संस्थानें आहेत त्यांचाहि प्रत्येकीं राज्यकारभार अशा स्वरूपाचाच आहे. प्रत्यक्ष जनता संस्थानाच्या गव्हर्नराची दोन अगर चार वर्षांकरितां निवड करते. गव्हर्नर कार्यकारी मंडळाचा प्रमुख असतो. यांत कांहीं नोकरांची नेमणूक जनतेच्या मतावर अवलंबून असते व कांहींची नेमणूक गव्हर्नर करतो दोन्ही प्रकारचे लोक बहुधा बहुमतवाल्या पक्षाचेच असतात. कायदेमंडळाचीं दोन चेंबर्स असतात व मतदानाचा हक्क सर्वांस सर्वांना असतो. कांहीं संस्थानें सोडून इतरत्र न्यायाधीशांची निवड लोकांचीं मतें घेऊन करण्यांत येते व यांची नेमणूक कांहीं वर्षांकरितां असतें. ही जी निवड करून अधिकारी नेमण्याची तऱ्हा आहे याच्यामागें जनतेच्या सार्वभौम सत्तेचें तत्व आहे. या तत्वान्वयें शक्य तितक्या जागांवर लोकांचीं मतें घेऊन नेमणूक केली म्हणजे अधिकाऱ्यांना आठवण राहते कीं ते सर्वस्वीं लोकसत्तेला जबाबदार असून त्यांची नेमणूक निव्वळ लोकांच्या राजीखुषीवरच आहे. पण तत्वतः जी गोष्ट फार उत्कृष्ट दिसते ती कदाचित प्रत्यक्ष अंमल बजावणींत अजीबात फोल व अयशस्वी ठरूं शकते. आणि अमेरिकेच्या ध्येयवादाचा अगदीं असाच बोजवारा उडाला आहे.

———

प्रकरण ३ रें.

सूत्रधारांचे साम्राज्य.

अमेरिकन राज्य घटनेच्या मूळ योजकांचा " जनतेची सत्ता " या तत्वावरहुकूम एक स्वतंत्र व बलशाली लोकशाही आपले देशांत स्थापण्याचा इरादा होता. पण वाशिंगटन व इतर मूळ राज्यघटनेचे धुरीण यांनीं घातलेल्या पायावर आज डॉलर–भक्त व सावकार यांनीं इमारती उभ्या केलेल्या दिसतील. " जनतेच्या सत्तेचा " कोठेंच पत्ता नसून निरनिराळ्या सूत्रधारांच्या हातीं सर्व सत्ता जाऊन बसली आहे.

रुझवेल्टच्या मतें लोकांचा पुढारी हा लोकांना योग्य मार्गाकडे प्रेमानें वळवितो व सूत्रधार हा हांकलण्याचा प्रयत्न करतो. पुढारी हा लोकांच्या सदसाद्विवेक बुद्धीला निरनिराळ्या गोष्टी पटवून देण्याचा प्रयत्न करतो. सूत्रधार आपली सत्ता युक्त्या प्रयुक्त्या, गुप्त कट, व स्वार्थाच्या निरनिराळ्या भावनांवर युक्तिपूर्वक खेळ करून गाजवितो. आज स्वार्थावर दृष्टि ठेवलेल्या सूत्रधारांच्या हातांत जी सर्व सत्ता जाऊन बसली आहे त्या ऐवजीं निस्वार्थी व खमंग अशा खऱ्या लोकपुढाऱ्यांच्या हातांत सत्ता जाणें अवश्य आहे.

अमेरिकेच्या लोकशाहींत पक्ष उपपक्ष यांचें फार मोठें महत्व आहे. क्रोलीनामक लेखक पक्षांचें वर्णन लोकशासक संस्था या नात्यानें पुढील प्रमाणें करतोः– "लोकांनीं स्वतः जें आपल्या करितां करावयास हवें तें पक्ष उपपक्ष त्यांच्या यतीनें करण्याचा प्रयत्न करतात व पक्षामुळें लोक व राज्यकर्ते यांचे मध्यें दोन सत्ताधारी संस्था उत्पन्न केल्या जातात. कोणत्याहि लोकसेवा करणाऱ्या व्यक्तीनें देशाकरितांच जो स्वार्थत्याग व एकनिष्ठपणाची सेवा करावयास हवी ती या पक्ष उपपक्षांमुळें स्वतःच्या पक्षाकरितां करावी अशी अपेक्षा या पक्ष उपपक्षांची होऊन बसते. यांमुळें मौज अशी होते कीं अमेरिकन मनुष्य व्यक्ती या नात्यानें एकटा कांहीच करूं शकत नाहीं; काम करावयाचें झाल्यास त्याला कोणत्या तरी पक्षांत सामील झालें पाहिजे व पक्षांत सामील झाल्यानंतर

त्याचे कडून पक्षाच्या इभ्रती करितां व टिकाऊपणा करितां भलभलता स्वार्थत्याग त्यानें करावा अशी तो ज्या पक्षांत सामील होईल त्या पक्षांच्या चालकांची इच्छा असते.

अमेरिकन राजकारणांत या पक्षोपपक्षांच्या स्थापनेला शंभरांवर वर्षें होऊन गेलीं असून या अवधींत सर्व राजकारण त्यांच्याच वृत्तीनें होत गेलें. महत्वाच्या जागांवरील नेमणुका या पक्षोपपक्षांच्या वरिष्ठांच्या सल्ल्यानेंच होत गेल्या व या जागावर समाजांत मान्यता असणाऱ्या पण अननुभवी अशा लोकांच्या नेमणुका होत. राज्यकारभाराचीं सूत्रें निराळ्या पक्षाचे हातीं गेल्या बरोबर सर्व जागांवर निराळ्या माणसांची नेमणूक करण्याचा जणुं काय शिरस्ताच पडल्या-सारखा झाला आहे. ह्मणून स्वाभाविकपणें कोणत्याहि पक्षाचा सभासद लोकांच्या मतानुरूप वागण्याची पर्वा न करतां त्या पक्षांतील अध्वर्यूंचीच मिनतवारी करणें जास्त फायद्याचें समजतो. पक्षांतील वरिष्ठांची नाराजी होऊं नये या करितां हा सभासद पक्षाच्या कार्यकारी मंडळाच्या हुकुमावरहुकूम कामें करितो. या सर्व प्रकारामुळें सर्व प्रकारच्या नोकरीच्या जागा या पक्षांतील वरिष्ठांच्या देणगीचा व मर्जीचा प्रश्न होऊन बसल्या आहेत व जे या वरिष्ठांची लाळ घोटणी पुरेपूर करतील त्यांनाच हा नोकऱ्यांचा मलीदा मिळण्याचा संभव असतो. ही गोष्ट निव्वळ कार्यकारी नोकऱ्यांच्याच संबंधानें नव्हे तर न्यायखात्यांतील नोकऱ्यां-संबंधीं सुद्धां खरी आहे.

"मॉडर्न डेमाक्रसीज" मधील [मॅकमिलन कं. लंडन भाग २, पान. १११] खालील उतारा पहा– या पुस्तकांत व्हायकाऊंट ब्राइस यांनीं खालीलप्रमाणं मीमांसा केली आहे.

" निरनिराळे पक्ष स्थापन होऊन यांनीं शहरांचा कारभार आपले स्वाधीन करून घेतला. त्यांनी यांची व्यवस्था करण्यास सुरुवात केली, आपल्या पक्षानकें उमेदवार उभे करूं लागले, व निवडणुकीच्या वेळीं दुसऱ्याचे नांवानें खोटी मतें देणें अशासारख्या निरनिराळ्या अडमार्गांचाहे उपयोग करूं लागले. जर निवडणुकीचे अधिकारी यांच्यांतले असले तर धाकदपटशा, काल्पनिक मतदारांच्या मतपत्रिका कोंबणें, व खोटी मोजणी यांचाहे अवलंब होऊं लागला.

वांच्यांतले अनेक उमेदवार इतके अप्रसिद्ध असत कीं बहुतेक लोकांना त्यांची माहिती नस्से ह्मणून निव्वळ अमुक पक्षाचा एवढ्याच सबबींवर लोकांना अशा उमेदवारांना मत देणें भाग पडे. अशा प्रकारें एखाद्या पक्षाला सर्व प्रकारच्या नोकऱ्यांच्या जागांवर आपल्या हातांतली बाव्हली या अज्ञानी लोकमताच्या भरंवशावर सहज नेमतां येई व यांतील जे प्रमुख असत त्यांना ठेके विकतांना अगर विशिष्ट हक्क विकतांना (उ० ट्राम लाइनींचा हक्क) अथवा ज्या कंपन्यांना कायद्याविरुद्ध कामें करावयाचीं आहेत त्यांच्या हुकमांकडे कानाडोळा करण्याची फी या नात्यानें भरपूर पैसा खातां येई."

ज्या मार्गानें कांहीं आपमतलबी धंदेवाइक राजकारणी लोक शहरोशहरीं प्रथम विशिष्ट पक्षांचीं व नंतर त्या शहराच्या व्यवस्थेचीं सूत्रें आपल्या हातीं घेत त्या मार्गांचा पत्ता लागणें फार कठीण आहे. कारण या कटाचे जे मुख्य असतात त्यांचे कट नेहमीं गुप्तपणेंच चालतात व त्यांच्या लौकिक कामाच्या वृत्तांताच्या रजिस्टरांतून त्यांच्या कृत्यांचें फक्त बाह्यांगच दिसूं शकतें. प्रथमतः कांहीं वस्ताद लोक पुढें पुढें करून लोकांचें लक्ष आपलेकडे वेधतात व मॅनेजिंग कमेट्यांवर स्वतःला निवडून घेतात. त्या ठिकाणीं आपमतलबीपणाचाच एकमेव उद्देश असणाऱ्या लोकांचीं एकमेकांत ओळख होते. मग हे लोक ज्या लोकांच्या आज्ञाधारकपणावर विश्वसून राहतां येईल अशाच लोकांना निरनिराळ्या कामांवर नोकरीला ठेवतात व अशा प्रकारें एक बेजबाबदार कट अस्तित्वांत येतो. आणि निव्वळ ठामेठोकपणाच्या भरवशावर हे सत्ता गाजवूं लागतात. यांत सूत्र चालकांची संख्या लहानच असते. परंतु या सूत्रचालकांताहे एकादा सर्वांत धूर्त असतो. त्याच्या धूर्तपणामुळें व लोकरंजक गुणांमुळें त्या पक्षांतले इतरेजन त्याच्या मागें असतात. जर त्यांच्यांत पुढारीपणाचे गुण, धैर्य, आत्मविश्वास, व तडफ हीं असतील तर हा सर्वांवर वरिष्ठ होऊन बसतो. लोकशाहीचे चाहते समतेच्या गोष्टी करोत पण कोणत्याही राज्य व्यवस्थेंत अगर पक्षव्यवस्थेंत योग्यतेची व चांगल्या कामाची गरज आहेच. ह्मणूनच लोकशाहीमध्येंहे असे लहान लहान स्वच्छंदी सूत्रधारांचें कट नैसर्गिकच निर्माण होतात. ज्याअर्थीं जोमदार व चलाख इच्छाशक्तीच्या भरवशावर यश मिळत असतें त्या अर्थीं हे गुण ज्यांच्यांत

असतील ते सहजच वरचा नंबर पटकावितात. अशा प्रकारें मूलतः लोकशाहीच्या तत्वावर स्थापिलेला पक्ष लोकशाहीचे नियम कागदोपत्रीं एकीकडे पाळीत असतो व लोकशाहीच्या तत्वांची टिमकी वाजवितो व दुसरीकडे वर वर्णिलेल्या स्वच्छंदी सूत्रधारांच्या कटाचा जो मुख्य त्याचे हातीं जाऊन बसतो. इतर कटवाले या मुख्य सूत्रधाराचे प्रमुख सल्लागार बनतात. *

अशा प्रकारें लोकशाहीच्या उदात्त तत्वांना फांटा मिळून सर्वत्र या सूत्रधार परंपरेनें आज न्युयॉर्कमध्यें गेल्या ८० वर्षें सतत राजनैतिक पुढारीपण गाजविलें आहे. त्यांची तुलना ज्यांनीं निव्वळ लष्करी जोराचे भरंवशावर राज्य चालविलें अशा रोमन साम्राज्याच्या नीरो पासून कांस्टंटाइन पर्यंत झालेल्या राजांच्या परंपरेशीं करतां येईल. हे रोमन साम्राज्याचे राजे वंशपरंपरागत नव्हते किंवा लोकांनीं निवडलेलेहि नव्हते. †

मोहल्ल्या मोहल्ल्यांचे राजकारणी लोक समाजाच्या हलक्या दर्जाच्या भागांत आपली कारवाई चालवून पैसे उकळतात. व यांचे पुढारी मतदार लोकांची एखाद्या सैन्या प्रमाणें हालचाल करितात. पण मुख्य सूत्रधार स्वतःला मोठ्या जागा बळकाऊन त्या ठिकाणीं खोऱ्यानें पैसा गिळंकृत करतात.

थोडक्यांत सांगावयाचें झणजे अमेरिकन राज्यघटनेच्या मूळ संस्थापकांनी निर्माण केलेल्या संस्थांना भेदवाईक लोकांनीं अत्यंत विपर्यस्त रूप दिलें व तेलाच्या खाणीवाले, आगगाड्यांचे मालक, कू-क्लक्स-क्लॅन, धर्म गुरू, व "Professional grafter" इत्यादि (झणजे खुद्द शंभर टक्के नागरिक जे आहेत, त्यां खेरीज) इतर लोकांच्या हातांत सर्व सूत्रें जाऊन बसली.

वालस्ट्रीटची [१] सत्ता देशोदेशीं माहीत आहे, व वॉलस्ट्रीट मधील सूत्रधार

---

* मॉडर्न डेमाक्रसीज (वरचेंच पुस्तक) भाग दुसरा पान १११.

† दोन्ही उतारे मॉडर्न डेमाक्रसीज या पुस्तकांतीलच आहेत.

[१] वालस्ट्रीट या रस्त्यावर अत्यंत मोठ्या व प्रमुख अमेरिकन बँकांचीं आफिसें आहेत झणून वालस्ट्रीटचा उल्लेख द्रव्य शक्तीचें द्योतक या नात्यानें करण्यांत येतो.

हे एका अर्थी जगाचे सूत्रधार आहेत. वालस्ट्रीट कायदेमंडळांतून वाटेल ते कायदे पास करवूं शकते. वॉलस्ट्रीट लढाई पुकारूं शकते अथवा तहनामेहि करू शकते. लिंडबर्गच्या उड्डाणाला ह्मणा अथवा मेक्सिकोच्या स्वारीला ह्मणा वॉलस्ट्रीट पैसा पुरवूं शकेल. पॅन अमेरिकन कांग्रेस = (अमेरिकामयत्व प्रचारा-करितां सभा), इंग्लंडशीं जलयानासंबंधीचा तह, चीन मधल्या व्यापाराकरितां दरवाजा खुला करणें, फिलिपाइन मध्यें ट्रस्ट वजा सत्ता चालविणें, नायकारगुआ मधील स्वतंत्र संस्था सुरक्षित ठेवण्याच्या मिषानें लुडबुड करणें इ. सर्व गोष्टींत वॉलस्ट्रीटचे हितसंबंध गुंतले असून वालस्ट्रीट या सर्वां कडे काकदृष्टीनें पाहते.

वालस्ट्रीटच्या सर्वव्यापी शक्तीवद्दल खुद्द प्रेसिडेंट विल्सन यांचे सर्टिफिकेट आहे. " न्यू फ्रीडम " मध्यें विल्सन साहेब लिहितात " वालस्ट्रीटमधून राज्य-व्यवस्थेचीं सूत्रें हालविली जात आहेत व खुद्द प्रेसिडेंट सुद्धां कुर्निसात करून "जी हुकूम" ह्मणून काय आज्ञा आहे हें ऐकण्याकरितां वालस्ट्रीटमध्येंच जातो." वालस्ट्रीटमधील राजकारण व नीतिमत्ता ही एकाच दर्जाचीं आहेत. ज्यांचे वास्तव्य पार्क ॲव्हेन्यू या शानदार रस्त्यावर आहे, जे पॅकर्ड सारख्या उमद्या व विनआवाजी मोटारींतून फिरतात व ज्यांना उंची व किंमती वारांगना सुसाध्य आहेत असे रबराचे (धंद्यांतील) राजे, पोलादाचे (धंद्यातील) नवाब, तेलाचे (धंद्यांतील) शहानशाहा; हे जितक्या सहज एखाद्या सीनेमा नटीला अथवा रशियन नर्तकीला आपलीशी करू शकतात तितक्याच सफाईनें खजान्याचा सेक्रेटरी अथवा सीनेटर अथवा वृत्तपत्रचालक यांना विकत घेऊं शकतात. पन्नास हजारांची लांचलुचपत ह्ताशीं दिसत असतां निव्वळ मताच्या सक्षेपणाकरितां ती लाथाडणें हे वाटतें तितकें सोपे नाहीं. डॉलर्सचा खुळखुळाट असला ह्मणजे डॉलर्सचेंच साम्राज्य असणार; तेथें नीतिमत्तेचा विचार कोण करतो ?"

लोकांत प्रचलित असलेल्या कुजबुजीसंबंधीं सीनेट ज्या चौकशी कमिट्या नेमते त्यांचे रिपोर्ट, निवडणुकीच्या वेळीं प्रतिपक्षी उमेदवार एकमेकांच्या काढतात त्या उखाळ्या पाखाळ्या, व संस्थानी अधिकारी व उपसंस्थानी अधिकारी यांना अपराध्यांच्या विरुद्ध लढावे लागणारे असंख्य खटले या सर्वावरून या वेळवर्तीत परिस्थिती कशी आहे हें स्पष्ट होईल.

चाटानुगा टाइम्सच्या संपादक वर्गापैकीं एक रा. आर. ए. पॅटन " करंट हिस्ट्री " मध्यें लिहितात.

"उत्तरेकडील संस्थानांतून (दक्षिणेच्या मानाने) अत्याचार प्रवृत्तीकमी आहे पण निवडणुकीत मतांचा सर्रास विक्रय होतो, लायक माणसें नोकरीवरून कमी करण्यांत येतात, व नालायकांना त्यांच्या जागा देण्यांत येतात. एकंदरींत म्युनिसिपालट्या, काऊंटी व खुद्द देशाचा कारभार येथें सर्वत्र कुजकेपणा व कटवाजी यांचा सुळसुळाट झाला आहे."

यूनायटेड स्टेटसच्या सीनेटच्या एका कमिटीनें नुक्तीच एका तेलाच्या भानगडी संबंधीं चौकशी केली. त्यांत बऱ्याच मनोरंजक गोष्टी बाहेर आल्या.

तेलाच्या व्यापारासंबंधीं घोटाळा चव्हाट्यावर आला, त्याची चौकशी करण्यासाठीं यूनायटेड स्टेट्सच्या सीनेटनें एक कमेटी नेमली होती. ह्या चौकशींतून कांहीं फारच मौजेच्या गोष्टी उजेडांत आल्या! नोव्हेंबर स. १९२३ मध्यें हॅरी एफ. सिन्क्लेअर नांवाच्या एका इसमाने, रिपब्लिकन नॅशनल कमेटीचे चेअरमन दिव्. एच्. हेस ह्यांच्या स्वाधीन केलेल्या २६०,००० डॉलर किंमतीच्या लिबर्टी बाँडच्या फेडगुडशाही बदल कांहीं इसमांनीं बनावटी दानपत्रें लिहून दिलीं असल्याचें ह्या चौकशींत दिसून आलें. शिकागो येथील धान्याचा व्यापारी जेम्स ए. पॅटन ह्यानें साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत उभें राहून जबानी दिली कीं, पार्टी फंडास त्यानें देणगी दिल्याबद्दल प्रत्येकी १५०० डॉलर किंमतीचे पंचवीस लिबर्टी बॉड त्याला देण्यांत आले होते. ट्रेझरीचे सेक्रेटरी, एन्ड्रयू. डब्ल्यू. मेलॉन ह्याने सीनेटर वेल्श ह्याना पत्र लिहून कळविलें कीं, 'पूर्वी कांहीं न ठरावितां रा. हेस ह्यांनीं माझ्याकडे पाठविलेले ५०,००० डॉलर किंमतीचे लिबर्टी बाँड मी त्यांच्याकडे परत पाठविले; परंतु त्याच सुमारास किंवा त्यानंतर थोड्या दिवसानांच, मी त्यांच्याकडे माझ्या स्वत:च्या रकमेपैकीं ५०००० डॉलर पाठवून दिले. एवढी रकम फंडास देण्याचा माझा हेतु होता." इ. स. १९२० सालच्या रिपब्लिकन नॅशनल कंपेनमध्यें पडलेल्या तुटीची अंशतः भरपाई करण्यासाठीं खिस्तवासी जान प्रॉट याने जी ५०००० डॉलरची रकम दिली त्या बाबत त्याच्या कागदपत्रांत पेंसिलीनें 'वीक्स', एन्डी', 'डु पॉन्ट', आणि 'बटलर' ह्या नांवांचा उल्लेख करून ठेवलेला

आढळला, ह्मणून सीनेटला दुसऱ्याही अनेक नव्या मार्गांनी आपली चौकशी सुरू करतां आली. रिपाब्लिकन नॅशनल कमिटीचे चेअरमन विलिअम बटलर यांनां न्यांच्या मंडळीच्या अब्रूवर हे जे 'तेलाचे डाग' पडले आहेत ते धुवून टाकण्यासाठीं आवश्यक ते उपाय अंमलांत आणण्याविषयीं मी दिनादिलें आहे, असें सीनेटर बोऱ्हा यांनीं नमूद करून ठेवलें आहे. तेला वद्दल ह्या संस्थेने जो हा निधी अनीतिपूर्ण मार्गाने गोळा केला तो परत करण्याविषयीं सीनेटर बोऱ्हा यांनीं सूचना केली होती.

ह्या संबंधींच लिहितांना, हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे एमेरिटस प्रोफेसर, आलवर्ट बुशनेल हार्ट ह्मणतात:—

"कितीतरी महिने चौकशीचें काम कसोशीनें चालल्यानंतर, द्रव्यदानानें आपणांस इष्ट अशा गोष्टी सरकारांतून प्राप्त करून घेण्यासाठीं जवाबदार सरकारी अधिकाऱ्यानां त्यांच्या कर्तव्यापासून भ्रष्ट करण्याच्या गुन्ह्याबद्दल, न्यायकोर्टाचा अपमान केल्याबद्दल ह्या वदमाश गुन्हेगारांच्या टोळी पैकीं कांहीं, तुरुंगवास भोगीत आहेत. कोर्टाच्या हद्दी बाहेर पळ काढल्यामुळें किंवा एकमेकांविरुद्ध साक्ष देण्याचें नाकारल्यामुळें अद्यापिही कांहीं श्रीमंत वदमाश शिक्षेच्या तडाख्यातून बांचलेले आहेत. या सर्वांत अत्यंत अपराधी असणाऱ्या कंपन्यांतील महत्वाच्या भागीदारांपैकी दोन तीन सन्मान्य अपवाद खेरीज करून बाकीचे सर्व अद्यापिही आरोपींच्या पाठींशीं उभे राहून त्यांनां सहाय्य करीत आहेत, इतकेंच नाहीं तर ते त्यांनांच पुनः पुनः या व दुसऱ्या जवाबदारीच्या अधिकारासाठीं निवडून देत आहेत.

कायद्याची थट्टेवाजी व लांच लुचपतीचा सुळसुळाट यांचे खरें कारण हें आहे की ज्या 'धंदेवाईक' पणा बद्दल अमेरिकन माणसाला अभिमान वाटतो त्या धंदेवाईकपणा लौकिक कामांतून शिरला आहे. पक्षाच्या सूत्रधाराकडे नोकऱ्यांची खैरात करण्याचा हक्क असल्यामुळें या नोकऱ्या मिळणें बहुधा अविश्वसनीय व स्वार्थसाधू अशा राजकारणी पुरुषांच्या इच्छेवर अवलंबून राहतें. अतर्क्य अशा भरमसाट प्रमाणांत अमेरिकन राज्य कारभारांत लांच लुचपतीचा शिरकाव झाला आहे. सर्वांगीण चौकशीवरून असें दिसतें कीं शेंकडा नव्वद या

प्रमाणांत हे घोंटाळें असतांतच असें ह्मणावयास बिलकुल हरकत नाहीं. लोकशाहीच्या १३९ वे वर्षीं सीनेटर आ. जेम्स. टी. हेफ्लीन यांनीं १९२५ मध्यें अल्बामा येथें भाषणांत ह्मटलें:– "फेडरल खात्यांतून सोद्यांचा व अड्ल्यांचा सुळसुळाट आहे."

सरकारी पैसा खासगी कामासाठीं उपयोगांत आणण्यासंबंधीं तेथें फारसा प्रतिबंधनिषेध नाहीं. इ. स. १९२० च्या नोव्हेंबर महिन्यांत व्हर्मान्ट येथील गव्हर्नर होरेस एफ् ग्रॅहम याला सरकारी रकमेची चोरी केल्या बद्दल पाच वर्षांपासून आठ वर्षें पर्यंतची शिक्षा ठोठावण्यांत आली.

इ. स. १९२१ सालीं, सरकारी रकमेंतून ५३५००० डॉलरची अफरातफर केल्याचा आरोप, इलिनॉइस येथील गव्हर्नर स्माल आणि लेफ्टनंट गव्हर्नर स्टर्लिंग या दोघांवर ठेवण्यांत येऊन त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. त्यांच्यावर ठेवण्यांत आलेल्या गुन्ह्याची हकीगत अशी होती:– ग्रँट पार्क बँक नांवाची एक संस्था होती त्या बँकेच्या 'सेफ फंड' मध्यें सरकारी रकमा जमा करण्याच्या कटांत उपरिनोर्दिष्ट दोघे अधिकारी सामील होते. वास्तविकपणें, 'ग्रँट पार्क बँक' ही एखादी बँक होती असें नाहीं. हें नुसतें नांव होतें, आणि ह्या नांवाच्या आवरणाखालीं स्माल, स्टर्लिंग आणि त्यांचे साथीदार आपले काळेबेरें व्यवहार चालवीत असत. सरकारी रकमा ह्या 'बँकेत' (?) ठेवी ह्मणून घेऊन त्या बद्दल शेंकडा २ डॉलर प्रमाणें सरकारला व्याज द्यायचें; आणि त्याच रकमा दुसऱ्या व्यापारी संस्थांना कर्जाऊ देऊन त्यांच्या जबळून भरपूर व्याज उकळावयाचें, घेतलेल्या आणि सरकारला दिलेल्या व्याजांत कधीं कधीं शेंकडा ५ पासून ८½ डॉलर पर्यंतचा फरक असे, व हा फरक ह्मणजे ह्या सोद्यांचा नफा किंवा मिळकत असे !

इकडे ह्या असल्या भानगडीची चौकशी चालू असतानाच, तिकडे ओक्लाहामाच्या गव्हर्नर संबंधीं अशीच एक दुसरी भानगड उपस्थित झाली होती. बँक आफ ओक्मल्जी नांवाची एक बँक होती. ह्या बँकेची स्थिती असमाधानकारक असून, तींत ठेवलेल्या ठेवी परत मिळणें अशक्य आहे, ह्या गोष्टीची गव्हर्नरला जाणीव होती; आणि तरीही सरकारी रकमा त्या बँकेतच ठेवण्यासाठीं गव्हर्नर साहेबांना बँकेकडून २५००० डॉलरची चोरमरी देण्यांत आली होती ! ह्या कृत्याबद्दल गव्हर्नर साहेबांवर खटला भरण्यांत आला.

गव्हर्नरांचें हें असें वर्तन राज्यचक्रांत सर्वत्रच माजलेल्या गोंधळाचें निदर्शक आहे. अमेरिकन लोकांचीं नीतिमत्ता किती अधोगतीस गेलेली आहे, हें ह्यावरून दिसून येते. गव्हर्नर झटला झणजे तो समाजांतील एक फारच उच्च दर्जाचा इसम असतो. परंतु एका मागून एक गव्हर्नरावर असले आरोप ठेवण्यांत येऊन त्यांना न्यायकचेऱ्यांत ओढले जात आहे, तरीही त्यापासून जनतेच्या अंतः-करणांत यत्किंचितही चलबिचल झालेली कधीं आढळत नाहीं.

ह्या शिवाय, शहरांतील अधिकारी, गुप्त पोलिस खातें, दारूबंदीसाठीं नेमण्यांत आलेले अधिकारी इत्यादि दुयम दर्ज्याच्या अधिकारीवर्गांत जे लांच खाणें, सरकारी रकमेचा अफरातफर करणे इत्यादि अनीतीच्या प्रकाराचा धुडगूस चाललेला आहे, त्याचा उल्लेख करावा तरी कुठवर ? हा नुसता रोग नाही, तर सर्व व्यक्तिसमूहाला जिनें सर्रास पछाडलेलें आहे अशी ही रोगाची एक सांथ आहे, असेंच झटलें पाहिजे.

मसाचुसेट्स येथील परिस्थिति सन १९२२ मध्यें खालीं दिल्या-प्रमाणें होती:—

अटर्नी जनरल, जे. वेस्टन ॲलन ह्याच्यावर एका झाताऱ्या गरीब विधवेचे पैसे खाल्याचा आरोप ठेवण्यात आला असून त्याची चौकशी चालू होती. अटर्नी जनरलच्या पदासाठीं त्याची निवड होण्यापूर्वी ह्या बाईचा एक खटला चाल-विण्यासाठीं झणून तिनें ह्याला वकीलपत्र दिलें असून त्याच्या फीदाखल ही रकम त्याच्या स्वाधीन केली होती; न्यायदानाच्या कार्यांत बुद्धिपुरःसर अडथळे उत्पन्न केल्याबद्दलच्या आरे पावरून संस्थानच्या वरिष्ठ कोर्टाचे मुख्य न्यायाधीश जज्ज पीअर्स, ह्याच्यावर खटला चालला होता; ह्या पेक्षांही अधिक भयंकर स्वरूपाचे गुन्हे केल्याबद्दल डिस्ट्रिक्ट अटर्नी नॅथान. ए. टफ्ट्स ह्याला वरिष्ठ कोर्टानें बडतर्फ केले होतें; पूर्वी अटर्नीपदावर नियुक्त असलेल्या उत्तर प्रांतांतील एका इसमावर गुप्त कट केल्याबद्दल खटला चालू होता; बोस्टन येथील किती तरी प्रमुख वकिलां विरुद्ध, त्यांच्या वकिलीच्या सनदा रद्द करण्याबद्दल सरकार प्रयत्न करीत होते; विरुद्ध पक्षाच्या वकिलाच्या कचेरींतून कांहीं महत्वाचे कागदपत्र चोरी करून आणल्याबद्दल तिघां वकिलांवर चोरीचा आरोप ठेवण्यांत आलेला

होता; वकिलांचे दोन तट पडले असून, त्यां पैकीं कोणा एका तटाकडून तरी, न्यायाधिशांनीं दिलेल्या काहीं खटल्यांच्या निकालावद्दल, न्यायाधिशांवर वाटेल तसे आरोप ठेवण्यांत येत होते.

यूनायटेड स्टेटस मधील बराच मोठा भाग 'बोनस बेल्ट' (Bonus Belt) च्या पारिच्छदा खालीं येतो. येथील राजकारणी मुत्सद्यांच्या मंडळींत ह्या 'बोनस बेल्ट' ला फार मान आहे. बोनस बेल्टनें ज्या प्रांताचा बोध होतो त्या भागांत अमेरिकन लीजनचें अत्यंत वर्चस्व असतें ! आणि अमेरिकन लीजन ह्मणजे सार्वजानिक निर्भांतून आलेल्या सदस्यांसाठीं देणग्या मिळवून देणारी प्रमुख संस्था आहे. *

मागील वर्षीच्या प्रेसिडेंटनें केलेल्या भाषणांत ह्या नीतिभ्रष्टतेचें "महत्वाचा प्रश्न" असें वर्णन करण्यांत आलें होतें. सीनेटर बोऱ्हा यांचें एप्रिल २८ ता. ला हॅमिल्टन क्लब पुढें झालेले भाषण त्यांनीं उजेडांत आणलेल्या गोष्टी, स्पष्ट वक्तृत्व इ. गोष्टींमुळें मोठें मनोरंजक झालें. त्या भाषणांत त्यांनीं सांगितले 'अधिकारी वर्गांत माजलेली नीतिभ्रष्टता या वर्षातील सर्वात मोठा प्रश्न राहील.' ते पुढें ह्मणतात.

" हीं कृष्णकृत्यें उघडकीस येण्यापूर्वीं काय झाले त्या वरून जनता लोकसत्ताक पक्षाकडे पाहणार नसून हीं कृत्यें उघडकीस आल्यानंतर ह्या पक्षाचें काय धोरण राहील त्या वरून आपलीं मतें बनवितील. वाशिंग्टन येथें नुकत्याच उघडकीस आलेल्या प्रकारापेक्षां अधिक घाणेरडे प्रकार फारच थोडे असूं शकतील. ह्या वेभानीच्या नीच व्यवहारांनां कितीही नांवे ठेवलीं तरी तीं थोडींच होणार आहेत, त्याचप्रमाणें, ह्या व्यवहाराचा अमेरिकेनें सर्व दृष्टीनें विचार करणें हे किती महत्वाचें व आवश्यक आहे, तेंही कोणी सांगावयास पाहिजे असें नाहीं. "

" परंतु माझें मत ह्या बाबतींत थोडेंसे निराळें आहे. अंधारांत राहून, मतदारांनां आणि पक्षाला कळूं न देतां चार आठ वदमाषांनीं कट करून जीं कांहीं कृत्यें केलीं यांवर लोकसत्ताक पक्षाचे आणि त्या पक्षाकडून पुढें घडणाऱ्या लोक-

---

* [अमेरिकाना : १९२५ मॅफिंटन हापाकेन्स आणि कं. पान ३०२]

सेवेचें अस्तित्व अवलंबून आहे, असें मला वाटत नाहीं. परंतु तें, आतां सर्व गोष्टी उघडपणें स्पष्ट होऊन विश्वासघाताचे हे प्रकार स्पष्टपणें नजरेसमोर आल्यानंतर, आणि ह्याचे भावी परिणाम किती भयंकर होतील हेंही स्पष्ट दिसत असल्यानंतर, तुह्मी आह्मी आणे ह्या पक्षाचे इतर सर्व सभासद पुढें जगाला काय करून दाखविणार, ह्यावरच अवलंबून आहे. ”

“ व्यवहारी व्यापारी संस्था असोत, अथवा राज्यसंस्था असोत, त्या सर्वदा गुप्त कृत्यापासून आत्मसंरक्षण करूं शकतीलच अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. परंतु एकदां सर्व घाण चवाठ्यावर मांडली गेल्यानंतर सभ्यतेचे व नीतीच्या साध्या नियमान्वयें या कृत्यांचा निषेध करणें, त्यांचे परिणाम नष्ट करणें व गुन्ह्यांचा धिक्कार करणें हें अवश्य कर्तव्य ठरतें. ”

“ आमच्या या सफाईच्या चळवळींत पैसे खावूपणा दृष्टोत्पत्तीस येणारच. आमची इच्छा असली तरी आह्मीं तो टाळू शकत नाहीं पण आह्मीं टाळूं शकत असलों तरी, न टाळतां त्याचा छडा आह्मीं लावलाच पाहिजे. ”

“ राजकारणांत पैशाचा अयोग्य उपयोग हा प्रातिनिधिक राज्यव्यवस्थेइतकाच महत्वाचा आणि खोल प्रश्न आहे व ही गोष्ट जनताही ओळखीत नाहीं असें नाहीं. मतदानाचें पावित्र्य आणि अधिकाऱ्यांचें इमान येथूनच कोणत्याही लोकप्रिय राजसत्तेचा प्रारंभ होतो, आणि हेंच त्या राजसत्तेचें ध्येयही असतें, ह्या दोन गोष्टींच्या अभावीं, लोकांच्या मतस्वातंत्र्याचा हेतु सर्वस्वीं विफल होतो आणि थोड्या फार अवधींतच ते जुलुमाच्या व फसवणुकीच्या (Exploitation) चरवंट्या खालीं चिरडले जातात.—आणे हेंही जनता ओळखून आहे !

“ नीतिपूर्ण राज्यव्यवस्था स्थापन करण्यासाठी झटणें ह्मणजेच सुराज्य स्थापण्यासाठीं झटणें होय. ह्याची लोकांना पूर्ण जाणीव आहे. आपल्या पुढील प्रश्न अगदीं स्पष्ट आहे. मोठमोठाल्या शहरांतील जबाबदार अधिकारी, ज्यांच्या ताब्यांत लक्षावधि मनुष्य, स्त्रिया व बालकांच्या सार्वजनिक जीवनक्रमाची पवित्र जबाबदारी राज्यानें ठेव ह्मणून ठेवली आहे, असे अधिकारी, बेकायदेशीर गुन्हेगारींत भाग घेत आहेत, असा त्यांचा दुर्लौकिक चोहीकडे पसरलेला आहे. ”

लाच त्रस्त जाहे. हा प्रश्न साधारण नाही, ही अवस्थाही साधारण अवस्था नाहीं. ह्या प्रश्नाचा आपण काय निकाल लावतो, त्यावरच आपल्या पक्षाचें भावी अस्तित्व अवलंबून आहे. अशा शत्रूशी तोंड देत असतांना, भ्याडपणाला स्थान नाहीं. सुग्धता स्वीकारणें, ह्मणजे सुद्धां गुन्ह्यांत प्रत्यक्ष सहकार्य केल्यासारखेंच होणार आहे. ''

राजनैतिक प्रामाणिकपणासंबंधीं विचार करितां रिपब्लिकन व डेमोक्रॅट पक्ष यांत कोणाला वराच्याईट ह्मणणें कठीण आहे. या बाबत सर्वांचें एक मत आहे. न्यूहेवन येथील '' जर्नल कूरियर '' ह्मणतें, टॅमनीहालचा आजवरचा इतिहास ध्रुतल्या तांदळाप्रमाणें स्वच्छ आहे असें ह्मणणें धाटर्याचें होईल पण त्या बद्दल गव्हर्नर स्मिथ यांना दोष देणें अगर ते आपला त्या मार्गाने आपला स्वार्थ साधतात असें ह्मणणें अधिक धाटर्याचें होईल. त्याच प्रमाणें ज्या सर्व गुन्ह्यांबद्दल रिपब्लिकन पार्टी जनतेच्या दृष्टीने जबादार आहे त्या बद्दल प्रेसिडेंट हूवर यांना जबाबदार धरता येणार नाहीं.

'' दोन्ही पक्षांच्या लोकांत दोषस्थल इतका स्पष्ट व विपुल आहेत कीं कोणी कोणाला दोष देण्यांत तात्पर्य नाहीं. टॅमनी हॉलचे अत्यंत किळसवाणें कल्पित चित्र जरी आपण रेखाटले तरी पेन्सिल्व्हेनिआ, इलिनॉइस, इंडियाना, ओहिओ, व प्रत्यक्ष न्यूयॉर्क इ. ठिकाणच्या रिपब्लिकन संस्था पेक्षां टॅमनीहॉल अधिक अध:पतित व नीच आहे असें ठरावेण्यास मेंदूची कमाल कसरत करावी लागेल. ''

'' आह्मीं टॅमनी हॉलचें वकीलपत्र घेतलें आहे अशांतला भाग नाहीं. ज्याच्या डोळ्यांत मुसळ आहे अशानें दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळाची मीमांसा करण्याचा हास्यास्पदता उघड करून दाखविणें एवढाच आमचा उद्देश आहे. सारांश, मागच्या इतिहासाशीं वर्तमानाचेताहे संबंध न ठेवतां निवडणुकींतील यशापयश केवळ उमेदवारांच्या वैयक्तिक चारित्र्यावर अवलंबून राहील. मत मिळविण्याचें बाबतींत राज्यशासन तत्वांचा उपयोग ज्या प्रमाणांत केला जाईल फक्त तितक्याच प्रमाणांत इतिहासाकडे लक्ष देण्यांत येईल. ''

---

* धि लिटररी डायजेस्ट, १२ मे १९२८.

* दि लिटररी डायजेस्ट १३।६।१९२८.

आपल्या पक्षाला दरपांगी चिकटून राहून पक्षाच्या घटनेची राजरोसपणे पायमल्ली करणें हा शिरस्ता कार्यकारी लोक व कायदेमंडळ यान्च्यांतच आढळतो असें नसून न्यायखात्यांतहि पक्षांधता, पक्षभेद व लांचखाऊपणाहि आढळतो. ही गोष्ट सकृद्दर्शनीं जरी चमत्कारिक भासली तरी खरी आहे यांत शंका नाहीं. शिकागो येथील तीन न्यायाधीशांच्या वर्तनाची चौकशी ज्या कमिशननें केली तिनें त्यांच्या गुन्ह्यासंबंधी खालील मजकूर लिहिला आहे:—

" आमच्या पुढील जबानीतून असें सांगण्यांत आलें कीं ज्यांच्या वर्तनाची पूर्ण चौकशी सध्यां आमचे पुढें होत आहे त्या तीन न्यायाधीशांचे स्टेट अटर्नीशीं निकट राजकीय संबंध असल्यामुळें जाणुनबुजून किंवा इच्छा नसूनाहे निव्वळ गुळमुळीतपणामुळें या लोकांनीं स्टेट अटर्नीला कर्तव्यपराङमुखतेंत मदत केली आहे व याचाच परिणाम असा झाला कीं ग्रँड ज्यूरीनें अपराधी ठरविलेल्यांना ठामेठोकपणें योग्य शिक्षा देण्याऐवजीं या न्यायाधीशांनीं अपराध्यांना गैरशिस्तपणें व नियमबाह्य दया दाखविली अशासारख्या टीकेला त्यांनीं स्वतःस पात्रं करून घेतलें. "

धि वाशिंगटन पोस्ट ह्या वस्तुस्थितीबद्दल " ह्या रिपोर्टावरून एवढेंच सिद्ध होत आहे, कीं, दर दहा पैकी एखादाच गुन्हा उघडकीस येतो; गुन्हेगार कैद केला गेल्यानंतर पांचांत एखाद्यावरच गुन्हा शाबीत केला जाऊं शकतो; आणि अशा तिघां पैकी एखाद्यावरच गुन्हा शाबीत झाल्यानंतर शिक्षा भोगण्याचा प्रसंग येतो. "

" १९२६ सालीं न्यायदानाची तपासणी करण्याचें काम इलिनॉइस येथें ज्या कमिटीनें केलें, तिच्या अहवालांत असें दाखविण्यांत आलें आहे कीं स्टेट कोर्टांत, खून, दरोडा ह्यांसारख्या गुन्ह्यांबद्दल एकंदर १२,५४३ खटले चालविण्यांत आले, आणि त्यांपैकीं १०५६८ गुन्हेगारांना कोणतीही शिक्षा देण्यांत आली नाहीं. त्याच वर्षीं तसल्याच आरोपाखालीं म्युनिसिपल न्याय कोर्टांत १०८२९ गुन्हेगार उभे करण्यांत आले आणि त्यां पैकी ६००

---

* धि लिटररी डायजेस्ट १३।६।२८.

च्यावर गुन्हेगार सोडून देण्यांत आले. कामेटी पुढें लिहेते, " स्टेट अटर्नी गुन्हेगारांना इतकें सहाय करतो, आणि त्यांच्या गुन्ह्यांचें स्वरूप इतकें कमी करून ते अगदींच साधारण आहेत असें भासवितो, कीं त्यामुळें कुक कौटी मधील गुन्हेगारांनां कायद्याची मुळीं दहशतच वाटत नाहीं, आणि शिक्षेच्या भयाला गुन्ह्याचा प्रतिबंधक उपाय या नात्यानें बिलकुल किंमत उरली नाहीं. " *

समाज व्यवस्था शिथिल झाली आहे, ह्याचा ह्या पेक्षां आणखी कोणती कबुली पाहिजे ?

न्यायालयांतील अनीतीचे प्रकार, फेडरल स्टेटच्या खात्यांतील कमीशन व लांच लुचपती, झब्बूंचीं कृष्ण कारस्थानें, ह्या सर्व गोष्टी आतां जवळ जवळ प्रचलित व सरावाच्या होऊन बसल्या आहेत. कधीं कधीं कोठें तरी ओरड होते. वर्तमानपत्रांनां तेवढाच चमचमीत मजकूर सांपडतो, लोकांचीही तेवढ्या पुरती करमणूक होते; आणि गप्पांनां विषय मिळतो; आणि अनीतीचा हा राक्षसी गाडा मात्र अमेरिकन राजकारण व आर्थिक स्वातंत्र्याचा मार्गावरून अप्रतिहत-पणें व अगदीं बेगुमानपणें आपला मार्ग धिमेपणानें आक्रमीत असतोच ! हा प्रकार कोणत्याही साधारण अमेरिकन गृहस्थाला विशेष महत्वाचा वाटत नाहीं. व्हायकौंट ब्राईस ह्मणतो:-

" नगरव्यवस्थेंतील अनीतीच्या गोष्टी वारंवार घडून आल्यानें राजनैतिक नीतिमत्ता अत्यंत खालच्या पायरीवर येऊन ठेपली आहे, कायम ठरल्याच्या व मेहमींच्या झालेल्या गुन्ह्यांचा लोकांनां तिरस्कार वाटेनासा झाला आहे. दारूबंदीचा कायदा आपल्या पायाच्या जोड्यांत दारूच्या वाटल्या लपवून मोडणारा ऑल्डरमन, व उच्च कुटुंबांत जन्म पावलेला पण धंद्यांत फसून आपल्या नीतीचें भांडवल गमावून बसलेला कायदेपंडित ह्यांच्या सारख्या व्यक्ति ह्या अमेरिकेच्या रंगभूमीवरील परिचयाच्या व दुःखापेक्षां आनंदच देणाऱ्या अशा व्यक्ति गणल्या जाऊं लागल्या आहेत. नगराधिकाऱ्यापासून नीतिमत्तेची कोणीच अपेक्षा करीत नाहीं; त्यामुळें त्या अधिकाऱ्यांनीं आपल्या पदाचा

---

* धि लिटररी डायजेस्ट २-६-२८.

दुरुपयोग केल्याबद्दल कोणाला उद्वेगही वाटत नाहीं; पुष्कळ अधिकारी नीचतेनें वागतात व त्यांच्या वागणुकीनें कोणीहि आश्चर्यचकित होत नाहीं कारण त्यांच्या अपेक्षेप्रमाणेंच हें वर्तन असतें. " +

प्रकरण ४ थें.

के. के. के.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, यूनायटेड स्टेटसचा राज्य कारभार तीन मुख्य खात्यांच्या द्वारें चालविला जातो. (१) गव्हर्नर अथवा प्रेसिडेंट आणि त्याचें कार्यकारी मंडळ; (२) कायदे मंडळ; आणि (३) न्याय खातें. ह्या शिवाय, पक्ष निर्माण होऊन ते निवडणुकींवर आपलें प्रभुत्व कसें गाजवितात, आणि कार्यकारी विभागाला आपल्या हुकुमती खालीं वांकवून ते न्याय खात्यांत कशी अंदाधुंदी माजवितात, ह्याचें दिग्दर्शनही पूर्वी करण्यांत आलें आहे. न्यायाच्या आणि राजकीय नीतिमत्तेच्या बाबतींत रिपाब्लिकन व डेमाक्रेटिक हे दोन्हींही पक्ष सारखेच अधःपतित कसे आहेत, प्रत्यक्ष गव्हर्नर सुद्धां सरकारी खजिन्यांतून चोरी कशी करतात, कायदे मंडळावर व्यापारी रंग कसा चढतो, पक्षांच्या व झब्बूंच्या मर्जीविरुद्ध कार्यकारीमंडळ अस्तित्वांत राहणें कसें अशक्य होतें, संस्थानच्या व संयुक्त राज्यकारभारांत लांचलुचपत व पोटभरूपणा यांचा कसा नंगा नाच चालला आहे, आणि न्यायदानाचें पवित्र कार्यही ह्या सर्वांगीण अधःपातापासून कसें वाचलेलें नाहीं, ह्या सर्व गोष्टींचें विवरण पूर्वीच करण्यांत आलें आहे. सरते शेवटीं, अमेरिकेच्या घटनेचे " जनतेची सत्ता प्रस्थापित करण्यासंबंधीचे सोवळे उद्देश व हेतु " हे कितपत व्यवहारांत तरले आहेत तेंही आपण पाहिलें.

आतां, प्रजेच्या समतेशीं व स्वातंत्र्याशीं फार निकटचा संबंध असलेल्या कांहीं गोष्टींबद्दल विवेचन करूं.

---

* धि लिटररी डायजेस्ट, १३ जून १९२८.

+ माडर्न डिमाक्रसीज. व्हाल्यूम २; पान ११७.

प्रजेला स्वातंत्र्य, कायदा व शांतता ह्यांचें संरक्षण, अल्पसंख्यांकाचे हितसंरक्षण, श्रमाचें, धर्माचे आणि विचारप्रदर्शनाचें पूर्ण स्वातंत्र्य ह्या गोष्टी कोणत्याही सुधारलेल्या (Civilised) राज्यव्यवस्थेचा प्राण होत. लोकांचें स्वातंत्र्य व त्यांच्या स्वाधीन असलेली राज्यसत्ता हा कोणत्याही लोकप्रेय लोकसत्ताक राज्यपद्धतीचा पाया होय, जगांतील अत्यंत श्रेष्ठ व पूर्ण स्वरूपाची लोकसत्ताक पद्धति जर कोठे आस्तित्वांत असेल, तर ती अमेरिकेंत होय असा लौकिक सर्व जगभर पसरलेला आहे; आणि तरीही अमेरिकन कांग्रेसनें वेळोवेळीं ज्या चौकश्या केल्या त्यांचा निष्कर्ष काय निघतो ? कायद्याच्या बंधनांचें बेगुमानपणें केलेलें उल्लंघन, स्वातंत्र्याची अत्यंत क्रूरपणें केली जाणारी कत्तल लोकांचें जीवित व त्यांची मालमत्ता यांची निरंकुश व निर्लज्जपणें चाललेली धूळधाण इत्यादि भानगडी अमेरिकेंत जशा आढळतात तशा इतरत्र क्वचितच आढळतील. ह्या चौकशींतून असेंही निष्पन्न झालें आहे कीं, संस्थानेंचीं संस्थानें जुलुमखोरांच्या (Terrorist) जुलुमाखाली थरथरां कांपत आहेत. ह्याला साक्षी म्हणून पुढील संस्थानांचीं नांवें सांगण्यांत येतात:– ओरेगान, टेक्सस, कोलोरॅडो, इंडिआना, ओवलॅहामा, कॅन्सस, लुइसिआना, अलबामा, आणि कांहीं अंशीं इलिनाइस. *

ह्या ठिकाणीं अशा जुलुमखोर मंडळांचा थोडासा इतिहास नमूद करणें अप्रासंगिक होणार नाहीं. के. के. के. (K. K. K.) ह्या अक्षरांचा गर्भितार्थ ज्याला ठाऊक नाहीं, असा आज तगी कोणी सुशिक्षित इसम सांपडणार नाहीं. जगाची साधारण माहिती असणाऱ्या इसमाला ह्यांची फोड करून सांगण्याचें प्रयोजन नाहीं. साऱ्या जगभर ह्या अक्षरांचा अर्थ म्हणजे, खून, पाशवी अत्याचार, आणि जुलुम असा करण्यांत येत असतो.

अमेरिकेच्या जीवनांतील जीं मूलतत्वें म्हणजे जाहिरातबाजी व कमिशन खावूपणा या दोन तत्वांच्या मदतीनेच या कु–क्लक्स–क्लॅनची भरभराट झाली. एडवर्ड यंग क्लार्क व एलिझाबेथ टायलर या दोन व्यक्तींना या क्लॅनच्या कल्पनेतील

---

* पहा, करंट हिस्टरी, एप्रिल १९२८.

फायद्याची पुरेपूर कल्पना होती. या दोघा धूर्त व्यक्तींच्या मदतीनें विलियम जे. सिमन्स यानें १९१५ मध्यें सुरुवातीच्या [illegible]

मांडला देऊन क्लॅनची मेंबरशिप वाढविण्यास सुरुवात केली. एक अमेरिकन माणसाचें असें मत आहे कीं या "क्लॅन प्रणेत्यांनीं अमेरिकन-मयत्वाच्या दूषित भागांतील द्वेषत्रयींचा मनसुराद उपयोग केला" या पैकीं पहिला द्वेष कॅथोलिक लोकांबद्दलचा; कारण:हे लोक रोमच्या पोपला मानीत असत व अमेरिकेत कॅथोलिसिझमचा प्रसार होण्याची खटपट करीत. ज्यूंच्या संबंधीं द्वेष कारण आर्थिक दृष्ट्या हे अमेरिकेला गुलाम बनवीत आहेत असा समज; व परदेशी माणूस व नीग्रो यांबद्दलचा द्वेष कारण यांच्या अस्तित्वानें गोरकायांचें सर्वस्व धोक्यांत आहे ही भीति. या द्वेषत्रयीबरोबरच अशीहि टिमकी वाजविण्यांत येई कीं क्लॅन राज्यघटनेला उचलून धरील व न्याय व्हावा अशीहि खटपट करील. या क्लॅनच्या कामाला पुरेसें यश मिळालें व १९२३ च्या सुमारास १५ लाखांवर या क्लॅनचे सभासद झाले होते. जेव्हां क्लॅन वरचढ झाला व प्रणेत्यांचे खिसे पुरेसे गरम झाले [illegible] सिमन्स यानें स्वतःचे आर्थिक हितसंबंध विकले व नंतर हिरॅम वेस्ले इव्हान्स याजकडे या जुलुमबाज संस्थेचें बालकत्व आलें. या नंतर हा इव्हान्स या क्लॅनचा मदारी बनला.

ह्या संघाची शक्ति कुठवर गेली होती तें कोर्टांतील व संस्थानांतील कागदपत्रांवरून दिसून येतें. कांग्रेसच्या चौकशीवरूनही, सर्वत्र संयुक्त संस्थानें ह्या मंडळाच्या तडाख्यांत सांपडलीं होतीं, असें स्पष्टपणें दिसून येतें. रात्रीचे वेळीं, सर्वांग शरीर पुरख्याखालीं झांकून घेऊन हें मंडळ, खून व अत्याचारांचें आपलें सत्र सुरू करी. पाशवी नीचपणा व अनीतिकृत कार्य यांचे बाबतींत तर त्यांनीं कमाल केली. ह्याचा परिणाम म्हणून, ह्या मंडळाचे भीषण अत्याचार थांबविण्यासाठीं मदत मागण्याकरितां म्हणून लुइसानाचे गव्हर्नर पार्कर यांना [illegible] संस्थान म्हणजे "राजकीय अनीतीचें व अधःपाताचें एक भीषण चित्र" बनलें. दुसऱ्या संस्थानांत घडत असलेल्या अत्याचारामुळें चिडून जाऊन आरेगानचे गव्हर्नर ऑलकॉट व गव्हर्नर

एलॅन त्यांनीं वरिष्ठ कोर्टें व संयुक्त अधिकारी खातें यांच्याकडे. त्यांच्या खात्यांत नोकरीवर असलेल्या ह्या मंडळाच्या सभासदांना बडतर्फ करण्याविषयीं गिल्ला सुरू केला.

निव्वळ नीग्रो लोकांनांच नव्हे, तर पांढऱ्या कातडीच्या स्त्रियांना सुद्धां बेशुद्ध होईपर्यंत फटके मारणें व बेशुद्ध पडल्या नंतर तसेंच टाकून त्यांना मरूं देणें, हे प्रकार किती तरी संस्थानांत घडून आले. शाम काकाच्या ह्या सुधारलेल्या राज्यांत जे जे अत्याचार घडून आले आहेत व जे तेथील न्यायकचेऱ्यांच्या दप्तरीं दाखल आहेत त्या सर्वांची—किंवा त्यां पैकीं काहींची यादी देण्यास सुद्धा हें पुस्तक अपुरें पडेल. पाठीच्या अक्षरशः चिंधड्या चिंधड्या उडेपर्यंत एका मुलाला चाबकाखालीं झोडण्यांत आलें, एका नीग्रो स्त्रीला ती अर्धमेली होई पर्यंत झोडपण्यांत येऊन तश्याच अवस्थेत तिला उघड्यावर टाकून दिल्यामुळें ती न्यूमोनिआच्या विकारानें मरण पावली; एका अमेरिकन स्त्रीशीं विवाह केल्या-बद्दल अमेरिकेच्या राहिवाशी झालेल्या एका परदेशी इसमाला, त्याच्या पाठीचा मांसाचा गोळा बनेपर्यंत झोडपण्यांत आलें; आपली जमीन फुकट वजा कमी किंमतीला एका गोरकायाला विकीतोपर्यंत एका नीग्रोला ठोकण्यात आलें, —पण ही यादी अशी संपणार नाहीं. हीं फक्त कांहीं उदाहरणें आहेत. *

ग्रॅनशा कौंटीच्या ग्रँड ज्यूरीच्या मताप्रमाणें 'ह्या चुरख्याचें व फटक्याचें भय' कांहीसें 'इनक्विझिशन' च्या भयाप्रमाणेच होतें! (इनक्विझिशन म्हणजे, यूरोपांत्या काळीं ख्रिस्तो धर्माच्या शिकवणीविरुद्ध वागणाऱ्यांची चौकशी करून शिक्षा देण्यासाठीं जें न्याय कोर्ट नेमण्यांत येत असे; करपणामुळें त्याची दहशत भयंकर असे.) मर रूज, हेरेन, ओहिओ, इन्डिअनो इ. ठिकाणीं घडलेल्या अमानुष खुनांची हकीगत ह्या ज्यूरीनें नमूद करून ठेवली आहे. टेक्सस येथें, ज्याचें शब्दानें वर्णन देखील करतां येणार नाहीं अशा एका भीषण खुनाच्या बातमीनें लोकांची छाती दडपून गेल्याचे वृत्त ऐकण्यांत आहे १९२३ सालीं एके रात्रीं 'एका फिरत्या व्यापाऱ्याला काहीं चुरखे घातलेल्या इसमांनीं रस्त्यांत पकडले, त्याला एका झाडाशीं दोरानें व कांटेरी तारेनें जखडून बांधले, व त्या

---

* न्यू एज. मार्च १९२८.

अवस्थेंत, तो बेशुद्ध होईपर्यंत चाबकानें झोडपलें, तो बेशुद्ध झाल्यानंतर त्याला झाडापासून सोडून फरफटत टेलर येथील चौकांत आणून टाकलें, व तेथें त्याच्या जखमांवर किआसोट टाकून त्याला तेथेंच तडफडत मरूं दिलें ! ' *

ओक्ला संस्थानांतिल ओटमन गांवीं एक निग्रो स्त्री तिच्या १४ वर्षें वयाच्या मुलासह काही लोकांकडून पकडण्यांत आली आणि तिला तिच्या मुलासकट एका पुलावरून फांस लावून लटकावण्यांत आलें. त्या स्त्रीला असें फांशीं देण्यापूर्वी तिच्यावर बळजबरीने अत्याचार करण्यात आला होता ! या संस्थानांतिल कोटस्विल गांवीं दवाखान्यांत आजारी अवस्थेंत अंथरुणावर पडलेल्या एका इसमास खेंचून काढून त्याला जिवंत जाळण्यांत आलें. आगीच्या ज्वालांतून तो बाहेर येण्यास धडपडूं लागला कीं लोखंडाच्या लांब सळ्यांनीं त्याला पुन्हा आगींत ढकलण्यांत येई ! ह्या करमणुकीच्या प्रकारावद्दल ज्यांना ज्यांना पकडण्यांत आलें, त्या सर्वांची न्यायाधीशानें निर्दोष म्हणून सुटका केली. अगदीं नुकतीच घडलेली गोष्ट. इकडे लिंडबर्गच्या वैमानिक उड्डाणांवद्दल सर्वत्र अमेरिका स्तुतिस्तोत्रें गाण्यांत रंगून गेली होती; आणि त्याच वेळीं मिसिसिपी येथील सरासरी एक हजार नरपशूंचा समुदाय निराळ्याच मार्गानें आपली करमणूक करून घेत होता. दोघां नीग्रोना सांखळदंडानें तारेच्या खांबाशीं जखडून बांधण्यांत आलें, आणि पेट्रोलनें आंघोळ घालून त्यांना बाहिस्मा दिल्या नंतर, त्यांच्या अंगाला काडी लावण्यांत आली ! दक्षिण कारोलिना येथें एक निराळीच गंमत झाली. दोन माणसें व एक स्त्री ह्यांचा खटला न्यायालयांत चाललेला होता. न्यायाधिशाने बाईला निर्दोषी ठरविलें. ज्यूरीनें त्या मनुष्यांनांही बहुधा निर्दोषच ठरविलें असतें. पण प्रकार भलताच झाला. त्याच रात्रीं पुष्कळश्या लोकांचा एक जमाव, तुरुंगावरील अधिकाऱ्यांनी जाणून बुजून कानाडोळा केल्यामुळें तुरुंगांत शिरला, व त्यांनी ह्या स्त्री पुरुषांना तुरुंगाच्या बाहेर आणून त्यांना गाळ्या घालून ठार मारलें. *

---

* न्यू एज. मार्च १९२८.

पण शाम काकाला ह्या असल्या अमानुष कृत्यांत काहीं न्यारीच गोडी वाटत असावी असें दिसतें. सेंट लूई येथील 'पोस्ट डिसपॅच' वर्तमानपत्राचा खास बातमीदार लिहितो," ज्या प्रमाणें उघड्या मैदानांत खेळाडू आपले खेळ खेळतात जवळ जवळ अगदीं त्याच मनःस्थितींत माणसांच्या मागें लागून त्यांची शिकारही करण्यांत येत असते. सर्वच प्रकार अत्यंत निर्घृण दुष्टपणाचा असून, त्यापासून ह्या नरहिसकांना एका विशिष्ट आनंदाचीच प्राप्ति होत असलेली दिसून येते." ह्या नंतर तो प्राचीन काळीं रोम शहरांत जो नरयज्ञाचा प्रघात होता त्याच्याशीं ह्या हिंसेची तुलना करून म्हणतो," रोमन कोलेशियमच्या भोंवतीं गोळा होणाऱ्या जनसंमर्दांत व ह्या जनसंमर्दांत फारसा फरक नाहीं ! फरक इतकाच कीं रोमन प्रकारांत जंगली जनावरांस ठार करीत पण अमेरिकेंतील प्रकारांत लढणारे व वध्य हे दोघेही मानवजातींतलेच असतात.

'अमेरिका कन्स ऑफ एज' त्या पुस्तकाचा लेखक असें सांगतो कीं, हे पाशवी अत्याचार व जनसमूहाकडून होणारा आततायीपणा घडवून आणण्यास मुख्यत्वें करून "समाजांतील अत्यंत वरिष्ठ दर्जाचे लोक, उच्चपदाधिष्ठित अधिकारी आणि न्यायाधीश सुद्धां" जबाबदार असतात हाच लेखक पुढें लिहितो, — †

"प्रत्यक्ष त्या लोकांपैकीं कांहींनी मला सांगितलें ..... तुम्हाला जो बाह्य स्वरूपावरून सभ्यतेचा व सालस्वभावतेचा मूर्तिमंत पुतळा वाटतो व ज्याच्याशीं तुम्ही अगदी मनमोकळेपणाने व मित्रत्वाच्या नात्याने बोलत आहांत, कदाचित् त्याच माणसाने एकट्या सांपडलेल्या एखाद्या गरीब निरपराधी मनुष्याला हजारो लोकांच्या मदतीनें जंगलांत ठार मारले असेल ! ह्या घाणेरड्या कृत्यांत त्याच्याशी सहकार्य करणाऱ्यां पैकीं कित्येक तुमचे अगदीं निकटचे मित्र सुद्धां असतील,' कांहीं कृत्यांची चौकशी केल्यानंतर असें आढळून आलें कीं, ह्या कृत्यांत, अमेरिकेंतील अत्यंत मोठ्या गणल्या जाणाऱ्या व्यक्ति सुद्धां सामील होत्या.

---

* न्यू एज, मार्च १९२८

† अमेरिका कन्स आफ एज." पान ९८, ९९.

वर एके ठिकाणीं उल्लेखिलेल्या टेलर संबंधींच्या अत्याचाराची चौकशी करून त्या भानगडींत हात गुंतलेल्या गुन्हेगारांसंबंधीं, मार्च १९२८ मध्यें-टॅक्ससचे गव्हर्नर मूडी हे 'न्यू एज' वर्तमानपत्राच्या वार्तमीदाराला सांगतात, "ह्या गुन्हेगारां पैकीं एक धर्माधिकारी (Clergyman) होता असें आढळून आले. आणि इतर सर्व गुन्हेगार ज्यांना मी बाळपणापासून चांगला ओळखत होतों असे इसम होते. हे सर्व माझ्या बरोबर माझ्याच गांवांत लहानाचे मोठे झाले होते. "

नुकतेच अल्बामा येथें जे अत्याचार घडले त्यांकडे तेथील गव्हर्नर ग्रेव्हज यांनीं मुद्दाम काना डोळा केला, कदाचित् त्यांत त्यांचें स्वतःचें अंगही असूं शकेल. हा प्रकार अमेरिकेन्या राजकीय इतिहासांतील एक अत्यंत निंद्य दोषस्थान आहे, असें समजण्यांत येतें ! एका तिजोरींत सांपडलेल्या एका पत्रांत सबंध भानगडीचा खुलासा करणाऱ्या मार्गाची किल्ली सांपडली; आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या पत्रावरून असें स्पष्ट सिद्ध होतें कीं, ह्या अत्याचार चळवळींत स्टेटच्या कार्यकारी मंडळाचे जे प्रमुख त्यांनीं प्रत्यक्ष भाग जरी घेतला नसला, तरी त्यांच्याकडे बुद्धिपुरःसर कानाडोळा करून त्यांनीं चळवळीला निदान उत्तेजन तरी दिलें हें निःसंशय सिद्ध होतें.

ह्या पत्रामुळें गव्हर्नर साहेब मोठ्या विलक्षण पेंचांत सांपडले. यूनायटेड स्टेटसचे सिनेटर टॉम हेफालिन ह्यांनीं सडेतोड जाब विचारला, "मध्यवर्ती सरकारचें अस्तित्वांत असलेलें स्वरूप व कायदे ह्यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ह्या कृत्यांबद्दल गव्हर्नर ग्रेव्हज क्षमावृत्ति धारण करून आपली पसंति दर्शविणार आहेत काय ? तसें असेल, तर तिकडूनहि इसम त्याच्यापासून असाही निष्कर्ष अगदीं सहज काढतिल कीं न्यायकचेऱ्यांचा हेतु उघडपणें विफल करण्याबद्दल प्रत्यक्ष स्टेटच्या गव्हर्नरच्या मनांत सहानुभूतीच वसत असावी; " न्यायालयाचा हेतु विफल व्हावा, व गुन्हेगारांना शिक्षा होऊं नये अशी गव्हर्नरची खरोखरच इच्छा होती, हें पुढें घडून आलेल्या गोष्टींवरून दिसून आलेंच ह्या गुन्ह्याबद्दल १०२ इसमांवर खटले चालविण्यासाठीं अटर्नी

जनरल मॅककाल ह्यांना १०००० डॉलर्सची जरुरी होती. परंतु गव्हर्नरनें त्यांना फक्त १५०० डॉलर्सची मंजुरी दिली, आणि मॅककॉल यांनीं जे क्लॅनच्या मदतीनेंच निवडून आले होते अशाच सालीसिटर्सची मदत घ्यावी असा गव्हर्नर यांनीं आग्रह धरला. *

प्रकरण ५ वें.

नीग्रो.

नीग्रोंचा प्रश्न अर्थात् अमेरिकेंतील श्वेतवर्णी लोक व तेथले रहिवाशी काळे आफ्रिकन नीग्रो लोक यांचे परस्परसंबंध हा अमेरिकेच्या अंतर्व्यवस्थेंतील एक अत्यंत महत्वाचा बिकट प्रश्न आहे. अमेरिकन लोकसत्तेच्या यशावरील हा एक फार मोठा डाग आहे, असेंही ह्मणतां येईल. यूनायटेड स्टेटस मध्यें ज्या नागरिकत्वाच्या स्वातंत्र्याचा जो मोठ्या दिमाखानें टेंभा मिरविण्यांत येतो, याचें सत्यस्वरूप काय आहे तें ह्या वर्णभेदावरून, उच्चनीचत्वाच्या कल्पनेवरून व दुसऱ्या वर्णाच्या लोकांबद्दल अमेरिकनांच्या अंतःकरणांत दृढमूल होऊन बसलेल्या तिरस्कारावरून अगदीं सहज निदर्शनास येतें ! हा नीग्रोचा प्रश्न सोडविण्याचें आजपर्यंत अनेक उपाय सुचविण्यांत आले आहेत, पण ते सर्व्व बहुधा अशक्य किंवा असंभाव्य कोटींतीलच आहेत ! या जवळ जवळ १२० लक्ष नीग्रो लोकांना परत आफ्रिकेंत नेऊन सोडून द्यावें, किंवा ह्या नीग्रो लोकांचे एक निराळेंच संस्थान वसवावें, हे दोन त्या सुचविलेल्या उपायांपैकींच होत ! दुसरे कांहीं असें सुचवितात, कीं ह्या प्रश्नाचें एकच उत्तर असूं शकतें. तें ह्मणजे ह्या सव्वा कोटी लोकांच्या जातीनें नामशेष तरी होऊन जावें अथवा, अमेरिकेचे

---

* करंट हिस्टरी, एप्रिल १९२८.

मूळचे रहिवाशी जे रेड इंडिअन त्यांच्या प्रमाणें ह्यांचें समूळ निर्मूलन तरी करून टाकावें ! ह्या सूचनांचा दुसरा तर कांहींच उपयोग झाला नाहीं; पण त्यामुळें प्रश्न अधिक अस्पष्ट स्वरूपाचा होऊन त्यामुळें जातीजातींत द्वेषबुद्धी व तिरस्कार भावना मात्र वाढली !

नीग्रो लोकांचा हा प्रश्न उपस्थित व्हावयास नीग्रो लोक कारणीभूत झालेले नाहींत, हें अमेरिकन लोकही मान्य करतात. अमेरिकेंत येऊन आपली वसाहत करण्याची जर सर्वांत कमी इच्छा कोणाची असेल तर ती नीग्रो लोकांची होती. इतर सर्व लोक अमेरिकेंत वसती करायला आले ते खुषीनें; फक्त नीग्रो लोकच काय ते आपल्या इच्छेविरुद्ध येथें जबरदस्तीनें आणले गेले. * पांढऱ्या अमेरिकन लोकांच्या मुद्दाम केलेल्या जबरदस्तीच्या आग्रहामुळेंच त्यांना येथें येणें भाग पडलें; आणि गुलामीची प्रथा ह्या पांढऱ्या लोकांनींच आपल्या खासगी सुखसोयीसाठीं व मतलबासाठीं, अंमलांत आणली, वाढविली व अस्तित्वांत ठेवली ! +

नीग्रो लोकांविषयीं जी एक सर्वसाधारण भावना येथें वसत असलेली दिसून येते, त्या भावनेंत निरानिराळ्या भावनांचें मिश्रण झालेलें आहे. परंतु नैसर्गिकपणेंच किंवा अनुवंशिकत्वामुळें, ह्या लोकांशीं निकटसंबंधाचा मनापासून तिरस्कार, हें त्या भावनेचें सर्वसामान्य स्वरूप आहे.

नीग्रो लोकांबद्दल आपली अशा प्रकारची वृत्ति बनवून घेतांना पांढऱ्या अमेरिकनांनीं मुळींच विचार केलेला नाहीं; ही वृत्ती सर्वस्वी भावनामूलक आहे. ह्यामुळें, नीग्रो म्हणजे शारीरिक दृष्ट्या पशु असतो, त्याची बुद्धिमत्ता कमी दर्जाची असते, त्याला वैयक्तिक नीतिमत्तेची फारशी चाड नसते, बळजबरी, खून, चोरी व गुन्हेगारी अशा गोष्टींकडे त्याची नैसर्गिकपणें प्रवृत्ति असते, अशा प्रकारची सार्वत्रिक समजूत झालेली आहे. ह्या साठींच, जर पांढऱ्या

---

*धि नीग्रो इन शिकागो (शिकागो कमिशन ऑन स्पेशल रिलेशन्सचा रिपोर्ट पान २३

+ ' धि नीग्रो इन शिकागो.

लोकांचें पावित्र्य संरक्षण करावयाचें असेल, तर नीग्रो लोकांना त्यांपासून अगदीं विलग ठेवलें पाहिजे, हें ओघानेंच आलें. निरनिराळ्या न्यायकचेऱ्या, विद्यालयें व्यापारी व औद्योगिक केंद्रें ह्यांचें निरीक्षण करून पुरावा गोळा केला असतां असें दिसून येतें कीं, नीग्रो हा अमेरिकनापेक्षां शारीरिक दृष्ट्या तर श्रेष्ठ असतोच, पण तो बौद्धिक अगर नैतिक दृष्ट्याही त्यापेक्षां यत्किंचित्ही कमी दर्जाचा नसतो ! नीग्रोच्या विरुद्ध मतें आणि भावना ह्या बहुधा बाजार गप्पांच्या आधारावरच बनविलेलीं असतात; प्रत्यक्ष घडलेल्या वस्तुस्थितीच्या आधारावर नसतात. १९२० सालीं जातीजातींच्या संबंधाचें निरीक्षण करण्यासाठीं नेमलेल्या शिकॅगो कमिशनच्या चौकशींतून हें अगदीं उघडपणें सिद्ध झालें आहे.

नीग्रो लोकांवर जे अत्याचार करण्यांत येतात, त्याला बहुधा दोन प्रकारचीं कारणें देण्यांत येतात; एक तर नीग्रोंनीं काढलेल्या कुरापती व तज्जन्य मारामाऱ्या, अथवा नीग्रोची पांढऱ्या स्त्रियांशीं फाजील सलगी. साधारणपणें हीं कारणें फोलच असतात. * उपरिनिर्दिष्ट कमिशनपुढें ह्या कारणामुळें उत्पन्न झालेल्या कितीतरी भानगडी मांडण्यांत आल्या होत्या, परंतु एकाही बाबतींत हे आरोप सिद्ध करतां आले नाहींत. उलट, भिन्न वर्णाच्या लोकांशीं संबंध आला असतां नीग्रो अत्यंत सज्जनपणानें व व्यवस्थितपणाचें वर्तन ठेवतो, असेंच सिद्ध झालें. हाईड पार्क ही उच्च वर्गातील कुटुंबांची राहण्याची जागा आहे; येथें राहणारी एक पांढऱ्या वर्णाची स्त्री कमिशनपुढें साक्ष देतांना म्हणते, " शहरांत ट्रॅम किंवा मोटर गाड्यांतून जात असतांनां, पांढऱ्या वर्णाच्या सभ्य-गृहस्थापेक्षां काळ्या नीग्रोची सोबतच मी अधिक पसंत करीन. ज्याला थोडेसें शिक्षण मिळालेलें आहे असा नीग्रो खरोखरीचा हाडाचा सभ्य असतो. माझ्या मुली व मुलें रस्त्यांतील बस मधून रोज हाईडपार्क हायस्कूल मध्यें जातात; पण मला भीति वाटते ती नीग्रो माणसाची नव्हे तर रस्त्यावरील उडाणटप्पू पांढऱ्या माणसांची ! " [१]

---

* धि नीग्रो इन शिकागो. पान ३०७.

१ ' धि लॉज आफ सेक्स, ' रिचर्ड वेजर, बोस्टन. पान १७८.

रस्त्यांतील सार्वजनिक भाड्याच्या गाड्यांतून निरनिराळ्या अपरिचित स्त्री पुरुषांचा एकमेकांशीं सहवास येणें हें अगदीं अपरिहार्य असतें. परंतु कमिशनपुढें अशी एकही साक्ष आली नाहीं कीं जींतून एखाद्या नीग्रोनें पांढऱ्या स्त्रीशीं फाजीलपणाचें वर्तन केल्याचें सिद्ध होईल. उलट पक्षीं, अशा गाड्यांतून जात असतांना, नीग्रो स्त्रीशीं बेशरमपणाचें वर्तन केल्याचीं गौरकाय सत्पुरुषांची (?) मात्र अनेक उदाहरणें कमिशनपुढें मांडण्यांत आलीं.

कृष्ण व श्वेतवर्णीयांच्या परस्पर–संभोगाबद्दल जो तिरस्कार व्यक्त करण्यांत येतो तो फक्त ज्या बाबतींत नीग्रो पुरुषाचा गौरकाय स्त्रीशीं संबंध आलेला असतो तेथेंच अशा अपराध्याला त्याच्याशीं संबंध येणाऱ्या व्यक्तीनें मनास येईल ती शिक्षा ठोठावी, वाटल्यास त्याची कातडी सोलून जिवें मारावें, (Lynch) असें लोकमत सांगतें. पण उलट पक्षीं दर वर्षीं उत्पन्न होणारीं हजारों आणि लाखों अर्भकें, शाम काकानें काळ्या स्त्रियांच्या समागमांत जो आनंदानें कालक्षेप केलेला असतो, त्याची साक्ष साऱ्या जगाला ठेंवरवानें ओरडून पटवीत असतातच ! डॉक्टर एडिथ हूकर लिहितात:–

" सर्व अमेरिकेंत चाललेला वर्णसंकर आपल्या मूक वाणीनें हेंच सिद्ध करीत आहे कीं जो श्वेतकाय पुरुष कृष्णवर्ण स्त्रीला अधर्मी ठरवितो आणि जिच्याशीं गौरकायानें विवाह करूं नये असें त्याला वाटतें तिच्याशींच संभोग करण्यांत आणि ज्या कृष्ण वर्णाचा त्याला इतका तिरस्कार वाटतो त्याच कृष्ण-वर्णाची प्रजा स्वत: त्या स्त्रीपासून निर्माण करण्यांत मात्र त्याला तिळमात्रही लज्जा वाटत नाहीं ! " *

श्वेतकायांच्या साठींच राखून ठेवण्यांत आलेल्या करमणुकींच्या ठिकाणीं नीग्रोला प्रवेश नसतो; आणि यदाकदाचित् कारणवशात् तेथें त्याला शिरकाव मिळालाच, तर त्याला अत्यंत अनादरपूर्वक बागाबिग्यांत येंत असतें; पण इकडे पहावें, तों कृष्णवर्णीय स्त्रीपुरुषांशीं रममाण होण्यांत गौरकाय स्त्रियांना व पुरुषांना विशेष आनंद वाटतो, असें दिसून येतें ! नीग्रो लोकांच्या करमणुकींच्या

---

* ' धि लाज ऑफ सेक्स ' पान १७८.

स्थलीं नीग्रो स्त्रीच्या सहवासांत आंग्ल पुरुष व गौरवर्ण स्त्रीच्या बाहुपाशांत नीग्रो गुरफटून नृत्य करीत असल्याचें दृश्य रोजच्या परिचयाचें आहे. अमेरिकनांच्या जीवनांतील ह्या विरोधाचें विवरण पुढें (१२ व्या प्रकरणांत) केलें आहे.

तत्वतः पाहतां, पुष्कळश्या संस्थानांतून नीग्रोचा व श्वेतकाय मनुष्याचा दर्जा एक मानण्यांत आला आहे. नीग्रो स्त्री पुरुषांना यूनायटेड स्टेट व फेडरल कामनवेल्थचे नागारेक समजण्यांत यावें, आणि केवळ कृष्णवर्णामुळें त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या जुलुमापासून व अन्यायांपासून कायद्यानें त्यांचें संरक्षण करावें ह्याबद्दल फेडरल आणि स्टेट कोर्टाची मान्यताही आहे. परंतु हें तत्व जरी मान्य असलें, तरी त्याची वस्तुस्थितींत परिणति होऊं देण्यास मात्र श्वेतकाय सत्पुरुष तयार नाहींत. ह्या लोकांशीं करण्यांत आलेलें वर्तन पाहिलें असतां, जुलुम, आणि भेदबुद्धीनें केलेले अत्याचार हा येथील रोजचा परिपाठ आहे असेंच दृष्टोत्पत्तीस येतें. नीग्रोला चर्चे मध्यें मज्जाव असतो; त्याला सार्वजानिक उपहारगृहें, नाटकगृहें ह्यांसारख्या करमणुकीच्या स्थलींही जाण्याची मनाई असते. भर रस्त्यावर त्यांचा अपमान आणि पाणउतारा करण्यांत येतो आणि अगदीं क्षुल्लक कारणांसाठीं सुद्धां त्यांच्यावर पशूप्रमाणें हल्ला करण्यांत येऊन मारहाण करण्यांत येते; मग ती क्षुल्लक कारणें कितीही क्षुद्र असोत, किंवा ती किंबहुना काल्पनिकहि असोत. !

एकाद्या नीग्रोची ज्या वेळीं अशी गर्ह्य अवहेलना करण्यांत येते, अथवा जनसमूहाकडून एखाद्या वन्य पशूप्रमाणें त्याचा पाठलाग करण्यांत येतो, त्या वेळीं त्याची वास्तविक मनःस्थिति कशी असते त्याचें हुबेहुब वर्णन करणें कठिण आहे. अश्या प्रकारच्या अत्याचाराला बळी पडलेल्या नीग्रो यूनिव्हर्सिटींतील एका विद्यार्थ्यानें शिकॅगो कमिशन पुढें दिलेली जबानीच पुढें उध्दृत करतों म्हणजे, वाचकांना तें अधिक स्पष्टपणें कळूं शकेल ह्या अत्याचाराचें वर्णन कमिशननें " श्वेत वर्णीय जनसमूहानें खेळकरपणाच्या भरांत केलेला पशुतुल्य अत्याचार " असें केलें आहे. अत्यंत प्रतिकूल वातावरणांत पुरे साडेपांच तास पर्यंत पाठलाग केल्यानंतर सरते शेवटीं तो दुर्दैवी विद्यार्थी ह्या समुदायाच्या तडाख्यांतून कसा तरी निसटला, हें येथें नमूद करून ठेवलें पाहिजे. त्या विद्यार्थ्याची जबानी अशीः—

" त्या वेळीं ह्या अन्यायाच्या जाणिवेनें माझें हृदय दडपून गेलें, – भावनांचा माझ्या अंतःकरणांत कल्लोळ माजला ! फ्रान्समध्यें मी जे दहा महिने घालविलें, ते सर्व वृथाच ठरले कां ? फ्लॅन्डर्सच्या रणमैदानांत कामीं आलेल्या माझ्या कृष्णवर्णीय बांधवांच्या थडग्यांवर उभारण्यांत आलेल्या त्या क्रॉसेस मध्यें कांहींच का अर्थ नाहीं ? लोकसत्ता ह्मणजे एक पोकळ भावनाच तर मग ! माझ्यावर असे अत्याचार करण्यांत यावे, असें माझ्या हातून पापाचरण तरी कोणतें घडलें ? दाक्षिणात्य संस्थानांतील असंख्य कृष्णवर्णीयांवर एखाद्या काल्पनिक आरोपाखालीं हल्ला करण्यांत आल्यानंतर जे विचार व ज्या भावना त्याच्या हृदयांत हैदोस मांडीत असतील, त्या व तत्सदृश भावनांचा धुमाकूळ सहन करीत मी त्या अवस्थेंत तेथें पडून राहिलों. अमेरिकन नागरिक व अमेरिकन सैनिक होण्यासाठीं मी आपल्या कानडाच्या नागरिकत्वावर पाणी सोडलें, त्याचें हेंच का फळ ? ज्या देशांत अशा द्वेषाची व तिरस्काराची वसती आहे, तेथें राहून आपला जीव धोक्यांत घालण्यांत कांहीं तात्पर्य आहे का ? फक्त आपल्या कातडीच्या रंगामुळेंच नीग्रोनें सदासर्वकाळ हे अत्याचार सहन केलेच पाहिजेत का ? " तो पहा, तो निगर चालला आहे; – चला आपण त्याला पकडूं या ! " हे शब्द माझ्या कानांत सारखे घुमत होते;– त्यांचा मला केव्हांही विसर पडणें शक्य नाहीं ! * "

ज्या वेळीं लोकसत्तेसाठीं ह्मणून, सुधारणेचें व प्रगतीचें संरक्षण करण्यासाठीं ह्मणून युद्ध पुकारण्यांत आलें होतें, त्या वेळीं शाम काकानें ह्याच आपल्या काळ्याकुट्ट विद्रूप मुलांना राष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं युद्धावर रवाना केलें होतें. युद्धांत विजय मिळविल्याचें श्रेय आपल्याकडे आहे, असें शाम काका छातीठोकपणानें आपल्याला बजावतात ! हें जर खरें असेल तर ह्या यशाचा बराचसा भाग ह्या काळ्या फौजी तुकड्यांकडेच जातो. १९१८ च्या हिवाळ्याच्या सुमारास महायुद्ध संपलें. विजयपताका फडकावीत, व आपल्या असामान्य शौर्याबद्दल मिळविलेलीं पदकें मोठ्या डौलानें मिरवीत हे तरुण अमेरिकेस परत आले. युद्ध संपलें होतें. हूणांपासून, प्रशियांतील पशू पासून, तान्ह्या अर्भकांचा

---

* ' धि नीग्रो इन शिकॅगो ' पान, ४८३.

व अबलांचा चरचरा गळा कापणाऱ्या अमानुष रानटी लोकांपासून जगाचें संरक्षण करण्याचें कार्य पूर्ण झालें होतें ! ह्या संरक्षणकार्याचे आधार हे कृष्णवर्णीय आतां परत आले होते. इतिहासांतील सर्वांत मोठ्या महायुद्धांत विजय मिळविण्याचें महनीय व पवित्र कार्य संपादन करून ते आतां परत आले होते. जुल्म, अत्याचार, अधार्मिकता, ह्यांचा नायनाट करण्यासाठीं हें युद्ध पुकारण्यांत आलें होतें; पारतंत्र्याच्या जुलुमाखालीं रखडणाऱ्या गरीब देशांचा उद्धार करून समता व स्वातंत्र्य ह्यांची स्थापना करणारें युद्ध, सर्व पृथ्वीवर निरंतर शांति व प्रेमभाव स्थापित करणारें युद्ध, अशी, ह्या युद्धाची मोठमोठालीं नांवें आणि वर्णनें होतीं ! – ह्या युद्धांत आपल्या प्राणांचें मोल देऊन यश संपादून हे कृष्णवर्णीय परत आलेले होते !

वाचकहो, हें १९१८ च्या हिवाळ्याच्या सुमारास घडलें, हें विसरूं नका ! १९१८ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या ११ तारखेस, ज्या वेळीं फ्रेंडर्स-च्या तोफांनीं आपले शेवटचे गोळे झाडून सोडले, व आपलीं घातकी मुखें मिटून घेतलीं, त्या वेळीं, युद्धांत जर्जर झालेल्या राष्ट्रांच्या देहांत प्रमत्त आनंदाचा आणि हर्षाचा संचार झाला ! त्या दिवशींचें चित्र प्रस्तुत लेखकाला आजही चांगलें स्मरतें. तहावर सही झाली, आणि जवळ जवळ एक कोट जीवांचा संहार केल्यानंतर युद्धाचें पिशाच्च शांत झालें, हें वर्तमान लंडन शहरांत कळलें त्या वेळीं दुपारच होती. विजयाच्या त्या उन्मादकारक आनंदाच्या भरांत लोक क्षणभर आपले वर्णभेद आणि जातिभेद विसरून गेले. यशामुळें उत्पन्न झालेल्या भ्रातृभावनेच्या पहिल्या भरांत, काळे, पांढरे, पिंवळा, नीग्रो, जपानी चिनी लिथुॲनिअन, पोल्स, फ्रेंच, इंग्लिश, अमेरिकन – सर्वच प्रकारचे लोक एकमेकांच्या गळ्यांत मिठ्या मारूं लागले. त्या रात्रीं लंडन मधील हजारों तरुणींनीं जो प्रथम भेटला त्या नवख्या तिऱ्हाईताला आपल्या सर्वस्वदानानें पुनीत केलें ! – कारण तो विजयाचा दिवस होता ! त्या दिवशीं समतेच्या, बंधुत्वाच्या व उत्कर्षाच्या नवीन युगाचा प्रारंभ झाला होता.

युद्धाच्या रक्तानें माखलेल्या राष्ट्रांनीं अटलांटिक महासागराच्या पलीकडे आपली दृष्टि वळवून पाहिलें, तों दूर अंतरावर वसलेली अमेरिका लढाईच्या

धुक्यामुळें अखिल जगाचा उद्धार करणारी व शांतता प्रस्थापन करणारी देवता अशी भासली. शांतता प्रस्थापित करण्यासाठीं, विजयांत दयेचा योग्य अंश मिसळण्यासाठीं आणि त्यांच्या १४ तत्वांमध्यें दिग्दर्शित केलेल्या नवीन पंथाची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठीं प्रत्यक्ष प्रेसिडेंट विल्सनची स्वारी युरोपखंडांत येऊन दाखल झाली !

परंतु हा भ्रमाचा फुटका भोंपळा आतां जुन्या इतिहासांत दाखल झाला आहे. युद्धांत विजय मिळविणाऱ्यांना शांततेला आंचवावें लागलें. प्रत्येक भावना, प्रदर्शित केलेला प्रत्येक उद्देश, – चौदाही मुद्यांतील प्रत्येक मुद्दा अर्थतः व उद्देशतः फोल ठरविण्यांत आला. व्हर्सेलीस येथें ठरविला गेलेला तहनामा ह्मणजे युद्धाच्या मूळ उच्च उद्देशांची उत्तर क्रिया आणि 'शांतिपाठाच्या' अधोगामी उद्देशांची सुरवात, असें दिसून आलें. राष्ट्रसंघ ह्मणजे भोंदूचा संघ ठरला !

परंतु तिकडे, शांततेच्या ह्या तहनाम्यावर सही व्हायचीच होती, आणि प्रेसिडेंट विल्सन साहेब जर्मनांच्या अत्याचारांचा विचार करण्यासाठीं न्यायासनावर विराजमान झाले होते, – आणि इकडे, त्यांच्याच देशांत, एका नीग्रोला सार्वजनिक ठिकाणीं बटाटा उकडतात तसें जिवंत उकडून काढण्यांत आलें ! त्या वेळीं ज्याला दलित जातींचें स्वातंत्र्यप्रदान (Charter of Subject Races) असें नांव देण्यांत आलें होतें त्या हक्कावर अमेरिकेच्या प्रतिनिधींनीं सह्या केल्यानंतर एका महिन्याच्या आंतच, शिकागोचे नागरिक इतिहासांतील अत्यंत गलिच्छ व निर्घृण स्वरूपाच्या अशा नीग्रोच्या शिकारी करण्यांत मग्न होते ! (मूळ पुस्तकांत) प्रसिद्ध झालेल्या चित्रांवरून, ह्या स्वातंत्र्यदानाची पूर्तता अमेरिकन लोकांनीं कोणत्या प्रकारें केली, तें वाचकाच्या ध्यानांत येणार आहे. १९१८ च्या आगस्ट महिन्यापासून १९१९ च्या आगस्ट महिन्या पर्यंतच्या एक वर्षाच्या सर्वोत्कृष्ट आणि वाचनीय समजल्या जाणाऱ्या अवकाशांत पांच निग्रो स्त्रिया जिवंतपणीं सोलून काढून ठार मारण्यांत आल्या ! – सभ्य ह्मणून सर्व जगांत नांवाजलेल्या ह्या लोकांकडून पांच स्त्रिया अशा प्रकारें मारल्या गेल्या !

यूनायटेड स्टेट्समध्यें नीग्रो लोकांवर ज्या अत्याचाराचें व अपमानाचें लक्ष्य होण्याची पाळी पदोपदीं येते, त्यांच्या स्वरूपाचें संपूर्णतः विवेचन करणें अनावश्यक आहे. अशा कांहीं उदाहरणांचा उल्लेख वर केलेलाच आहे, आणि ही मालिका अशीच आणखी कितीतरी लांबवितां येणें शक्य आहे, हें जरी खरें असलें, तरी पण, दिलेल्या उदाहरणांवरून असल्या प्रसंगांचें निर्घृणत्व व पशुत्व वाचकांना सहजच पटण्यासारखें आहे.

जाती जातींच्या संबंधाचें निरीक्षण करण्यासाठीं नेमलेल्या कमिशनच्या निकालांतून पुरावे उध्दृत करून मी हें तर सिद्ध केलें आहेच कीं, नीग्रो पुरुष हा श्वेतकाय स्त्रीशीं सलगी करण्याचा प्रयत्न स्वतः करीत नसतो. आणि तरीही नीग्रो बद्दल सर्वसाधारण समज मात्र असा रूढ आहे, कीं, तो अमेरिकन मनुष्यापेक्षां नीच, अनैसर्गिक मार्गानें आपली कामेच्छा तृप्त करणारा, स्त्रियांवर बळजबरी करणारा पशु असतो ! ही भावना किती निर्मूल व निराधार आहे त्याचा अधिकारयुक्त पुरावा पुढें देत आहे:—

जज्ज ह्यूगो पॅम:— "तुम्ही त्यांच्यावर मैथुनविषयक आरोप करतां. परंतु अशा प्रकारचे गुन्हे – मग ते बळजबरीचे असोत किंवा बालमैथुनाबद्दलचे असोत—ह्या पेक्षांही अधिक भीषण स्वरूपांत श्वेतकाय समाजांत घडलेले जितके मला ठाऊक आहेत, तितके ते काळ्या लोकांमध्यें घडत नाहींत ! सरासरी दहा दिवसांपूर्वीच माझ्यापुढें एक एतद्विषयक अत्यंत भयंकर गुन्हा निकालासाठीं आला होता. त्या गुन्हेगाराला मी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली ! अशा प्रकारचा गुन्हा केलेला नीग्रो माझ्या पुढें केव्हांही आलाँ नाहीं !

जज्ज चार्ल्स एन्. थांम्सन:— फौजदारी कोर्टाशीं माझा जो कांहीं संबंध आला, त्यांत बाल मैथुनाचे गुन्हे आश्चर्यजनक प्रमाणांत माझ्यापुढें ठेवण्यांत आले. परंतु अशा गुन्ह्यांत एकदांही कोणी नीग्रो गुन्हेगार म्हणून माझ्यापुढें आला नाहीं. बहुधा प्रत्येक जातीचे लोक आरोपी म्हणून माझ्यापुढें आले, परंतु नीग्रो मात्र एकदां सुद्धां आलेला मला स्मरत नाहीं.... ... अशय स्वरूपाच्या किती तरी गुन्ह्यांची मी चौकशी केलेली आहे, परंतु ह्या गुन्ह्यांबद्दल अपराधी म्हणून एकदांही कोणी नीग्रो माझ्यापुढें आणण्यांत आला नाहीं.

कांग्रेसनें नेमलेल्या कमिटी ऑफ् इमिग्रेशननें न्यू यॉर्क येथील सेशन्स कोर्टातील दाव्यांचें वर्गीकरण केलें, त्यांत असें दिसून येतें कीं, अश्या क्वचित् घडणाऱ्या गुन्ह्यांची संख्या २·१ होती, आणि त्यापैकीं ·५ दावेच फक्त असे होते, कीं ज्यांत नीग्रोचा संबंध आलेला होता. ह्याचा अर्थ असा कीं, बळजबरीच्या गुन्ह्यांच्या बाबतींत पांच श्वेतकाय अमेरिकनांच्या गुन्ह्यास नीग्रोचा एक गुन्हा असें प्रमाण पडतें.

नीग्रो हा स्वभावतः बळजबरी करणारा व अनैसर्गिक मैथुन करणारा असतो, हे दोन्हीही आरोप असत्य आहेत असें कमीशननें नमूद करून ठेवले आहे:—

" वॉकेगन येथील दंगा:— वाकेगन येथील नीग्रो राहेवाश्यांमध्यें व तेथील गोरे नागरिक आणि ग्रेट लेक नेव्हल ट्रेनिंग स्टेशन मधील दर्यावर्दी लोकांमध्यें जो दंगा झाला, त्यांत, स्त्रीविषयक भानगडीचा संबंध, हा एक महत्वाचा मुद्दा होता. लेफ्टनंट ब्लेझीअरच्या पत्नीवर नीग्रो तरुणांनीं हल्ला केला ' ह्या निर्मूल गप्पेवर विश्वास ठेवूनच हा बखेडा माजला असण्याचा संभव आहे, हें उघड आहे. कारण चौकशी अंतीं असें दिसून आलें, कीं कॅप्टन ब्लेझीअर हे अद्यापि अविवाहित आहेत; आणि ह्या प्रसंगीं त्यांच्या गाडींत बरोबर दुसरी कोणीही स्त्री सुद्धां नव्हती. "

" शिकागो येथील दंगा:— एका इटालिअन तरुणी संबंधींच्या बातमीच्या आधारावर, १९१९ च्या शिकागो येथील दंग्यांत एक अत्यंत अमानुष खून करण्यांत आला. सदर तरुणीला एका नीग्रोनें ठार मारलें अशी अफवा पसरविण्यांत आली. अश्या सुमारास त्या भागांतून जोसेफ लिंहग नांवाचा एक निरपराधी नीग्रो तरुण सायकलवर बसून चालला होता. त्याच्यावर ताबडतोब हल्ला करण्यांत येऊन त्याला जागच्या जागीं ठार मारण्यांत आलें. कोरोनरच्या चौकशींत असें दिसून आलें कीं, त्याच्या शरीरावर १४ गोळ्यांच्या जखमा, आणि अनेक सुऱ्यांच्या जखमा असून, सर्व शरीरांतील हाडें तुटलीं असून डोक्याची कवटीही फुटली होती. ह्या अत्याचाराची आधारभूत जी मूळ बातमी, ती सर्वस्वी निराधार होती, हे ही नंतर सिद्ध झालें. कारण त्या

दंग्यांत केव्हांही आणि कोठेंही कोणतीही स्त्री ठार मारण्यांत आलेली नव्हती. ज्याला ठार मारण्यांत आलें, तो नीग्रो सर्वस्वी निर्दोषी होता. एखाद्या तरुणीला कदाचित् थोडीफार दुखापात झाली असेल; पण ही दुखापत करणारा कोण ह्याचा पत्ता मुळींच लागलेला नव्हता !"

ह्याच प्रश्नावर न्यायाधीशांनीं नमूद करून ठेवलेलीं मतें महत्वाचीं आहेत. दोन न्यायाधीशांच्या मतांचा उल्लेख वर करण्यांत आलेला आहेच; त्यांच्याच मताचा अनुवाद करणारें, क्रिमिनल कोर्टाचे जज्ज के. स्केन्लेन ह्यांचें मत पहाः—

"वैषयिक गुन्ह्यांची जवाबदारी श्वेतकायांपेक्षां कृष्णकायांकडे अधिक प्रमाणांत आहे, हें मला खरें वाटत नाहीं. ७८ वर्षांपूर्वीं माझ्यापुढें बालमैथुन बद्दल एक नीग्रो इसम गुन्हेगार ह्मणून उभा करण्यांत आला होता. ह्यानें एक अनाथालय उघडलेलें होतें, आणि तेथें पुष्कळशीं लहान मुलें मुली रहात असत. ह्या गुन्हेगाराला मी आजन्म तुरुंगवासाची शिक्षा दिली होती. अश्या स्वरूपाच्या गुन्ह्याबद्दल माझ्यापुढें आलेला असा तो एकच काय तो काळा इसम होता. परंतु अश्या अत्याचारी गुन्ह्यांबद्दल माझ्यापुढें श्वेतकाय इसम मात्र किती तरी आणण्यांत आले. माझ्या दहा बारा वर्षांच्या कारकीर्दीत बालमैथुनाबद्दल १०।१२ पांढऱ्या गुन्हेगारांनां माझ्यापुढें उभें करण्यांत आलें आहे; परंतु मुलांशीं अत्याचार केलेला एकही नीग्रो माझ्यापुढें आला नाहीं."*

वेश्यावृत्तीबद्दल शिकॅगो म्यूनिसिपल कोर्टाचे जज्ज वेल्स एन् कुक ह्मणतात:—

"१९१८ सालांत श्वेतकायिकांमध्यें चालू असलेला वेश्याव्यवसाय घोड्या स्वरूपाचा, खांसगी घरांतून, स्वस्त हॉटेलांतून, भाड्याच्या खोल्यांतून वगैरे चालतेला आणि लपून छपून चालविण्यांत येणारा असा होता. नीग्रो लोक उलटपक्षीं, शहराच्या एकाच विभागांत राहणारे आणि मिळून मिसळून वागणारे भावनाप्रधान वृत्तीचे लोक असल्यामुळें सार्वजनिक ठिकाणचा त्यांचा जमाव पोलिसच्या सहज निदर्शनास येई व त्यांच्यावर गुन्हा लादण्यांत येई. अनैतिक

---

* धि नीग्रो इन शिकॅगो. पान ३४७.

स्वरूपाच्या गुन्ह्यांबद्दल जे अपराधी पुढें येतात, त्यांत श्वेतकायिकांपेक्षां नीग्रो लोकांचेंच प्रमाण अधिक आढळते. ह्याचें ह्याखेरीज दुसरें कारण असेल असें मला वाटत नाहीं. नीग्रो हा श्वेतकायिकापेक्षां अधिक अनीतिमान् असतो, असें मुळींच नाहीं. श्वेतकायिकांचा वेड्यावांकड्या चोरून मारून चाललेला असल्याकरणानें तो उजेडांत येत नाहीं इतकेंच काय तें ! *

चोरीच्या गुन्ह्याबद्दल सुद्धां, जज्ज वेल्स एन्. कुकचें मत इतकेंच महत्वाचें व नीग्रोला अनुकूल असें आहे:-

" नीग्रोची श्वेतकायिकापेक्षां चोरी करण्याकडे अधिक प्रवृत्ति असते हें ह्मणणें बरेंच मूर्खपणाचे आहे, मला वाटतें. हा प्रश्न ह्मणजे विशेषतः संस्काराचा व परिस्थितीचा आहे, असें माझें मत आहे. चोरी करण्याकडे किंवा खोटें बोलण्याकडे नीग्रोची प्रवृत्ति श्वेतकायिकाइतकीच असते, असा माझा विश्वास आहे." *

जज्ज चार्लस एम् थामसन या बाबतींत अधिक अधिकारयुक्त वाणीनें सांगतो, कीं, त्याच्यापुढें आलेल्या चोरीच्या खटल्यांत नीग्रो लोकांपेक्षां श्वेतकाय गुन्हेगारांचेंच प्रमाण अधिक होतें. *

पुष्कळदां असें सांगण्यांत येत असतें कीं सुसंघटित गुन्हे हा जो अमेरिकन जीवनांतील विशेष ' त्याचा मोठा भाग नीग्रो लोकांच्या वसाहतींतून उगम पावतो. हें ह्मणणं साधार नाहीं. इलिनाइस स्टेटचे गुन्हाशास्त्रज्ञ डॉक्टर हरमन एलरचे मत असें आहे:-

" तुह्मी टोळ्यांच्याविषयीं- अशा संघटना नीग्रो लोकांमध्यें आहेत किंवा नाहींत, असा-प्रश्न विचारला. मला असें माहित आहे कीं, त्या लोकांमध्यें अशा टोळ्या फारश्या नाहींत. नीग्रो लोकांत गुन्हेगारी बहुधा

---

* हे नीग्रो इन शिकागो पान ३४७-३४८

व्यक्तिनिष्ठच असते. कधी कधीं, अगदीं खालच्या दर्ज्याचे नीग्रो दुसऱ्यांच्या हातांतील बाहुली बनलेली आढळतात; त्यांचा अशा रीतीनें उपयोग करून घेतल्याचे किती तरी दाखले मला ठाऊक आहेत. खून, वैषयिक गुन्हे, कांहीं विशिष्ट प्रकारची घरफोडी, चोरी अशा गुन्ह्यांची चौकशी करीत असतांना, आपला संबंध एखाद्या टोळीशीं येत नसून व्यक्तीशिच येतो, असे निदर्शनास येतें.

परंतु तेंच शिकॅगोमध्यें गुन्ह्यांचें धंदेवाईक आणि सुसंघटित असें स्वरूप अस्तित्वांत आहे. अशा धंदेवाईक गुन्हेगारांत नीग्रो लोकांचें फारच थोडे अंग असते; आणि ते सुद्धां अगदीं योगायोगानेंच (accidental) असें असतें. ह्या वर्गातील केव्हां केव्हां गुन्हे करणारे लोक हे बहुधा सशक्त रागीट आणि खालच्या दर्ज्याचे असे असतात; आणि ते अत्यल्प अत्याचाराचे असेच मार्ग स्वीकारतात. *

मेजर एल्. एम्. सी फन्कहौसरही असेंच ह्मणतो:—

" गुन्हेगार नीग्रो लोकांची संघटना नाहीं "

प्रोफेसर चार्ल्स ई. मेरिअमही असेंच ह्मणतो:—

" माझा असा विश्वास आहे कीं नीग्रो गुन्हेगार हे श्वेतकाय गुन्हेगारांसारखे सुसंघटित नाहींत. त्यांच्या टोळ्या बहुधा नसतातच; त्या शिवाय त्यांच्या गुन्हेगारीचें स्वरूप धंदेवाईक गुन्हेगाराऐवजीं कधीं काळीं घडलेल्या गुन्ह्याचेंच विशेषतः असते. मला असें वाटतें कीं नीग्रो अपराधी ह्मणजे एकटाच असतो; आणि त्याचा गुन्हा हा बहुधा आततायीपणाचा व क्रोधावेशांत घडलेला असा असतो. नीग्रो हा धंदेवाईक गुन्हेगार नसून कधीं काळीं गुन्हे करणारांच्या वर्गात मोडतो.

---

* ' धि नीग्रो इन शिकागो ' पान ३४६.

पोलिसखात्याच्या मताप्रमाणें देखील, नीग्रो लोक टोळ्या टोळ्यांनीं राहून गुन्हे करीत नाहींत असेंच दिसतें. नीग्रो गुन्हेगार एकटाच असतो; आणि टोळींत सामील होणें त्याला आवडत नाहीं. पूर्वी चीफ ऑफ पोलिसच्या पदावर असलेले जनरल लाओरी टी. स्टूअर्ड असें ह्मणतातः—

" साधारणपणें पाहतां, मला असें वाटतें कीं नीग्रो गुन्हेगार एकेकटाच गुन्हा करतो. माझा जिच्याशीं संबंध आला अशी नीग्रो गुन्हेगारांची फक्त एकच टोळी मला स्मरते. परंतु श्वेतकाय गुन्हेगारांच्या अशा किती तरी टोळ्या माझ्या तडाख्यांत सांपडल्या होत्या.

वाचकांनीं नीग्रोनीं वैयक्तिकपणें केलेल्या गुन्ह्यांची नीग्रो लोकांच्या घरादारांवर बांब टाकून त्यांचा सत्यानाश केलेल्या सुसंघटित गुन्ह्यांशीं तुलना करून पहावी. १९१७ च्या जुलै पासून १९२१ च्या मार्च महिन्यांपर्यंत, शिकॅगोमध्यें 'नीग्रोचें घर' हा प्रश्न कोणत्या स्वरूपाचा आहे त्याचें प्रत्यंतर ५८ बांबच्या स्फोटांनीं पटवून दिलें होतें. ह्या भानगडींत दोन नीग्रो ठार झाले, पुष्कळसे श्वेतकाय व नीग्रो लोक जखमी झाले, आणि १००००० डालर्सपेक्षां अधिक जिनगीची माती झाली ! ह्या ५८ बांब स्फोटांपैकीं ३८, ४१ व्या, ६० व्या कॉटेज ग्रोव्ह अव्हेन्यू, आणि स्ट्रीट ह्या चार रस्त्यांच्या चतुः सीमेच्या आंत घडून आले. ह्या बांबचें प्रमाण असें पडलें कीं दर वीस दिवसांनीं एक बांब श्वेतकायिकांकडून नीग्रो लोकांच्या घरांवर टाकण्यांत येत असे. आणि तरीही, ज्यांना फक्त बांधून ठेवण्याची शिक्षा देण्यांत आली अशा दोन इसमांना वगळलें, तर ह्या गुन्हेगारीच्या संबंधांत कोणालाही पकडण्यांत आलें नाहीं कीं शिक्षा देण्यांत आली नाहीं.

हे बांबचे अत्याचार घडवून आणणारे लोक, फक्त नीग्रो लोकांच्या वसाहतींवर बांब फेंकूनच स्वस्थ बसले असें नाहीं. नीग्रो जमीनवाल्यांबरोबर, श्वेतकाय जमीनवाल्यांवरही कधीं कधीं बांब टाकण्यांत आले, कारण ह्या श्वेतकायांनीं आपल्या जमिनी नीग्रो लोकांना विकल्या होत्या, किंवा भाड्यानें दिल्या होत्या.

---

* वि नीग्रो इन शिकॅगो पान. ३४६

त्याच प्रमाणें ज्या नीग्रो सावकारांनीं द्रव्य सहाय्य करून आपल्या कर्जदार बांधवांच्या इस्टेटीची श्वेतकायिकांच्या घशांत जाण्यापासून वांचविल्या होत्या, त्यांनाही ह्या बांबचा प्रसाद मिळाल्या वांचून राहिला नाहीं.

ह्या बांब-प्रकरणाची शिकॅगो कमीशननें चौकशी केलेली आहे. ह्या प्रकरणांतील कांहीं विशिष्ट प्रसंगांचें त्यांनीं केलेलें वर्णन येथें उद्धृत करतों:-

" मोटले होम वरील बांब प्रकरण:-१९१३ सालीं एस्. पी. मोटले नांवाच्या एका नीग्रो इसमानें नं. ५२३० मेरीलँड एव्हेन्यू हें घर विकत घेतलें, व तो आपल्या कुटुंबासह त्याच वर्षी मार्चच्या १५ तारखेला ह्या घरांत रहावयास गेला. हा व्यवहार एका गौरकाय दलालाच्या मार्फतीनें झाला होता. ह्या घरांत हें कुटुंब चार वर्षे पर्यंत रहात होतें, आणि या अवधींत शेजाऱ्याकडून तऱ्हतऱ्हेचें तिरस्कार दर्शविणें, आणि रस्त्यांत नीग्रो मुलाबाळांना फिरण्यास उघड उघड हरकत घेणें ह्या पेक्षां अन्य असा त्रास त्यांना फारसा झाला नाहीं. पण १९१७ सालच्या जुलैच्या १ ल्या तारखेस अगदीं एकएकीं, पूर्वी कोणत्याही प्रकारची सूचना न मिळतां, त्यांच्या घराच्या पुढील ओसरींत एकाएकीं बांबचा स्फोट करण्यांत आला; ह्यामुळें त्या घराचा पुढील भाग उडवून दिला गेला. ह्यांत घरमालकाचें सरासरीं १००० डालर्सचें नुकसान झालें. ५२ व्या रस्त्याच्या आणि लेक मार्ग एव्हेन्यूचा चौकींतील पोलिस स्फोटानंतर दहा मिनिटांनीं त्या ठिकाणीं येऊन दाखल झाले; परंतु गुन्हेगारांचा कांहींच तपास न लागल्यामुळें कोणालाही पकडण्यांत आलें नाहीं. ह्या घराचा मूळचा मालक नीग्रो लोकांचा कट्टा द्वेष्टा असून, ह्या विभागांतून नीग्रो लोकांचे उच्चाटन करूं पाहणाऱ्या चळवळ्यांपैकीं एक होता.

ह्या नंतर कांहीं दिवसांनंतर, मोटले आपल्या शेजारचीच दुसरी एक इमारत विकत घेण्याच्या विचारांत आहे, अशी बातमी बाहेर आली. ह्यानंतर १९१९ च्या जून महिन्याच्या ४ तारखेस पहांटेस ४ वाजतां त्या इमा-

रतीन्या पुढील भागांत बांबचा स्फोट झाला व त्यामुळें इमारतीचा पुढील भाग कोसळून पडला. स्फोट झाल्याबरोबर आसपासच्या घरांतील रहिवाशी तावडतोब बाहेर रस्त्यावर येऊन दाखल झाले. ह्या प्रसंगींही, बांब फेंकणाऱ्याचा कांहींच सुगावा न लागल्यामुळें कोणालाही पकडण्यांत आलें नाहीं. ह्या पुढील प्रसंगीं, शेजारच्या घरांत दुसऱ्या एका नीग्रो कुटुंबाला आणून ठेवण्याचा मोटलेचा विचार होता असा त्याच्यावर आरोप ठेवण्यांत आला. ह्या घरासंबंधीं घरमालकांशीं त्या दुसऱ्या नीग्रो कुटुंबाचा व्यवहार ठरत असतांना, त्यांनीं पत्रद्वारें व टेलिफोनमधून पुष्कळ धमक्या देण्यांत आल्या. सरते शेवटीं तें कुटुंब ह्या धमक्यांना न जुमानतां आपल्या नव्या घरांत येऊन राहिलें; पण त्यांच्यावर बांबचा प्रयोग करण्यांत आला नाहीं.

फॉक्सच्या घरावरील बांबप्रकरण—एका, जमिनीचा क्रयविक्रय करणाऱ्या कंपनींशीं संबंध असणारा मोझेस फॉक्स नांवाचा श्वेतकाय इसम, न. ४४ ईस्ट फॉर्टीफिफ्थ (४५ व्या) स्ट्रीट, येथें रहात असे. हें घर त्याला फार मोठें असल्यामुळें त्यानें दुसऱ्या लहान घरात जाऊन राहण्याचें ठरविलें. त्याचें हें घर, एका कंपनीमार्फत त्याला ठाऊक नसणाऱ्या कोणा तरी इसमाला विकण्यांत आलें. ही विक्री झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं १९२० च्या मार्चच्या १० तारखेला, त्याला टेलीफोनमधून असें कळविण्यांत आलें कीं, आपलें घर नीग्रोला विकल्याच्या अपराधाबद्दलचें परिणाम भोगण्यास त्यानें तयार असलें पाहिजे. त्या दिवशीं सायंकाळीं ७-३० च्या सुमारास एक मोटार त्याच्या घरावरून अगदीं संथपणें तीनदां गेली, आणि प्रत्येक वेळेस ती घराच्या पूर्व भागास किंचित काळ पर्यंत थांबली. तिसऱ्या खेपेस एक इसम त्या मोटारींतून खालीं उतरला व लांब फ्यूज असलेला एक बांब त्यानें घराच्या ओरींत नेऊन ठेवला. फ्यूज सरासरी ४ मिनिटें पर्यंत जळत होती. धुरामुळें कुतुहल उत्पन्न होऊन फॉक्स घरांतून धांवत बाहेर आला. तो दाराशीं येण्यापूर्वीच बांबचा स्फोट झाला. ह्या बांबमध्यें डायनामाईट भरलेलें असून लोखंडाचे

तीक्ष्ण व अणकुचीदार तुकडेही होते. हे तुकडे, रस्त्याच्या पलीकडील घराच्या खिडकींतही शिरले. हें कृत्य करण्यास असाच दिवस निवडण्यांत आला होता कीं ज्या दिवशीं एडवर्ड ओन्स नावांचा नीग्रो पोलीस तेथील पहाऱ्यावर नसून एक गोरा पोलिस तेथें होता. डॅन जोन्स नांवाचा एक नीग्रो देवडीवाला व फ्लारेन्स डी. लव्हलेड नांवाची एक नीग्रो भाडेकरीण ह्या दोघांनींही हा सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिला. घराच्या पुढील भागाचा सत्यानाश झाला असून खिडक्यांचेही तुकडे तुकडे उडाले होते. सरासरीं १००० डालर्सचें नुकसान झालें होतें. ह्या प्रकरणां-तही कोणाला गिरफ्तार केलें गेलें नाहीं.

जेसी बिंगाच्या इस्टेटीवरील बांब-स्फोट:—जेसी बिंग हा एक नीग्रो सावकार व जमीन जुमल्याचा धनी असा इसम आहे. त्याची पेढी अ. ३६३३ स्टेट स्ट्रीट येथें असन जमिनीच्या क्रयविक्रयाचें त्याचें दुकान नं. ४७२४ स्टेटस्ट्रीट येथें आहे. त्याचें राहतें घर नं. ५९२२ सौथ पार्क एव्हेन्यू येथें आहे. त्याचा एकंदर ५००००० डालर्सचा रोजगार आहे, आणि त्यानें आपल्या पेढीच्या वतीनें पुष्कळशा नीग्रो लोकांच्या इस्टे-टींची गहाणखतें करून घेतली आहेत.

ता. १२ नोव्हेंबर १९१९ ह्या दिवशीं त्याच्या दुकाना वरून एक मोटार गाडी गेली, व जातां जातां तींतून त्याच्या दुकानाच्या घरावर एक बांब फेकण्यांत आला. ह्याचा परिणाम तें घर समूळ नष्ट करून टाकण्यांत झाला. लवकरच पोलिस येऊन दाखल झाले, पण तों पर्यंत मोटार कुठल्या कुठें नापत्ता झाली होती. गुन्हेगाराचा कांहींच सुगावा न लागल्यामुळें ह्या बाबतींत कांहींच धरपकड करण्यांत आली नाहीं पोलिसांचे असें मत पडलें कीं, जेसी बिंगाच्या गोऱ्या शेजाऱ्यांना तो नीग्रो लोकांशीं करीत असलेले व्यवहार नापसंत होतें.

ह्या नंतर एकवीस दिवसांनीं बिंगाच्या राहत्या घरापुढें एक मोटार येऊन उभी राहिली, व तींत बसलेल्या इसमानें खालीं उतरून घराच्या पुढील भागांत एक बांब आणून ठेवला. सुदैवानें त्याचा

स्फोट झाला. नाहीं. पोर्चमध्यें तो धुमसत असलेला लोकांना आढळला. नीग्रो लोकांबद्दलचा द्वेष ह्या भानगडीच्या मुळांशीं आहे. असें पोलिसचें मत पडलें.

पंचवीस दिवसांनंतर बांबवाले पुन्हा आले, व पूर्वस्थानीं तिसरा बांब ठेऊन निघून गेले. ह्या वेळच्या स्फोटांत बिंगाच्या घरचा पोर्च अजीबात उडून गेला. ह्या वेळींही ह्याचें कारण बिंगा उच्च लोकस्तींतिल जागा नीग्रो लोकांना भाड्यानें देतो ह्मणून त्याच्याबद्दल गोऱ्या लोकांना वाटणारा द्वेष हेंच आहे असें मत देण्यापलीकडे पोलिसांना कांहींच करतां आलें नाहीं. ह्या घराची दुरुस्ती करण्यांत आली, व त्याचें संरक्षण करण्यासाठीं पोलीसची योजनाही करण्यांत आली. त्या दिवशीं १२ वाजतां पाहऱ्यावर असलेला पोलिस थोडा अगोदरच कामावरून निघून गेला, व त्याच्या जागीं येणारा दुसरा पोलीस थोडासाच उशीरानें येऊन दाखल झाला. मध्यंतरींच्या अवकाशांत एक मोटार बिंगाच्या घरापुढुन निघून गेली, आणि जातां जातां आंतील इसमानें एक बांब बिंगाच्या घरच्या पुढील आवारांत झोंकून दिला. बांब पाण्याच्या डबक्यांत पडला आणि त्या मुळें फ्यूज विझला. हा बांब काळी बारूद, मानिला कागद व कापूस ह्यां पासून बनावेला असल्याचे आढळून आलें. या सर्वांचें कारण काय तर "तुमचे ३०००० डॉलर किंमतीचें घर गोऱ्या लोकांच्या वस्तींत आहे."

१८ जून १९२० ह्या दिवशीं जेव्हां ही बांब टाकणारी मोटार पुन्हा आली, त्या वेळीं पोलिसाचा पहारा कांढलेला नव्हता. पण गाडी घराशेजारीं येण्याचे वेळीं पहारेदारांपैकीं एकही शिपाई तेथें दिसे ना. ह्या वेळीं एक मनुष्य गाडींतून खालीं उतरला व त्यानें नीट, काळजीपूर्वक बांब नेऊन ठेवला. ह्या स्फोटामुळें घराचें सरासरी ४००० डॉलर्सचें नुकसान झालें. वारंवार घडलेल्या ह्या अत्याचाराच्या प्रवर्तकांचा शोध लावणाऱ्यास बिंगानें १००० डॉलर्सचें बक्षीस देण्याचें जाहीर केलें.

नोवेंबरच्या २३ तारखेस बिंगाच्या घरावर पुन्हा बांब फेकण्यांत आला. ह्या प्रसंगीं बिंगाच्या घरापेक्षां त्याच्या शेजाऱ्यांच्या घरांचेंच ह्या स्फोटामुळें अधिक नुकसान झालें. गुन्हेगाराचा मात्र पत्ता लागला नाहींच. *

ह्या व अशा आणखी नीग्रो लोकांच्या घरांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यां बाबत एकंदर दोन इसमांना संशयावरून पकडण्यांत आले, व त्यांनाही ज्यातमुचलका घेऊन सोडून देण्यांत आले जज्ज स्कॅन्लेन झणतो, "असें आहे तरीही, कोणीही न्यायाधीश एकाच पुराव्यावर, गोऱ्या अपराध्याला शिक्षा देईल: त्यापेक्षां काळ्या इसमाला अधिक तत्परतेनें व कमी विचार करून शिक्षा ठोठावतो." * जज्ज कीर्सन झणतो, एकाच पुराव्याच्या वस्तुस्थितीच्या आधारावर गोऱ्यापेक्षां काळ्या गुन्हेगाराला लवकर शिक्षा मिळते. दंग्यांचे वेळीं पोलीसनें फक्त काळ्या लोकांनांच पकडले; आणि गोरे लोक अजीबात सोडून देण्यांत आले." * जज्ज स्कन्लेन झणतो "साधारण पणें, गोऱ्यापेक्षां काळा मनुष्यच अधिक लवकर गिरफ्तार करण्यांत येतो." *

वर दिलेल्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत, असें शिकॅगो कमिशननें पूर्ण चौकशी करून नमूद करून ठेवलें आहे. त्यांनीं आपल्या चौकशीचा थोडक्यांत सारांश खालील शब्दांत व्यक्त केला आहे:—

"विविध स्वरूपाची पुष्कळ माहिती गुन्ह्याचा शास्त्रोक्त अभ्यास केलेले लोक; मुलांच्या कोर्टाचे, म्युनिसिपल कोर्टाचे, फिरत्या कोर्टाचे, सुपिरिअर कोर्टाचे व क्रिमिनल कोर्टाचे न्यायाधीश; पोलिस खात्याचे जनरल सुपरिंटेंडेंट, पोलिस कॅप्टन, व पूर्वी मोठ्या पदावर असलेले लोक; तुरुंगावरील उच्चपदस्थ अधिकारी; संस्थानांचे अटर्नी (सरकारी वकील) ; सुट्टीवर असलेले आणि कामावर असलेले तज्ञ; शेरिफच्या आफिसांतील प्रतिनिधि; वस्तुस्थितीचें व गुन्ह्यांचें पूर्ण ज्ञान असणारे समाज-कार्यकर्ते, इ. लोकांकडून मिळावेण्यांत आली.

नीग्रो लोकांत गुन्हे कां जास्त दिसतात व एकाच प्रकारच्या गुन्ह्यांत गोऱ्यापेक्षां नीग्रोच जास्त पकडला जाण्याचा संभव कां अधिक असतो या

---

* धि नीग्रो इन शिकागो पान १२४ व पुढें.

प्रश्नावर वरील जबान्यांनीं पुष्कळ प्रकाश पडतो. उदाहरणार्थ, एका बाबतींत सर्वच साक्षीदारांची एकवाक्यता असलेली आढळून आली. ती बाबत म्हणजे गोऱ्या लोकांपेक्षां नीग्रो लोकच अधिक प्रमाणांत पकडण्यांत येतात. ह्याचें कारण पोलीसांची सुद्धां अशी धारणा झालेली आहे कीं, काळा इसम म्हटला कीं त्याची गुन्हे करण्याकडे प्रवृत्ति असावयाची ! त्याच बरोबर, गोऱ्या इसमाला अटक करण्यांत निरनिराळ्या अडचणी व संकटे आणि जबाबदाऱ्या अंगावर येण्याचा संभव असतो, त्याचा नीग्रो लोकांच्या गिरफ्तारीच्या बाबतींत अशा धोक्याचा संपूर्ण अभाव, हेंही कारण ह्याच्या मुळाशीं आहेच.

गोऱ्या गुन्हेगारांपैकीं फार कमी लोक पकडण्यांत येतात आणि एकाच गुन्ह्यासाठीं अनेक नीग्रो पकडण्यांत येतात, ह्या दोन कारणांमुळें, नीग्रो लोकांच्या गुन्हेगारी बद्दल अतीशियोक्तिपूर्ण कल्पना रूढ झालेल्या आहेत. पोलिसांनीं नोंद केलेल्या गुन्ह्यांच्या यादींतील नीग्रोच्या नांवावर नमूद केलेल्या गुन्ह्यांना आंकडा, क्राईम कमीशननें त्यांच्या नांवानें नमूद करून घेतलेल्या गुन्ह्यांच्या आंकड्यापेक्षां कितीतरी पटींनें अधिक भरला. धरपकड व आरोप शाबित होणें, ह्यांतून गोऱ्यांपेक्षां काळे लोक फारच कमी प्रमाणांत सुटतात. सर्व आंकड्यांचें यथातथ्य प्रमाण जर लोकांपुढें मांडण्यांत आलें नाहीं व नीग्रोच्या गुन्हेगारीचें चित्र फार भडक असें रंगविण्यांत आलें तर त्यांत काहींच नवल नाहीं *

नीग्रोंचा प्रश्न, हें शामकाकांच्या समतावादावरील एक, लांछन झालें या व्यतिरिक्त इतरही लांछनें आहेत त्याचा विचार पुढील प्रकरणांतून केला आहे.

---

* धि नीग्रो इन शिकॅगो. पान, ३४५

प्रकरण ६ वें.

एक बादांत खोटी थाप.

सॅन फ्रान्सिस्को येथील पहिल्या कांग्रिगेशनल चर्चच्या रेव्हरंड जेम्स एल् गॉर्डन् यांच्या मतें "गेलें महायुद्ध मानवजातीच्या हितसंरक्षणासाठीं, केलेलें युद्ध होतें. लोकांचें स्वातंत्र्य कायम रहावें, सर्व जगाच्या स्वातंत्र्याचें अस्तित्व धोक्यांत राहूं नये, ख्रिश्चन धर्माचें पृथ्वीवरून उच्चाटन होऊं नये आणि जगांतील अत्यंत श्रेष्ठ व शिखरस्थ संस्कृति कोलमंडून खालीं कोसळूं नये, एतदर्थ हें युद्ध पुकारण्यांत आलें होतें. !"

रे. जेम्स गॉर्डननें उल्लेखिल्याप्रमाणें जगाचें सौख्य व लोकांचें स्वातंत्र्य हा जो महायुद्धाचा हेतु, त्या हेतूच्या कक्षेंत अमेरिकन नीग्रो लोकांना अर्थातच स्थान नव्हतें. आणि अमेरिकन जीवनक्रमांत इतरत्राहि ख्रिस्ती दयाशीलता व सहेतुकता यांचा असाच विपर्यास झालेला आढळून येईल.

राज्यव्यवस्थेबद्दल एकी कडे अंधश्रद्धा व आदर मनांत वसत असूनही' आचरणानें त्या राज्यचक्राच्या नियमांविरुद्ध आचरण करणें, हा सर्वसाधारण अमेरिकन व्यक्तीच्या स्वभावांतील एक विलक्षण विशेष आहे. टी कायलर म्हणतो:– " जगांत सर्वत्रच, श्रीमंत आणि गरीब हा भेदभाव दिसून येतो. ह्या दोन्ही वर्गांतील लोकांना एकाच मापानें कोठेंही मोजण्यांत येत नाहीं, हें खरें आहे. तरी पण, वैयक्तिक लाभासाठीं लौकिक किंवा सार्वत्रिक सुखाची पायमल्ली करून आपल्या पोळीवर तूप ओढण्याचे जे शिस्तवार व नीच प्रयत्न अमेरिकेंत दृष्टोत्पत्तीस येतात, ते इतरत्र कोठेंही आढळण्यांत येत नसतील ! " हें म्हणणें अगदीं सत्यास धरूनच आहे. अमेरिकेंत, फौजदारी गुन्ह्यांच्या बाबतींत ज्यूरी नेमलेल्या माणसांचीं गुन्हेगाराबद्दलचीं मतें काय आहेत, तें जाणण्यासाठीं, राज्यांतून गुप्त पोलिसांची योजना करण्यांत येते ' आणि लोकशाहीसाठी पुढें करण्यांत आलेल्या गरीब गुन्हेगारांच्या वतीनें जो एक

अद्दही तोंडावाटे उच्चारण्याचा संभव आहे अशा इसमाला ज्यूरर म्हणून नेमण्यांत येत नाहीं. दिवाणी खटल्यांचे बाबतींत, जो पक्ष अधिक सधन असतो, तो पैसे चारून गुप्त पोलिसांना वश करून ठेवतो; ह्यामुळें, त्याला अनुकूल अशा माणसांचीच ज्यूरीचे जागीं नेमणूक करून घेणें त्याला अगदीं सहज असतें. अमेरिकन न्याय कोर्टांतील दाव्यांत जे चमत्कारिक व विपर्यस्त निकाल पुष्कळदां देण्यांत येतात, त्याचें कारण वरील दोन गोष्टींवरूनच वाचकांच्या ध्यानांत येईल. अशा वेळीं ज्यूरीचे सर्व सभासदही विलक्षण जूटीनें काम करतात. ! *

आपल्या न्यायालयाचे कार्य सुव्यवस्थितपणें चालावें अशी ज्या सरकारची इच्छा असते, तें सरकार अशा मार्गानीं ज्यूरीचे एकमत घडवून आणण्याच्या फंदांत कधींच पडणार नाहीं. पुष्कळदां तिन्हाईत इसमाला अमेरिकन न्याय कोर्टातील दृश्यें हास्यास्पद तरी वाटतात, अथवा, त्यांपासून निष्पन्न होणाऱ्या परिणामांच्या दृष्टीनें भयंकर स्वरूपाचीं वाटतात. अगदीं सुरवातीपासूनच ह्या सबगोलांकाराला सुरुवात होते. (संयुक्त संस्थानांशी संबध असण्याऱ्या खेरीज) सर्वच गुन्ह्यांची चौकशी व त्यांच्यावरील खटले चालविणें हें कार्य प्रत्येक जिल्ह्यांतील डिस्ट्रिक्ट अटर्नीच्याकडे सोंपाविण्यांत येते. संस्थानांतील इतर अधिकाऱ्यांप्रमाणें ह्या अधिकरणाचीही योजना निवडणुकीवर अवलंबून असते; आणि, आपल्या जिल्ह्यांत संस्थानांच्या वतीनें वकीलाचें कार्य करणें एवढेंच त्यांचें कर्तव्य नसून, त्याच्या जोडीला संशयित माणसांच्या हालचालीची माहिती ठेवणें, प्राथमिक चौकशीसाठीं साक्षीदार गोळा करणें, व गुन्हेगारांवर खटला भरणें, हीं कामेंही असतात. ह्यामुळें एखाद्या अटर्नीनें खटला कोर्टात दाखल केला, कीं त्या खटल्यांत गुन्हेगाराला शिक्षा कशी होईल इकडे त्याचें सारखें लक्ष असतें. कारण वकील ह्या नात्यानें आपल्या कायदे पांडित्याच्या बरोबरीनेंच गुप्त पोलिसाचे चातुर्यही आपल्या ठिकाणीं वसत आहे, हें त्याला जगाला

---

* अमेरिकॉनिझम ए वर्ल्ड मीनेस (लेबर पाब्लिशिंग कं. लि.) पान ५३

पटवावयाचें असतें, आणि त्याला आपल्या डिटेक्टिव्ह खात्याची इभ्रतहि सांभाळायची असते. *

असा प्रकार असल्यामुळें, सरकारतर्फे भरण्यांत आलेला खटला चालविण्याची अमेरिकेची पद्धति इतकी निर्दयतेची व प्रसंगी अन्यायाची असते कीं, ब्रिटिश लोकमताला ती रुचण्यासारखी नाहीं. आर्थर सी. बर्च नामक इसमावर ठेवलेला खुनाचा आरोप ज्युरीनें नाशाबीत ठरविल्यानंतर, कॅलिफोर्निआ मधील लॉस एन्जिलीस येथील डिस्ट्रिक्ट अटर्नीनें जे उद्गार काढले, त्यावरून सर्वसाधारण डिस्ट्रिक्ट अटर्नी लोकांची मनःस्थिति आपल्या खटल्यांच्या बाबतींत कशी असते, तें दिसून येईल. तो म्हणाला "वरचेवर गुन्हा शाबीत करीतोपर्यंत मी त्याचा पिच्छा सोडणार नाहीं!" *

पोलिसच्या कचाट्यांत सांपडलेल्या इसमावर गुन्हा शाबित करण्याचे प्रत्येक संस्थानाचे भिन्न भिन्न मार्ग आहेत. लुसिआनामध्ये,:—

"ऑल्व्हन कॅलहौन नामक खुनाच्या आरोपावरून कोर्टापुढें आणलेल्या एका नीग्रोवरील आरोपाच्या बाबतींत एका ज्युरीमनचें मत निराळें पडलें या अक्षम्य अपराधावरून, खवळलेल्या लोकसमूहानें ज्युरीच्या खोलींतून त्याला जबरदस्तीनें खेंचून बाहेर काढलें, व मनसोक्त फटके लगावल्यानंतर त्याला घाणेरड्या पाण्याच्या डबक्यांत बुचकळण्यांत आलें! ही शिक्षा भोगल्यानंतर, पूर्वी विरुद्ध मत दिलेल्या ज्यूररची स्वारी पुन्हा कोर्टांत परत आली, व आपलें पूर्वीचे मत बदलून घेऊन, त्यानें आरोपविरुद्ध आरोप खरा आहे असें आपलें मत नमूद केलें!" ×

अटर्नी आपल्या अधिकाराचा उपयोग फक्त सार्वजनिक व सरकारी बाबतींतच काय तो करतो, असें मुळींच नाहीं. अटर्नीचे पद म्हणजे एखाद्या पक्षाकडून बहाल करण्यांत येणारे बक्षिस असून, त्या पदाचा स्टेट सीनेटरच्या किंवा कधीं कधीं गव्हर्नरच्या पदावर देखील चढण्यासाठीं

---

* 'अमेरिकेनिझम ए वर्ल्ड मीनेस.' पान ५४.

× अमेरिकॅन १९२५ (मार्टिन हॉपकिन्स, लंडन) पान ९७.

पायरीप्रमाणें उपयोग होत असतो. ह्या अधिकाऱ्याला पक्षपाताचें, दुसऱ्यांचा फायदा करून देण्याचे, दुसऱ्यांना लुबाडण्याचे वगैरे अनेक प्रसंग येत असल्यामुळें, हा अधिकार नियुक्त पुरुषास चांगलाच लाट मिळवून देतो, हें उघड आहे.

पगारी अथवा ज्यांना पूर्ण माहिती नाहीं असे अनेक प्रचारक स्वातंत्र्य हाच अमेरिकन संस्था आणि अमेरिकन आयुष्यक्रमाचा पाया आहे असें गृहीत धरून चालतात, जिकडे पहावें तिकडे स्वातंत्र्य शब्दाचा सुळसुळाट. काय ह्मणे स्वातंत्र्य पुतळा, स्वातंत्र्य मोटार, स्वातंत्र्य रोखे, स्वातंत्र्य घंटा इत्यादि नामकरणामुळें वरील प्रचारक असा समज पसराविण्याचा प्रयत्न करतात कीं स्वातंत्र्य शब्दाचा वरप्रमाणें होणारा सर्रास उपयोग, स्वातंत्र्याचें जाहीरनामे, व पाद्री लोकांची सत्वशील पुराणें यांतच लोकशाही आणि ख्रिस्ती सुधारणा यांचें सार सर्वस्व आहे. पण लोकशाही हीं प्रत्येक अमेरिकनला जितकी पवित्र वाटते तितकाच तो तिला पारखा असतो. त्याला बिचाऱ्याला असें वाटतें कीं धनकुबेर ब कंदमूलफलहारी ऋषी एकसमयावच्छेदेंकरून होण्यांत कांहींहि प्रत्यवाय नाहीं. वास्तविक पाहतां अमेरिकन माणसाच्या प्रत्यक्ष आयुष्यक्रमांत लोकशाही न ख्रिस्तीधर्म यांचा शपथ घ्यायला सुद्धां सुगावा लागणार नाहीं, पण निगरगट्टपणानें तो जगभर स्वतःचा देव व संस्था याची टिमकी वाजविण्यास मागेपुढें पाहणार नाहीं. या देवाला मात्र तो आपल्या अंतःकरणाएवजीं नेहमीं तिजोरीत ठेवत असतो. पण जर तुह्मीं त्याला या बाबतींत कांहीं चौकस प्रश्न विचाराल तर तो तुह्मांला गोळी घालील. सारांश काय कीं तो आपल्या श्रद्धेच्या रक्षणार्थ काय हवे करील; आपली तत्वें आचरणांत आणण्याचा प्रयत्न मात्र कधींहि करणार नाहीं एवढेंच काय तें.

अमेरिकन स्वातंत्र्याचें विचित्र स्वरूप, तेथील चमत्कारिक कायदे, खासगी आयुष्यक्रमांत हात घालण्याचा राजव्यवस्थेला असलेला पूर्ण अधिकार, क्षुल्लक लहान सहान अपराधांबद्दल फाजील कडकपणा व मोठ मोठ्या अपराधांच्या बाबतींत आढळणारा बेछुट मोकळेपणा, इत्यादि गोष्टीवरून लक्षांत येण्यासारखें आहे. ह्यामुळेंच, चोरीच्या अपराधीं

बद्दल ६० वर्षांचा तुरुंगवास आणि खूनाच्या अपराधाबद्दल साधी कैद अशा विपर्यस्त शिक्षा येथें देण्यांत आलेल्या आहेत.

सरकारी पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून गव्हर्नर होरेस एफ्. ग्रॅहॅम याला आठ वर्षें तुरुंगवासाची शिक्षा झाली; पण शिक्षा सुनावली गेली त्याच दिवशीं त्याला सोडून देण्यांत आलें. आणि वाशिंगटन मधील जार्ज एल्. पॅट्रिक नांवाच्या इसमाला, त्यानें "कूलिज नरकांत पडो, तो प्रेसिडेंट आहे हा एक आपला योगायोग आहे झालें!" हें वाक्य उच्चारल्याबद्दल दोनशें दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला. इ. स. १९२५ सालीं ओकमलजी येथें तेलाच्या खाणींत काम करणाऱ्या टी. एच्. हार्वे नांवाच्या इसमाला, तो भर रस्त्यांत एका दुराचारणी स्त्री बरोबर हिंडतांना आढळला म्हणून १० डॉलर दंड करण्यांत आला. टॅक्समध्यें रंगी बेरंगी कापडाची विजार घालेंग किंवा भोजन प्रसंगीं निराळा पोषाख घालून बसणें हें नीतिबाह्य आचरण समजलें जातें, परंतु तेथें अशा अनेक स्त्री पुरुषांची वस्ती आहे कीं, जे दररोज रात्रीं आणे दिवसां प्रत्यक्ष सैतानाच्या सहवासांत विलास करीत असतात! टेनेसी येथें, कायद्याच्या बंदीमुळें उत्क्रांतीच्या तत्त्वासारखें विषय शाळांतून शिकविणें हा सुद्धां गुन्हा होतो. कॅन्ससमध्यें असा एक कायदा आहे कीं, शाळेंतील एखाद्या मुलानें जर राष्ट्रीय निशाणाबद्दलची शपथ घेण्याचे नाकारलें तर त्या मुलाच्या आईबापानां पकडून चाबकानें झोडपून काढावें. अमेरिकन ज्यूरिस प्रूडन्सनें केलेल्या प्रगतीचा उल्लेख नुकताच 'वाशिंगटन पोष्ट' वर्तमान पत्रांत जाहीर झाला आहे:-

"आज पहांटेसच पोलिसांनीं नं. ३४५ पेन्सिल्व्हेनिआ एव्हेन्यू नार्थवेस्ट ह्या घराला वेढा दिला आणि माहजोन्गचा खेळ खेळत असण्याच्या अपराधाबद्दल पंधरा चिनी इसमांना गिरफ्तार केलें!"

कनेक्टिकट येथें एका तरुण मुलीला पकडण्यांत आलें, व "ती वाईट मार्गाला लावण्याचा संभव आहे" हा आरोप तिच्यावर ठेवण्यांत आला. लॉस एन्जिलीस येथील कायद्यांप्रमाणें एकाच टबांत दोन तान्ह्या

मुलांना स्नान घालणें हा सुद्धां गुन्हा होतो. आणि तरीही, सॅन फ्रान्सिस्को येथील 'एक्झामिनर' पत्र ह्मणतें कीं ह्या शहरीं १४ व १५ वर्षें वयाच्या दरम्यानांतील शेंकडो मुली 'मादिरेनें धुंद झालेल्या' 'विकारांच्या आहारी गेलेल्या,' आणि '९ तरुणांच्या प्रेमप्रदर्शनाचा लोभ न आवरूं शकणाऱ्या' अश्या आहेत. मिन्नेसोटा येथें मात्र, लोकांच्या नीतिसंरक्षणाचें कार्य पोलिसच करतें. पाऊस पडत असला तर गोष्ट वेगळी, पण एरव्हीं मोटारींचे पडदे सोडून हिंडणें, हा तेथें गुन्हा होतो. मिआमि फ्लोरिज येथें मात्र असा कायदा बियदा कांहीं नाहीं. येथें प्रणयी जोडप्यांना नुसतें मोटारीचें पडदे सोडण्याचीच नव्हे तर ऐकमेकांच्या उश्या-गाद्या वापरण्याची सुद्धां सदर परवानगी आहे! आलबामा येथें रविवारचे दिवशीं कोणतेच खेळ खेळूं नये असा कडक निर्बंध आहे. आणि जॅमिनो नांवाच्या खेळावर तर विशेषच कटाक्ष आहे. पण ह्या संस्थानांत नीग्रोला जाळून पोळून काढण्यासाठीं आठवड्यांतील वाटेल तो वार चालूं शकतो. बहुतेक संस्थानांत वेश्याव्यवसाय हा गुन्हा होत नाहीं; परंतु अविवाहित स्त्रीपुरुषांनीं एकत्र राहणें मात्र गुन्हा होतो. ह्या अपराधाबद्दल कांहीं खटले भरण्यांत आले आहेत; परंतु अमेरिकेंतील उच्च वर्गांतील मनुष्यावर हा गुन्हा क्वचितच लादण्यांत येतो. एखादा मनुष्य एखाद्या स्त्रीला 'ठेवण्या' इतका जर श्रीमंत असेल, किंवा – एखादी बया जर कोणा पुरुषाला ठेवण्या इतकी श्रीमंत असेल व अमेरिकेंत हेंच अधिक संभवनीय आहे तर, तेथील पोलिस अथवा अटर्नी (त्यांचा तळीराम गार केल्यानंतर) जिव्हाळ्याच्या प्रेमप्रवाहाच्या आड येण्याइतकें कठोर कधींच नसतात!

संततिनियमन करून आपल्या कुटुंबाची संख्या मर्यादित ठेऊं इच्छिणाऱ्या कोणत्याहि इसमाला ह्या संबंधींची कोणतीही माहिती देऊं नये, असा डॉक्टरांना कडक नियम घालून देण्यांत आला आहे. ह्या बाबींची माहिती प्रसिद्ध करणें तर दूरच, पण आपल्या रोगी तपासण्याच्या खोलींत बसून अगदीं एकांतांत एखाद्याला ही माहिती सांगणें म्हणजे सुद्धां तेथें गुन्हा मानला जातो. आणि तरीही, श्रीमंत व सुखवस्तू व्यक्तींच्या बाबतींत हा कायदा गुंडाळून

ठेवण्यांत येतो, आणि ज्या गरीब स्थितींतील स्त्री-पुरुषांनां ह्या ज्ञानाची अधिक गरज असते, त्यांना मात्र ह्यापासून वंचित ठेवण्यांत येते. डॉक्टर, नर्सेस व इतर माणसांना हा गुन्हा आचरीत असतां पकडण्यासाठीं वारंवार उपाय योजण्यांत येतात, व एखादा गुन्हेगार सांपडला, तर त्याला शिक्षाही होते. ह्या मुळें गर्भपाताचीं उदाहरणें अमेरिकेंत पावलोपावलीं आढळतात.

प्रत्येक संस्थानाच्या स्वातंत्र्याबद्दलच्या कल्पना निरनिराळ्या आहेत. अमेरिकेंत मर्क्युरी'चे संपादक एच्. एल. मेन्केन ह्मणतात, "युनायटेड स्टेटसचे कायदे न्यू यार्कच्या खिजगणतींतच नाहींत!- तें शहर मनस्वी श्रीमंत असून तितकेंच दिलासलोलुपही आहे! संबंध स्पेनमध्यें नसतील इतक्या वेश्या एकट्या न्यूयार्कमध्यें पोसल्या जात आहेत! तेथें राहणारे कितीतरी दारुडे कोट्याधीश आहेत! न्यूयार्क ह्मणजे सैतानाची राजधानी आहे, आणि तेथें एकहि सोळा आणे सोनळीं कुमारिका मिळणार नाहीं! * आणि तरीहि, युनायटेड स्टेटच्या राजव्यवस्थेंतील दोषांची नुसती चर्चा करणें हा सुद्धां अक्षम्य गुन्हा ठरविण्याइतके न्यूयार्क येथील कायदे कडक आहेत! नेव्हाडा येथील सोडचिठ्ठीबद्दलचे कायदे फारसे कडक नसल्यामुळें, येथें विवाहित पतिपत्नींनीं एकमेकांना सोडचिट्ठी दिलेल्या विधुर-कुमारिकांचे तांड्याच्या तांडे, गोल्फ खेळण्यांत व व्यभिचारकर्मांत दंग होऊन गेलेले आढळतात. इन्डिआना येथें दारूबंदीचे कायदे कल्पनातीत कडक असून सुद्धां हवी तेवढी व्हिस्की विकण्यांत येते. कान्सास येथें जगांतील अत्यंत श्रेष्ठ प्रकारचा गहूं पिकतो-हा प्रांत फार धार्मिक आचरणाचा आहे;-आणि ह्मणूनच त्या प्रांतांत दारूचे प्रवाह पाण्याप्रमाणें वहात असतात! अर्थात्, येथें दारूबंदीचे नियम अंमलांत आहेतच! पश्चिम व्हर्जिनिआ ह्या प्रांतांत कोळ्याच्या खाणी आहेत. जेव्हां खाणींतील मजूर एखादे वेळीं संप पुकारतात, त्यावेळीं "पोलिसांकडून त्यांची हत्या करण्यांत येते. कित्येकदां तर त्यांच्या बरोबर त्यांच्या बायका पोरांनांही ठार मारण्यांत येत असतें! *

---

* अमेरिकेंना पान २९५

उत्तर कॅरोलिना येथील नामदार कॅमेरॉन मॉरिसन ह्मणतात, " युनायटेड स्टेटसची राज्यव्यवस्था, आणि ज्या प्रातिनिधिक तत्वांवर ह्या व्यवस्थेची नियमपूर्वक उभारणी केली आहे तीं तत्त्वें, हीं जगांतील राज्यव्यवस्थेचीं अगदीं पूर्णतेस पोहोंचलेली सर्वश्रेष्ठ होत."

ह्या व पूर्वीच्या प्रकरणांत वर्णिलेल्या गोष्टी जर खऱ्या असतील– आणि त्या खऱ्याच आहेत– तर मग ह्या नामदार साहेबांच्या उक्तीचा अर्थ कसा लावायचा तें आह्मांला कळत नाहीं.

मॉरिसन साहेबांच्या विधानांतील सत्यांश अग्राह्य मानण्याचें, किंवा त्यांनीं कोणत्या आधारावर आपला हा अपूर्व शोध उभारला आहे तें त्यांना विचारण्याचें आपल्याला कांहींच प्रयोजन नाहीं. हीं ' स्वातंत्र्याचीं मूलतत्वें' आणि ही, प्रातिनिधिक राज्यव्यवस्था ' काय आहे त्याची थोडीशी चुणूक आपण आतांपर्यंत पाहिली आहेच. परंतु मॉरिसन साहेबांचे स्तुतिपाठ प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं मिसूरीच्या ' टाईम्स ' पत्रानें ह्या ' स्वतंत्र ' राज्यपद्धतीच्या संपूर्ण व पूर्ण सुधारलेल्या तत्त्वांबद्दल जें लिहिलें आहे, तें वाचनीय आहे. तें पत्र म्हणते:–

पोलिस खात्यांतील लेफ्टनंट सिडने ई. सीअर्स ह्या इसमावर गोळी झाडल्याचें विलिमम लॅशले नांवाच्या नीग्रोनें कबूल केलें, असें पोलिसनें सांगितलें. परंतु आतां असें दिसून येतें कीं सदर नीग्रोनें ही कबूली, बंदुकीच्या दस्त्यानें मारमारून त्याला बेशुद्ध पाडल्या नंतर 'त्याचा जबडा तोडून टाकल्यानंतर, तीन बरगड्या मोडण्यांत आल्यानंतर, तोंडावर व कोथळ्यांत बुटाच्या लाथा खाल्यनंतर, व ह्या सारखेच आणखी उपचार सोसल्यानंतर दिली. हा सर्व प्रकार केल्यानंतर मग त्याला गोळी झाडण्याबद्दल प्रश्न विचारण्यांत आला, असें तो म्हणतो.

अमेरिकेची थापेबाजी व फ्रेंच एक्सचेकरचा तोंडपुजेपणा जर वगळला तर वस्तुस्थितीचें निरीक्षण केल्यानंतर अमेरिकेच्या सुनियमित संस्थांचें वर्णन असें करतां येईल:–

(१) संस्थानांच्या विधिनियामक मंडळावर लोकांचा विश्वास नाहीं. ह्या मंडळावर घालण्यांत आलेल्या निर्बंधांवरून ही गोष्ट सिद्ध होते.

(२) प्रजेचें स्वातंत्र्य व लोकांच्या हातीं राज्यसत्ता हे जे ह्या राज्य तंत्राच्या मुळ संस्थापकांचे दोन मुख्य उद्देश, त्यांची बेगुमानपणें पायमल्ली करण्यांत येत असते. संयुक्त किंवा संस्थानिक, दोन्ही ठिकाणची एकूण एक खातीं विवक्षित लोकसमुदायांच्या हातांतील खेळणीं असून तीं सर्व कर्तव्य पराङ्मुख, भ्रष्ट व नालायक अशीं बनलीं आहेत. वैयक्तिक स्वातंत्र्याला वाव देणें किंवा त्याचें संरक्षण करणें हें प्रत्यक्ष व्यवहारांत क्वचितच दिसतें.

(३) कार्यकारी मंडळ आणि न्यायखातें हींहि खासगी प्रलोभनांना बळी पडत नाहीं असें नाहीं. झव्वूशाहीच्या व सामुदायिक यंत्राच्या तडाख्यांतून हींहि सुटलेलीं नाहींत.

(४) कायदा व कायदा अमलांत आणणारे अधिकारी ह्यांबद्दल सर्वांस तिरस्कार वसत असतो.

लोकसत्ताक पद्धतीच्या आदर्शापर्यंत जाऊन पोहोंचण्याच्या आड येणाऱ्या कारणांचीं मीमांसा येथें अनावश्यक आहे. विधिमंडळांतील सभासद साधारण बुद्धिमत्तेचेंच असतात. ह्यामुळें त्या मंडळाबद्दल तिरस्कार वसत असणें शक्य आहे. नोकरीचे दिवस व पगार ह्याचें अल्पत्व आणि बहुतेक न्यायाधिशांची साधारण बुद्धिमत्ता हें कदाचित् त्या खात्यांतील भ्रष्टाकाराचें कारण असेल. त्याचप्रमाणें, योग्यायोग्यतेचा विचार न करतां करण्यांत आलेली संस्थानिक नोकरांची भरती ही त्यांच्या लांचखाऊपणांचें कारण असेल. राष्ट्रांतील सर्वांत अधिक बुद्धिसंपन्न व योग्य पुरुष नोकरीच्या भानगडींत पडतच नसतील. पण ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतल्यानंतर सुद्धां अमेरिकेच्या सार्वजनिक राज्यतंत्राला व नीतिमत्तेला जी ही कीड लागलेली आहे, त्याच्या मुळाशीं ह्या वरपांगीं कारणांपेक्षां निराळें कांहीं तरी कारण असलें पाहिजे ह्यांत संशय नाहीं. कदाचित् अलेक्झँडर हॅमिल्टनचें ह्मणणें सत्याला सोडून नसावें.

कांहीं वर्षांपूर्वी न्यू-यार्कच्या बंदरांत ऐक्विटानिआ आगबोट शिरत होती, व तिजवरील एक इंग्रज व दुसरा अमेरिकन असे दोघे उतारू समोर दिसणाऱ्या

शहरांतील गगनस्पर्शी इमारतींकडे स्तंभित होऊन पहात होते. इंग्रज गृहस्थाला अमेरिकेसंबंधीं फारशी माहिती नव्हती. बंदरा शेजारींच दिसत असलेल्या स्वतंत्रता देवीच्या पुतळ्याकडे अंगुलिनिर्देश करून त्यानें अमेरिकन गृहस्थाला विचारलें, 'हे काय आहे?' 'हं: ?' तो अमेरकन म्हणाला, 'खरें सांगावयाचें म्हणजे ही आम्हां अमेरिकन लोकांच्या मिथ्यावादित्वाची मूर्तीच येथें बंदरांत उभारून ठेवलेली आहे?

एक्विटेनिआ बोटीवरील अलेक्झँडर हॅमिल्टन व तो अमेरिकन गृहस्थ यांच्या या संवादावरून आपणास वस्तुस्थितीबद्दल कल्पना करणें फारसें कठिण जाणार नाहीं!

प्रकरण ७ वें.

अमेरिकेची कन्यारत्नें!

आधुनिक अमेरिकन युवतीच्या बाह्य स्वरूपांत व वर्तनांत पुरुषवर्गापेक्षां भिन्न असें फारच थोडें आढळतें. तिची शारीरिक शक्ति पुरुषी थाटाचीच असते; नापिताच्या दुकानांत जाऊन जिलेटचा उपयोग करण्याची तिलाही आवश्यकता भासते, चिल्यापिल्यांच्या कटकटींचा तिला मनस्वी तिटकारा वाटतो, ती पुरुषांप्रमाणेंच आफिसांत जाऊन कामें करतें व महिन्याच्या शेवटीं पगार खिशांत घालते, आणि ह्या पैशांचा विनियोग ती उंची सिगारेट्स विकत घेण्यांत व आपले निशाचरी विलासाचे खर्च भागविण्यांत करते! आजच्या भिकारड्या वर्तमानपत्रांची ती इष्टदेवता मानली जाते. परंतु वास्तविक पाहतां ती म्हणजे ह्या युगांतील प्रत्यक्ष पापमूर्ति आहे!

याला कोणी पुराणमतवादीपणा म्हणतील. पण ज्या पूर्वीच्या मातांवर जुन्या काळच्या पित्यांनीं प्रेम केलें व ज्यांनीं गृहांना भूषविलें त्या सर्वांनाच पुराण मतवादी म्हणावयाचें असेल तर बहुधा बोंकडों नव्वद लोक पुराणमत-

वादी असतात. एवढेंच नव्हें, तर मी असेंही छातीठोकपणें म्हणूं शकतो, कीं शेंकडा नव्याण्णव लोक माझ्याप्रमाणेंच पुराणमताभिमानीच आहेत। त्या काळच्या स्त्रियांचे पोशाख कदाचित कांहींसे 'गबाळ' असतील; परंतु त्यांचीं हृदयें सोन्याचीं होतीं ह्यांत संशय नाहीं. मी पुन्हा असें ठांसून सांगतों कीं, गेल्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थांपासून ज्यांचे स्वरूप प्रामुख्यानें प्रगट होऊं लागलें आहे अशा ह्या व्यभिचारी छेलछबेल्यापेक्षां, पूर्वकालीन साध्या भोळ्या व पवित्र आचरणाच्या स्त्रियाच आज शेंकडा नव्याण्णव पुरुषांना मनांतून आवडतात. आजच्या ह्या सिगारेट ओढणाऱ्या, कृत्रिमत्वाच्या रंगानें रंगलेल्या, अर्धनग्नावस्थेंत रस्त्यांतून हिंडणाऱ्या गांव गौरींबद्दल लोकांच्या मनांत गुप्तच कां होईना पण संपूर्ण तिटकाराच वसत असतो.

सर्वांगपरिपूर्ण अशी स्त्री कोणत्याहि सर्वांगपरिपूर्ण वस्तूप्रमाणें आदर्शभूतच असणार; ती प्रत्यक्षांत आढळणें कठिण आहे. तरी पण कोणतीहि सुमाता ह्या स्त्री आदर्शाच्या सीमेंतील पराकाष्टेच्या अंशापर्यंत पोहोंचलेली असते, असें म्हणणें वस्तुस्थितीला सोडून होणार नाहीं. आदर्शभूत सुमाता म्हणजेच आपल्या सद्गुणसामर्थ्यानें, बुद्धिमत्तेनें, समजूतदारपणानें सहानुभूतीनें आणि कुटुंबांत आनंदवृत्तीची प्रेरणा करणाऱ्या व्यक्ति-वैशिष्ट्यानें समाजाच्या भाग्यभांडाराची नियंत्री व राष्ट्राची जोपासना करणारी देवता ठरतें! प्रत्येक शहाणा पुरुष स्त्री पासून ह्याच गुणांची अपेक्षा करीत असतो.

प्रत्येक स्त्रीला जें सामर्थ्य गौरवपर वाटते, ज्या सामर्थ्याचे बाह्यस्वरूप सौंदर्याच्या रूपानें प्रत्यक्ष होतें, आणि ज्या सामर्थ्याची परिणाते म्हणजे प्रजेचें व प्रजेच्या विशिष्ट संस्कारांचे संरक्षण व संवर्धन ह्यांत असतें अशा सामर्थ्याच्या प्राप्तीसाठीं प्रत्येक सुखाभिलाषी समाज धडपड करीत असतो. आजच्या प्रत्येक राष्ट्राची—मग तें राष्ट्र उन्नत असो अथवा अधःपतित असो एक ओरड सारखी चालू आहे, ती म्हणजे अशा सामर्थ्यानें युक्त अशा सु-मातांची आवश्यकता, ही होय. निःशक्त खुरट्या स्त्रिया सर्वोत्कृष्ट संतति उत्पन्न करूं शकत नाहींत; त्याचप्रमाणें अनीतिमान स्त्रियाहि त्या वांछनीय व पवित्र अशा सौंदर्याच्या स्वामिनी होऊं शकत नाहींत!

आजची अमेरिकेची कन्या म्हणजे आधुनिक ईव्ह ! तिची नटवेगिरी फाजील उद्धटपणा, कामोद्दीपकता, कामलोलुपता, सर्वच कांहीं पराकाष्टेला पोहोचलेली ! चार दिडक्या टाकल्या कीं तिचें स्वरूप कसें असतें तें कोणालाही दिसूं शकतें. यूनायटेड स्टेट्समधील वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, कोणतीहि नियतकालिकें ह्या अमेरिकन कन्यारत्नांचे फोटो आपल्या अंकांत दिल्याखेरीज कधींच रहात नाहींत. जॉन बारिमूरच्या बाहुपाशांत बद्ध झालेली आठ सिलेंडरची मोटार हांकीत असतांना, फिफ्थ एव्हेन्यू रस्त्यावरून आपल्या नाकावर पावडर लावणारी, स्नानगृहांत स्नान करीत असतांना लिफ्टवर नियुक्त केलेल्या पोराजवळ निजतांना, उंची सुगंधित सिगारेट ओढतांना किंवा एखाद्या यूरोपांतील मोडक्या परंतु पदवीधर जहागीरदाराशीं विवाह केलेली, अशी तिची अनेक व विविध स्वरूपें तुम्हाला तेथें पहावयास सांपडतील. ती कधीं रोमन बादशहांनाही हेवा वाटावा अशा स्नानगृहांत बसलेली दिसते, तर कधीं, हिरवागार रंग दिलेल्या, अत्तरांच्या व निरनिराळ्या सौंदर्यप्रसाधनांच्या बाटल्यांचा व बरण्यांच्या रांगाच्या रांगा जेथें मांडून ठेवण्यांत आल्या आहेत अशा, आणि जेथील आरसे सौंदर्याच्या ह्या रसायनशाळेंतील सर्व गुह्य गोष्टी प्रत्यहीं प्रतिबिंबित करीत असतात अशा अंतःपुरांत विराजमान झालेली आढळतें ! आपल्या ओंठ रंगविण्याच्या कांडी बरोबरच, निरनिराळ्या ओष्ठांच्या मर्दनानें कांहीं विकार जडूं नये ह्मणून ओष्ठसंरक्षक सामुग्रीही जवळ बाळगणारी, नुसत्या इषाऱ्याची वाट पहाणारे प्रेमिक जिच्या भोंवतीं घुटमळत आहेत, जिची मोहक शरीरयष्टि कोणत्याही उद्दीपक सुखाचा आस्वाद घेण्यास सदैव तत्पर असते, व जिचा आत्मा बनावट टिफॅनी रत्नांनीं खच्चविलेला असतो अशी ही जगन्मोहिनी तुह्माला कोणत्याही आगगाडींत अगदीं सहज दृष्टीस पडते.

ख्रिश्चन धर्मांत कुमारीच्या पावित्र्याला फारच उच्च स्थान दिलें आहे. येशू ख्रिस्ताच्या कुमारी मातेचें उदाहरण गिरवून, आजन्म कुमारी व्रताची शपथ घेणाऱ्या हजारो स्त्रिया अद्यापिही ख्रिस्ती समाजांत दरवर्षी आढळतातच ! ख्रिस्ती धर्माचा जेवढा उदोउदो अमेरिकेंत केला जातो, आणि

धार्मिक कृत्यासाठीं जेवढा पैसा येथें देण्यांत येतो, तेवढा दुसऱ्या कोणत्याही ख्रिस्ती राष्ट्रांत देण्यांत येत नाहीं, हेंही तेवढेंच खरें आहे. आणि तरीही शामकाका फारच थोड्या कुमारिकांना भ्रष्ट केल्याखेरीज सोडतात! ह्या बाबतींत नेहमीं दोष शामकाकांकडेच असतो असें नाहीं, हें येथें शामकाकावर अवास्तव दोषारोप होऊं नये ह्मणून सांगून ठेवणें अवश्य आहे.

आजच्या फॅशनचें प्रवर्तन मुख्यत्वें करून दोन केंद्रांपासून होत असतें; एक पॅरिस व दुसरें न्यूयार्क! उरःप्रदेश न झांकण्याइतक्या विस्तीर्ण व आकुंचित कश्या बश्या जंघा झांकण्याइतक्या आकुंचित परिवेषाचे घडे पॅरिस घालून देतें, आणि सुविस्तीर्ण विलासमर्यादा व अत्यंत अकुंचित नीतिकल्पना ह्यांचे घडे न्यूयार्क घालून देतें!

संमतीचें वय ही एक नुसती भुलथाप आहे; विकारोत्पत्तीचें वय हीच खरी महत्वाची गोष्ट आहे, कारण तो शरीरधर्म असतो. आणि येथील बहुतेक मुलींच्या ठायीं, त्या कायदेशीर रीतीनें संमति देण्यास योग्य होण्याच्या किती तरी पूर्वीच हे प्रबळ शरीरधर्म जागृत झालेले असतात. नेव्हां १४ वर्षें वयाच्या अमेरिकन मुलाला चिमण्या कावळे मारीत भटकण्यांत ब्रह्मानंद होत असतो, त्याच वेळीं त्याच्या १२ वर्षें वयाच्या धाकट्या बहिणीस दुसऱ्याच प्रकारची शिकार मारण्यांत मौज वाटत असते, हें सर्वमान्यें सत्य आहे. कांहीं कांहीं समाजांत मुलें कमी वयांतच यौवन प्रांतांत पदार्पण करतात हें खरें आहे; परंतु निरनिराळ्या जातींच्या मिश्रणापासून निर्माण झालेल्या अमेरिकेसारख्या वर्णसंकरित समाजांत ही वयोमर्यादा अधिकच कमी होऊन, अगदींच लहान वयांत मुले मुली प्रौढ झालेली आढळतात; आणि ह्यांची कामवासना अधिक प्रमाणांत प्रबळ असलेलीही आढळते. अमेरिकन लोकांत ज्या निरनिराळ्या बीजांचें संमिश्रण झालेलें आहे तेंच ह्या अकाल परिपक्वतेच्या व प्रबल वासनालोलुपतेच्या मुळाशीं असलें पाहिजे हें उघड आहे. पुढें दिलेल्या हकीकतीवरून हें वाचकांना स्पष्टपणें कळून येईल कीं अमेरिकन मुलगी चार पांच वर्षांची असतांनाच तिच्या मनांत

वैषयिक कल्पना शिरूं लागतात; ती बारा वर्षांची होते तों तिला आपल्या सहचरांच्या (मुलांच्या) शरीर धर्माविषयीं शारीरिक दृष्ट्या पूर्ण ज्ञान झालेलें असतें; ती १५।१६ वर्षांची होईपर्यंत तिनें बहुधा जीवनरसाचा आनंददायक आस्वाद अनुभवलेला असतो; ती पंचाविशींत येते तों तिनें चारपांचदा तरी विवाहसंस्काराचा अनुभव घेतलेला असतो आणि ज्यावेळीं ती तिशीच्या घरांत येतें त्यावेळीं ती एक रसहीन, संसर्गरोगदूषित, सर्वतोपरी स्त्रीला अननुरूप अशी बनलेली आढळते. शामकाकाच्या कन्येचें हें सामान्य स्वरूप आहे व हा तिचा जीवनक्रम आहे. हें विधान कपोलकल्पित नाहीं, तर तें वस्तुस्थितीचें खरें वर्णन आहे, हें पुढें दिलेल्या आधारांवरून वाचकांच्या ध्यानांत येईल.

कामविषयक प्रबलता अथवा जिज्ञासा म्हणजे यौवनाचें लक्षण आहे, हें डॉक्टर लोरी ह्यांचें म्हणणें अगदीं खरें आहे. ही म्हणजे शरीरानें संवगड्याला मारलेली हांकच आहे. सर्व जातींच्या प्राण्यांमध्यें ही इच्छा उत्पन्न होते, व सर्व प्राण्यांच्या संभोगाचा एक विविक्षित ऋतुही ठरलेला असतो. वसंत ऋतूंत पक्ष्यांची किलबिल व कूजन ह्याच विकाराचें—ह्या प्रीतिविकाराचें द्योतक असतें. अगदीं लहानांत लहान अशा कीटकांनां सुद्धां हे विकार असतात. त्यांच्या चालीरीतींचें व संवयींचें आपणास ज्ञान असेल, तरच ह्या विकारांचें त्यांनीं केलेलें प्रदर्शन आपल्या ध्यानांत येणें शक्य आहे. ज्याची कोणाला लाज वाटावी असें ह्या भावनेंत किंवा विकारांत कांहींही नाहीं; कारण हा विकार ईश्वरानें कांहीं दैवी हेतूच्या पूर्ततेसांठींच जीवांचें ठायीं निर्माण केला आहे. योग्य शिक्षण दिलें गेलें, तर प्रत्येक मुलीला हें म्हणजे खऱ्या प्रेमाची पूर्ति होय असेंच वाटायला पाहिजे. ज्याची मर्यादा स्वतः आणि स्वतःचा पति ह्या दोन व्यक्तींच्या पलीकडे जाऊं नये असें हें कांहींतरी अत्यंत पवित्र व परम मंगल असें कर्म आहे, अशीच तिची धारणा व्हावयास पाहिजे.

यौवन ही बालपण व प्रौढत्व ह्यांच्यां मधली स्थिति आहे. अमेरिकेतील परिस्थितीकडे पाहतां, येथील मुलें एकवीस वर्षांची होईपर्यंत व मुली

१८ वर्षांच्या होईपर्यंत त्यांच्या ठायीं यौवन सुलभ अश्या प्रीति, सहवासेच्छा अश्या विकारांची प्रबल उत्पात्ति होऊं नये. परंतु एक अमेरिकन लेखक अगदीं विश्वासपूर्वक सांगतो कीं, " परंतु , अमेरिकेंतील समाजांतील जीवनच असें चमत्कारिक आहे, कीं वयाच्या दहा बारा वर्षांतच येथील मुलामुलींनां आपण प्रेमपाशांत सांपडलों आहोंत, असें वाटूं लागतें. " तोच लेखक पुढें लिहितो, " ह्याचे परिणामही फार वाईट होतात. परस्परांवद्दल संभोगेच्छेची परिणति वाटेल त्या भयंकर स्वरूपांत होऊं शकते. ह्या परिणामांचें अगदीं साधें स्वरूपच वर्णावयाचें झालें, तर, आईबापांच्या नकळत घरांतून पळून जाणें, बालविवाह, आणि कधीं कधीं बालप्रेमांत व्यत्यय आल्यास लहान मुलामुलींनीं केलेल्या आत्महत्या, ह्यांचीं उदाहरणें पहावी म्हणजे झालें. * "

बहुतेक देशांत यौवनविषयक भावनांचा उदय, ज्यावेळीं मुलें साधारणपणें कालेजांत शिक्षण घेत असतात, त्यावेळीं होतो. कांहीं कालेजांत, कडक शिस्त राखून, खेळांचें प्रमाण वाढवून, शारीरिक श्रम व खेळ ह्यांच्याबद्दल सात्विक आवड उत्पन्न करून नीतिमर्यादेचें संरक्षण करण्याचे प्रयत्न करण्यांत येतात. परंतु अमेरिकेंत मात्र विकारांची उत्पत्ति फारच लहान वयांत होत असतें:—

" मी अधिक खोल चौकशी केली तेव्हां मला असें आढळून आलें कीं, मुलगी पंधरा वर्षांची झाली कीं तिनें दुसऱ्या तरुणावरोबर मोटारींतून हिंडायाला जाण्यास, अठरा वर्षांची झाल्यानंतर मनसोक्त मदिरापान करण्यास आणि प्रेमास तर वाटेल तेव्हां सुरुवात करण्यास कसलाच प्रत्यवाय नाहीं. ह्या मोहक चेहेऱ्याच्या मुलीला, चुंबन, अंगाला लगटणें इत्यादिकांसारख्या विकारोत्पादक गोष्टी—अधिकांशांत नसतील तर त्या अठरा वर्षांच्या अगोदरच अनुभवण्याच्याच आहेत, अशा वाटत होत्या. असें करत असतांना कोणाच्या दृष्टीस न पडण्याची खबरदारी घेणें मात्र अवश्य आहे, असें तिचें मत होतें. हीं फक्त तिचीं एकटींचीच मतें होतीं असें नाहीं, तर तिच्या इतर सोबतिणींत ही अशीच समजूत रुढ असल्याचें दिसून आलें. " *

---

* 'रिव्होल्ट ऑफ माडर्न यूथ' पान. २५

अमेरिकेंतील मुली नक्की कितव्या वर्षीं ऋतुस्नात होतात तें सांगतां येणें कठिण आहे. एवढें मात्र खरें कीं, यूरोपिय मुलींपेक्षां त्या लवकरच वयांत येतात. जी मुलगी अशी लवकर वयांत येतें तिच्या वाबतींत मुलांचे घोटाळेही बरेच घडतात, हें ही तितकेंच सर्वमान्यें सत्य आहे. डेनवर हा अमेरिकेचाच एक मुख्य भाग आहे; येथील गोष्टीवरून जर शितावरून भाताची परीक्षा, ह्या न्यायानें अमेरिकेबद्दल कयास बांधावयाचा असेल, तर तो खुशाल बांधावा. डेनवर येथें शेंकडा ९१ मुलींना १३ वर्षांच्या आंत रजोदर्शन होतें, आणि शेंकडा १९ मुलींना तर तें त्यांच्या वयाच्या ११ वर्षांच्या अगोदरच झालेलें आढळते ! *

मुलामुलींमध्यें जे संभोगाचे दाखले विपुल प्रमाणांत आढळतात त्यावरूनही हेंच स्पष्ट होतें. डॉक्टर एडिथ हूकर ह्मणतात, ' चांगल्या श्रीमंत व सुसंस्कृत अशा कुटुंबांत सुद्धां हे प्रकार थोडे घडतात असें नाहीं. सात सात, आठ आठ वर्षें वयाचीं मुलें आणि मुलीं, आपल्या एवढ्याच वयाच्या मुलामुलींच्या प्रेमांत सांपडलेली असतात, आणि त्यांच्या समागमें, कधीं कधीं दुसऱ्यांच्या देखत सुद्धां संभोग करतांना पकडलीं जातात." ×

" एका कुलीन घराण्यांतिल सात वर्षें वयाच्या मुलीला, आपल्या वडील भावाबरोबर व त्याच्या इतर मित्रांबरोबर संभोग करण्याची चट लागली होती. असेंच दुसरें उदाहरण ह्मणजे शेजारीं शेजारीं, श्रीमंत सुखवस्तु लोकांच्या मध्यवस्तींत राहणाऱ्या पांच मुलांचें. ह्या पैकीं दोन मुली व तीन मुलें होतीं. हीं मुलें रोज एकमेकांशीं आळीपाळीनें संभोग करीत व ह्याचा ते आपल्या इतर मित्रांजवळ मोठ्या गर्वानें उल्लेख करीत. ह्यां पैकीं सर्वांत वडील ह्मणजे दहा वर्षें वयाचा एक मुलगा होता. आणखी तिसरें

---

* रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ पान ८२

× हूकरकृत " लॉज ऑफ सेक्स " पान ३२८

उदाहरण ह्मणजे एका नऊ वर्षें वयाच्या मुलीचें. ही मुलगी चांगल्या कुटुंबांत कडक शिस्तींत रहात होती; आणि तीही, आपल्याला कितीतरी वल्लभ आहेत, ह्या गोष्टीबद्दल तिला विलक्षण अभिमान वाटत असल्याचें दिसून येई ! " *

जेथें मुलांमुलींनां एकत्र ठेवण्यांत येते अशा शिक्षण संस्थांमध्यें, दारू आणि दुर्गुण ह्यांच्या वातावरणांत सांपडल्यामुळें लहान मुलें मुली जो सांवळां गोंधळ घालीत असतात, तो ह्मणजे अशा शिक्षणसंस्थांचें एक अंगच होऊन बसल्यासारखें झालें आहे. बर्नार्ड मॅकफेडन मुलींना ' लग्न कसें करावें ' ह्याबद्दल उपदेश देत असतां लिहितो, आमच्या येथील पुष्कळशा शाळांमधून ज्या गोष्टी तुह्मी आपोआप शिकतां, त्यामुळें, खरें पाहतां चांगला विश्वसनीय पति मिळविण्याची तुमची संधी कमीच होत आहे × " पती मिळविण्याच्या खटपटींत, ' प्रेमाची हांक ' ह्या विषयांबद्दल मुली जें स्वैर शिक्षण मिळवित असतात, त्याबद्दल त्यानें एक सबंध ग्रंथच लिहिलेला आहे. तो ह्मणतो, " पुष्कळच मुली मार्गस्खालित होतात × ! बर्नार्ड मॅकफेडन ह्मणतो " आपल्या सुधारणेचा सर्व डोलारा, आपल्या कौटुंबिक भक्कमपणावरच अवलंबून असतो. " हा भक्कमपणा आजच्या अमेरिकेच्या नीतिकल्पना व आचार रूढ असेपर्यंत, प्राप्त होईल अशी आशा करणें अगदीं वृथा आहे.

" स्थानिक शाळेंत जाणाऱ्या " " इतर चार चौघां कुटुंबाप्रमाणेंच एका कुटुंबांत वाढलेल्या, " व इतर चारचौघी मुलींप्रमाणेंच एक अशा मॉली नामक मुलीच्या बाबतींत ह्या पुस्तकांत वर्णिलेली हकीगत फार बोधप्रद आहे.

अमेरिकेंत सर्व साधारण कुटुंबांत सर्व साधारण मुलगी कशी वाढविण्यांत येते, ह्या बद्दलची कल्पना मॉलीनें केलेल्या स्वतः संबंधीच्या वर्णना वरून करतां येईल. ती ह्मणते, " निरनिराळे नवरें करणें, हें नवीन नवीन

× ' हाऊ कॅन आय गेट मॅरिड ८ व २१

* लिंडसेकृत " रिव्होल्ट ऑफ मार्डर्न यूथ " पान २५

मोटारगाड्या खरीद करण्यासारखें आहे, असें आईच्या ह्या विषयावरील उद्गारांवरून वाटे. तिची आत्या ऑन्ट बिनी, हिचे ह्या विषयावरील उद्गारही मननीय आहेत. ती ह्मणे, यंदा हा नवरा, तर पुढील वर्षीं दुसरा ! पण सतत नवीन नवरे हुडकण्याची बायकांनां तर बाई सोय नाहीं ! स्वयंपाक घरांतील भांड्यावर आणि कपाटांतील कपड्यांवर घातलेल्या नांवाच्या आद्याक्षराशीं ज्यांच्या नांवाचीं अद्याक्षरें जुळतील, असे नवरे वरचे वर सांपडणार तरी किती, ह्मणतें मी ? *

मॉली आपला जीवनवृत्तांत सांगतांना ह्मणतें, मी पहिल्यांदां तडाख्यांत सांपडलें; ती एका खोड्या माणसाच्या ! (खोटा ह्मणजे, त्यानें मला खोटें सांगून फसविलें असें नाहीं, तर माझ्याशीं लग्न करण्याची त्याची इच्छा नव्हती ह्मणून.) त्याला दुसऱ्यांच्या बायकांशीं संबंध ठेवण्याचें आवडत असे. माझें कौमार्य भ्रष्ट करण्याची त्याची तशी इच्छा नव्हती; मी कोणातरी एखाद्या भोळसटाशीं लग्न केव्हां लागतें ह्याचीच तो वाट पहात होता. माझें लग्न झाल्यानंतर, येऊन मला सुखी करण्याची त्याची इच्छा होती.

पण ह्याच सुमारास ह्या मॉलीला, इतर मुलींच्या शाळांप्रमाणेंच असणाऱ्या एका मुलींच्या शाळेंत शिकावयास जावें लागलें. तेथील अवस्थेबद्दल ती ह्मणतें, " नुसत्या आमच्या पुस्तकांत आणि अभ्यासक्रमांतच जर आह्मी आपलें मन ठेवलें असतें, तर त्यांत कांहीं विशेष नव्हतें. पण त्या व्यतिरिक्त अनर्थकारक व लज्जास्पद अशा अनेक गोष्टी आह्मी तेथें शिकतों····· आह्मा मुलींचीं मुलांबद्दलचीं बोलचीं, आमचीं मतें, आमच्या मुलांबद्दलच्या आवडी व त्यांचीं कारणें, ह्या संबंधीं जी आमची भाषा चाले, ती ऐकून एखाद्या छाकट्या गांवगुंडाला देखील शरमेनें खालीं मान घालावीशी

---

* " हाऊ कॅन आय गॅट मॅरीड " पान ८ व २१

वाटली असती. कोणत्या प्रकारचा तरुण ह्मणजे चांगला नवरा होईल? आणि चांगला नवरा ह्मणजें नुसता शारीरिकदृष्ट्याच इ." *

'पेटिंग' आणि 'नेकिंग' हे दोन क्रीडाप्रकार अमेरिकन नांवकुळीचे आणि फक्त अमेरिकेंतच्य प्रचारांत असलेले असे आहेत. अमेरिकेंतील शाळा कालेजांतून 'पेटिंग पार्टी' ह्मणजे मिश्र विद्यार्थीसमूहाची अत्यंत प्यारी पार्टी समजली जाते. ह्याचें मॉली असें वर्णन करते. "अशा पार्ट्यांमध्यें, कोणालाही हानिकारक होईल एवढ्या प्रमाणांत दारू पिणें, विड्या ओढणें आणि फाजील सलगीचें नाच नाचणें, ह्या गोष्टींचा धुडगूस चालतो." * ह्या प्रकारांत मुलींचा तोल सुटतो, त्यांचें देहभान हरपतें, आणि त्याचा सरतेशेवट रतिक्रीडेंत होतो. ह्या 'पेटिंग क्रीडे' ची पूर्वगामी क्रीडा ह्मणजे 'नेकिंग' होय. अमेरिकन मरक्युरी वर्तमानपत्राचे संपादक ह्या क्रीडेची व्याख्या अशी देतात, "ही अशी एक क्रीडा आहे कीं, उत्तम प्रकारें एकदां ह्या क्रीडेंत भाग घेतलेली कोणतीही मुलगी पूर्ववत् राहूंच शकत नाहीं."× त्याच लेखकानें सांगितल्याप्रमाणें, पेटिंग व नेकिंग ह्या दोन्हीही क्रीडा अमेरिकेंतील सर्वच सहशिक्षणसंस्थांमध्यें पराकाष्टेच्या लोकप्रिय आहेत.

ह्या 'पेटिंग पार्टी' चा दुसरा एक चित्ताकर्षक भाग ह्मणजे वस्त्रसंन्यासा-(Strip poker) चा खेळ होय. ह्या खेळांत मुलें व मुली हळूं हळूं आपल्या शरीरावरील एकूणएक वस्त्रें काढून फेंकून देतात. मॉली सांगते:-

"अगदीं सोडावाटर प्रमाणेंच वाटणाऱ्या कांहीं पेयांचें मिश्रण डेळ तयार करूं लागला. पण त्यांचा परिणाम सोडावाटरपेक्षां अगदींच निराळा होता! त्यानंतर आम्ही वस्त्रसंन्यासाचा खेळ खेळूं लागलो! छेः! छेः! छेः! मुलींच्या मूर्खपणाला कांहीं मर्यादा?"

"पण त्यावेळीं मला असें वाटलें कीं आनंदी वृत्तीच्या, हुषारीच्या व सर्व प्रकारच्या नवीन नवीन खेळांच्या बाबतींतही मी जगांतील कोणत्याही

---

* 'हाऊ कॅन आय गेट मॅरिड.' पान ७०-७१-१७२ व पुढें.

× अमेरिकॅना १९२५ पान ३००

मुलीपेक्षां कमी नव्हतें ! खरें सांगायचें झगजे, त्यावेळीं मी मूर्खपणाच्या, वेभान अवस्थेच्या आणि अधःपाताच्या शक्य तितक्या जवळ गेलें होते !

" वस्त्रसंन्यास हा अधोमार्गाला नेणारा खेळ आहे. पण आलिहला त्याबद्दल कांहींच वाटत नसावेसें दिसलें. तिनें अगदीं खुशाल आपल्या शरीरावरील सारीं वस्त्रें काढून टाकली. शेवटीं तर तिच्या देहावर एका जपानी हातरुमालाखेरीज एक बोटभर सुद्धां चिंधी उरली नाहीं. माझ्याविषयीं सांगायचें, तर त्यावेळीं सारें विश्व माझ्य । दृष्टीपुढें अभ्राच्छादित व अस्पष्ट दिसत होते. त्यावेळीं, साऱ्या जगांत जर कोणी पुरुष मला हवासा वाटत असेल तर तो डेल होता ! " *

ह्या नितांत मनोहर अमेरिकन क्रीडेच्या शेवट पर्यंकावरील समेटांत होतो हें निराळें सांगावयास का पाहिजे ?

मदिरेचा चषक ही एक दुसरी त्यांची आवडती वस्तु आहे. अशी एकही पेटिंग पार्टी नाहीं, वनभोजन नाहीं, मेनस्ट्रीटच्या दृष्टीच्या टप्प्याबाहेरच्या मोटारच्या सफरी नाहींत, कीं ज्या मद्यघटांशिवाय पूर्ण होऊं शकतील ! ह्या विषयावरील आंकडे काढलेले माझ्या आढळण्यांत नाहींत; परंतु एका गोष्टीबद्दल मात्र मला दृढ विश्वास वाटतो, कीं नीतीच्या राजपथावरून कामदेवाच्या आडगल्यांत ह्या तरुण तरुणींचें स्खलन घडविणारे जेवढे म्हणून प्रकार असतील, त्या पैकीं प्रत्येकाच्या मुळाशीं ही मदिरा आहे ! ×

विद्यार्थिवर्गांत रूढ असणाऱ्या अनीतीबद्दल कोरोलिना मॅगाझिन ह्या मासिकानें एक फॉर सुरेख चौकशी आंरभिली होती. कांहीं छापील प्रश्न प्रत्येक विद्यार्थ्यांकडे पाठविण्यांत येऊन, त्याच्याकडून त्यांचीं उत्तरें मागविण्यांत आलीं. विद्यार्थ्यांनीं पाठविलेल्या उत्तरपत्रिकांतून कांही विलक्षण गोष्टी दिसून आल्या ! सर्वसाधारणपणें प्रत्येक पुरुष विद्यार्थ्याचा सहा पोरींशीं तरी

---

* ' हाऊ कॅन आय गेट मॅरिड ' पान १७८

× रिन्होल्ट ऑफ मार्डर्न यूथ. पान ५१

संबंध घडलेला होता. शेंकडा ८७·७ मुली नेकिंगच्या परिरंभ क्रीडेंतून यशस्वीपणें पार पडलेल्या अश्या होत्या, आणि सरासरी शेंकडा ६० मुलीं अगदीं पहिल्या प्रयत्नांतच स्वतःचा देह समर्पण करून देणाऱ्या अशा होत्या-ह्या उत्तरपात्रिकांवरून असेही दिसून आलें कीं, एकच मुलगी एकानंतर दुसऱ्याकडे अश्या अनेक पुरुषांकडे जाऊन त्यांच्याबरोबर आपला खेळ उरकून घेत असल्याचींही उदाहरणें अनेक आहेत ! *

अमेरिकेंत पावित्र्य फारसें महाग आहे असेंही नाहीं ! चाकोलेटची एक पेटी किंवा आपल्या मोटारींतून एकवार सहल, एवढ्या मोबदल्यांत एक तासाचें सहवाससुख सहज विकत घेतां येतें. 'फिज' चा एक प्याला अथवा दोन कॉक टेल्स दिले तर सबंध रात्रभर तुह्माला तें सुख मिळवितां येतें; आणि एक नवीन टोपी जर दिली तर मग काय ? शनिवार रविवारची सुट्टी तुह्मी ह्मणाल त्या सुंदर गांवीं मौजेनें हंसत-हंसवीत घालविण्यास ह्या कुमारिका अगदीं दोन्ही पायांवर तयार असतात ! अगदीं खरें ह्मणावयाचें ह्मणजे धंदेवाईक वेश्या अशा कुमारिकांच्या मानानें पुष्कळच महाग पडतात. शाळा कालेजांच्या शहरांतून वेश्यागृहें जवळ जवळ बंदच झालेलीं आढळतात, कारण त्या वेश्यांनां ह्या कुमारिकाप्रमाणें स्वस्त दरानें आपलें शरीरदान करणें परवडत नाहीं ! ह्या कुमारिकांनीं एवढा स्वस्त दर लावून बिचाऱ्या वेश्यांच्या पोटावर पाय आणला आहे ! जज् लिंडसे ह्मणतो:-

"ज्या मुलांच्या बरोबर मुली फिरावयास जातात त्यांनीं त्यांच्याशीं अशा प्रकारचें स्वैरवर्तन केलेंच पाहिजे, असा त्यांचा आग्रह असतो. त्या आपल्या स्त्रीसुलभ प्रलोभनांनीं च इंगितांनीं, तरुणांइतक्याच ह्या सुखाचा आस्वाद घेण्यास उत्सुक असल्याचें दाखवीत असतात ! +

+ अमेरिकेना १९२५ पान. १७९

* रिव्हील्ट ऑफ मॉडर्न यूथ. पान. ५७

ह्या पेटिंग पार्टींचा, नेकिंग पार्टींचा व शाळा कालेजांतील इतर जीवनाचा अनुभव घेतलेली कोणतीही पोरगी पावित्र्य शीलाची असूंच शकत नाहीं. जज लिंडसे मोठ्या जपत जपतच असें विधान करतात, कीं शेंकडा ४५ मुली शाळेंतून बाहेर पडण्यापूर्वींच नीतिभ्रष्ट झालेल्या असतात; आणि शाळेबाहेर पडल्यानंतर त्यांच्या भ्रष्टतेचें प्रमाण ह्यापेक्षां किती तरी अधिक असते. ह्या वरून हें उघड होतें, कीं विवाहापूर्वी जिला संभोगाचा अनुभव नाहीं, अशा मुलीशीं अमेरिकेंत विवाहच करतां येणें जवळ जवळ शक्य नाहीं. बहुधा तर, विवाहासाठीं चर्चमध्यें उभा राहण्यापूर्वी ह्या कन्यकेचा पुरुषांसंबंधींचा प्रत्यक्ष अनुभव चांगलाच विस्तृत व सर्वव्यापी स्वरूपाचा असतो. सर्वसाधारणपणें १८ वर्ष वयाची इंग्रज मुलगी गुलाबी पुष्पाप्रमाणें पवित्र व सुंदर अशा स्वरूपांत जीवनांत प्रवेश करते; आणि त्याच वयाची अमेरिकन मुलगी, धंदेवाईक वारांगनेला अत्यंत यशस्वीपणें शह देऊन बसलेली आढळते.

प्रकरण ८ वें.

अमेरिकन अप्सरा !

अमेरिकेंतील हायस्कुलांतील विद्यार्थी हागजे प्रख्यात व्यभिचारी दुर्गुणांशीं पूर्णपणें परिचित असतो, हें सर्वविश्रुत आहे. एका अधिकारी व्यक्तीच्या मतें शेंकडा नव्याण्णव विद्यार्थी हस्तमैथुन करणारे असतात, व उरलेला एक खोटें बोलतो. सहशिक्षणाची सोय होईपर्यंत, १५ च्या पुढील वयाच्या मुलांना वेश्यांना भरपूर आश्रय असे. परंतु आतां हायस्कुलांतील मुलींनीं वेश्यांनां ह्या व्यवसायांतून कसें हांकून लावलें आहे तें आपण मागील प्रकरणीं पाहिलेंच आहेच !

सहशिक्षणाचें ज्या ज्या ठिकाणीं केंद्र आहे, तेथें तेथें असे हे अनाचार आढळावयाचेच ! आणि ज्या शिक्षणसंस्थांत मुलें आणि मुलीं अगदीं कडकपणें वेगवेगळीं ठेवण्यांत येतात, तेथें दुसऱ्याच प्रकारच्या इंद्रियविषयक अत्याचारांचा प्रादुर्भाव झालेला दिसून येतो. ह्या अत्याचारांचें वर्णन करणें सुद्धां किळसवाणें वाटतें. सजातीय मैथुन (Homo sexuality) असें शास्त्रीय नांव ह्या अत्याचारांनां देतां येईल. एकाच जातीच्या व्यक्तींमध्यें मैथुनाचा संबंध असणें, हें ह्याचें स्वरूप होय. युनायटेड स्टेट्स मध्यें हा प्रकार फार मोठ्या प्रमाणांत रूढ आहे. डॉक्टर हूकर ह्मणतात, " एकवर्गीय शाळा आणि कालेजांमध्यें, परिचारकांच्या (Nurses) शिक्षणवर्गांत, धर्मप्रचारक तयार करणाऱ्या शाळेंत वगैरे ठिकाणीं, एकजातीय व्यक्तींमध्यें असें अनैसर्गिक स्वरूपांचें प्रेम उत्पन्न होऊन, अशा हतभागी स्त्री पुरुषांमधून दुसऱ्या जातीच्या व्यक्तीवर नैसर्गिक प्रेम करण्याची पात्रता अजीबात नष्ट झालेली आढळून येते ! " *

वाचकहो, लक्षांत ठेवा धर्मप्रचारक तयार करणाऱ्या शाळा सुद्धां, बरें का !

कामुक विचारांमध्यें मुलांप्रमाणें मुलींनांहीं कुतूहल वाटत असतें. निरानिराळीं कल्पनाचित्रें रेखाटण्यांत, आणि ह्या वर्ज्य विषयाबद्दलची अतिशयोक्तिपूर्ण माहिती करून घेण्यांत त्यांना फार आनंद वाटतो. एका मागून एक तीं अधःपाताच्या पायऱ्या उतरत असतात. कित्येक वेळां तर इतरांपेक्षां आपण ह्या बाबतींत कमी नाहीं हें दाखविण्यासाठींच कित्येक असल्या प्रकरणांत मोठा गाजावाजा करून भाग घेतात ! अशा मुलांनां अथवा मुलींना ' नॅन्सी बायेज ' किंवा ' नॅन्सी फेअरीज ' असें ह्मणण्याचा प्रघात आहे. हे अनैसर्गिक प्रकार मुलांच्या त्याचप्रमाणें मुलींच्याही शाळांतून सुरू असतात.

" गेल्या मे महिन्यांत चांगल्या सुखवस्तु व सज्जन अशा चाळीस कुटुंबांवर एकदम वज्राघात झाल्यासारखें झालें. त्यांचीं मुलें ज्या मुलांच्या शाळेंत शिकत होतीं त्या शाळेच्या हेडमास्तरनें ह्या पालकांनां खासगी पत्रें

---

* ' लॉज आफ सेक्स ' पान ३३१

पाठविली, आणि तीं वाचून त्यांना लाजेनें माना खालीं घालाव्या लागल्या ! त्यांच्या मुलांनां ह्या पुढें त्या शाळेंत घेतलें जाणार नाहीं, असें हेडमास्तरनें कळविलें होतें. ह्याचें कारण म्हणून त्यानें कळविलें होतें कीं, अनीतिमय दुराचारांची कांहीं भयंकर उदाहरणें नुकतींच शाळेंत उघडकीस आलेलीं आहेत; आणि, इतर मुलांनां धडा घालून देण्यासाठीं म्हणून, ह्या प्रकारांशीं संबंध असलेल्या सर्व मुलांनां शाळेंतून काढून टाकण्यांत आलेलें आहे !

" खासगी रीतीनें हेडमास्तरनें ह्या ' दुराचारांच्या भयंकर उदाहरणांचा आणखी खुलासा करून असें सांगितलें कीं, ह्या सर्व गोष्टींचा उगम एका अत्यंत सुखवस्तू व उच्च दर्ज्याच्या कुटुंबांतील मुलापासून झाला असून, त्यानेंच दुसऱ्या मुलांनां आपल्या बरोबर ओढलें होतें ! " *

खालीं दिलेल्या कांहीं वस्तुस्थितिदर्शक उदाहरणांबद्दल, आम्ही ' लॉज ऑफ सेक्स ' ह्या पुस्तकाच्या लेखकाचे ऋणी आहोंत.

(१) एका कॉलेजांत दोन मुली रहात असून त्यांच्या मनांत एकमेकांबद्दल प्रेमभाव वसत होता. आपल्या ह्या भावना लपाविण्याचा किंवा चोरून ठेवण्याचा त्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. त्या ग्रॅजुएट झाल्यानंतर त्यांनीं कॉलेज सोडलें, व त्यांचें एकमेकींशीं असलेले संबंध तुटले.....त्यानंतर त्यांपैकीं एक जोगीण बनून मठांत (Convent) गेली. तेथें ती एका दुसऱ्या जोगिणीच्या (nun) प्रेमपाशात सांपडली, व सरतेशेवटीं तिनें आत्महत्या केली. दुसरीनें मात्र विवाह करून गृहणीपदाचा स्वीकार केला, व ती बऱ्याचशा लेंकरांची आई झाली.

(२) दुसऱ्या एका परिचारिकेचा (nurse) वृत्तान्त मात्र ह्यापेक्षां पुष्कळच हृदयद्रावक आहे. ही पराकाष्टेची बुद्धिमान व स्वरूपसुंदर असून तिचें सर्व शिक्षण मुलींच्याच शाळांतून झालेलें होतें. ती चांगली उंच, सुंदर

---

* डॉ. लोरीकृत " हरसेल्फ " पान १७९

बांध्याची व मनोहर स्वरूपाची अशी होती. हिचें आपल्या आईवर अत्यंत प्रेम होते, परंतु दुर्दैवानें ती हिच्या वयाच्या पांचव्या वर्षींच मृत्यु पावली होती. ती चवदा वर्षांची होती त्यावेळीं, तिच्या शाळेतील एका शिक्षकिणीनेंच तिला फुसलावून आपल्या नादीं लावलें; आणि ती अशा रीतीनें तीन वर्षें-पर्यंत ह्या अनुभवांचा आस्वाद घेत होती. त्यानंतर त्या शिक्षाकिणीनें आपल्या ह्या पूर्व प्रणयिनीच्या जिवाच्या तडफडाटाकडे लक्ष न देतां आपली प्रीति दुसऱ्या एका मुलीकडे वळविली. ह्यानंतर ही मुलगी घरीं परत आली; परंतु ह्या वेळेपासून तिच्या मनांत पुरुषांशीं स्त्रीत्वाचें संबंध ठेवण्याच्या कल्पनेबद्दल सुद्धां तिरस्कार वाटूं लागला. ज्यांच्याबद्दल तिच्या मनांत अगदीं सात्विक स्वरूपाचा मित्रभाव वसत होता असे तिचें पुरुषवर्गांतही बरेचसे मित्र होते, व त्यापैकीं कित्तींनीं तरी तिला मागणीहि घातली. परंतु विवाह करण्याची मनाची तयारी होईना. शेवटीं तिनें परिचारिकेचें काम शिकण्याचें ठरविलें. ह्या वर्गांत आल्यानंतर तिच्या हृदयांत स्त्रियांच्या बद्दलच्या त्या पूर्व भावना पुन्हां जागृत झाल्या व तिनें आपल्या बरोबरच्या एका असाधारण सुंदर व बुद्धिसंपन्न परिचारिकेबरोबर आपला संबंध स्थापन केला. हा संबंध सरासरी सहा वर्षेपर्यंत टिकला. साधारणतः विवाहित जोडप्यांत सुद्धां दुष्प्राप्य इतकीं परस्परानुरक्ति ह्या उभयतांमध्यें वसत असलेली दिसत होती. ह्या सहा वर्षांच्या काळानंतर तिचें एकाएकीं दुसऱ्याच एका, अशा स्ववर्गीय मैथून प्रकरणांत अनभ्यस्त अशा तरुणीवर प्रेम बसलें, व तिनें तिच्याशीं आपलें संबंध प्रस्थापित केले. तिच्या पूर्वीच्या वल्लभेला तिचा संशय येऊं लागल्यामुळें तिनें हा नवीन संबंध सोडला; परंतु थोड्याच आठव-ड्यानंतर ती तिसऱ्याच एका अशाच अनभ्यस्त स्त्रीच्या प्रणयपाशांत सांपडली! तिचें ह्या नवीन पात्राशीं संबंध प्रस्थापित होत असतांनांच, तिचें मन एका सदृश विकारांच्या व अशा गोष्टींचा पूर्वी अनेकवार आस्वाद घेतलेल्या कुरुप स्त्रीकडे ओढ घेऊं लागलें. हा प्रकार उघडकीस आला, व ह्यामुळें इतरही सर्व तरुणींचीं नांवें उजेडांत आली. तिच्या पहिल्या सोबतिणीनें तर सर्व गोष्टी जगाकडे आणून तिच्यावर खटला भरण्याचाही धाक घातला.

(३) तिसरी गोष्ट एका धर्माधिकारी पाद्रयाची आहे. वर्षमध्यें येणाऱ्या सर्व श्रद्धाळू ख्रिश्चनांच्या आत्म्यांची देखरेख ठेवीत असतांनाच हा धर्ममार्तंड आपल्या पन्नाशीच्या वयांत कोंवळ्या वयाच्या लहान लहान पोरांशीं संबंध ठेवीत असल्याचें उघडकीस आलें. चौकशीअंतीं, असे प्रयोग करण्याची आपणास नैसर्गिकपणेंच अनावर इच्छा होतें, अशी सबब त्यानें सांगितली.

(४) असाच इतिहास एके काळीं शिक्षक असलेल्या गृहस्थाचा आहे. त्यानें अशी कबूली दिली आहे कीं, कोंवळ्या पोरांच्यामध्यें असल्यानंतर मला हा मोह आवरतच नाहीं. भर चवाठ्यावर त्याला मरे मरे तों फटकांखाला बडविण्या ऐवजीं-ही शिक्षा त्याला अगदीं योग्यच झाली असती, आणि तो नीग्रो असता, तर ती त्याला देण्यांत आलीही असती- त्याला ही शाळा सोडून दुसरीकडे कोठें तरी शिक्षकाची नोकरी शोधण्याची परवानगी देण्यांत आली ! '' *

अशा प्रकारचे अनैसर्गिक संभोग युनायटेड स्टेटसमध्यें थोडे थोडके घडतात असें नाहीं. कांहीं उलट्या काळजाच्या व उलट्या संवयीच्या वसती मध्यें सवर्गीय संभोग म्हणजे विशेषच आनंददायी समजण्यांत येतो. ' फेअरीज फेअरीज ! ' ह्या सुमधुर गीताच्या तालसुरांत एकमेकांच्या गळ्यांत गळे घालून नाचतांनां देहभाव विसरणाऱ्या स्त्रिया येथें किती तरी आढळतात. एका कवीनें म्हटल्याप्रमाणें, ही अप्सरांची (Fairies) वसती वाशिंग्टन स्क्वेअर पासून फारशी लांब नाहीं. ' अप्सरा ' (fairy) ह्या शब्दाचा येथील रूढार्थ म्हणजे स्वर्गीयांशीं संभोगसुख अनुभवणारी असा आहे.

स्टीफन ग्रहॅम ह्मणतो; " हे अप्सरेचे विचित्र गुण अद्यापिही लंडन मध्यें अपरिचित आहेत. तेथें अजूनही एखाद्या तरुणीला ' अप्सरा ' (Fairy) म्हणणें म्हणजे तिच्या सौंदर्याची स्तुति केल्यासारखें होतें. आणि अमेरिकेत- !

---

* ' लॉज ऑफ सेक्स ' - पानें ३३३-३३५

प्रकरण ९ वें.

अनीतिमान कामचेष्टाविहार.

'गद्धेपंचविशींतील उल्लूपणा' (Sowing wild oats) म्हणजे स्वैर काम विहार हा जवळ जवळ प्रत्येक अमेरिकन तरुण मनुष्याच्या जीवनांतील एक महत्वाचा व सर्वमान्य भाग होऊन बसलेला आहे. ह्या बाह्यतः विनोदपूर्ण व पश्चात्तापनिदर्शक वचनाच्या सोइस्कर आवरणांखालीं, शाळाकालेजांतील सोबतीणींबरोबर मजा मारणें, अनैसर्गिक संभोग, वेश्याचार व ह्या सारखाच इतर अनीतिमय विलासांचा मनमुराद उपभोग घेणें, हा येथील एक सर्वमान्य प्रघात (fashion) आहे. असल्या विलासोपभोगांच्या शिक्षणांत परिपूर्णता मिळाल्याखेरीज कोणत्याही विद्यार्थ्याचा शिक्षणक्रम पूर्ण होऊन तो आपले व्यावहारिक जीवन सुरूं करावयास पात्र झाला व समाजमान्य (Social) बनला असें ठरतच नाहीं मुळीं ! ह्या भावनेचें मूळ, मनसोक्त मदिरापानाचा व व्यभिचाराचा पूर्णपणें अनुभव घेतल्यावांचून, स्त्रीच्या अंतःकरणाला गुदगुल्या करूं शकण्याची कला पुरुषाला साध्य होणें शक्यच नाहीं, ह्या कल्पनेंतच आहे. गद्धेपंचविशींतिल उल्लूपणांतही पदवीधर झालेला तरुण पदवीधर, आपल्या ह्या उल्लू जीवनप्रसंगांतील ज्या शेवटच्या युवतीच्या चरणीं आपलें प्रेम समर्पण करतो त्या तरुणीला, नवरेपणाच्या व्यवसायांत पूर्ण पारंगत व वाकबगार अशा पुरुषापासूनच मिळूं शकणाऱ्या अशा सुखसमाधानाची प्राप्ति झाली, अशी येथें समजूत रूढ आहे.

परंतु ह्या उल्लूपणाचें परिणाम अपेक्षेपेक्षां अगदीं निराळेच घडून येतात, हें मात्र लोकांच्या निदर्शनास फारसे आलेलें नाहीं. तरुणांच्या ह्या मूर्खपणाचे दुष्ट परिणाम पुढें, त्यांच्या बरोबर त्यांच्या बायकामुलांना व इतर कुटुंबीयांनाही भोगावे लागतात !

शरीरस्वास्थाविषयीं व स्त्रीपुरुषसंबंधविषयक सुखी जीवनाविषयीं ज्यांचीं मतें ग्राह्य व आचरणीय मानण्यांत येतात, अशा सर्व व्यक्तींचें असेंच मत आहे कीं, आदर्श पति किंवा आदर्श पिता होण्यास असे 'उल्लू' तरुण अगदींच नालायक असतात. ह्या उल्लूपणाचें आचरण करीत असूनही तज्जन्य रोगांपासून किंवा इतर दुष्परिणामांपासून जे बचावून राहूं शकतील असे तरुण अत्यंत थोड्या प्रमाणांतच सांपडणें शक्य आहे.

परंतु ह्या वस्तुस्थितीचा परिणाम मात्र अगदींच विचित्र झालेला आहे. शिक्षणक्रम चालू असतां, तरुणांच्या दुराचरणाला आळा घालून त्यांच्या अंत:करणावर ब्रह्मचर्याचें महत्व बिंबावेण्याऐवजीं, अमेरिकेनें विद्यार्थ्यांप्रमाणें विद्यार्थिनानां सुद्धां ह्या स्वैराचाराला सदर परवानगी देऊन ठेवली आहे. कुमारी-जीवनांतच पतिसुखाचा आस्वाद घेतल्यावांचून कोणाही तरुणीला आदर्श पत्नीही होतां येणार नाहीं, हीच समजूत ह्याच्याही मुळाशीं बहुधा असावी!

Sowing wild oats (स्वैर कामविहार) हा जसा जीवनाच्या महाद्वाराशीं उभा असलेल्या तरुणाच्या अध:पाताचा व दुराचारांच्या उल्लेखाचे वेळीं उपयोगांत आणला जाणारा वाक्प्रचार आहे, त्याचप्रमाणें **Having a good time** (घटकाभर मौज मारणें) हा तरुणींच्या तशाच वर्तनाचा निदर्शक वाक्प्रचार आहे. ह्या दोन्ही इंग्रजी वाक्प्रचारांचे शब्दश: भाषांतर करावयाचें झाल्यास अनुक्रमें, रानटी वाटाणें पेरणें व मजेंत काळ घालविणें, असें करतां येईल! हं: !– रानटी वाटाणे पेरणें आणि 'मजेंत काळ घालविणें';– मोठे अर्थपूर्ण व योग्य शब्दप्रयोग खरे!

ह्या 'रानटी वाटाण्यां'ची ह्मण जरी जुनी असली, तरी 'घटकाभर मौज मारणें' ही ह्मण मात्र त्या मानानें बरीच नवीन आहे. १९१३ व १९१४ सालच्या तरुणींना ह्या 'मौज मारण्याचें' फारसें ज्ञान असावें असें वाटत नाहीं. ही ह्मण ह्मणजे अमेरिकेच्या आजच्या कन्यारत्नांनीं तेथील शब्दकोशाला अर्पण केलेली नवीन देणगी आहे.

"ह्या युगांतील तरुणींच्या जीवनक्रमाशीं ज्याचा निकट संबंध आलेला नाहीं, त्याला, त्यांच्यामध्यें रूढ असलेल्या अनीतीचें प्रमाण

कुठवर गेलें आहे ह्याची कल्पना होणें शक्य नाहीं. पूर्वी, फक्त मुलेंच ह्या 'उल्लूपणांत' भाग घेतात असें आपण समजत होतों. परंतु आतां पहावें, तों येथील मुलीही ह्या बाबतींत मुलांशीं बरोबरीनें स्पर्धा करीत आहेत. दुर्दैवी कुमारिकेवर तिच्या दुर्वर्तनाचा परिणाम भोगण्याची पाळी आली, म्हणजेच काय तो हा प्रकार लोकांपुढें येतो; तिच्या इतर सर्व भगिनी काय करीत असतात, तें आपणाला कळतच नाहीं. साधारणपणें आपलें कृत्य अशा रीतीनें चवाठ्यावर येऊं देणारी मुलगी त्या सर्वापेक्षां अधिक सदाचारीच असते ! *

ह्या विधानाचें समर्थन जज्ज लिंड्से असें करतो:-

" हेलेनचें प्रकरण अपवादभूत आहे असें मी म्हणतों. ह्याचें कारण हें कीं तिचें कृत्य, परिस्थितीनें तिला दगा दिल्यामुळें, चवाठ्यावर येऊं शकलें ! असें चवाठ्यावर येणें हेंच खरोखर अपवादात्मक होय. शेंकडा दहा तरी मुली अशा पकडल्या जातात कीं नाहीं, ह्याची वानवाच आहे; आणि हें प्रमाण सुद्धां कदाचित कमी ठरेल. शंभरांतील दोन तरी मुलींचें पाप उघडकीस येते कमें, हाच एक मला मोठा प्रश्न वाटतो ! आणि उघडकीस येणाऱ्या पापांची ही प्रमाणवारी विशेष चुकीची नाहीं असें वाटतें. *

स्त्री-पुरुष संबंधविषयक गोष्टींत साऱ्या जगांतच फार मोठ्या क्रांत्या घडून आल्या आहेत व येत आहेत. स्त्रीत्वावद्दल, स्त्रीच्या हक्कांबद्दल, मातृपदा बद्दल व पितृपदावद्दल निरनिराळ्या नवीन कल्पनांची, तत्वांची, चालीरीतींची व कौटुंबिक चरित्रादर्शांची रूढ कल्पना एकसारखी बदलत आहे. परंतु राशेआ आणि अमेरिका हे दोनच देश असे आहेत कीं, जेथें, जगाच्या प्रारंभापासून आजपर्यंत कुटुंबसंस्था आणि तज्जन्य इतर सर्व गोष्टींनां अजीबात चाट— मिळाली आहे. राशियामध्यें ही क्रांति आर्थिक परिस्थितीमुळें घडून आली; अमेरिकेमध्यें ह्याचें कारण व्यभिचार आणे स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांबद्दलच्या अनैसर्गिक व उलट्या कल्पनांचें अस्तित्व, हें आहे.

---

* 'हर्सेल्फ' पान १५०

* 'दि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ' पान ३६

'धि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ' आणि 'कंपेनिअनेट मॅरेज' हीं दोन पुस्तकें लिहून जज्ज बेन लिंडसे यानें ह्या प्रभावें भीषण स्वरूप निदर्शित केलें आहे. ह्या पुस्तकांत सिद्ध करून दाखविलेल्या विलासलोलुपतेकडे काना डोळा करावा असें जज्ज साहेब सांगतात. परंतु हा ह्या पुस्तकाचा विशेष नाहीं. ज्या समाजांतील जज्जसाहेब एक प्रमुख व सुधारणेसाठीं खरोखर तळमळणारे असे एक सन्मान्य घटक आहेत, त्याच समाजातील दुराचारांबद्दलचे पुरावे, आंकडे व प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींचें संकलन हेंच ह्या पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे. डेन्व्हर येथील ज्यूव्हेनाईल (लहान मुलांसाठीं असणाऱ्य) कोर्टाचे मुख्य न्यायाधीश ह्या नात्यानें त्यांच्यापुढें ज्या अनेक गोष्टी आल्या त्यांतूनच त्यांनीं आपला सर्व पुरावा गोळा केलेला आहे. जज्जसाहेब जें डेन्व्हरबद्दल विधान करतात तेच सर्व अमेरिकेलाही लागू पडण्यासारखें आहे. ते ह्मणतात:-

माझ्यापुढें असे कांहीं आंकडे आहेत कीं, त्यांवरून हें सिद्ध होतें कीं दुराचरणाचा एखादा गुन्हा पकडला जातो, पण ह्या एका उघडकीस येणाऱ्या मागें असे किती तरी गुन्हे असतात कीं ते उजेडांत आलेलेच नसतात. उदाहरणार्थ, हायस्कुलांत जाण्याच्या वयाच्या-सर्वच कदाचित् हायस्कुलांत जात नसतील-अशा ४९५ मुलींनीं, आपण पुरुषांशीं संबंध केल्याची कबुली दिली; परंतु त्यांपैकीं फक्त २५ जणींनांच गर्भधारणा झाली! ह्मणजे सरासरीं वीसांत एक- शेंकडा पांच असें प्रमाण पडलें! बाकीच्यांनी गर्भधारणा टाळली. कांहींच्या बाबतींत हें दैवदशात् घडलें; इतरांनीं गर्भप्रतिबंधक उपायांची योजना करून आपलें संरक्षण केलें. ह्या प्रतिबंधक उपायांचें ज्ञान, साधारणपणें लोकांनां वाटतें त्यापेक्षां किती तरी पटींनीं अधिक प्रमाणांत मुलींना अवगत असतें, असें मला दिसून आलें आहे? *

जेव्हां रशियानें आपल्या वैवाहिक रूढींचें व कायद्यांचें उच्चाटन केलें, त्या वेळीं, हा अनाचार (१) पाहून सर्व जगाची छातीच हबकली! असें

---

* 'धि रिव्होल्ट ऑफ माडर्न यूथ' पान ६४.

करणें ह्मणजे रानटीपणाचें आहे, वैवाहिक जीवनांतील पावित्र्यावर आणि गृहसौख्यांच्या मुळावर हा कुठाराघात आहे, इत्यादि टीकास्त्रांनीं रशियाचें त्यावेळीं ताडन करण्यांत आलें होतें. हं: ! वाटेल त्या स्त्रीला व पुरुषाला, त्यांच्या मनास येईल तितके दिवसपर्यंतच एकमेकांजवळ राहून मग दुसरें सोबती पाहण्यास स्वैर परवानगी देणें ह्मणजे काय ? असें केलें तर मग पशु-मध्यें आणि आम्हा मनुष्यांमध्यें अंतर तें कोणतें राहिलें ? कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राला अशी स्वैरता खपणार नाहीं !– वगैरे वाग्वाणांनीं अमेरिकेनें व इतर सुधारलेल्या राष्ट्रांनीं त्या वेळीं रशियाचा विरोध केला होता.

—आणि इकडे अमेरिकेंतील स्वैराचाराकडे जगानें सहानुभूतिपूर्वकच पहावें, अशी जज्ज लिंडसे वकिली करतात ! अमेरिकेंतील हा स्वैराचार ह्मणजे भोंदू शिक्षक, समाजसुधारक, कायदे पंडित, डॉक्टर, व धर्ममार्तंड इ. लोक सुधारणेच्या नांवाखालीं जी अनावश्यक व अनैसर्गिक परिस्थितीचें अवडंबर समाजांत निर्माण करीत असतात, त्याविरुद्ध उभारलेलें बंड होय, असें जज्जसाहेबांचें समर्थन आहे. ह्यानंतर, जज्ज लिंडसें ह्यांनीं असेंही अश्रुतपूर्व भविष्य वर्तविलें आहे कीं, आजच्या तरुण पिढींत आढळणारी ही व्यक्ति-स्वातंत्र्याची लाट ह्मणजेच भावी कुटुंबपद्धतीची व विवाह–सुखाची परिपोषक अशी सामर्थ्यप्रदायिनी जननी होय, असें पुढें जगाला दिसून येणार आहे !

जुन्या प्रथेप्रमाणें झालेल्या विवाहांचा शेवट घटस्फोटांत होतो. (ह्याचें विवेचन पुढें १२ व्या प्रकरणांत येणार आहे.) तर ह्या नवीन प्रकारच्या विवाहाचा शेवट ह्मणजे 'चुकीचा प्रयोग' असे ठरण्यांत होतो. आज सर्व अमेरिका कोणत्याहि व्यक्ती वैवाहिक जीवनांत बद्ध होण्यासाठीं एकमेकांस अनुरूप आहेत कीं नाहींत तें ठरविण्यासाठीं विवाहापूर्वीच त्यांना कांहीं दिवस पतिपत्नींच्या नात्यानें राहूं देण्याची परवानगी व्हावी या मताची असावीशी वाटते. अशा मासलेवजा तात्पुरत्या विवाहाला Trial marriage ह्मणजे प्रयोगिक विवाह अथवा ' अविवाहित विवाह ' असे ह्मणण्यांत येतें. पावित्र्याचें व पातिव्रत्याचें जेथें चिन्हही आढळत

नाहीं, अशा डेन्व्हरचे त्यानें मोठें भयंकर चित्र रेखाटलें आहें. हें शहर इतर सर्व शहरांप्रमाणेंच असून अमेरिकेंत असे आणखी कितीतरी डेन्व्हर असतील, असें जज्जसाहेब सांगतात.

जज्ज लिंडसे आणि त्यांच्या मताचा अनुवाद करणारे इतर लोक अशा प्रायोगिक विवाहाला (trial marriage) सहवासिक विवाह (Companionate marriage) असें नांव देतात. परंतु सहवासिक विवाह व अथवा प्रायोगिक विवाह, ह्यांत अर्थाच्या दृष्टीनें कांहींच अंतर नाहीं. प्रयोगरूपांत असतांनां, दोघांपैकीं कोणालाही दुसरा पक्ष नापसंत ठरला, तर त्यानें दुसरीकडे जावें व पुन्हा जुळतें कीं काय तें पाहण्याचा प्रयत्न करावा! प्रयत्नांतीं पतीचा परमेश्वर कोठें ना कोठेंतरी खासच लाभणार! मग विनाकारण शब्दच्छल तरी करण्यांत काय तात्पर्य आहे? जें जसें आहे त्याला तसें स्पष्ट नांव द्यावें हेंच बरें नाहीं कां? अक्षरांची ओढाताण केल्यानें वस्तूस्थितींत बदल होणार आहे थोडाच! त्यामुळें वेश्येला पतिव्रतेचें पदहि प्राप्त होणें शक्य नाहीं! असें जर आहे, तर मग उगाच डोक्याला शीण कशासाठीं द्या? सरळ आपला (trial marriage) 'प्रायोगिक विवाह' असें म्हणावें व मोकळें व्हावें झालें!

'सहवासिक विवाह' ह्या शब्दांपासून तरी कोणता अर्थ निष्पन्न होतो, तें आपण पाहूं या. ह्याचा साध्या आणि सरळ भाषेंत अर्थ असा होतो, कीं, दोघा तरुणतरुणींनीं एकमेकांच्या सहवासांत पतिपत्नीप्रमाणें कालक्रमणा करावयाची; आणि समजूत अशी कीं ज्या वेळीं दोहोंपैकीं कोणाही एकाला दुसऱ्याचा कंटाळा येईल, त्या वेळीं त्याला त्याचा मार्ग मोकळा असावा, आणि त्याला करारांतून मोकळें करण्यांत यावें. अशा सहवास प्रसंगीं करार करण्यांत येतो, आणि कांहीं संस्कारही पाळण्यांत येतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अर्थात्, ह्या करारांत आणि ह्या संस्काराचारांत, दोन जीव विवाहसूत्रानें बांधल्यानंतर त्यांच्या ठायीं जें समाजशासनाच्या धार्मिक दृष्टीनें किंवा कायद्याच्या दृष्टीनें एक यावज्जीव असें बंधन निर्माण होतें, तसें झालेलें नसतें; परंतु शब्दशः एकमेकांजवळ तशा आणाभाका जरी घेतल्या नसल्या, तरी समजूत मात्र अशी असते कीं, जों पर्यंत

आपलें एकमेकांशीं मन रमतें, तों पर्यंत आपण एकामेकांचे; ह्यानंतर तुह्माला तुमची वाट मोकळी, आह्माला ही दाही दिशा मोकळ्या ! पण त्याबरोबर हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, हा नुसता सहवासिक विवाह आहे, खराखुरा विवाह नाहीं ! तेव्हां ह्या सहवासाच्या अवधींत आपल्यामागें पोराबाळांचें लफडें लागणार नाहीं, अशीही खबरदारी बाळगली पाहिजे. कारण मूल झालें कीं मग आपलें लग्न झालें असें ठरेल, आणि मग त्या मुलाला सांभाळण्याची जबाबदारी दोहोंपैकीं कोणा एकाच्या अथवा दोघांच्याही शिरावर येईल ! तशी वेळ-नको. शिवाय अशा प्रकारें मुलें होईपर्यंत आपले आईबाप आपल्याला पोसणारच ! आणि पुष्कळ दिवस आपण दोघे एकत्र राहिल्यानंतर जर आपणाला असें वाटूं लागलें, कीं आपणाला जन्मभर असें एकत्र राहण्यास कांहीं हरकत नाहीं, तर मग एखादे दिवशीं घेऊं खर्चिग्रस्त आरडा विवाह उरकून ! * एकंदरींत काय, कीं सहवासिक विवाहांत आणि खरोखरीच्या विवाहांत तत्त्वतः कांहींच भेद नाहीं. फक्त खऱ्या विवाहाचे सर्व संस्कार मात्र कमी करण्यांत आलेले असतात. ह्या आधुनिक विवाहाला आवश्यक असणारीं उपकरणें व संस्कार म्हणजे, एक शय्या, संभोगेच्छा, आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचें तोंड बंद करण्यासाठीं थोडेसें द्रव्य, एवढें असलें कीं तुम्हाला मनसोक्त क्रीडा करायला पूर्ण मोकळीक मिळते.

एक स्पष्टवक्ता म्हणून प्रख्यात असलेल्या वाकिलाला, तुम्हाला ह्या सहवासिक विवाहपद्धतीविषयीं काय वाटतें, असा प्रश्न विचारण्यांत आला. त्याचें त्यानें दिलेलें उत्तर असें आहे:-

"ज्या अर्थीं लोकांनीं निर्भय आणि स्पष्ट असावें असें मी नेहमीं म्हणतो, त्याअर्थीं ह्या सात्त्विकतेच्या नांवाखालीं पापाला धुडगूस घालूं देण्याची जी सांधे देण्यांत येते, त्याबद्दल माझें मत काय आहे, तें स्पष्टपणें मला सांगितलें पाहिजे. मला नीतीच्या आणि अनीतीच्या लांब लांब गप्पा मारतां येत नाहींत; पण एवढें मात्र मला कळतें कीं, एखाद्या पुरुषाला जर कोण्या एका स्त्रीच्या सहवासाची तीव्र इच्छा असेल आणि तिच्याशीं विवाहानें

---

* धि न्यू एज, फेब्रुआरी १९२८

बद्ध होण्याची जर त्याची तयारी नसेल, तर स्त्री तयार असल्यास, त्यानें उघड उघड तिला आपली रखेली म्हणून बाळगावी; किंवा दुसऱ्या शब्दांत हेंच सांगावयाचें म्हणजे त्यानें वेश्याचार करावा. ह्या प्रकारांत, त्या स्त्रीच्या खर्चाचा बोजा आपल्यावर असल्याचें सोंग तरी त्याला आणावें लागेलच ! पण ह्या सहवासिक विवाहांत त्याच्यावरची ही एवढी सुद्धां जबाबदारी नाहींशी झालेली असतें. अशा रीतीनें रखेली म्हणूनाहि एखाद्या स्त्रीशीं संबंध ठेवावयास तयार झालेल्या निर्घृण मनुष्याला तिची अशा प्रकारें जबाबदारी पत्करण्यासाहि तिजवर बरेंचसें प्रेम असावें लागेल ! " *

वस्तुस्थितीचें जज लिंडसेनें केलेलें वर्णन मोठें विलक्षण आहे. स्त्री पुरुष संबंधाविषयीं मुलांमुलींमध्यें अगदीं उघड उघड स्वैरालाप चाललेले असतात. गर्भप्रतिबंधक उपाय—कधींकधीं चुकीचेही व संभोगाचे नित्य नवे प्रकार ह्यांबद्दलही ते अगदीं मोकळेपणानें एकमेकांशीं बोलतात. प्रणयचेष्टा आणि प्रियाराधन हे त्यांना रोजचे करमणुकीचे व्यवसाय वाटतात आणि संभोगक्रीडेचा आस्वाद घेण्यासही ते कोणत्याही प्रकारच्या लज्जेची अथवा अनीतीची जाणीव न होऊं देतां एकमेकांना आमंत्रणें देतात ! तो म्हणतो:—

"मला एका मुलीचें उदाहरण आठवतें. ही मुलगी अत्यंत सुंदर व तेजस्वी वृत्तीची होती. तिनें मला सांगितलें कीं, एका विवाहित मुलाचें ठायीं तिला हवी होती तेवढी उद्दीपन शक्ति नाहीं, आणि तिचें मन संभोगासाठीं वश करून घेण्याची कला नाहीं, ह्या सबबीवर तिनें त्या मुलाबरोबर फिरावयास जाण्याचें नाकारलें.

" मी तिला विचारलें, आजकाल सर्वच तरुण असे वागतात का ?

" तिनें उत्तर दिलें, अर्थातच ते असे वागतात ! ते जर असे न वागतील तर त्यांच्यांत कोठेंतरी कांहींतरी व्यंग आहे असें समजण्यांत येतें." ×

---

* धि न्यू एज. फेब्रुआरी १९२८.

× धि रिव्होल्ट ऑफ माडर्न यूथ पान ५७.

जज्ज लिंडसे म्हणतो कीं ह्या सर्व प्रकारांत मुलीच पुढाकार घेतात.

" हायस्कुलांतील मुलगा हा तेथील मुलीपेक्षां फारच अनभ्यस्त व साळसूद असा असतो. बहुधा ह्या बाबतींत मुलीच पुढाकार घेतात. आणि मुलगा तिच्या इच्छेबरहुकूम नाचतो ! " *

त्याच लेखकाच्या सांगण्याप्रमाणें, मुली ह्या सर्व गोष्टींत बुद्धिपुरःसर निर्लज्जपणें भाग घेत असतात. एखाद्या तरुणावरोबर विवाह न करतां एकत्र राहणें ह्यांत अनीतिमय किंवा अयोग्य असें कांहीं नाहींच, अशी त्यांची समजूत असते. ह्या समजुतीच्या आधारावर, आज हजारों युगुलें अशीं आहेत कीं जी कोणत्याहि पापाचरणाच्या जाणिवेशिवाय अगदीं आनंदानें आपलें अविवाहित दांपत्यजीवन उपभोगित आहेत. त्यांच्यासमोर जर कोणती एक अडचण असेल, तर ती आपल्या आईबापांना कोणती थाप मारावी व समाजाच्या डोळ्यांत कोणत्या उपायांनीं धूळ झोंकावी, हीच काय ती असते. जज्ज लिंडसेनें एका मुलीची हकीगत नमूद करून ठेवली आहे. पूर्वी पांच वर्षांपासून एका मुलीचे कितीतरी मुलांबरोबर वैषयिक संबंध घडत होते. सरतेशेवटीं ती आपल्या वयाच्या १७ व्या वर्षीं, पुष्कळ वल्लभांचा कंटाळा आल्यामुळें एकाच वल्लभाला चिकटून राहून, त्याच्याशीं विवाह न लावतांच त्याच्या पत्नीप्रमाणें त्याच्याजवळ राहूं लागली ! ह्यानंतर तिनें शेवटीं लग्नही केलें, आणि लग्नाचें प्रसंगीं तिच्या आईच्या डोळ्यांतून अश्रूही वहात होते ! भोळी विचारी आई ! तिला वाटत होतें, कीं तिची पोरगी आज नव्यानेंच एका निराळ्या सृष्टींत पाऊल ठेवीत आहे म्हणून ! अशा प्रकारचीं वयाच्या १२ व्या वर्षापासूनच विषयसंभोगांत व्यतीत होणारीं आयुष्याचीं वर्षे, आणि अविवाहित दांपत्य जीवनांत व्यतीत होणारें आयुष्य, हाच जज्ज लिंडसे यांच्या रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ ह्या पुस्तकाचा विषय असून, ह्याच मुद्यावर त्यांनीं सहवासिक विवाहसंस्थेची स्थापना आवश्यक आहे असें प्रतिपादिलें आहे. रशियामध्यें ह्या प्रकाराला अधिक सत्य व वस्तुस्थितिदर्शक असें स्वैरप्रेम (free love) असें नांव आहे.

---

* धि रिव्होल्ट ऑफ माडर्न यूथ पान. ५५,

वैवाहिक जीवनाच्या ह्या नव्या स्वरूपाचें वर्णन जज्ज साहेबांनीं एका सर्वसाधारण मुलीच्या तोंडून पुढीलप्रमाणें वदाविलें आहे:-

" लग्न झालें आहे कीं नाहीं ? या प्रश्नाला मुलगी उत्तर देते:-" अहो जज्ज साहेब, माझ्या सोबतिणींपैकीं ज्या दहांनीं गेल्या दोन वर्षांत लग्नें केलीं होतीं त्यापैकीं अर्ध्याअधिकांनीं आपल्या नवऱ्यांना सोडचिठ्या तरी दिल्या आहेत किंवा त्या नवऱ्यापासून वेगळ्या तरी राहूं लागल्या आहेत ! ..... नवे नवे प्रेमप्रसंग अनुभवावे व आयुष्यांत असाधारण गोष्टींचा उपभोग घ्यावा, हा आमचा हक्कच आहे असें मला व ह्या युगातील माझ्यासारख्या सर्व मुलींनां वाटत असतें. इच्छा नसतांनाहे मुलें होऊन आमचा मार्ग कंटकमय करूं नये, ह्यासाठीं गर्भप्रतिबंधक उपायांची माहितीही आह्मां सर्वांनां चांगली असते; आणि पूर्वापार चालत आलेल्या रूढींमध्यें अशी थारेपालट करणें हें समजसपणाचें आहे, असा आह्मां मुलींचा विश्वास आहे. ,, *

ही विचारसरणी चुकीची आहे असें जर मीं म्हटलें तर जज्ज लिंडसे मला क्षमा करतील अशी आशा आहे. इकडे ते, मुलींचें हें नीतिबाह्य वर्तन, " तिला कळत नव्हतें; तिच्या आईबापांनीं तिला अज्ञानांत ठेवलें; " असें सांगून ते क्षम्य ठरवितात आणि तिकडे पहावें तों ते ह्याच्या उलट असा सवाल विचारतात कीं, ह्या सर्व प्रकाराबद्दल स्पष्टच कां बोलूं नये ? मेरी आणि तिच्या सारख्या आजच्या इतर सर्व तरुणी ह्या विवाहाच्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर शोधण्याची खटपट करीत आहेत, हेंच सत्य ह्मणून मान्य कां करूं नये ? ही ' खटपट ' बहुधा ' चुकीची ' आहे असें ह्मणण्यास मात्र जज्ज साहेब विसरत नाहींत. परंतु अश्या बाबतींत असा गुळमुळीत अर्धवट निकाल कामीं पडत नसतो. एक तर आपण पातिव्रत्य, गृहधर्म, एक पत्नीत्व ह्या प्रचलित तत्वांचा तरी पुरस्कार केला पाहिजे, अथवा सब गोलंकाराला तरी पूर्ण संमति दिली पाहिजे. समाजव्यवस्थेच्या प्रचलित रूढि जर अयोग्य ठरल्या असतील तर त्यांच्या जागीं नव्या सुधारणा अमलांत आणण्याचा खुशाल प्रयत्न करावा, नाहीं असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं;

---

* फिजिकल कल्चर मॅगझीन, फेब्रुआरी १९२६

पण मग ह्या सुधारणांना 'चुकीच्या' 'अज्ञानजन्य' 'फाजील विनय शीलतेमुळें उत्पन्न झालेल्या' अशीं विशेषणें तरी लावूं नयेत, एवढेंच आमचें म्हणणें !

एका अमेरिकनानें, अगदीं थेट न्यूयार्क मधीलच एका इसमानें जज्ज साहेबांनां प्रत्युत्तर दिलें आहे. तो म्हणतो:—

" ह्या स्वतंत्र मतांच्या व्यक्तींच्या मानानें मी फारच विनयशील व लाजाळू आहें, असें मी कबूल करतों. ते कांहीं 'गुप्त गोष्टींची' मारे चर्चा करीत असतात. आम्ही आपल्या मुलाबाळांनां ह्या गोष्टींचें शिक्षण कां देऊं नये असें हे विचारतात ? खरें सांगावयाचें म्हणजे, या 'गुप्त गोष्टींचें' ज्ञान असणाऱ्या ह्या महापुरुषांचे मेंदू घाणीनें कुजलेले आणि त्यांचीं दृष्टि अहंकाराच्या दिमाखानें अंधुक झालेली असते.

" बालप्रावस्थेत असणाऱ्या लहान लेकरांना हें शिक्षण घेऊन काय करावयाचे आहे ? चौदा वर्षांपुढील असा एकही मुलगा किंवा मुलगी सांपडणार नाहीं कीं ज्याला (अथवा जिला) 'पवित्र' व शुद्ध असें जीवन घालवण्यास अवश्य अशा ह्या ज्ञानाचा अभाव भासत असेल. एवढ्यावरून सर्व माहिती क्रमाक्रमानें मुलांनां आपोआपच मिळत असते. जसें हळूं हळूं 'सॅन्टा क्लाज' म्हणून कोणी खराखरच असतो असें नाहीं, हें त्यांनां कळूं लागतें तितकेंच खात्रीनें ह्या विषयांचेंहि ज्ञान त्यांनां होतेंच ! ह्या 'गुप्त गोष्टींचें' शिक्षण मला स्वतःला कोणीही दिलें नव्हतें. तरी मला ती सर्व माहिती आहेच ना ?

" कित्येक सत्पुरुषांनां अश्लील संभाषणांतच अत्यानंद वाटत असतो. ह्याच महाभागांनीं 'परत निग्रहीकडे' किंवा 'सुधारूजकांच्या' संस्था स्थापण्यास सुरवात केली आहे. ह्या सर्व संस्थांमें आद्य तत्त्व हें कीं वस्त्रें हीं अनावश्यक आहेत, एवढेंच नव्हें तर तीं पापास कारण होत असतात.

खरें सांगावयाचें म्हणजे, लहान मुलांबाळांनां सुद्धां कामशास्त्रविषयक ज्ञान शिक्षाविण्यांत यावें असें म्हणणारे हे उदारमतवादी महात्मे

किंवा वस्त्रांचा त्याग करावयास शिकविणारे उदारधी ह्मणजे एकजात विषयलंपट असून, ह्यांचे मेंदू वर्षानुवर्षाच्या बेफाम विषयोपभोगानें सडून जाऊन त्यांचीं निश्चय शक्ति लटपटूं लागून त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचा चुरा झालेला असतो.

"एका सद्गृहस्थानें त्यांचें नांव आतां मला आठवत नाहीं- पापाची अशी व्याख्या केली आहे:-"पापाचा सुरुवातीस आपण तिरस्कार करतों; पुढें त्याबद्दल आपल्याला कींव वाटूं लागतें, आणि शेवटीं आपण त्याला आलिंगन देतों." हे स्वतंत्रमतवादाचे पुतळे पापाच्या गर्तेत इतका दीर्घ काळपर्यंत कुजत पडलेले असतात, कीं, ह्या गर्तेत आपण कोणत्या मार्गानें आलों ह्याचा देखील ह्यांना अजीबाद विसर पडलेला असतो." *

ह्या रूढिप्रतिकाराच्या बंडखोरीची सर्रास अधिक खोड जर कशामुळें येत असेल, तर, तिचा प्रसार करण्यासाठीं जी फाजील बडेजावी मिरविण्यांत येते आणि जीं मोठमोठालीं आकर्षक तत्वें सांगण्यांत येत असतात, त्यामुळें हा अविवाहित दांपत्यसंबंधाचा प्रकार ह्मणजे वास्तविकपणें रोशियांत रूढ असलेल्या आणि ज्याबद्दल सर्वच सुधारलेल्या जगतांत एकदम तीव्र तिरस्काराची लाट पसरली, अशा स्वैर प्रेमविहाराहेतीं (Free love) निराळा आहे असें नाहीं. ह्यानेंही विवाहसंस्थेवर अगदीं तितकाच घातकी हल्ला चढविलेला आहे; आणि साळसूदपणाचा आव आणल्यामुळें तर ह्या सुधारणेचें (?) पाप अधिकच भीषण झालेलें आहे! सुदैवानें ह्या व्यभिचारधर्माची उभारणी कोणा देवतेच्या नांवानें करण्यांत आलेली नाहीं, एवढें तरी बरें झालें! ढोंगीपणाचा परमेश्वराला तिटकारा आहे! ह्या जारकर्माला खऱ्या खऱ्या नांवांखालीं उघडपणें मिरविण्याची सुद्धां जगांत लाज वाटावी, हें योग्यच आहे. प्रायोगिक दांपत्यसंबंध ह्मटला कीं, त्याबरोबरच गृह आणि गृहधर्म रसातळाला

---

* फिजिकल कल्चर मॅगझीन फेब्रुआरी १९२६.

गेलेच ! आणि कुटुंबसंस्थेचा अशा प्रकारें समूळ उच्छेद झाल्यानतर आजच्या जगाला संमत असलेल्या समाजाचेंही विघटीकरण होऊन सर्वत्र स्वैरतेचा अंध:कार माजणें हें अवश्यभावी ठरल्यावांचून कसें राहील ?

फिजिकल कल्चरच्या त्याच अंकांत 'न्यू वूमन' ह्या सहीनें लिहणाऱ्या लेखिकेनें म्हटलें आहे, समान हक्क म्हटले म्हणजे मग ते समान हक्कच ! स्त्रीलाहीं तसें करण्यास पूर्ण मोकळीक दिल्याखेरीज कोणत्याहि पुरुषाला विडी ओढण्याचा, दारू पिण्याचा, अश्लील भाषा वापरण्याचा किंवा व्यभिचार करण्याचा अधिकार नाहीं.' सर्वसाधारण अमेरिकन स्त्री ही अशी आहे. समान हक्क म्हणजे पापाचरणाची समान मोकळीक असेंच ठरतें !

आमच्या तरुणांच्या दुर्वर्तनाच्या मुळांशीं अज्ञानजन्य कुतूहलही नाहीं, किंवा सत्यस्वरूपाची सुधारणा शोधण्याची बुद्धिही नाहीं. नवीन स्वातंत्र्याचा, पुरुषाप्रमाणें स्त्रियांच्याही आर्थिक समान दर्ज्याचा, वर्णसंकराचा, अनियंत्रित व स्वैर अशा अकालप्राप्त यौवनसुलभ उपभोगांचा पाशवी लोलुपतेचा, उद्दीपक नृत्यामुळें व चटोर वाङमयाच्या वाचनामुळें बळावलेल्या वासनांचा, सहाशिक्षणाचा आणि मद्यपाननिषेध धाब्यावर बसविल्याचाच हा परिणाम होय. ह्याचीं कारणें म्हणजे, व्यभिचारांचे व घटस्फोटाचें विलक्षण स्वरूप, आणि सिनेमागृहें, नग्नचित्रकलाप्रदर्शनें, अश्लील वाङ्मय, स्वैर जीवनक्रम व विचारांचा लोप ह्यांमुळें उत्पन्न होणारी विकारशीलता, हीं होत, असेंही म्हणतां येईल. आणि ह्या अभिनव मतपुरस्काराचा एक प्रमुख विशेष म्हणजे समान हक्कांच्या कल्पनांचा मूर्खपणाचा पुरस्कार, हा होय !

अनीतीच्या बाबतींतही पुरुषांबरोबर समानतेचा हक्क गाजवूं म्हणणें म्हणजे समतेच्या तत्त्वाचा दुरुपयोग करणें होय, असें शिक्षण धर्मसंस्थांकडून व ग्रंथप्रकाशकांकडून सांगण्यांत येण्याऐवजीं, उलट, आपले आश्रयदाते कमी होऊं नये अथवा आपला खप वाढवा म्हणून उलट ह्या गोष्टींनां सर्व बाजूंनीं उत्तेजनच मिळतें. ह्यामुळें अमेरिकन जातीचा नाश होऊन तेथील सुधारणा रसातळास गेल्यावांचून राहणार नाहीं, इें खास !

अमेरिकन नीतिमत्तेला पौर्वात्य पद्धतीचें वळण लावावें असें जे लिंडसेंचें मत तें सर्व अमेरिकनांना मान्य होईल असें दिसत नाहीं. बर्नार मॅकफेडन लिहितो:—

" आमच्या स्त्रियांच्या अंगीं स्वतःला वेश्या न बनावेंयाइतका स्वाभिमान उत्पन्न होईपर्यंत आमचे तरुण देशाच्या अपकर्षाला कारणीभूत होणाऱ्या अधःपतित आचाराचे व विचारांचेच राहणार ! *

नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वी ह्या विषयावर लिहीत असतांना, साइन्स ऑफ टाईम्स ' नें ह्या परिस्थितीविरुद्ध मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. व आजच्या सुधारणांकडे सहानुभूतीनें पण चुकींनें पाहणाऱ्यांपेक्षां आधेक स्पष्टतेनें वस्तुस्थितीचें निरूपण केलें. तो ह्मणतो:—

" आज जगांत तीन सैतानी शक्तींचा प्रादुर्भाव झालेला आहे, आणि त्या तिन्हीही शक्ति नरकाभिमुख आहेत. पहिलें, महायुद्धानंतर अत्यंत विकृत व निर्लज्ज स्वरूपांत फोफावलेलें कामुक चटोर वाङ्मय; दुसरे, विलासी व विकारपूर्ण अशा उद्दीपक कथानकांचीं सिनेमांतिल प्रदर्शनें; आणि तिसरें ह्मणजे, स्त्रियांच्या बाबतींत, त्यांच्या पोषाखांत .— पोषाखाच्या अभावांत ह्मणणेंच अधिक योग्य होईल—त्यांच्यांत दिसून येणाऱ्या धूम्रपानाच्या वाढत्या व्यसनांत, आणि ' नेकिंग ' आणि 'पेटिंग' ह्यां सारख्या क्रीडांतून सिद्ध होणाऱ्या त्यांच्या पुरुषांशीं असलेल्या व्यभिचारसंबंधांत व्यक्त होणारें नैतिक अधःपतन.

" ह्या तीन गोष्टींची आमच्या समाजांत सारखी वाढ होत आहे आणि त्यामुळें ख्रिस्ती समाजाचा व संस्कृतीचा नायनाट होणार ह्यांत शंका नाहीं. जर ह्या गोष्टींना वेळींच पायबंद घातला नाहीं तर, आमचाही इतिहास, विषय विलासांनां बळी पडून आपल्या सर्व विलाससामुग्रीबरोबर सर्व नाशाच्या गर्तेकडे धांवत गेलेल्या रोमच्या इतिहासाचाच कित्ता गिरवतील हें अगदीं उघड आहे. "

---

* वूमनहुड ॲन्ड मॅरेज , पान ९८

प्रकरण १० वें.

असे अपघात हे व्हायचेच !

विज्ञानशास्त्र निसर्गाच्या नियमांवर कुरघोडी करण्याचे उपाय शोधून मनुष्याचे श्रेष्टत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे. पुरुषाचा स्त्रीशीं संयोग झाला ह्मणजे अपत्यसंभव होतो,हा निसर्गाचा नियम आहे परंतु मनुष्यानें आपल्या विज्ञानशास्त्राच्या सहाय्यानें असे उपाय शोधून काढले आहेत, कीं त्यामुळें संततिनियमन तर होतेंच, पण ज्या जातीचीं जेवढीं अपत्यें माणसाला हवीं असतील त्या जातीचीं तेवढींच फक्त अपत्यें उ-पन्न होणें ही क्रिया देखील आकाशांत विहार करण्याइतकीं, किंवा घरीं बसुन कोणत्याही दृश्य उपकरणांच्या सहाय्यावांचुन जगाच्या दुसऱ्या टोंकांशीं भाषा बोलण्याप्रमाणेंच सुलभ झाली आहे ! मनुष्यानें सृष्टीवर मिळविलेला विजय व नैसर्गिक शक्तींचा त्यानें आपल्या फायद्याकरतां करून घेतलेला उपयोग, ह्या गोष्टी आतां नित्याच्या होऊन बसल्या आहेत.

परंतु कधीं कधीं, मनुष्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें उत्पन्न केलेल्या साधनांवर सृष्टिनियमही विजय मिळवितात. सृष्टिनियमांनीं मानवी कर्तबगारीवर जेव्हां असा हरताळ फांसला जातो तेव्हां याला आपण अपघात म्हणून संबोधतो. पण हा निव्वळ मनुष्याचा वृथाभिमान आहे.

मनुष्यानें कितीही काळजी घेतली, तरी हे अपघात टळणें कांहीं शक्य नाहीं. संततिप्रतिबंधक उपाय किती पूर्ण स्वरूपाचे असले, तरी त्यांच्या यशस्वितेचें मान शेंकडा ९५ आहे, असेंच फार फार झालें तर ह्मणतां येईल. उरलेल्या पांच टक्क्यांत तरी त्या उपायांची विफलता दिसून आल्यांवाचून रहात नाहीं; हीं पांच टक्के उदाहरणें म्हणजे प्रायोगिक विवाहाच्या निष्फलतेचीं कटु फलें होत.

आदर्श पति कोणता पुरुष होणें शक्य आहे तें प्रत्यक्ष अनुभवांतीं, पडताळून पाहून ठरविण्याच्या योजनेंत, हे गर्भप्रतिबंधक उपाय अगदीं शंभर

टक्के यशस्वी ठरणारे असे असले, तरच ठीक, पण असें होणें शक्य नाहीं. दुर्दैवानें या शेवटच्या पांच अपघात प्रसंगांचा निभाही उतरण्याची सोय झालेली नाहीं.

लॅटिन भाषेंत **Vae victis** (दोषी व्यक्तीच्या कपाळीं दुःख लिहिलेलें आहे !) असें एक वचन आहे. अपराधी म्हणून जो निसर्गाच्या तावडींत सांपडला, कीं मग त्याच्या दुःखाला पार नाहीं ! अविवाहित मुलींसाठीं अमेरिकेंत पुष्कळ उपयुक्त कार्यें आहेत; परंतु अविवाहित मातेची मात्र तेथें गरज नाहीं. आणि अमेरिकन छाकटाही, आपल्या प्रीतीचें प्रदर्शन करीत असतां जरी कोणतींच बंधनें पाळतांनां दिसत नसला, तरी, लवकरच मातृपदावर आरूढ होऊं पाहणाऱ्या हतभागिनीबद्दल अगदीं पूर्णपणें सहानुभूतिशून्यच असतो. ही लज्जाजनक असली तरी सत्य परिस्थिति आहे व सर्वसाधारण अमेरिकन पुरुषांत त्यानें भ्रष्टविलेल्या व जिच्यासह त्याने आपल्या जीवनांतील अत्यानंदाचा काळ घालविला असेल अशा स्त्रीशीं असलेला आपला संबंध शेवटपर्यंत कबूल करण्याची सभ्यता किंवा माणुसकी आढळत नाहीं. ह्याला कांहीं थोडे फार अपवाद असतील, परंतु हा साधारण नियम मी सांगितला. अशा नीचांचें वर्णन करणारें एक विशेषण आहे, परंतु त्याचा उल्लेख करण्याचें माझ्या जिवावर येतें. डॉ. लोरी अमेरिकन तरुणींना उपदेशाच्या चार गोष्टी समजावून सांगतांना लिहितातः—

" पुष्कळदां मुलींना विवाहाची आश्वासनें देऊन वाममार्गावर खेंचण्यांत येत असते. प्रत्यक्ष प्रसंग येऊन ठेपल्यानंतर, ही आश्वासनें फोल असतात, असें दिसून आलेलें आहे. आपला कार्यभाग साधल्यानंतर बहुधा पुरुष आपला विचार ' बदलला ' असें सांगू लागतो; तो दुसरीकडे निघून जाऊन आपल्या वासनेला बळी पडलेल्या ह्या पोरीची आठवणही पार विसरून जातो, आणि त्याच्यामागें त्या उभयतांनीं मिळून उपभोगिलेल्या आनंदाचीं फळें मात्र त्या पोरीलाच भोगावीं लागतात ! पुरुषाला ह्या पोरी, बाहेर बरोबर हिंडण्या फिरण्यासांठीं व मौज मारण्यासाठीं हव्या असतात; लग्नाचा प्रश्न आला म्हणजे पत्नीपदावर बसविण्यासाठीं त्याला स्त्री हवी असते ती निराळ्याच प्रकारची ! " *

---

* " हरसेल्फ " प्रकरण १४ वें पान १२१ वें पुढें.

'हार्ट्स् कॉस्मापॉलिटन,' 'ट्रू स्टोरी' 'ड्रीम – वर्ल्डड ऑफ लव्ह ॲन्ड रोमॉन्स', 'ट्रू एक्स्पीरिअन्सेस' ह्यांसारखीं व इतरही अनेक कथात्मक वाङ्मयाला व शास्त्रीय विषयांनां वाहिलेलीं कित्ती तरी मासिकें नित्यशः अविवाहित मातेच्या करुण कहाण्यांचीं हृदयद्रावक वर्णनें प्रसिद्ध करीत असतात. ह्या प्रश्नाचा उल्लेख व त्यावरील भाष्य, हा नियतकालिकांचा एक महत्वाचाच विषय आहे. दैनिक व इतर वृत्तपत्रांत, प्रलोभनाला बळी पडलेल्या व लवकरच अपत्यप्राप्तीचा संभव असणाऱ्या कुमारिकांचीं अनेक पत्रें प्रत्यहीं प्रसिद्ध होत असतात. मुलामुलींच्या साठींच असलेल्या (Juvenile) न्यायालयांत असले खटले दरवर्षीं हजारोंनीं पुढें येत असतात. अविवाहित मातेसंबंधीं जज्ज लिंडसे पुष्कळच गोष्टी सांगतात. एके ठिकाणीं त्यांनीं ह्मटलें आहे:–

"ते शब्द बोलतांनां तिच्या मुद्रेवर जें औदासीन्य दिसत होतें, त्याचा मला या जन्मांत कधींहीं विसर पडणार नाहीं. ती ह्मणाली, 'समाज ज्यांनां पापकृत्यें ह्मणेल अशीं अनेक कृत्यें माझ्याहातून आजवर घडलीं आहेत, परंतु त्यांपैकीं प्रत्येक कृत्याबद्दल मी स्वतःचें समर्थन करूं शकतें. फक्त एकच कृत्य माझ्या हातून असें घडलें आहे कीं त्याबद्दल मी स्वतःला केव्हांहीं क्षमा करूं शकणार नाहीं, तें हें, – मी माझ्या बाळाला आंचवलें ! एक अपत्याला जन्म देण्याचें उच्च व महनीय सत्कृत्य करण्याबद्दल समाजानें स्त्रीला अपराधी ह्मणावें, आणि त्याची उत्पत्ति जर तिनें कोणत्याही उपायानें टाळली, तर त्यानें तिला निर्दोष ह्मणून सोडून द्यावें, हा न्याय आहे का ?'

"तिच्यावर प्रसंग आल्यानंतर तिनें ज्या मार्गाचें अवलंबन केलें तो मार्ग बरोबर होता, असें ह्मटल्यावांचून मला रहावत नाहीं. आपल्या गर्भाशयांत सजीव झालेल्या अर्भकाचा आंतल्या आंतच प्राण घेऊन, माता होण्याचा प्रसंग जर स्त्रीला टाळतां आला, तर ती पातकी आहे हें ठाऊक असूनही समाज तिला आपलेपणानें वागविण्यास तयार असतो, ह्याचीं अनेक उदाहरणें मी पाहिलेलीं आहेत !" *

धि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ, पान २२०–२२१.

लवकरच माता होणार असलेल्या कुमारिकेच्या मनःस्थितीचें चित्र खालील हकीकतींत चांगलें प्रतिबिंबित झालेलें आहे:-

" लवकरच मला मूल होणार हें मला समजून आलें. आपलें मुलाबाळांनीं गजबजलेलें घर असावें, अशी माझी मनापासून इच्छा होती; परंतु ह्या जबाबदारीचा भार सांभाळण्याची पात्रता ह्या वेळीं माझ्या अंगीं नव्हती. गृहिणीपणाचा मान सोडावा लागला तरी हरकत नाहीं, असें ठरवून मी तशीच स्वस्थ राहिलें. पुढील सर्व लोकापवाद मी धैर्यानें सहन केले असते, परंतु दुर्दैवानें येथें माझ्या संकटांना सुरुवातच झालेला होता.

" जो मनुष्य मला देवाप्रमाणें वाटत होता, व ज्याचें माझ्यावर अपार प्रेम होतें, तो मनुष्य शेवटीं हिणकस आहे असेच ठरलें ! माझ्या अवस्थेची जाणीव होतांच त्याचें मन फिरलें. त्यावेळीं माझ्या ध्यानांत आलें कीं तो दुसऱ्याच एका तरुणीच्या मागें लागलेला आहे म्हणून ! माझ्याशीं लग्न करून घर करण्याला, कॉलेजमधील त्याच्या असंख्य धंद्या (?) मुळें वेळ कुठें होता ? त्या वेळीं मला काय वाटलें, आणि माझें हृदय कसें पिळवटून निघत होतें तें शब्दांनीं वर्णन करून सांगतां येणार नाहीं. मनुष्यत्वाच्या पायरीवरून एवढा अधःपात होईल असा मनुष्य असणें शक्य नाहीं, अशी माझी ह्या वेळपर्यंत कल्पना होती. आज जर माझा पुरुषजातीवरील विश्वास समूळ नष्ट झाला असला, तर त्यांत कांहीं नवल आहे का ? त्यानंतर मला कशाचीच पर्वा वाटेनाशी झाली, आणि संसार म्हणजे शून्यमय, अंधःकारपूर्ण निरानंद असें कांहीं तरी आहे अशी माझी समजूत पटली !

व लोकांच्या आग्रहाच्या सल्ल्यावरून मी आपला गर्भ पाडून टाकला !" *

अशाच दुसरी एक हकीगत ही पहा:-

" गेल्या एप्रिल महिन्यापासूनच्या माझ्या जीवनक्रमाची थोडीशी रूपरेषा मी तुमच्या पुढें मांडतें. ह्या महिन्यांतच माझ्या आपत्तींना प्रारंभ झाला. ह्या आपत्तींचा दोष मुख्यतः दोन गोष्टींकडे आहे. एक तर, माझ्या इच्छेस येईल त्या

---

* फिजिकल कल्चर मॅगेझीन. जून १९२६.

प्रमाणें माझ्या इष्टमित्रांनां घरीं येण्यास बंदी असल्यामुळें व घरीं न कळवितांच वाटेल त्या मित्राबरोबर बाहेर हिंडण्यास जाण्याचीही बंदी असल्यामुळें ह्या बंधनांच्या निर्माणकर्त्यांकडे – माझ्या आईबापांकडे – ह्या दोषांची जबाबदारी कांहीं अंशीं जाते. आणि दुसरें ह्मणजे, ज्या गोष्टींची सर्व मुलांनां माहिती असावी, त्यापासून मला वंचित ठेवलें, ही वस्तुस्थितिही माझ्यावरील संकटपरंपरेला जबाबदार आहे ! मागच्या मार्च महिन्यांत मी १९ वर्षांची झालें. लोक असें सांगतात, कीं माझ्यासारख्या तरुणीचें आकर्षण आणि प्रलोभन आवरणें पुरुषांनां कठीण असतें. हें सत्य आहे कीं नाहीं कोणास ठाऊक; पण एक गोष्ट मात्र खरी, कीं तरुणांचे लक्ष माझ्याकडे नेहमीं वेधलेलें असे. आणि त्या गोष्टीबद्दल मला वाईटही वाटतें. पण तरीही त्यांच्या सहवासाची मला आतुर इच्छा असते. वर्षानुवर्षें मला असेंच वाटत आलें आहे, आणि अशा कोणा तरुणाच्या सहवासाव्यतिरिक्त मला अगदीं कंटाळवाणें वाटूं लागतें. त्याशिवाय, दुसरीही एक विचित्र गोष्ट अशी कीं, कोणास कळे कां, पण मला मुलींपेक्षां तरुणांचाच सहवास अधिक हवासा वाटतो. मागच्या एप्रिल महिन्यांत आमच्या गावीं एक तिशीच्या वयाचा पण त्यापेक्षां पुष्कळच तरुण दिसणारा असा एक इसम येऊन राहिला. तो देखणा होता, सुशिक्षित होता, नीटनेटका राहणीचा होता आणि त्याच्याजवळ पैसाही बराच असावा असें वाटे. ह्या सुमारासच, माझा एक बाळपणापासूनचा आणि सर्व बाबतींत भाग घेणारा असा एक मित्र होता, त्यानें कोणास ठाऊक कां मला पत्रें पाठविणें बंद केलें होतें; आणि घरींही माझ्या त्रासांना सुरुवात झालेली होती. ह्मणून मी ह्या नवीन इसमाशीं परिचय करून घेतला. सुरवातीला दोन प्रसंगीं आमच्या गप्पागोष्टी इतर मंडळींच्या बरोबरच झाल्या, पण त्यानंतर त्यानें मला एकटीलाच भेटण्यासांठीं प्रसंग ठरवून ठेवले. आमच्या मित्रांच्या सहाय्यानें मी पुष्कळ वेळां रात्रीच्या वेळीं त्याच्या भेटी घेतल्या. तिसऱ्याच रात्रीं, मी काय करतें आहे त्याचें वास्तविक स्वरूप माझ्या ध्यानांत येण्यापूर्वीच मी त्याला माझ्या सर्वस्वाचें भांडार लुटूं दिलें ! असें करणें पाप आहे असें मला

पूर्वी कधींही सांगण्यांत आलें नव्हतें, तरीही मी करतें आहे तें बरें नाहीं अशी जाणीव मला होत होतीच. ह्या गोष्टीचा माझ्या मनाला सारखा जाच होत होता, पण मी आपलें मन ज्याच्यापुढें उघडें करूं शकेन व जो मला योग्य उपदेश देईल असाही कोणी इसम आढळेना. ह्या तरुणानें मला असें सांगेतलें कीं, 'ज्या अर्थीं जें झालें तें आतां परत येणें शक्य नाहीं, त्या अर्थीं आतां विनाकारण त्रास करण्यांत काय अर्थ आहे ! झाला तो प्रकार असाच चालू ठेवूं या ! त्याच्याखेरीज दुसऱ्या कोणाचाच उपदेश मला मिळणें शक्य नसल्यामुळें मी त्याच्याच सांगण्याप्रमाणें वागूं लागलें. त्यानंतर कित्येक आठवड्यपर्यंत सांधे सांपडेल तितक्यांदां मी त्याच्या भेटीस जात होतें. आमच्या ह्या भेटींपासून पुढें काय होईल त्याची मला कल्पना होती, आणि त्याबद्दल मी त्याजवळ बोलूनही दाखविलें. परंतु प्रत्येक वेळीं तो, 'ह्याबद्दल तूं निर्धास्त रहा. मी सर्व व्यवस्था केलेली आहे' असें सांगून माझें समाधान करी. थोड्याच दिवसांनीं तो गांव सोडून जाणार होता; तत्पूर्वी त्यानें मला कांहीं औषध खाण्यासाठीं दिलें व सांगितलें कीं 'तुला कांहींसें अवघडल्यासारखें जें वाटतें आहे त्याचें कारण, तुला ह्या असल्या गोष्टींची संवय नाहीं म्हणून होय.' पण त्याच्या शब्दांवर माझा विश्वास बसला नाहीं. एका विवाहित स्त्रीकडे,— जिच्यावर भरंवसा ठेवायला हरकत नाहीं असें मला वाटत होतें,— जाऊन मी आपली कहाणी सांगितली. एके दिवशीं दोन प्रहरीं तिनें मला व माझ्या त्या सोबत्याला चहाला म्हणून निमंत्रण दिलें आणि त्यावेळीं तिनें सर्व परिस्थितीबद्दल आमच्याशीं – आमच्याशीं असें म्हणण्यापेक्षां 'त्याच्याशीं' असें म्हणणेंच अधिक योग्य होईल – सांगोपांग उहापोह केला. त्यानंतर, त्यानें आपलें जाणें थोडे दिवस लांबणीवर टाकलें, व माझ्यावरच्या प्रसंगांतून माझी सुटका होईपर्यंत तो आमच्या गांवींच राहिला. पण त्या प्रसंगा-नंतर माझी शरीरप्रकृति जी ढांसळली ती कायमचीच. आतां मला तुम्हाला जो प्रश्न विचारायचा आहे तो हा, कीं, ह्या उपर माझ्या पावित्र्यावर व निष्कलंक चारित्र्यावर विश्वसून माझ्याशीं लग्न लावण्यास तयार होणाऱ्या

कोणाही तरुणाबरोबर मी लग्न लावणें योग्य होईल कां ? ज्यांच्याशीं पुरुषांचीं लग्न करण्याचीं इच्छा असते, त्या स्त्रिया अशा असतात अशी त्यांची कल्पना असते का ? खरें म्हणजे, लग्न करण्याची माझी इच्छाच नाहीं; पण कांहीं तरी केलें हें पाहिजेच. मी जे कृत्य केलें त्याबद्दल, व तें जर माझ्या आईबापांनां कळलें तर काय होईल ह्याबद्दल घरीं बसून विचार करकरून माझें मस्तक फिरेल, असें मला भय वाटतें ! कोठें तरी जाऊन कांहीं तरी कामधंदा करावा असें मला फार वाटतें, पण त्यासाठीं कोणाकडे जावें तेंही मला ठाऊक नाहीं, आणि अशा कामधंदे करणाऱ्या मुलाच्या पुढें जीं प्रलोभने नित्यशः पसरलेलीं असतात त्यांपासून स्वतःचें रक्षण करण्याइतकें मनोधैर्यही माझ्याठायीं आहे असें मला वाटत नाहीं. मजला त्या पहिल्या प्रसंगानंतर, मी दानदां आणखी अशाच वासनांना बळी पडले आहे. ह्यां पैकीं पहिल्यांदां म्हणजे मलाच राहवलें नाहीं म्हणून, आणि दुसऱ्यांदां माझ्याकडे आलेला तरुण माझी गोष्ट जगांत फेडील ह्या भयाने ! पहिल्या माणसानच ह्याला माझें नांव सांगितलेलें होतें ! पुरुषांचा असा त्रास सहन करूनही शुद्ध राहणें अशक्य आहे असें जेव्हां मला दिसून आलें, तेव्हां पुरुषांचा सहवासच मी सोडला, आणि आज कित्येक महिने झाले मी आपल्या घराच्या बाहेरच पडलेले नाहीं. आतां मी शुद्ध जीवन व्यतीत करण्याची मनापासून खटपट करीत आहे, तरी पण हें कार्य दुष्कर आहे; ह्यांत शंका नाहीं. कधीं कधीं तर समाधि देण्याचा मोह मला अनावर होतो. माझ्याबद्दल तुमचें काय मत आहे तें मला पत्र लिहून अवश्य कळवा. ह्या माणसानें माझ्या आयुष्याचा सत्यानाश केला, असेंच शेवटीं ठरणार का ? *

" ही मुलगी आपल्या मनाच्या हळवेपणा टाकून देऊन थोडी निर्लज्जता जर पत्करणार नाहीं, आणि ' जशास तसें ' ह्या न्यायानें, समाजांत वावरून आपलें संरक्षण करून घेणार नाहीं, तर त्याचा शेवट ही कायमची पतित

---

* ' हरसेल्फ ' पान १५७ ते १६०.

ठरून वेश्या बनण्यांत होण्याचें फार भय आहे. हर हर ! पण हिची कहाणी किती तरी इतर मुलींसारखीच नव्हे का ! *

मातृप्रेमाइतकी सुंदर व परिपूर्णतेस गेलेली भावना दुसरी कोणतीही नाहीं, असें मनुष्यावें चिरकालापासून चालत आलेलें मत आहे. पशूंमध्यें सुद्धां ह्या मातृप्रेमाच्या भावनेचें मोठें विलक्षण चित्र स्वाभाविकपणेंच वसत असलेलें दिसतें. आणे तरीही सुधारणेवर आपला हक्क सांगणारें असेही समाज आहेतच, कीं ज्यांनां, मातृपद ' कायदेशीर ' रीतीनें प्राप्त झालेलें नसेल तर तें ओंछन आहे असें वाटून अशीं आपलें म्हणजे आपल्या मातांच्या पापांचीं व दुर्वर्तनाच्या ध्वजा होत, असें वाटतें.

" समाजानें अस्तित्वांत रहावें असें माझें मत असल्यामुळें, मी मुलांचा फार मोठा पक्षपाती आहे. आजचीं मुलें म्हणजेच उद्यांच्या समाजाचे घटक होत. म्हणून माझा असाच आग्रह आहे कीं कोणत्याही अर्भकाला जगात जन्म घेण्याचा हक्क आहे आणि वस्तुतः ' बेकायदेशीर ' अशत्व असे कांहीं असूंच शकत नाहीं. अविवाहितपणीं च माता झालेल्या स्त्रीबद्दलही, तिनें जीवनाच्या पवित्र कार्याला मूर्तरूप दिल्याबद्दल विवाहित मातेइतकीच आदरबुद्धि बाळगण्यांत यावी, व मान देण्यांत यावा, अशी माझी समाजाजवळ हक्काची मागणी आहे ! +

ह्यास्तव अ-जात अर्भकांना त्यांच्या जन्मापूर्वीच मृत्यु घडूं नये आणि जन्मा-नंतर त्यांच्यावर कलंक राहूं नये म्हणून, आज समाजांत अविवाहित मातेबद्दल जी तिरस्काराची भावना आहे ती नष्ट होणें अवश्य आहे. असें झालें म्हणजे तरी अशा माता, लोक आपल्याकडे बोटें दाखवून तिरस्कारपूर्वक " पापिणी ! दुराचारिणी ! व्यभिचारिणी ! " असे उद्गार काढणार नाहींत अशी खात्री पटून तरी स्त्रिया भ्रूणहत्येच्या पापापासून परावृत्त होतील. अशा स्त्रियांना शिक्षाच द्यावयाची जर समाजाची इच्छा असेल, तर, त्यांना निराश

---

* ' हरसेल्फ ' पान १६०

+ ' धि रिव्होल्ट ऑफ 'मदर' यूथ ' पान १५०

करून गुप्त गोष्टींचा अवलंब करून प्रत्यक्ष खुनी बनण्यास प्रवृत्त करणाऱ्या ह्या अवहेलने ऐवजीं, त्यांचें पाऊल वांकडें पडल्यानंतर त्यांना सुशिक्षण देऊन पवित्रतर आचरण करण्यास पात्र बनविण्यास अनुकूल होईल, अशी कांहीं तरी शिक्षा देण्याची समाजानें योजना करावी ! *

गर्भ राहिलेल्या अविवाहित तरुणींचा पहिला उपाय ह्मणजे गर्भपात करणें हा असतो. स्त्रीहृदयाला कोणत्याही परिस्थितींत अत्यंत प्रियच वाटणाऱ्या अश्या त्या गोजिरवाण्या छबकड्याचें संगोपन करून समाजाचा छळ मुकाट्यानें सहन करण्याइतकें धैर्य क्वचितच स्त्रियांच्या अंगीं असतें. हा छळ सोसणें ह्मणजे एक भयंकर दिव्यच असते ! परंतु त्या गोजिरवाण्या चिमण्या बाळासाठीं स्त्री कोणत्या दिव्यांतून पार पडावयास मान्यता देणार नाहीं ? भ्रूणहत्येच्या विचाराला बळी न पडतां आपल्या अपत्याचें संगोपन करावयास तयार होणाऱ्या कांहीं तरी स्त्रिया निघतातच, ही आनंदाची गोष्ट ह्मटली पाहिजे. परंतु अश्या स्त्रियांचें प्रमाण दुसऱ्या प्रकारच्या स्त्रियांपेक्षां फार कमी असतें. ह्याबद्दल सात्विक संतापानें उद्विग्न होऊन जज्ज लिंडसे ह्मणतात:—

" अजात शिशूंच्या हक्कांकडे दुर्लक्ष करून अविवाहित दांपत्यजीवन ह्मणजे अनीतीला संमती देणें आहे असें जे मोठ्या दिमाखाचा आव आणून बोलतात, ते आपल्या बोलण्याचा विचार करीत नसतात हेंच खरें. जर ह्याला ' अनीतीला संमाते देणें ' असें ह्मणावयाचें, तर मग, दरवर्षीं ह्या देशांत घडणाऱ्या १५ लक्ष भ्रूणहत्या व हजारों ' बेकायदेशीर ' अपत्यांच्या बालहत्यांना काय नांव द्यावयाचें ? एकीकडे अनीतीला संमति देणें आणि दुसरीकडे समाजाला भ्यायलेल्या गरीब अबलांकडून घडणाऱ्या भ्रूणहत्या व बालहत्या, त्यांपैकीं कोणतीतरी एक गोष्ट जर पत्करायचीच असेल तर ती ' ह्या अनीतीचा स्वीकार करणें ' हीच असावी असें मी ह्मणतों; कारण ह्या संकटाचें स्वरूप निःसंशय कमी भीषण आहे. नीतीच्या गप्पा सांगणाऱ्या ह्याताऱ्या आजीबाईंना हें आवडणार नाहीं हें खरें. पण माझी खात्री आहे कीं तें परमेश्वराला आवडेल, आणि

---

* 'धि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ ' पान २२०.

दयानें जन्माला घातलेल्या व खून झालेल्या त्याच्या लक्षावधि अर्भकांनाहि तें आवडेल ! "

भ्रूणहत्येमुळें पापाचें फळ दृष्टीवेगळे करण्यांत कदाचित् यश मिळत असेल परंतु त्यामुळें स्त्रीमात्र आपलें शरीरस्वास्थ कायमचें गमावून बसते ह्यांत शंका नाहीं. आपल्या अ-जात किंवा सद्यः-जात शिशूचा प्राण घेणाऱ्या मातेच्या शिरावर परमेश्वराचा आणि सृष्टीचा शाप कोसळतो. भ्रूणहत्येमुळें, नष्ट झालेल्या भाविऱ्याचें दिखाऊ स्वरूप कदाचित् टिकून रहात असेल, आणि बालहत्या करून स्त्रीला आपल्या कौटुंबिक अडचणींतून कदाचित स्वतःची सुटका करून घेतां येत असेल, परंतु ह्या कृत्यांबद्दल सृष्टिमाता शिक्षा केल्याखेरीज सोडीत नाहीं ! त्या मुलाबरोबरच मातेचें स्त्रीत्व, मातेचे स्वास्थ्य आणि मातेचें हृदय हींही नष्टच होतात. ह्यानंतरची विवेकशून्य भग्नहृदय हताश स्त्री बहुधा वेश्याव्यवसाय अथवा आत्महत्या यापैकीं एका मार्गाकडे वेगानें धांव घेते.

अविवाहित दांपत्यजीवनांत घडणारा 'गर्भधारणा' हा एक अपघात आहे. उपदंशादि रोग हा दुसरा अपघात म्हणतां येईल. जज लिंडसेचें विधान जर खरें असेल, तर दरवर्षीं येथें सरासरी १५ लक्ष जीवांचा बळी देण्यांत येतो. जर वीसांपैकीं एकाच बाबतींत गर्भधारणा होते असें गृहीत धरलें तर जवळ जवळ पाऊणकोट अविवाहित दांपत्यें युनायटेड स्टेटमध्यें रहातात असें म्हणतां येईल. युनायटेड स्टेटसमध्यें दररोज पन्नास लक्ष वेश्यासंभोग घडतात; शेंकडा ९८ वेश्या उपदंशादि रोगांनीं पीडित असतात, आणि बहुतेक गांवांतून शेंकडा ९० माणसेंही ह्याच रोगांनीं आक्रांत असतात, हें सर्व गृहीत धरल्यानंतर, ह्या रोगाचें विष सर्वत्र पसरणें किती सहज आहे तें तेव्हांच ध्यानांत येईल. हे रोग आजच्या अमेरिकेच्या तरुण पिढींत इतके सार्वत्रिक झाले आहेत, कीं त्यांचा सर्व लोक अगदीं हंसत हंसत उल्लेख करतात ! ह्या रोगाला तेथें 'सर्दी' (cold) असें नांव देण्यांत येतें ! संतति

---

* धि रिव्होल्ट ऑफ माडर्न यूथ. पान २१०.

प्रतिबंधक उपाय निरुपयोगी ठरण्याचा जर शेंकडा पांच संभव असेल, तर उपदंशादि रोग जडण्याची शेंकडा नव्वदपणें अगदीं खात्रीच असते !

अमेरिकेचा स्वयंप्रतिष्ठित नीतिपुतळा या वस्तुस्थितीला कोणत्या पुराव्यानें खोडून काढणार ?

प्रकरण ११ वें.

देवाचे दारीं !

एकदां एक अमेरिकन मुलगी माझ्याशीं बोलतां बोलतां ह्मणाली, " खरें सांगायचें ह्मणजे, आपलें लग्न व्हावें अशी प्रत्येकीचीच इच्छा असते." हें नुसत्या अमेरिकन मुलीच्याच नव्हें, तर जगांतील कोणत्याही मुलीच्याबाबतींत खरें असावें, अशी माझी समजूत आहे. सर्व जगभर पाहिलें तरी विवाह ह्मणजे तारुण्यांतील सर्व आशा-स्वप्नांची सफलता असेंच तरुणांनाही वाटत असतें. ह्या विश्वव्यापी नियमाला अमेरिकन तरुणही अपवाद नसावा; आणि तरीही येथील लग्नाचें प्रमाण सारखें कमी कमी होत आहे, अशी अमेरिकेंत ओरड आहे. जज्ज लिंडसे कांहींहीं ह्मणोत, परंतु विवाह ही संस्था कांहीं अयशस्वी ठरलेली नाहीं. जुन्या रीतिप्रमाणें झालेल्या विवाहांतून अद्यापिही यश व आनंद ह्याचीच निश्चिती होते;—हा आनंद ह्या अविवाहित दांपत्य जीवनाच्या ऊर्फ व्यभिचाराच्या आनंदाच्या स्वरूपाचा मात्र नसतो, हें खरें ! युनायटेड स्टेट्समध्यें विवाह जर यशस्वी होत नसतील तर त्यांचीं कारणें लोकांच्या वृत्तींतच सांपडतील ! केवळ विषयवासनांची पूर्ति आणि विवाहांतील उच्च तत्वें परस्पराविरोधी आहेत. ध्येयवादित्व, एकमेकांसाठीं करावें लागणारे थोडे फार स्वार्थत्याग, आणि कांहीं अंशीं अत्यंत कडक अशी शिस्त ह्या तीन गोष्टींवाचून कोणत्याही कुटुंबाचा उत्कर्ष होणेंच शक्य नाहीं. जेव्हां लोक शिस्तीच्या व परस्परानुकूल स्वार्थत्यागाच्या विरुद्ध बंडाचें निशाण उभारून स्वातंत्र्याबद्दल आणि समान

हक्कांबद्दल ओरड सुरूं करतात, त्यावेळीं विवाहबंधनें शिथिल करण्याचीं हीं चळवळ ह्मणजे पुरुषांनीं व स्त्रियांनीं शिस्तीपासून व जबाबदारीपासून आपली मुक्तता करून घेण्याचे प्रयत्न आरंभले आहेत, एवढाच अर्थ त्याचा समजावयाचा. अविवाहित जीवनाविषयींच्या कल्पनांचा प्रसार एकसारखा होत असून, आणे दर वर्षीं घटस्फोटांचें प्रमाण एकसारखें वाढत असूनही अमेरिकन मुली थोड्या काळपर्यंतच टिकणाऱ्या कां होईना, पण विवाहांत स्वतःला अडकवून घेण्यासाठीं धडपडत असतातच, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे, अविवाहित मुलीपेक्षां विवाहित मुलगीच अधिक फायद्यांत राहते! अगदीं कडक शिस्तीसाठीं नांवाजलेल्या कुटुंबांत सुद्धां 'अपघात' टळूं शकत नाहीं. परंतु विवाहित मुलीच्या बाबतींत हे असे 'अपघात'—नवऱ्याविरुद्ध तसाच कांहीं खात्रीलायक पुरावा नसल्यास बहुधा काल्पनिक असण्याचाच संभव असतो. अविवाहित मुलीचें संरक्षण होण्याचा असा कोणताच उपाय नसतो. पुन्हां, वृद्ध-कुमारी राहण्यापेक्षां विभक्त स्त्री अथवा एखाद्याची विधवा ह्मणून राहणें हें अधिक शिष्टसंमत समजलें जातें. गिऱ्हाईक नसल्यामुळें दुकानांतच वर्षानुवर्षे धूळ खात पडलेल्या मालाप्रमाणें आलीही अवस्था होणें हें कोणाही मुलीला केव्हांहीं आवडणें शक्य नाहीं. एकदा कोणाच्या तरी नांवचा गळ्यांत मंगळसूत्र अडकावण्याची परवानगी लाधली ह्मणजे झालें; मग त्या मंगळसूत्राबरोबरच मानेभोंवतीं चोवीस तास दुसऱ्या वल्लभांच्या बाहुपाशांचें विळखे पडत असले, तरी त्याला कोणी हरकत घेऊं शकत नाहीं. ह्या फायद्यासाठीं अमेरिकन मुलगी कोणाच्या तरी नांवाचा आश्रय मिळण्याची संधि सहसा हातची जाऊं द्यायची नाहीं. एखाद्या होतकरू तरुणानें मागणी घातली, तर उत्तमच, नाहीं पेक्षां, युक्तीप्रयुक्तीनें त्याला कसें तरी जाळ्यांत अडकवून—किंवा वेळप्रसंगीं त्याच्यावर बालंट रचूनही—त्याला लग्न लावण्यास भाग पाडण्याचे कैक उपाय आहेत!

शिकेगोच्या एका धनाढ्य सावकाराचा मुलगा माझा मित्र आहे. त्याचें लग्न झालेलें असून त्याची पत्नी त्याच्यापेक्षां वयानें वडील, आणि त्याच्यापेक्षां कमी सामाजिक दर्ज्याची अशी एक स्त्री आहे. ह्या बाबतींत सामाजिक चौकशी

करण्याची मला इच्छा झाली. त्यावेळीं मला असें कळलें कीं, जेव्हां यांचें लग्न झालें तेव्हां ही स्त्री ४२ वर्षांची असून अविवाहितच होती. त्या उभयतांची भेट ब्रॉडवे (हॉटेल) मध्यें झाली, आणि त्यानंतर एकदां त्यानें तिला आपल्या बरोबर मोटारींत फिरायला नेलें व ते पार्कमध्यें हिंडायलाही गेले. थोड्याच दिवसांनीं, तिनें त्याला असें कळाविलें कीं ती आतां माता होण्याच्या मार्गास लागली आहे ! ह्या कचाट्यांतून सुटण्याचें त्यानें पुष्कळ प्रयत्न करून पाहिले; परंतु भावी अपत्याच्या पित्याच्या नांवाचा बभ्रा करण्याची दहशत घालतांच, स्वारी लग्नाला कबूल झाली. लवकरच ह्यांचा विवाह झाला. वर्तमान-पत्रांनींही ह्या विषम विवाहाचीं 'प्रीतिविवाह' म्हणून भडक वर्णनें केलीं. "एका २३ वर्षें वयाच्या सावकार-पुत्राचा ४२ वर्षांच्या दुय्यम दर्जाच्या शिंपणीशीं विवाह ! – मोटारींतील सहलींच्या कयेचा शेवटचा हप्ता ! " इ. लग्नानंतर बरेच दिवस गेले, आणि तरीही आपल्यांला पुत्ररत्न प्राप्ते होत नाहीं, हें पाहून विद्वान्या माझ्या मित्राला आश्चर्य वाटूं लागलें. पण करतो काय ? ह्या मुद्यावर, झालेलें लग्न कांहीं रद्द करतां येणें शक्य नव्हतें !

युनायटेड स्टेट्समध्यें अशा प्रकारचे विवाह कित्तीतरी होतात ! पुष्कळ वर्षेपर्यंत मनसोक्त 'मौजेच्या चार घटकांचा' उपभोग घेतल्यानंतर, ज्यावेळीं दिवसभर उनाडकी केलेल्या खबुतरांप्रमाणें, आपल्या सोबतिणी व सोबती एकीं मागुन एक विवाहरूपी खुराड्याचा आश्रय धुंडाळताहेत असें मुलीच्या लक्षांत येतें, त्यावेळीं तीहि आपल्या जाळ्यांत एखाद्या विवाहोत्सुक तरुणाला पकडते ! पुढच्या एका प्रकरणांत धंदेवाईक वेश्या साधारणपणें सहा वर्षेपर्यंत धंद्यांत असते हें मी दाखविणर आहें. विवाह करूं ह्या आशेनें सुरूं केलेलें दांपत्यजीवन आणि उघडउघड धंदा ह्यांची सुरवात वं शेवट हीं बरोबरच होतात, असें आपणास दिसून येईल. त्यानंतर चवथ्यांत आल्यावर पुढें जाऊनें लग्न लावायचें, दोन वर्षें वैवाहिक जीवनांत काढायचीं, कीं, त्यानंतर सभ्यतेचा हा बुरखा झुगारून देऊन घटस्फोटाचा दावा करायचा किंवा पतीच्या संमतीनें व्यभिचार व जारकर्मास सुरवात करायची !

फक्त परिणामांवरूनच पहावयाचें तर, येथील थोड्या विवाहांच्या मुळाशीं प्रीति आढळेल. प्रीतिशास्त्राचा चांगलाच शोधक बुद्धीनें अभ्यास केलेल्या एकाच्या मतें स्त्रियांमध्यें ह्या भावनेचा परमोत्कर्ष पुरुषांपेक्षां अगोदर ह्मणजे कमी वयांत होतो.* वयाच्या चौदाव्या वर्षापासून प्रीतीची कमान फारच झपाट्यानें चढत जाते. वयाच्या १८ व्या वर्षीं तिचा परमोत्कर्ष होतो, आणि ह्या भावनेची सर्वांत जोराची धडाडी वयाच्या १६ वर्षापासून २० वर्षापर्यंत अनुभवास येते. पुरुषांच्या बाबतींत ह्या पराकोटीस प्रीतिभावना पोहोंचण्याचें वय ह्मणजे २१ व २२ च्या दरम्यान असतें. ह्यावरून पाहतां असें दिसून येतें कीं, स्त्री व पुरुष ह्यांमधील पराकाष्टेच्या प्रीतिभावनाप्रवणतेच्या वयांत साधारणतः तीन वर्षांचें अंतर असतें. स्त्रिया पुरुषांपेक्षां तीन वर्षें अगोदरच प्रीतिभावनेचा परमोत्कर्ष अनुभवतात. स्त्रियांच्या व पुरुषांच्या यौवनप्राप्तीच्या बाबतींतही असाच तीन वर्षांचा फरक असतो, हें आपणास ठाउकच आहे. कायद्याच्या संमतीनेंही स्त्री १८ वर्षांची झाल्यानंतर व पुरुष २१ वर्षांचा झाल्यानंतर 'वयांत आला' असें ठरतें. *

पराकोटीला पोहोंचल्यानंतर, पुरुषांच्या प्रीतिभावनेंतील उतारही चढावा-प्रमाणेंच धिम्मेपणानें व हळूहळू होत असतो. ज्यावेळीं विलासाची व सौंदर्याची परिसीमा ओलांडली गेलेली असते व ज्यावेळीं शारीरिक संयोगेच्छा व हृदयस्थ प्रेमभावना ह्या दोहोंचाही कढ ओसरूं लागतो, त्याचवेळीं ही अमेरिकन कुमारिका, मातृपदाच्या योगानें अनायासेंच हक्कानें मिळणाऱ्या आश्रयाच्या लाभासाठीं, लग्नाला तयार असल्याचें कबूल करते ! ह्यामुळें, लग्नें बहुधा निव्वळ सोईसाठीं ह्मणूनच करण्यांत येतात. एखाद्या संपत्तीच्या वारसा हक्क मिळविणें, समाजांत दर्जा प्राप्त करून घेणें किंवा एक आपली नुसती 'गंमत' ह्मणूनच पुष्कळ मुली लग्न करावयास अनुकूल मत देतात. हे विवाह ह्मणजे खरे नसून विवाहविधीच्या तत्त्वांची थट्टा उडविणारे असेच असतात. ख्रिश्चिअन विवाह-प्रसंगीं उपयोगांत आणलें जाणारे वचन, "परमेश्वरानें ज्यांना एकत्र आणलें, यांच्यामध्यें कोणीही मनुष्य बिघाड न करो !" ह्या लग्नांच्या बाबतींत केव्हांहीं

---

* हार्पर्स मॅगॅझीन आगस्ट १९२८

खरें नसतें. कारण तसें कबूल करणें म्हणजे परमेश्वरोच्या सद्धेतूची विटंबनाच करणें होय. निव्वळ लोभ मुळें किंवा पाशवी विषयसुखासाठीं एकत्र रहावयास आलेल्या दोन व्यक्तींच्या विवाहसंबंधाला परमेश्वर केव्हांहीं अनुमति देणें शक्य नाहीं. +

आजकाल लग्नाला प्रेरक अमें दुसरेंहि एक कारण तरुणींना मिळालें आहे. ह्याच प्रेरणेच्या आधारावर " फेय बॉल्डविन " ह्या लेखिकेनें एका स्पष्ट व सुंदर अशा कथानकाची उभारणी केली आहे.* ह्या कथानकाचा विषय म्हणजे विभक्त स्त्रीनें नवऱ्याप सून मिळावेलेला अन्नवस्त्राचा हक्क हा आहे. गोष्ट मोठी वाचण्यासारखी आहे.

" आजकाळ सुलभ विवाहाबरोबरच, सुलभ घटस्फोटही आपल्या समाजांत रूढ झालेला आहे. आजकाल आपल्या समाजांत माणसांचा एक नवीनच वर्ग निर्माण झाला आहे. तो म्हणजे, अन्नवस्त्र पेगारे. अन्नवस्त्र मिळादेण्याची सोय पाहणारे, व अन्नवस्त्राची सोय करून द्या अशी विनवणी करणारे, ह्यांचा होय. "

ज्यावेळीं विवाहित व्यक्तींमधून एकमेकांविषयींची प्रीति नष्ट होते, त्या वेळींच त्या विवाहाचा विच्छेद करावा हे सांगणें अगदीं साध्या व सरळ सत्याला धरून आहे. परंतु आतांशा पुष्कळशा माणसांचे—ह्यांत न्यायाधीशांचा भरणा विशेष आहे—असें मत बनत चाललें आहे, कीं आजकालच्या विवाहाच्या बाबतींत ते जुळत असतांना किंवा मोडतांना प्रेमाला फारच थोडा अवकाश देण्यांत येतो. पुष्कळ वेळां स्त्रिया ह्याच जाणीवेनें विवाहबद्ध होतांना आढळतात कीं ज्या पुरुषाशीं त्यांनीं संबंध स्थापन केला आहे तो पुढें पसंतीस उतरला तर ठीकच आहे, नाहींतर त्याला सोडून दुसरीकडे सोय पहावी आणि त्याला सोडून त्याच्याकडून हक्कानें पोटगी घ्यावी, की झालें ! आज ह्या देशांत हजारों स्त्रिया अशा आहेत कीं त्यांचे पालन

+ हार्पर्स मॅगझीन. जुलै १९२८.

* " एथिनी "

एके काळीं त्यांचा पति असलेल्या अशा पुरुषांकडूनच करण्यांत येत असतं. त्या परावलंबी स्त्रिया असतात,.....पण त्यांच्यावर कोणाचीही सत्ता नसते ! *

आज जगांतील बहुतेक देशाप्रमाणें एके काळीं अमेरिकेंतही अशी समजूत रूढ होती कीं, वैवाहिक जीवनांतील प्रमुख अशी जबाबदारी म्हणजे प्रजोत्पादन ही होय. येथेंही पुरुषत्वाचा व स्त्रीत्वाचा पुत्रप्राप्ति हा परमोत्कर्ष समजण्यांत येत असे; अगि अजूनही पुष्कळशा समाजामध्यें, जेथें जेथें म्हणून मातृपदाबद्दल आदर वसत असतो, व मातृत्व हें गौरवपूर्ण वाटतें, तेथें तेथें गर्भवती स्त्रिया एका अत्यंत आनंददायक अशा लाभाची वाट पहात असलेल्या अशाच आढळतात. कदाचित् विवाहपूर्व दांपत्यजीवनासाठीं कांहीं कारणें देतां येणें शक्य आहे, असें जरी गृहीत धरलें, तरी, मातृपदाची अवहेलना करून तें टाळण्यासाठीं मात्र कोणतेंच कारण पुढें आणतां येणें अशक्य आहे. आजच्या फाजील 'सुधारलेल्या' स्त्रिया-पुरुषांनें ह्यांचा वर्ग एकसारखा वाढतच आहे—मातृपदाची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करीत असतात. पुरुषांच्या बरोबरीनें हक्काची मागणी न्याय्य आहे, हे एकदां गृहीत धरलें कीं मग हा प्रकार त्याचा एक अवश्यंभावी परिणाम म्हणून ओघानें आलाच ! पुरुषांनां जर गर्भधारणेचे व प्रसूतीचे कष्ट सहन करावे लागत नाहींत, तर मग स्त्रियांनां तरी ते काय म्हणून सहन करावे लागावे ! हाच रोखठोक सवाल आहे ! असे निष्कर्ष काढणें मूर्खपणाचें आहे हें खरें आहे. परंतु समान हक्काचें तत्व एकदां मान्य केलें कीं मग त्यांतून सुटका नाहीं, हें ही तितकेंच सत्यास धरून आहे.

अमेरिका म्हणजे सुधारणेंत फारच पुढें गेलेलें राष्ट्र ! त्यामुळें येथील विवाहित जीवन जगांतील इतर भागांतील विवाहित जीवनापेक्षां निराळें असणारच ! यूनायटेड स्टेट्स येथील लग्नाचें सत्य स्वरूप त्याच्या तात्विक स्वरूपापेक्षां अगदींच निराळें असतें. जरी कोर्टातून घटस्फोट मिळविला नाहीं, तर वैवाहित जीवन व्यतीत करावयास हरकत नाहीं, परंतु निराळे पलंग, गर्भप्रतिबंधक आणि स्वास्थसंरक्षक असे इतर इलाज मात्र झालेच पाहिजेत.

---

* ह्या विषयाच्या पूर्ण विवेचनासाठीं पुढें १२ वें प्रकरण वाचा.

विवाह ही समाजधारणेकरतां अवश्य व संस्कारांनीं पवित्र बनाविलेली भागीदारी होय असेंहि समजतात. किंबेक समाजांत विवाह म्हणजे कधींच तुटूं न शकणारें असें बंधन आहे, असा समज आहे. खिस्ती धर्माप्रमाणें ही विवाह हें एक पवित्र बंधन आहे. " ज्यांनां परमेश्वरानें एकत्र आणले, त्यांत विच्छेद उत्पन्न करण्याचें पाप कोणीही मनुष्य न करो ! " परंतु तरीही हें पाप माणसें करतातच, आणि येथें परमेश्वर म्हणजे एक पुराण कथा असेंच समजतात. अमेरिकेमध्यें, विवाह म्हणजे अभेद्य चिरस्थायी असें बंधन आहे, तो परस्परानुरक्तीचा परमोत्कर्ष आहे, तो प्रजोत्पत्ती करून नागरिकत्वाचे महत्त्वाचे हक्क बजावण्याचें साधन आहे, पितृपदाचें महत्वपूर्ण पद प्राप्त करून घेण्याची ती एक पायरी आहे, असें मुळीच मानण्यांत येत नाहीं. निरनिराळ्या समाजांत विवाहसंस्थेचीं निरनिराळीं स्वरूपें आढळतात. हिंदुस्थानांत हिंदुधर्मशास्त्रानें अनेक बायकांशीं एकाच पुरुषानें लग्न करावें अशी सवलत देऊन ठेवलेली आहे. तरीही, प्रजोत्पादनाचें असामर्थ्य किंवा असेंच कांहीं तरी सबळ कारण असल्याखेरीज अनेक भार्या केल्याचीं उदाहरणें येथें थोडींच आढळतात. वेश्याचाराला आळा घालण्यासाठीं मुसलमानी धर्मानेंही अशीच सवलत देऊन ठेवली आहे. त्या लोकांच्या मतें, मनुष्य म्हणजे निसर्गतः बहुभार्योपयोगी प्राणी आहे. तेव्हां त्यानें बाजारबसवीच्या दारीं जाऊन तत्सन्य सर्व दुष्परिणामांचें भक्ष्य बनण्याऐवजीं, प्रत्येकीवर सारखी प्रीति ठेवण्याची योग्यता असल्यास वाटेल तेवढ्या स्त्रियांशीं निकाह लावावा, अशी परवानगी त्यांनीं देऊन ठेविली आहे. कांहीं कांहीं इतक्याच प्राचीन समाजांमध्यें तात्पुरत्या विवाहांनां—अगदीं एक तासभरच राहण्याइतक्या तात्पुरत्या विवाहांनाहीं संमति असलेली आढळून येते. ह्यामुळें बेकायदेशीर मुलांपासून समाज बचावतो. प्रत्येक मूल विवाहित दंपत्यापासून झालेलें असल्यामुळें प्रत्येक मुलाला समाजांतील सन्मान्य घटक म्हणून राहतां येऊन प्रत्येक मुलीलाही आपल्या वयांत प्रजोत्पत्तीस हातभार लावतां येतो. अशा समाजांत अनाथाश्रमांची, भ्रूणहत्येची किंवा आत्महत्येचीं जरूरीच उरत नाहीं. ज्यांनां ह्या सुधारलेल्या राष्ट्राकडून ' रानटी ' असें विशेषण मिळतें त्या समाजांत हा बिकट प्रश्न,

बहुभार्यत्वाची, बहुपतित्वाची किंवा तात्पुरत्या विवाहाची सवलत देऊन सुलभ केलेला आढळतो. आणि अशाच समाजांत विवाहसंबंध चिरस्थायी व आनंदजनक झालेले आढळतात. गृहस्थाश्रम हा तेथें आदर्श बनतो; एवढेंच नव्हें तर त्याचें रक्षण व वर्धन करण्यासाठीं त्या समाजांतील प्रत्येक पुत्र व कन्या सर्वस्वानें झटत असतात !

समान हक्काचें हें भूत अमेरिकेंतील विवाहसंस्थेचा व कौटुंबिक सुखाचा कसा सर्वनाश करीत आहे, तें मी दाखविलें आहेच. साऱ्या रोजगारांत सुद्धां अंगमेहेनत करणारा आणि आंतील व्यवस्था पाहणारा, असे भागीदार असतातच. विवाह ही एक प्रकारें भागीदारीच आहे. ह्या धंद्यांत यश मिळवायचें असेल तर पतीनें अंगमेहेनत केली पाहिजे व पत्नीनें घर संभाळलें पाहिजे. हें कदाचित पुराणमत असेल; पण लग्न झटलें कीं मग तज्जन्य इतर गोष्टीही आल्याच. स्त्रीनें जर आपला गृहिणीधर्म सोडला तर मग तें घर ' गृह ' ह्या नांवाला कसें पात्र होणार ? नुसत्या पाशवी लालसेच्या साठींच नवरा, अशी जेथें पत्नीबद्दल स्त्रीची भावना, तेथें आपल्या लालसांच्या आवश्यकतेप्रमाणें ह्या पूर्तीच्या साधनांतही वळे येईल तसा बदल करावा, हें ओघानें आलेच ! आणि जेथें जगांतील इतर कोणत्याही देशापेक्षां स्त्रीचें आर्थिक स्वायत्ततेचें प्रमाण अधिक आहे, अशा अमेरिकेंत स्त्रीनें घटकोघटकीं आपले पती बदलण्याचा क्रम सुरू केला, तर त्यांत आश्चर्य कोणतें ?

प्रकरण १२ वें.

विवाह वृक्षाचीं फळें.

सर्व प्राणिमात्रांचें ठायीं क्षुधा आणि मैथुन हे दोन अत्यंत प्रबल विकार निसर्गदत्त गरजांप्रमाणेंच, कामेच्छेच्या प्रबळ आकर्षणावरही जर योग्य नियंत्रण ठेवलें, तर ह्या शक्तीचा उपयोगही आपलें जीवन अधिक सुंदर व सुखपूर्ण करण्याकडे सहज करतां येण शक्य आहे. भरत्या ओघानें वाहवल्यास, किंवा योग्यतेच्या दडपणाच्या अभावीं चांगल्या वांगल्या शक्ति देखील अधःपातळा व सर्वस्वनाशाला कारणीभूत होतात. कामानलाचेंही, योग्य नियंत्रण असलें व योग्य वळण मिळालें तर, समाजाला बळकटी आणून त्याला कार्यक्षम करण्याचें कामीं उपयोग होऊं शकतो; परंतु तसें न झाल्यास त्याच्या अनियंत्रित अनलज्वालेंत सर्व सामाजिक सौख्याची जळून राख होण्यास फारसा विलंब लागत नाहीं.

मनुष्याच्या कर्तबगारीनें जीं जीं अचाट कृत्यें जगांत केलीं, त्यांत अमेरिकेनें बराचसा प्रमुख भाग घेतला आहे. निसर्गाच्या प्रचंड शक्तींचा मनुष्याच्या सेवेसाठीं उपयोग करून घेणें, गगनचुंबी प्रचंड इमारतींची उभारणी करणें, विराट अमेरिका खंडाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाला त्वरेनें जातां यावें, ह्यासाठीं व उद्योगधंद्यासाठीं साधनभूत होणाऱ्या यंत्रांची निर्मिति करण्यासाठीं अवजारें बनविण्याचें प्रचंड कारखाने काढणें, इत्यादि गोष्टींचें श्रेय अमेरिकेकडे आहे. परंतु ह्या बरोबरच शाम काका दुसऱ्या एका पापाचे धनी होऊन बसले आहेत. त्यांनीं आपल्या कामचेष्टेला अनियंत्रितपणें सैराट सोडली असल्याकारणानें, ही राक्षसीण सर्व सामाजिक सुखाचा नाश करावयास आज उद्युक्त झालेली आहे.

मैथुनोपभोगास येथें किती अल्प वयांत सुरुवात होते, असे प्रसंग कसे खटपटीनें जुळवून आणण्यांत येतात, ह्या प्रसंगांचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे, आणि आज ह्या समाजांत विवाहसंस्थेचें स्वरूप कसें आहे ह्या गोष्टींचें दिग्दर्शन ह्यापूर्वी करण्यांत आलें आहेच. ह्या प्रकरणांत, ह्या विवाहवृक्षाचीं फळें गोळा करून, त्यांचा मासला वाचकांपुढें सादर करण्याची इच्छा आहे.

हीं फळें चार प्रकारचीं असतात; पृथग्व्यवहार, घटस्फोट, उपदंशादि रोग आणि वांझपणा.

ह्यापैकीं पहिल्या ह्मणजे पृथग्व्यवहाराच्या (Separation) बाबतींत न्यू यार्कच्या वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश सेल्हा ह्मणतात:—

नवऱ्यानें बायकोपासून वेगळे राहूं लागणें, ह्याचा शेवट अनीतीच्यां आचरणांत होतो. असे पृथग्व्यवहार ह्मणजे राष्ट्राला लागलेली कीड होय. दहा वर्षांपूर्वी एकाएकीं अशा पृथग्व्यवहारांचा आंकडा एकदम फुगला, आणि त्या नंतर दरवर्षी तो एकसारखा वाढतच आहे. ह्यामुळें दोन्ही पक्षांपैकीं एकालाही कशाचाच लाभ होत नाहीं; एवढेंच नव्हें, तर बहुतेक प्रसंगीं ते अनावश्यकही असतात. अशा प्रकारें बायकोनें नवऱ्यापासून पृथक् राहण्यासाठीं 'ह्याच्या सहवासांत राहणें धोक्याचें आहे,' असें सिद्ध करावें लागतें; आणि सिद्ध केलेल्या पांचशें प्रकरणांपैकीं एखादा पुरुष तरी, ज्याच्या बरोबर राहणें 'धोक्याचें' आहे अशा भयंकर स्वरूपाचा असत असेल कीं काय, ह्याबद्दल मला शंकाच आहे. उघड उघड सांगायचें ह्मणजे, नवऱ्यापासून विलग राहणें ह्मणजे त्याच्यापासून पोटगीची रक्कम उपटून स्वैरपणें राहण्याची संधि मिळविणें आहे, असाच त्याचा अर्थ आहे. एखाद्या पुरुषाच्या घरांत राहून, त्याचा संसार व्यवस्थितपणें चालवून, त्याच्या जेवणाखाण्याची सोय लावून, त्याच्या साहाय्यानें प्रजोत्पत्ती करून त्याचा जीवनक्रम यशस्वी करण्यास सहाय्यक होण्याऐवजीं, त्याच्यापासून द्रव्य उकळून त्या बळावर आपली स्वतःची चैन उपभोगीत

राहणाऱ्या स्वार्थलंपट धनलोभी स्त्रीचा हा खटाटोप आहे ! त्यांत जर हीं बया खुनशीही असली, तर बिचाऱ्या नवरोबाचें सुख संपलेंच ! ती मुद्दाम खटपट करून त्याला अश्या कांहीं पेंचांत पकडतें, कीं त्यामुळें हिच्या पासून वेगळें झाल्यानंतर देखील, दुसरें लग्न करून सुखानें संसार करण्याची संधिही ही त्याला मिळूं देत नाहीं. " *

एका अमेरिकन मासिकानें, पृथग्व्यवहाराच्या प्रश्नांशीं फार निकट संबंध असलेल्या ह्या पोटगीच्या नेमणुकीच्या प्रश्नाचा खोल अभ्यास करून त्याबद्दल खुलासा केलेला आहे:—

" कांहीं बाबतींत अन्नवस्त्राचे दावे अगदीं सकारण व योग्य असे असतात. अश्या बाबींच्या विरुद्ध कोणालाही कांहीं ह्मणतां येणार नाहीं. एखाद्या स्त्रीला लहान लहान मुलें असलीं, अथवा ती वयस्क असून आर्थिक दृष्ट्या तिची स्थिती फार वाईट असली, किंवा लग्न झाल्यानंतर ती एखाद्या वर्षांनुवर्षें नाहींश्या न होणाऱ्या रोगानें पछाडलेली असली, —आणि अश्या अवस्थेत तिचें तिच्या नवऱ्याशीं एकत्र नांदणें असंभव असलें, तर तिला आपला संभाळ करण्यास योग्य ती रक्कम नवऱ्यापासून घेण्याचा हक्कच आहे.

" अश्या स्त्रियांबद्दल आमच्या मनांत पूर्ण सहानुभूति व आदर वसत आहे !

" परंतु, ह्या बरोबरच, अशींही अन्नवस्त्राचा खर्च मिळविल्याची अनेक उदाहरणें आहेत, कीं ज्या बाबतींत हा खर्च मिळण्याचा स्त्रीला कोणताच अधिकार नव्हता. अशीं उदाहरणें ह्मणजे, असा हक्क मिळवून पृथग्व्यवहाराचा निकाल मिळवून त्या मार्गानें स्वेच्छेप्रमाणें राहण्याला मार्ग मोकळा करून घेणाऱ्या धनलोभी, कावेबाज, निपुत्रिक अश्या स्त्रीनें आपल्या सज्जन पतीवर उगाविलेला सूड होय ! हा हक्क मिळविला ह्मणजे—

---

* धि डिलेनिएटर. सप्टेंबर १९२८

तिला एक ठरीव पगार सुरूं होतो, आणि त्याबद्दल तिच्यावर जबाबदारी मात्र कोणतीच रहात नाहीं ! आणि त्याला ? त्याच्या नशिबीं मात्र महिन्याच्या शेवटीं ठरीव रक्कम देणें, एकांतवास, आणि दुसरें लग्न करण्यास कायदेशीर आडकाठी हेंच लिहिलेलें असतें ! एखाद्या दुष्ट स्त्रीचे हातीं, ह्यापेक्षां अधिक घातकी व कायदेशीर कोणतें अस्त्र असूं शकेल बरें ?

" आज काल ह्या देशांतील न्यायालयांत ह्या दुसऱ्या प्रकारच्या दाव्यांचीच झुम्मड झालेली आहे. परंतु हे न्यायाधीशापुढें सुनावणी होण्यापर्यंत फारसें येतच नाहींत ! एवढी पाळी यावी तरी कां ? दावा करणारी लोभी स्त्री व तिचा वकील हे दोघे मिळून, न्यायाधीशाच्या पुढें खटला येण्यापूर्वीच आपलें साध्य जें – द्रव्यार्जन तें मिळवून घेतात ! पुष्कळश्या संस्थानांत तर असे कायदे आहेत कीं, अश्या खटल्यांत, पत्नीविरुद्ध कितीही सबळ पुरावा असला, आणि फिर्याद कोणीही दाखल केलेली असली, तरी खटला चालू असेपर्यंत पत्नीच्या वकीलाचा खर्च पतीनेंच द्यावयास पाहिजे !

" आमच्या न्यायाधिशांनां नुसत्या शपथेवरच (affidavit), पतित्पनींचें तोंड पाहण्याची सांधि मिळण्यापूर्वीच, किंवा विनंति अर्जाचा नीट बारकाईनें विचार करण्यास आणि पतीची मागणी रक्कम देण्यास लायकी आहे अथवा नाहीं हें सुद्धां पाहण्यास वेळ मिळण्यापूर्वीच, पोटगीची रक्कम ठरवून ती देण्याबद्दल हुकूम सोडावा लागतो. पुढें ज्या वेळेस केस विचारांत घेतली जाईल, त्यावेळीं ह्या गोष्टींचा विचार होईल; परंतु तों पर्यंत ही रक्कम पतीनें पत्नीला दिलीच पाहिजे. आणि कित्येक दावे तर अठरा अठरा वीस वीस वर्षेपर्यंत कोर्टापुढें सुनावणीसच येत नाहींत ! "

अश्या रीतीनें कोर्टाकडून एखाद्या निपुत्रिक पत्नीला पतीकडून तात्पुरती रक्कम जी मंजूर करण्यांत येते, ती बहुधा पतीच्या उत्पन्नाच्या एकतृतीयांशा-इतकी असते. आणि ह्या उत्पन्नाचें मान कोर्ट ठरवितें तें बहुधा तिच्याच सांगण्यावरून ! अश्या प्रसंगीं एखाद्या साध्या व सादिच्छापूर्ण स्त्रीला देखील

मोह पडणें साहजिक आहे, मग एवढ्या साठींच 'लग्नाचा बाजार' मांडणाऱ्या जगदंबेनें जर ही उत्पन्नाची रक्कम वांगली फुगवून सांगितली तर त्यांत काय नवल ?

अश्या रीतीनें तात्पुरती तरी उत्पन्नाची सोय करून ठेवली कीं पत्नीच्या हृदयाला जरा हायसें वाटून ती सुटकेचा निःश्वास सोडून स्वस्थ बसते. आणि तिला खरोखरच निश्चितपणें स्वस्थ बसायला कोणतीच हरकत नसते. तिचा पैसा दर महिन्याला तिच्याकडे येणारच. पुष्कळश्या संस्थानांत तर, महिन्याच्या महिन्याला नवऱ्यानें बायकोकडे पैसा पाठविला नाहीं तर त्याला तुरुंगांत डांबावें, असे कायदे आहेत !

त्यानें पैसे तरी नियमितपणें माझ्याकडे पोंचते केले पाहिजेत, किंवा तुरुंगांत तरी गेलें पाहिजे. – आणि तो तुरुंगांत जायला केव्हांहीं तयार होणें शक्य नाहीं ! असा सस्मित वदनानें मनाशीं विचार करून ती स्वस्थ बसते व दाव्याची सुनावणी कितीही लांबणीवर पडली, तरी त्याची पर्वा करीत नाहीं.*

"पुष्कळश्या प्रसंगीं, आर्थिक हानि झाल्यामुळें किंवा आजारी पडल्यामुळें अश्या तात्पुरत्या स्वरूपाच्या पोटगीची थकलेली बाकी देणें शक्य न झाल्यामुळेंच कित्येक नवऱ्यांनां महिनोंगणती व वर्षोनुवर्षें तुरुंगांत रखडावें लागलें आहे. ही प्रथा अद्यापिही अस्तित्वांत आहे." *

अमेरिकेच्या विवाहविषयक प्रश्नाचा खोल अभ्यास करण्याची इच्छा असलेल्यांनीं फेथ बाल्डविनची 'डॉलिमनी' ही कादंबरी अवश्य वाचावी.

आतां घटस्फोटासंबंधीं विचार करूं. ह्या बाबतींत हें अगदीं सुरवातीसच कबूल केलें पाहिजे कीं, घटस्फोटाचा निकाल, हा पुष्कळदां इच्छा नसतांना जरी झाला असला, तरी तो एकदां कोर्टातून देण्यांत आल्यानंतर दोन्ही

---

* धि डेलिनिएटर. सेप्टेंबर १९२८

नक्षांनां मान्य झाल्यावांचून बहुधां रहात नाहीं* न्यूयार्कमधील पोटगी खर्च भरणाऱ्यांचें संरक्षण करणाऱ्या संस्थेचे (वाचक हो, संस्थेच्या नांवांकडे लक्ष द्या) प्रस्थापक राबर्ट फिलर्ट रूट ह्मणतात " मूर्ख, तरुण, शेफारलेल्या व शरीरानें तरुण्याच मनानेंही रोगी बनलेल्या स्त्रियांचे तांडेचे तांडें प्रत्यहीं आमच्या राष्ट्राच्या कान्याकोंपऱ्यांतूनही पुढें सरसावताहेत व आपले विवाह यशस्वी झाल्याच्या गिल्ल्यानें आमच्या न्यायकोर्टांच्या भिंती हादरवून सोडीत आहेत." ×धि डिट्राइट फ्रीप्रेस नामक वृत्तपत्राचें असें ह्मणणें आहे कीं," आज विवाहानें एकत्र येणाऱ्या व्यक्ति, हें बंधन लवकरच तुटेल ह्या जाणिवेनेंच विवाहबद्ध होत असतात. हजारों स्त्रीपुरुषांनां विवाहबंधन तुटणें ह्मणजे आयुष्यांतिल एक अगदीं साधी गोष्ट आहे, ह्यांत वाईट वाटण्याजोगें किंवा कमीपणा मानण्याजोगें कांहीं नसून, उलट जिचा अभिमानानें गवगवा करावा अशी ही गोष्ट आहे, असेंच खरोखर त्यांना वाटत असतें."

आपण १९२५ सालचेंच उदाहरण घेऊं. यावर्षीं, कोर्टाकडून ज्या दाव्यांत घटस्फोट मंजूर करण्यांत आला त्यांपैकीं १४६०६९ दाव्यांत, ह्मणजे साधारणपणें शेंकडा ८४ दाव्यांत आरोपी तर्फे बचावाचा कांहींच प्रयत्न करण्यांत आलेला नव्हता असें आढळून आलें. ह्या संबंधांत सिनसिनाटी येथील अश्या खटल्यांच्या विचारासाठीं असलेल्या कोर्टाचे न्यायाधीश सी- डब्ल्यू. हाफमन ह्यांनीं, त्यांच्यापुढें येणाऱ्या दाव्यांचा विचार करून पाहतां असें ठरविलें आहे, कीं शेंकडा ७५ बाबतींत आरोपीला आपला बचाव करून सुटका करून घेण्यास पूर्ण वाव असतो, परंतु ते ह्या संधीचा उपयोग करूनच घेत नाहींत. ह्यावरून असेंच अनुमान निघतें कीं, बहुतेक घटस्फोट हे नवरा व बायको ह्यांमध्यें अगोदर उघडपणें, एकमेकांच्या संमतिनें कोर्टाच्या द्वारें मिळवून घेतलेले असतात. ह्या पुढेंही, न्यायाधीश लोक, असें सांगतात कीं दहापैकीं नऊ बाबतींत, जेव्हां जेव्हां दोन्ही पक्षांकडून बचावाचा पुरावा देण्यांत येऊन खटला लढविण्यांत

---

* हार्पर्स मगेझीन जुलै, १९२८

× फिजिकल कल्चर

येतो, त्या वेळीं तो इस्टेटीसाठीं किंवा अपत्यांसाठीं म्हणूनच लढविण्यांत येतो, असें दिसून येतें.

इंग्लिश कायद्याप्रमाणेंही कांहीं योग्य कारणांसाठीं पत्नीला पतीपासून घटस्फोट मिळूं शकतो. पत्नी व्यभिचारी आहे, एवढ्या कारणावर पतीला तिला सोडचिठ्ठी देण्याचा कोर्टाकडून अधिकार मिळूं शकतो; परंतु स्त्रीला मात्र हा अधिकार मिळवावयास पतीचें व्यभिचारकृत्य तर सिद्ध करावयास पाहिजेच, पण त्याबरोबरच तो तिला दुष्टपणानें वागवितो, हेंही तिनें सिद्ध करून दिलें पाहिजे. ह्या शिवाय अन्यही कांहीं अनपेक्षित कारणांसाठीं विवाहपाशांतून उभय-पक्षांची सोडवणूक होऊं शकते. ह्या कायद्याची पुनर्घटना करणें अवश्य आहे, अशी जाणीव इंग्लंडमध्यें पुष्कळ दिवसांपासून उत्पन्न झाली आहे हें खरें आहे; परंतु कितीही झालें तरी अमेरिकन समाजांत विवाहाची जी ही विटंबना होत आहे, त्या थराला इंग्लंडमध्यें गोष्टी केव्हांहीं जाणें शक्य नाहीं. अमेरिकेंतील घटस्फोटाच्या खटल्यांचें स्वरूप कसें असतें तें खालीं दिलेल्या तीन ठळक उदाहरणांवरून वाचकांच्या ध्यानांत येईल:—

(१) " होय. माझ्या लग्नांत विघ्न उत्पन्न झालें आहे आणि मी माझ्या पतीला कायमचा रामराम ठोकला आहे, हें खरें आहे. पण ह्या बाबतींत सर्व दोष त्याच्याकडेच आहे, आणि तें मी त्याला सांगितलेंही ! ह्या आधुनिक युगांतील सुधारणेस न शोभणारा असा तो जुन्या रीतीभातींचा इसम होता. प्रत्येक गोष्टीबद्दल त्याची आपली पिरपिर सुरूंच असे. विशेषतः मुलांचे बाबतींत तर विचारायलाच नको. मी त्याला म्हणालें, 'आपल्याला दोन मुलें झालीं तेवढीं बस्स झाली; आतां आणखी नकोत ! माझ्या शरीराची रेंखीव आकृति आणखी मुलें प्रसवून अगदीं बिघडवून टाकण्याची तुमची इच्छा आहे कीं काय ? ह्यावरूनच आम्हीं एकमेकांशीं भांडण्याचें ठरविलें.— होय; आम्ही एकमेकांचा कायमचा निरोप घेतला आहे. "

(२) " माझ्याही विवाहाचा मोठा दुःखकारक शेवट झाला आहे हो ! आणि त्याचें दुःख फक्त मलाच काय तें भोगावें लागतें आहे. आज पर्यंतच्या

माझ्या सर्व कल्पना व समजुती अगदींच भ्रामक होत्या असें आतां मला दिसून आलें आहे. बाई, बाई, बाई ! हे मेले पुरुष ज्यावेळीं प्रणययाचनेची गोडी गुलाबी लावून लाळ घोंटीत येतात, त्यावेळीं काय काय सांगत असतात पण ! अन् तेंच, लग्न झाल्यानंतरच कसा मोहोरा फिरवितात, पहा ! माझ्या ह्यां नवरोबांचंच पहा ना ! नेहमीं सारी सकाळभर माझें डोकें दुखायचें; त्या तापानंतर दोनप्रहरीं कशीतरी अंथरुणांतच उठून बसून मी आपली सकाळची न्याहारी खात असलेली त्याच्या दृष्टीस पडलें, कीं म्हणायचा काय, ऐकलं कां ! म्हणे; शरीराला कांहीं व्यायाम घडेल असा कांहीं उद्योग करून हें डोकें दुखणें तूं पळवून कां लावीत नाहींस ? नुसतें नाचरंग, पार्ट्या आणि इतर उत्तेजक गोष्टींपेक्षां निराळ्या अशा कांहीं हितकारक गोष्टींत तूं अधिक मन कां नाहीं घालत ? म्हणूनच मला त्याला सोडचिठ्ठी द्यावी लागली, जन्मभर त्याची अशीं बोलणीं ऐकत राहणें मला बाई कांहीं सहन झालें नसतें ! "

(३) " माझ्याही बाई लग्नाचा असाच प्रकार झाला ! माझा नवरा भारीच निष्ठुर मनाचा ! प्रेमाचा आणि सहानुभूतीचा स्पर्श सुद्धां नाहीं; नुसता कोरडा ठणठणीत पाषाण ! आज वर्षोनुवर्षें मी अशी आजारांत खितपत पडलेली. कुठें आपलें उदासवाणें वाटावें, तर कुठें बद्धकोष्टताच आहे; आज काय तर अजीर्णच झालें तर उद्यां कांहीं तरी आपलें थकल्याभागल्या सारखेंच वाटते ! एक ना दोन, शरीरभोग आहेत झालें ! आणि जेव्हां मी त्याला म्हणालें, माझें एक चुंबन तरी घे, म्हणजे मला बरें वाटेल, तर बाई, माझ्या विनवणीकडे लक्षही न देतां, तो आपला खोलींच्या बाहेर तडक चालता झाला ! माझें मन आहे प्रेमळ; असल्या कठोरहृदयी माणसाचें तोंड सुद्धां पहाणें मला नको. म्हणून शेवटीं मी त्याला सोडून निघून आलें. पुढचें कार्य एकदां करीलच ! *

या जुनाट व ज्याची निगराणी करण्याचें अजीबात टाकून देण्यांत आलें आहे अशा विवाहवृक्षाचीं फळें, एखाद्या रानटी वृक्षाच्या फळापेक्षां फारशीं निराळीं नाहींत ! ×

---

* फिजिकल कल्चर मॅगझीन, जुलै १९२८.

× रिव्होल्ट ऑफ माडर्न युथ, पान २११.

जज्ज लिंडसे ह्मणतात:-

"१९२२ सालांत डेन्व्हर येथें झालेल्या प्रत्येक विवाहाचा शेवट पृथग्व्यवहारांत झालेला आहे, प्रत्येक दुसऱ्या लग्नाच्या बाबतींत घटस्फोटाची फिर्याद दाखल करण्यांत आली आहे. हे आंकडे फक्त डेन्व्हरच्याच बाबतींत खरे आहेत असें नाहीं. यूनायटेड स्टेटसमधील अनेक संस्थानांत जवळ जवळ असेच आंकडे आपणांस सांपडतील ! *

यूनायटेड प्रेसच्या एका लेखांत १९२४ सालांतील विवाहांचे व घटस्फोटांचे खालील आंकडे प्रसिद्ध झाले आहेत.

ॲटलान्टा गा:-		
विवाह	... ...	३३५०
घटस्फोट	... ...	१८४५
लॉस एन्जलीस:-		
विवाह	... ...	१६६०५
घटस्फोट	... ...	७८८२
कान्सस सिटी:-		
विवाह	... ...	४८२१
घटस्फोट	... ...	२४००
डेन्व्हर:-		
विवाह	... ...	३०००
घटस्फोट	... ...	१५००
क्लीव्हलँड:-		
विवाह	... ...	१०१३२
घटस्फोट	... ...	५२५६

* रिव्होल्ट ऑफ माडर्न युथ, पान २१२.

अश्याच स्वरूपाचे आंकडे असलेलीं इतर शहरें जीं तेथें नमूद करण्यांत आलीं होतीं तीं हीं :— पोर्टलंड; सीएटल्, मेम्फिस, ओमाहा आणि अशीच आणखी किती तरी! * जज्ज लिंडसे ह्मणतात:—

"अशी आहे ही परिस्थिति! ह्या वरून असें अनुमान बांधण्यावाचून गत्यंतर नाहीं कीं गेल्या वर्षांच्या आंकड्यांच्या तुलनेनें पाहतां, हें घटस्फोटाचे आंकडे सारखे फुगत चालले आहेत; आणि ते जर असेंच आणखी फुगत जातील—असें होणेंच फार संभवनीय दिसत आहे — तर लवकरच कित्येक संस्थानांत असें दिसून येईल कीं तेथें जितकीं लग्नें लागतात तितक्या सगळ्यांचा निकाल कोर्टांत घटस्फोट होऊन होतो! ह्या अवस्थेचें खरें स्वरूप लोकांच्या ध्यानांत येत नाहीं, ह्याचें कारण ह्या आंकड्यांच्या द्वारें येथील खासगी आयुष्यक्रमावर प्रकाश पडत नाहीं. वास्तविक पाहतां घटस्फोटाचा दावा आणणें हें पुष्कळ अंशीं त्रासदायक खर्चाचे व चमत्कारिक वाटणारे असें असल्यामुळें, अगदीं निरुपाय झाल्यावांचून स्त्री अथवा पुरुष कोर्टाचा आश्रय घेत नाहीं. परंतु ह्या व्यतिरिक्त अशी हजारों उदाहरणें प्रत्यहीं घडत असतात, कीं जेथें एकमेकांच्या अनुमतीनेंच ह्या भांडणाचा निकाल ठरविण्यांत येऊन नवरा बायको एकमेकांस सोडचिठ्ठी देतात. (Separation) आणि ह्यांचा उपरिनिर्दिष्ट आंकडयांत समावेशच होत नाहीं. ह्या शिवाय अशीं आणखीं किती तरी हजारों उदाहरणें आहेत, कीं जेथें कोर्टानें विवाहावर घटस्फोटाचा किंवा कायदेशीर पृथग्व्यवहाराचा शिक्का मारलेला नसतो, परंतु टाकून देणें, पोटाला देऊं न शकणें, खर्चास न देणें अशीं नांवें त्या गोष्टीला दिलेलीं असतात. ह्या सर्व गोष्टींना सुद्धां घटस्फोट ह्या एकाच सदरांत दाखल करण्यांत कां येऊं नये तेंच कळत नाहीं; कारण कायद्याच्या दडपणामुळें किंवा मुलांबाळांसाठीं आणि अश्याच इतर कारणांसाठीं त्या त्या स्त्रीपुरुषांना एका घरांत राहणें भागच पडतें हीं गोष्ट वेगळी, परंतु तसें नसतें तर ह्यांचा शेवट कसा झाला असता तें सांगणें

* धि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ. पान २१२.

नलगे. ह्या असल्या प्रकारांना–घटस्फोटादि धरून–एकच नांव द्यायचें झालें तर तें 'अयशस्वी विवाह' असें द्यावें लागेल. आणि ह्या सदराखालीं येणाऱ्या प्रकारांचा आंकडा पाहिला तर आपणांस खात्रीनें असें ह्मणतां येईल कीं दर वर्षी जेवढे विवाह लायसेन्सनें घडविण्यांत येतात तेवढेंच मांडण्यांतही येत असतात. " *

घटस्फोटांतील दाव्यांत निकाल आपल्या तर्फेचा व्हावा अशी इच्छा असल्यास पत्नीनें पतीच्या व्यभिचाराबद्दल पुरावा दाखल करावा लागत असल्यामुळें, असल्या खटल्यांत वारंवार जे घोटाळे माजतात त्यांचे जितकें विचित्र तितकेंच विविधही रूप असलेलें दिसून येतें! आपल्या हातून घडलेल्या व्यभिचार कृत्याची कबुली नवऱ्यानें दिल्यास कोर्ट ती गृहीत धरतें, परंतु त्या बरोबर स्त्रीनें त्या कृत्यांत कांहीं साक्षीदार किंवा तत्सदृश पुरावा आणला पाहिजे, असाही आग्रह धरतें. परंतु असे साक्षीदार मिळणें फारच कठिण असतें. कारण मनुष्य जेव्हां खरोखरच कांहीं बदकर्म करतो तेव्हां तो त्याचा डांगोरा कांहीं पिटीत नसतो; ह्या बाबतींत ठेवतां येईल तितकी गुप्तता राखण्याचा तो प्रयत्न करीत असतो; पण हें जेव्हां घटस्फोटाच्या दाव्यांतील खेरं कारण असेल, तेव्हां त्याचा विचार ! बहुतेक बाबतींत तर नवरा बायकोनें आपसांत ठरवून आणि पुरावे एकमेकांना पुरवून मगच कोर्टांत दावा दाखल केलेला असतो. उदाहरणार्थ, नवऱ्यानें आपल्या प्रियकारिणीला, ' आज तुला मी रात्रीं अमुक अमुक वेळीं अमक्या हॉटेलांत भेटेन, व मग आपण अमुक अमुक गोष्टी करूं ' इ. आशयाचें एक पत्र लिहून तें मुद्दामच विसरल्यासारखें दाखवून आपल्या जाकिटाच्या खिश्यांत किंवा दुसरीकडे कुठेंही, आपल्या पत्नीला दिसेल असें ठेवायचें; पत्नीनें तें पहायचें त्यांतील गोष्टी टिपून घ्यायच्या आणि ह्या दोघांनां पकडण्यासाठीं डिटेक्टिव्ह नेमायचे; नंतर हा सर्व पुरावा तिनें आपल्या वकिलाच्या स्वाधीन करायचा वकिलाला काय, आपल्या फीशीं काम ! हा पुरावा कोणत्या मार्गानें गोळा करण्यांत आला वगैरे गोष्टींची चांभारचौकशी करून त्याला काय करायचे ?

---

* धि रिव्होल्ट ऑफ माडर्न यूथ पान २११–२१४.

झालें. ह्यानंतर दावा दाखल करण्यांत येऊन, अश्याच खटल्यांची सुनावणी होतां होतां मेटाकुटीस आलेल्या न्यायाधिशापुढें कधीं तरी हा खटला पेश केला जातो. फिर्यादी आपली फिर्याद दाखल करतो; तिच्या वकिलानें विचारलेल्या ठरीव प्रश्नांना ती ठरीव उत्तरें देते; आणि आपल्या पतीशीं आपण हा खटला पुढें आणण्यांत संगनमत केलेलें नाहीं, अशी ती स्त्री शपथही घेते. डिटेक्टव्ह आपला पुरावा सादर करतात; नवरा मुळीं कोर्टांत येतच नाहीं; आणि नवऱ्याच्या व बायकोच्या वकिलांनीं अगोदरच आपसांत ठरविलेली वकील फी व स्त्रीला पोटगी मंजूर व्हावी ह्मणून वकील साहेब न्यायाधीशांस विनंति करतात. सर्व सोंग व न्यायाच्या आवश्यक गोष्टी अगदीं हव्या तश्या असल्यामुळें, न्यायाधिशालाही रकम मंजूर करण्यापलीकडे गत्यंतर उरत नाहीं. हा सर्व मार्ग अगदीं साधा आणि सोपा दिसतो, परंतु ह्याचें अंतरंगांतील वास्तविक स्वरूप काय असतें तें जगापासून लपलेलें नसतें. स्त्री आपल्या पतीपासून घटस्फोट मिळविते; परंतु त्या बरोबरच नरकवासाचें पापही जोडून घेत असते !

आणि जर नवऱ्याचा असा कोणा स्त्रीशीं संबंध नसला, तर डिटेक्टव्हाच्या फर्मच्या मदतीनें, अश्या भलत्याच प्रसंगांत माझ्या बरोबर असतांनां आह्मी पकडलों गेलों ' अशी साक्ष देणारी एखादी बया फी देऊन सहज मिळवितां येते; किंवा तो आपल्या पत्नीच्या वतीनें असेच वकील देतो कीं जे आपल्या तर्फेच्या साक्षीदार ह्मणून अश्या भाडोत्री बाया आणून त्यांच्या जबानींतून आवश्यक माहिती काढून घेतात ! अमेरिकेंत हा साक्षीदाराचा धंदाच होऊं बसला आहे. *

जज्ज जोसेफ डेव्हिड, ज्यांनीं अश्या स्वरूपाचे अनेक खटले चालविले आहेत, असें ह्मणतात कीं, आपल्या समाजांत घडणाऱ्या घटस्फोटांच्या खटल्या पैकीं पन्नास टक्के खटल्यांच्या बाबतींत तरी कसा बसा आरोप शाबीत करून घटस्फोट मिळविण्यांत आलेला असतो. जज हॅरी ए. लूइसचें ह्मणणें असें आहे कीं, शेंकडा ५० पासून ६० खटल्यांत पुढें मांडण्यांत येणारा पुरावा अगदीं खोटा असतो.

---

* हार्पर्स मॅगेझीन, जुलै १९२८.

अश्या स्वरूपाच्या घटस्फोटाच्या कायद्यांमुळें सर्वांत जास्त फायदा जर कोणाचा होत असेल तर तो वाकेलांचा होतो. वस्तुस्थितीचें ज्ञान असूनही जर त्यांनीं असे बनावट किंवा समजून उमजून दिलेले खोटे पुरावे कोर्टांत पुढें आणले, तर त्या गुन्ह्याबद्दल त्यांची सनद काढून घेण्यांत येतें हें जरी खरें असलें तरीही हे प्रकार नित्यशः चालले असतातच. वकील चलाख असला कीं, त्याच्या पक्षकारानें जो कांहीं पुरावा त्याच्या स्वाधीन केलेला असतो, तेवढाच तो गृहीत धरतो, व फारसा खोलांत तो मुळीं शिरतच नाहीं. परंतु पुष्कळसे वकील ह्यापेक्षां अधिक सावध असतात व अधिक नीतिमानही असतात. कित्येक वकीलाच्या फर्म्स तर अश्या आहेत कीं, त्या घटस्फोटाचे खटलेच मुळीं स्वीकारीत नाहींत. परंतु परस्परविरुद्ध पुराव्याच्या खडकांच्या मधून, संकटांत न सांपडतां आपलें तारू पुढें कसें ढकलावें हें जाणारे पुष्कळच वकील असतात ! कांहीं कांहीं कोर्टांच्या क्षेत्रांतील वकील तर ह्या बाबतींत कमालीचे धाडसी असलेले आढळतात. उदाहरणार्थ शिकॅगो येथें घटस्फोटाचे खटले चालविण्याचें बाबतींत नांवाजलेले एक वकील होते. हें आतां इहलोकांत नाहींत. ह्यांच्याकडे वकीलपत्र देण्यासाठीं एखादा पक्षकार आला, कीं पाहिल्यानें त्याच्याशीं आपल्या फीसंबंधीं ठराव करून घेत आणि त्यानंतर त्या पक्षकाराला प्रश्न विचारीत, पुरावा तुम्ही पुरविणार कीं आम्हीं पुरवायचा ? " *

आताशां घटस्फोटांच्या प्रकरणांची वाढ होत आहे, हें बहुश्रुत आहे; परंतु विवाहांचें प्रमाण आजकाल क्रमशः कमी कमी होत आहे ही गोष्ट लोकांनां फारशी विदित नसावी असें वाटतें. परंतु ती अगदीं सत्य आहे, आणि ह्या गोष्टीचे भावी परिणाम किती अनिष्ट होणार हें ही विचारवंतांना समजल्यावांचून राहत नाहीं. अनैसर्गिक स्वरूपाचे संबंध अस्तित्वांत येत असून ते विवाहसंस्थेचें उच्चाटन करीत आहेत, हाच ह्याचा उघड उघड अर्थ आहे. आतांपर्यंत लोक विवाहाकडे थोड्या तिरस्काराच्याच दृष्टीनें पहात होते, परंतु आतांशां तर त्यांना त्याची एक फालतू दगदग म्हणून मुळींच आवश्यकता वाटेनाशीं झालेली आहे.

* हार्पर्स मॅगेझीन. जुलै १९२८

' बाल्टिमोर सन ' मध्यें एक लेख लिहून जज्ज जार्ज सी. एपॅल ह्यां विवाहजन्य जबाबदारीच्या भयामुळें विवाह करण्याचें टाळण्याच्या प्रवृत्तीबद्दल लिहितातः—

ह्या प्रसंगीं, एका खटल्यांत एक तरुण व तरुणी माझ्यापुढें उभे करण्यांत आले होते, त्यांच्या संबंधींच्या हकीगतीची मला आठवण होते. त्यांचा एकमेकांशीं पतिपत्नीत्वाचा संबंध होता, परंतु त्यांचा विवाह झालेला नव्हता. अशा अवस्थेंत त्यांनां एक मूल झालें. ह्याच प्रकरणांत ते माझ्यापुढें न्यायासाठीं आणण्यांत आले होते. वैवाहिक जबाबदारीचा अंगीकार न करतां एकमेकांशीं संबंध ठेवतां यावे ह्या ' आधुनिक ' तत्वज्ञानाच्या बळावर तो आपलें समर्थन करण्याची खटपट करीत होता.

" तो तरुण मला ह्मणाला, " आतां काय सांगावें ? अहो, आजकालच्या स्थितींत जुन्या चालीप्रमाणें लग्न करून घर करून राहूं ह्मटलें तर तें जुळतच नाहीं. '

" परंतु ह्याच्या कारणांबद्दल ज्यावेळीं मी अधिक विचारपूस केली, त्यावेळीं मला असें आढळून आलें कीं, ह्या तरुणांची ' घर ' ह्या शब्दाची कल्पना जुन्या काळाच्या कल्पनेपेक्षां अगदींच निराळी होती. जी राहाणी त्याला अत्यंत खर्चाची वाटत होती, ती ह्मणजे एक चांगलासा बंगला घेऊन तेथें राहावें, आपल्या मालकीची मोटारगाडी असावी, घरांत रेडिओचा सेट असावा, नोकर चाकर असावे, किंमती पोषाख अंगावर घालायला आपल्याला मिळावे, अशा स्वरूपाचे श्रीमंतीचे होते. ह्या सर्व इच्छा माणसाला अवश्य असाव्या, ह्यांत शंका नाहीं. पण जुन्या काळांत, तरुण लग्न करून गरिबींतच आपल्या संसारास सुरवात करीत व हळूं हळूं पुढें सर्व उपरिनिर्दिष्ट श्रीमंतीच्या गोष्टी गोळा करीत असतात. आजकालच्या ह्या तरुणांनां मुळीं धीरच नाहीं. त्यांनां सर्व गोष्टी अगदीं प्रारंभापासूनच हव्या ?

खरें पाहतां १९१३ पासून खर्चाचें प्रमाण जर ७५ टक्क्यांनीं वाढलें असेल, तर पगारांचें प्रमाण शंभर टक्क्यांनीं वाढलेलें आहे. अशा परिस्थितींत

तरुणांनीं लग्नें करून स्थायीक होण्यास कांहींच आडकाठी नसावी. परंतु आमचे समाजसुधारक तरुणांनां असाच उपदेश करीत असतात कीं गृहस्थ-धर्म फार खर्चाचा आहे, आणि ह्मणून विवाहाशिवाय विवाहाचा दुसरा कांहीं तरी नवा मार्ग अमलांत आणणें अवश्य आहे."

जज्ज ऍमेलेनें मांडलेल्या मुद्यांवर टीका करून विवाहाच्या कमी झालेल्या प्रमाणांबद्दल लिहीत असतांनां, डिट्राइट येथील 'फ्री प्रेस' नें असें ह्मटलें आहे:—

नीतिशास्त्रज्ञाच्या दृष्टीनें अशी अवस्था फार भीषण असून तिचें स्वरूप फार घातकी आहे ह्यांत शंका नाहीं. परंपरागत किंवा व्यक्तिगत धर्म नियमांचा आणि बच्चा वाईटाचा प्रश्न जर क्षणभर बाजूला ठेवला, तरी हा प्रकार वाईट आहे हें सिद्ध होतेंच !

विवाहांचीं कमतरता, घटस्फोटांची वृद्धि आणि (गृहीत धरलेली) अनीतिमय आचरणांची व वेश्याचाराची वृद्धि ह्मणजे पशुवृत्तीकडे परत जाणें असून अपत्यांच्याबद्दल नैसर्गिक प्रेम कमी होऊन त्यांची हेळसांड करण्याकडे प्रवृत्ति होते. ह्याबरून, स्वतंत्र राज्यसत्तेचें आणि सुधारणेचें संरक्षण करण्यासाठीं गृहस्थधर्माचें परिपालन करणें अवश्य आहे हें न कळण्याइतकें लोक मूर्ख तरी असले पाहिजेत, किंवा ह्या पेक्षांही वाईट गोष्ट ह्मणजे त्यांनां ह्या संस्थांचें काय होईल त्याची फिकीरच वाटत नसली पाहिजे.

विवाहाला तुम्ही यशस्वी म्हणा, किंवा अयशस्वी ह्मणा, पण मनुष्याचा अधःपात होऊन तो पशुत्वाप्रत जाऊन पोहोंचूं नये असें वाटत असल्यास, विवाहसंस्था अवश्यक आहे हें कबूल केल्याखेरीज मात्र गत्यंतर नाहीं."

ह्या घटस्फोटाच्या वाढत्या व विवाहाच्या घटत्या प्रमाणाबरोबरच इकडे मातृपद टळणें हें फॅशनेबल होऊन बसलेलें आहे. हा शिष्टाचार नुसत्या अविवाहित स्त्रियांमध्येंच रूढ आहे असें नाहीं, तर तो विवाहित स्त्रियाहि तितक्याच कसोशीनें पाळतात असें दिसून येतें. विवाह केल्यानंतरही अपत्यप्राप्तीला हरकत घेणाऱ्या ह्या स्त्रियांचे बाबतींत स्त्रीत्वाची आणि शीलाची कल्पना फारच विपरीत स्वरूपांत असते, असें ह्मणणें प्राप्त

आहे. बरनार मॅकफेडन ह्मणतो,–पण, एका अर्थीं हें होतें आहे तेंच बरोबर आहे, असेंच ह्मणावें दुसरें काय? कारण कीं अस्या स्त्रीपासून झालेला मुलगा तरी पुढें समाजाला ललामभूत किंवा आपल्या आईबापांना अभिमानास्पद असा निपजेलच हें तरी कोणी सांगावें?" *

वैवाहिक जीवनाचें जें आवश्यक फळ, त्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं धडपडणाऱ्या ह्या स्त्रियांची संख्या पाहिली ह्मणजे खरोखरच फार आश्चर्य वाटतें.

यूरोपांतील निरनिराळ्या देशांत संतति प्रतिबंधक वस्तु औषधींच्या दुकानांत विकण्यांत येतात. आणि पुष्कळ ठिकाणीं त्यांच्या जाहिरातीही देण्यांत येतात. गर्भधारणा थांबविण्याच्या उपायांचे जास्त विवेचन. केलेलें आहे असें पुष्कळच बरें तसेंच वाईटही वाङ्मय प्रसिद्ध झालें असून त्याचा भरपूर सांठा औषध–विक्रेत्यांच्या दुकानांत नेहमीं ठेवण्यांत येतो. यूनायटेड स्टेटस मध्यें मात्र, गर्भप्रतिबंधक अशा उपायासंबंधीं कोणालाही माहिती करून देणें, हा मोठा गुन्हा समजला जात असून त्याबद्दल कायद्यानें फार कडक शिक्षा सांगितलेली आहे. परंतु अमेरिकेंतील हे कायदेही इतर कायद्याप्रमाणेंच, ज्यांनां त्यांचें बेगुमानपणें उल्लंघन करण्याइतकी श्रीमंती दिलेली असते, त्यांच्यासांठीं नसतात! जशा डॉलर देऊन चोरून दारूच्या बाटल्या विकत आणतां येतात, तसेच हे उपायही विकत घेतां येतात. एका सुंदर तरुण अमेरिकन स्त्रीनें एकदां असें कबूल केलें होतें कीं, "माझ्या सारख्या सर्वच तरुणी अशा औषधी आपल्याबरोबर बॅगमध्यें नेहमींच बाळगीत असतात! समजा, एखादे वेळीं पुरुषाला नाहीं आठवण राहिली आणि तो औषध बरोबर घ्यायचें विसरला, तर तेवढ्यासाठीं एका सुंदर सायंकाळची मौज तरी गमवायला नको हातची!

मुलांची कटकट आपल्या मागची सोडवायचा सर्वसाधारण उपाय ह्मणजे पोट पाडणें हा होय. ह्या गुन्ह्याचें प्रमाण अमेरिकेंत इतकें मोठें

---

* मॅनहुड ॲन्ड मॅरेज पान ८९

आहे कीं त्याला 'अमेरिकन गुन्हा' अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे. "आणि हा गुन्हा विवाहित स्त्रियांकडून आपल्या अतिशहाणपणामुळें, मूर्खपणामुळें किंवा आधुनिक युगावरील त्यांच्या अंधश्रद्धेमुळें किती वारंवार घडतो हें जर आपण लक्षांत घेतलें तर आपली छाती दडपून गेल्याखेरीज राहत नाहीं ! *

शेंकडा नव्वद बाबतींत गर्भपातासांठीं सांगण्यांत येणारीं कारणें काल्पनिक असतात, आणि त्यावरून समाजाच्या अधःपताचें स्वरूप मात्र दिसून येतें. मानवी जीवनाबद्दलचा अनादर ह्यापासून उघड दिसून येत असून, ह्या युगांतील परिस्थितीच्या विषारीपणाची मात्र जाणीव तीं करून देतात ! पायाशीं रेंगाळत येणाऱ्या उंदराचा सुद्धां जीव घेणें ज्यांच्या जिवावर येतें अशा कितीतरी स्त्रिया आपल्या पोटाच्या गोळ्यांचा प्रत्यहीं असा बळी घेत असतात. ह्या आपल्या कृत्याबद्दल स्त्री वाटेल तीं कारणें पुढें करो, त्यांवरून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते कीं आपल्या हातून एक पातक व गुन्हा घडलेला आहे, ह्याचें भय तिला वाटतेंच ! +

नुसत्या सांपत्तिक अडचणींचा विचार करूनच मुलें होण्याचें टाळण्यांत येतें, असें ह्मणावें तर तसेंही वाटत नाहीं. कारण अपत्यसंगोपन करून राष्ट्राच्या संपत्तींत भर घालण्यास आर्थिक दृष्ट्या ज्यांनां किंचित्ही अडचण नाहीं अशा श्रीमंत स्त्रिया देखील मातृपदप्राप्ति टाळण्याचा प्रयत्न करतात, असें दिसून येतें. संततिनियमनाचें मुळाशीं जें मुख्य कारण आहे ते ह्मणजे आईबापांची अनिवार व स्वैर विषयलालसा पूर्ण करण्याची इच्छा, हेंच आहे. मुलें झालीं नाहींत, ह्मणजे सर्व जवाबदारीच्या कटकटींतून आपोआप मुक्तता होते; कितीही वेळां, एका झाडावरून दुसऱ्या झाडावर जाऊन बसणाऱ्या पांखराप्रमाणें पुरुषांचें बाबतींत थारेपालट केला, घटस्फोट केले किंवा चोरून मारून मजा मारीत राहिले

---

* मॅनहुड ॲन्ड मॅरेज पान ८८

\+ बूमनहुड ॲन्ड मॅरेज पान १३८

खरी पकडलें जाण्याची धास्ती राहत नाहीं; घटस्फोटाचा दावा कोर्टांत आणला ह्मणजे पोराबाळांचे लटांबर ह्मणजे घटस्फोट मिळविण्याच्या बाबतींत एक नसतें विघ्न होऊन बसतें, त्यापासूनही सुटका होते; अशा प्रकारचे * संतिनियमनापासून अनेक फायदे आहेत ! बरनार मॅकफेडन ह्मणतो, " आजकालच्या किती तरी स्त्रिया केवळ स्वार्थी सुखालालसेसाठींच अपत्यांना प्रसवण्याचें टाळीत असतात. त्यांच्या सार्वजनिक जीवनांत व्यत्यय उत्पन्न होऊं नये एतदर्थच त्यांनां पोरें होऊं नयेत असें वाटतें. " * अशीच दुसरी एक घृणित सबब पुढें करण्यांत येते ती, " पुन्हा, पुष्कळशा स्त्रियांची अशी समजूत झालेली असतें, कीं गर्भधारणा व अपत्यप्राप्ति हीं शरीरसौष्ठव बिघडविण्यास कारणीभूत होत असतात. म्हणूनच त्यांनां मुळ नको असतात ! ' +

असल्या मूर्खपणाच्या सबबी म्हणजे शीलाचा आणि स्त्रीत्वाचा अभावच दर्शवितात !+ स्त्री असो अथवा पुरुष असो, जेथें जेथें म्हणून मुलांबद्दल अप्रीति अथवा नावड आढळून येईल तेथें चारित्र्याची कांहीं तरी अनैसर्गिक विकृति आणि अध:पतन असलेंच पाहिजे, असें अगदीं खुशाल समजावें. अपत्यप्रेम ही नुसत्या मनुष्यहृदयाचीच नव्हें, तर सृष्टींतील सर्व जीवमानांच्या हृदयांतील एक नैसर्गिक भावना आहे. आपल्या बाळांचे बोबडे बोल, त्याचे चाळे, त्याच्या अगदीं बारीक सारीक हालचाली, इ. गोष्टी मातेच्या हृदयांतील प्रेमबंध ओढून तें पुलकित करीत असतात. बालकशून्य गृह ह्मणजे गृहच होऊं शकत नाहीं. पुरुषांचें बाबतींत, आपल्याला आपल्या सारखाच पुत्र असावा, त्याच्या ठायीं आपल्या प्रमाणेंच शील व बुद्धिमत्ता असावी, आपण मिळविलेलें यश परंपरेनें त्याला मिळावें, अशा इच्छा असणें अगदीं स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणें स्त्रीच्या बाबतींतही, आपल्या प्रमाणेंच हंसतांनां गालाला खळ्या पडणारें, हर्षानें नाच

---

* वूमनहुड ॲन्ड मॅरेज पान १३८

+ मॅनहुड ॲन्ड मॅरेज ८२

असलेले नेत्र असलेलें छकुलें आपल्या मांडीवर खेळत असावें अशी महत्वाकांक्षा असणें तितकेंच स्वाभाविक असतें.

ज्या घरांत अशीं बाळें खेळत नाहींत, तें घर निष्प्रेम, सुनें आणि शून्य असें असतें; त्यावर सृष्टिदेवीचा आणि परमेश्वराचा शाप असतो.

अमेरिकन कुटुंबाचा व नीतिमत्तेचा नाश करणाऱ्या इतर कारणांपैकीं दुसरें एक महत्वाचें कारण म्हणजे, उपदंशादि विकारांची आपत्ति हें आहे. कमींत कमी शेंकडा नव्वद लोक अशा विकारांनीं ग्रासलेले आढळून येतात.

शिकॅगो येथील कमिशनर फॉर हेल्थ डॉ. हमेन् एन्. वुनसॉन ह्याच्या मताप्रमाणें, भीषण संकटाची वाढ मुग्धतेच्या पडद्याआड अगदीं एकसारखी होत आहे असें दिसतें. नुसती देवीची सांथ आली तरी लोक भयानें घाबरे होऊन घरें दारें सोडून पळून जातात; आणि तरीही, देवीच काय परंतु क्षयरोग सुद्धां ह्या रोगाइतका घातक नसतो ! ह्या रोगांचा दुसरा घातकी विशेष असा असतो कीं, अपराध्यांप्रमाणें निरपराधी व्यक्तीलाही ते जडतात. अमेरिकेंतील अर्धे तरी पुरुष ह्या व्याधीनें ग्रासलेले असतातच, असें प्रसिद्ध झालेलें आंकडेच आपल्याला सांगतात. यूरोपांतील अगदीं वाईटांतला वाईट असा देश घेतला तरी तेथें अशा लोकांचे प्रमाण पंचवीस टक्यापेक्षां अधिक आढळत नाही. अमेरिकन स्वास्थ्यसंरक्षक खात्याचें असें म्हणणें आहे कीं ह्या रोगाचा समाजात वेश्यांकडूनच प्रादुर्भाव करण्यांत येतो असें नाहीं तर तो पसरविण्यास स्वैराचारी आणि दर क्षणाला नवे नवे विषयसुख भोगण्यासाठीं तडफडणाऱ्या समाजांत सर्वत्र वावरणाऱ्या मुलीच विशेषत्वानें कारणीभूत होत असतात. ह्या महामायेच्या लालसाग्नींत एक तरुण पडला कीं त्यानंतर दुसरा, असें सत्र सुरू असल्यामुळें, ह्या संसर्गजन्य रोगाची देवाण घेवाण अगदींच सुलभ झालेली असते. यूनायटेड स्टेटस मध्यें दरसाल २५०००० उपदंशाचे रोगी औषधोपचारासाठीं येतात, ह्यावरून तेथील नैतिक

शिष्ठाचाराची आपणांस कल्पना करतां येते.* आणि तरीही होतां होईल तोंपर्यंत अशा बाबतींत बभ्रा होऊं देऊं नये अशी लोकांची खटपट असतेच; हे रोगी हुडकून काढून त्यांनां दवाखान्यांत नेऊन ठेवण्यासाठीं प्रयासच करावे लागत असावेतः १९२१ जुलैच्या 'जॅर्नल ऑफ सोशल हायजीन' मध्यें लिहीत असतांना ख्रिस्तवासी कार्डिनल गिबन लिहितातः—

"वैद्य ह्या नात्यानें तुह्मी जाणतां कीं समाजांत ह्या रोगांचें अस्तित्व आहे. पाद्री ह्या नात्यानें मीही त्यांचें अस्तित्व जाणतों. वैद्य ह्या नात्यानें त्यांचा पाडाव करून नायनाट करण्याची खटपट करणें हें तुमचें कर्तव्य आहे, धर्मपिता ह्या नात्यानें माझ्या मार्गानीं त्यांच्याशीं झगडणें हें माझें कर्तव्य आहे. हे रोग आपले शत्रु आहेत, आणि अंधारांत शत्रूशीं यशस्वीपणें लढतां येणें शक्य नसतें!"

जर सर्व आंकडे आपल्या समोर आले तर आपल्याला असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं कीं, यूनायटेड स्टेटस मधील हे रोग नुसत्या सांसर्गिक स्वरूपाचेच नाहींत तर प्लेगसारख्या सांथीप्रमाणें घातकीही आहेत. आजपर्यंत ह्या रोगांनीं किती इसम बळी घेतले असतील, त्याची कल्पना करणें कठिण आहे.

जगांतील इतर प्रदेशांत क्षय हा सर्वांत भीषण रोग आहे, असें दिसतें. परंतु युनायटेड स्टेटस मध्यें हा पहिला मान उपदंशादि रोगांकडे आहे. येथील नीतिमत्तेच्या व शिरगणतीच्या मोजादादीवरून आणि आंकड्यांवरून आपणास हें दिसून येतें. वंशपरंपरागत उपदंशविकारानेंच दरवर्षीं येथें तीस पासून चाळीस हजार माणसें मरतात, असें आकडे सांगतात. ह्या रोगाला 'बालसंहारक' असें विशेषण दिलेलें आहे तेंही अगदीं योग्यच आहे. एका विश्वसनीय मताप्रमाणें यूनायटेड स्टेटसमध्यें ५० लक्ष माणसें ह्या रोगानें पीडित आहेत असें आढळतें.* दुसऱ्या कित्येकांचें असें मत आहे कीं, बारा पासून वीस

---

* फिजिकल कल्चर मॅगेझीन मार्च १९२५.

* मॅनहुड ॲन्ड मॅरेज पान ३०२.

टक्के तरुण ह्या रोगानें पीडिलेलें असतात.* " असे प्रकार गुप्ततेच्या आवरणाखालीं सतत झांकलेले रहात असल्या कारणानें हें प्रमाण फार कमी असण्याचाही संभव आहे. "*

परम्याच्या रोगानें पीडित असलेल्यांचे आंकडे तर ह्यां पेक्षांही अधिक आहेत. अगदीं लक्षपूर्वक पाहणी केल्यानंतर तिशीच्या वयांतील मनुष्यांपैकीं शेंकडा पंचाहत्तर ते नव्वद पुरुष ह्या रोगानें पछाडलेले असतात.* आणि, "जवळ जवळ दहा लक्ष निरपराधी स्त्रिया आपल्या पतींच्या मुळेंच ह्या व्याधीला बळी पडलेल्या आढळतात. ह्या रोगानें पीडलेल्या वेश्यांपेक्षांही कदाचित् धरती स्त्रियांचा आंकडा अधिक असावा. " *

अश्या रोगांना गुप्त ठेवण्याबद्दल जशी खटपट करण्यांत येते, तसेंच दुसरें कांहीं लोक ह्याकडे नुसत्या मौजेच्याच दृष्टीनें पहातात. कित्येकांना तर असले रोग असणें म्हणजे खऱ्या पौरुषत्वाची आणि तें पौरुष प्रभावशाली रीतीनें गाजविल्याची ध्वजाच आहे, असें वाटतें.

मनस्वी अत्याचाराचें बी पेरलें कीं त्याचीं तितकींच मनस्वी व भयंकर फळें चाखावीं लागणारच ! दुर्दैव एवढेंच कीं ह्या बाबतींत सुक्या बरोबर ओलेंहीं भरडलें जाऊन कित्येक निरपराध्यांनांही हीं कडू फळें चाखणें भाग पडतें !

उपदंश आणि परमा ह्या दोन्ही रोगांचें प्रमाण एकत्र मिळविलें म्हणजे आपणास असें दिसून येतें कीं, युनायटेड स्टेटसमध्यें शेंकडा नव्वद व्यक्ति समाजांतील वंध्यत्वाला व पौरुषहीनत्वाला कारणीभूत झालेल्या असतात. स्त्रीच्या बाबतींत वंध्यात्व हा गर्भपाताचाही परिणाम असूं शकेल; परंतु बहुशः तें स्त्रीच्या अथवा पुरुषाच्या जननेंद्रियासंबंधींच्या विकारामुळेंच जडलेलें असतें. शिरगणतीच्या आंकड्यांवरून असें आढळून येतें कीं यूनायटेड स्टेटस मधिल जननाचे आंकडे, जेथें साधरणपणें ५ असावयास पाहिजेत, तेथें ते २.६ इतकेंच असलेले दिसतात. ह्यावरून असें दिसतें कीं कोणत्याना कोणत्या कारणा-

---

* मॅनहुड ॲन्ड मॅरेज पान ३०३.

मुळें अर्धी प्रजा प्रजोत्पादन करित नाहीं. गर्भपात करणाऱ्यांची व गर्भप्रतिबंधक उपायांची योजना करणाऱ्यांचीं उदाहरणें बगळळी, आणि त्याचप्रमाणें ह्या संसर्ग रोगानें दूषित व्यक्ति बगळल्या तर आठांत एक स्त्री आणि नवांत एक पुरुष, ह्यांपेक्षां अधिक स्त्री किंवा पुरुष विवाह करण्यास लायक नसतात. जुसल्या परम्याच्या विकारामुळेंच कनींत कमीं ५०० टक्के स्त्रिया वंध्या बनलेल्या आढळतात ! *

ज्यांच्या विधानांवर भरंवसा ठेवाबयास कोणतीच हरकत नाहीं अशा अधिकारी व्यक्तींचें असें मत आहे कीं, यूनायटेड स्टेटसमध्यें असें एकहीं घर किंवा ऑफिस आढळणें शक्य नाहीं कीं जेथें अनेक-निदान एक तरी व्यक्ति ह्या रोगानें पीडित असलेली असत नाहीं. स्त्रीपुरुषांतील व्यभिचाराला जों पर्यंत अडथळा आणण्यांत येत नाहीं, तों पर्यंत ह्या रोगांचें निर्मूलन होणें ही कठिणच आहे.

गृहसौख्याचा विच्छेद करणारा शेवटचा पण इतकाच भयंकर शत्रु ह्मणजे गुप्तपणें चालू असलेली बहुपत्नीत्वाची चाल, ही होय. जगांत पुष्कळ ठिकाणीं अनेक पत्नीत्वाला कायद्यानें संमति दिलेली आढळते, आणि कोठें कोठें तर असा प्रकार हा समाजाच्या स्थिरतेचा एक भक्कम आधार आहे असें समजण्यांत येतें. कांहीं काहीं लोकांचा अद्यापिही असा विश्वास आहे कीं, जीवनाचा वास्तविक नियम एकपत्नीत्व हा नसून बहुपत्नीत्व हाच आहे, आणि एकाच स्त्रीचें ठायीं जर एखाद्या पुरुषाची निष्ठा दिसून आली तर ती प्रीतीमुळें असावी, कायद्याच्या प्रतिबंधामुळें नव्हे ! दुसऱ्या कित्येकांचें असें मत आहे कीं, एकपत्नीत्वाचा कायदा बनवून मनुष्याच्या कामोपभोगावर जें नियंत्रण घालण्यांत आलें आहे तेंच जगांतील वैषयिक दोषांच्या मुळाशीं बहुशः आहे. ह्या पैकीं कोणतें मत सत्य आहे हें सांगण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. परंतु ह्या बाबतींत मनुष्यानें सत्य बोलावें, असें मात्र माझें मत आहे. ज्या नियमाचें आपल्याला पालन करतां येत नाहीं तो नियम कायदा ह्मणून समाजावर

---

* मनहुड ॲन्ड मॅरेज पान ३०३.

लादण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एकपत्नीत्वाचा उपदेश करायचा आणि व्यभिचार कर्दमांत लोळायचें, असें करण्यांत काय लाभ ? नुसता नीतिमत्तेचा देखावा डोळ्यापुढें उभा केल्यानें कांहीं कोणी नीतीचा विराटपुतळा बनूं शकत नाहीं ! यूनायटेड स्टेटसमध्यें बहुपत्नीत्वाला मान्यता देणारा किंवा अविवाहित परिस्थितींत उत्पन्न झालेल्या अपत्यांनां कायदेशीर वारसा मिळवून देण्याबद्दलचा कायदा जर पास झाला, तर त्यामुळें अमेरिकेंतील सगळ्या ख्रिस्तानुगामी राहिवाश्यांच्या कोंवळ्या धर्मबुद्धीला भयंकर धक्का बसेल; पण इकडे पहावें तों:—

" सबंध देशभर बहुपत्नीकत्व चालूच आहे:— तें गुप्त आहे एवढेंच..

पुरुष आणि स्त्रिया एकदां विवाह करताना तसेच पुनर्विवाहही करतांतिच. घटस्फोटाचें प्रमाण एकसारखें वाढतें आहे. संस्थानांमध्यें—जेथें कायदे विशेषेंकडक आहेत तेथें-पती आणि पत्नी दोघेही संगनमत करतात आणि बनावट पुराव्याच्या आधारावर घटस्फोट मिळवितात. हें जर न जुळलें तर ते दुसऱ्या एखाद्या संस्थानांमध्यें किंवा दुसऱ्या देशांत जाऊनही आपली इच्छा पूर्ण करून घेतात.

" परंतु वैवाहिक जीवनाच्या जबाबदारीकडे आणि ती पाळण्यासि लावणाऱ्या कायद्याकडे फारच थोडे लोक लक्ष देतात; किंबहुना कोणीच लक्ष देत नाहीं ! त्यांची इच्छा ज्या मार्गानें त्यांना ओढून नेईल, त्य मार्गानें ते सर्व चाललेले आहेत !

" आणि दर क्षणाला त्यांच्या मनांत एक भावना पूर्णपणेंच जागृत असते कीं, जों पर्यंत आपण पकडले जात नाहीं, तोपर्यंत जें जें आपण करूं तें सर्व योग्यच आहे.

" पकडलें जाण्याचें जें पाप त्याचेंच त्यांना एवढें भय वाटत असतें. मगींच व्यभिचार हें पापकृत्य ठरतें. पण जों पर्यंत हीं कृत्यें न पकडलें जातां करतां येतात तों पर्यंत त्याबद्दल अगदीं मोकळेपणानें हंसत हंसतें उल्लेख करण्यांत सुद्धां त्या गुन्हेगारींना कांहींच वाटत नाहीं.

"आपले नागरिक जीवनांत शारीरिक बौद्धिक अशी आवश्यक अशी क्रांति जोंपर्यंत घडणार नाहीं तो पर्यंत ही परिस्थिती सुधारण्याची ही आशा करणें नको ! *

ह्या घटस्फोट उपदंशादि सर्व रोगांचा विचार केला कीं येथील विवाह-वृक्षाची फळें रानटी व विषारी आहेत असें म्हणण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. इतक्या स्वतंत्र व अनुकूल जामिनींत पेरलेल्या बीजापासून उत्पन्न झालेल्या वृक्षाची फळेंच अशी कडू आणि विषारी कां निपजावी ह्या गोष्टींची मीमांसा करणें मात्र बरेंच मनोरंजक होणार आहे.

"ह्या विषयासबंधीं पुढें येणाऱ्या पुराव्याचें बारीक निरिक्षण केलें असतां, ह्या विवाहवृक्षांच्या ह्या विषारी फळांस दोन गोष्टी प्रमुखत्वानें कारणभूत होत असाव्या, असें आपणांस आढळून येतें.

(अ) नैतिक आचरणाची व जबाबदारीची सार्वजनिक जाणीव नसणें.

(ब) जातिसंमिश्रणामुळें उत्पन्न होणारी आत्यंतिक कामलालसा.

ह्यांपैकीं पहिल्या गोष्टीचे परिणाम, गुप्तपणें सार्वत्रिक स्वरूपाची अनेक पत्नीत्वाची चाल, वेश्या व्यवसायाचें भयंकर प्रमाण, आणि नैतिक किंवा सार्वजनिक जीवनांतील जबाबदारी न ओळखतां तरुणतरुणींमध्यें नित्यशः चाललेले वेटिंग आणि नेकिंग ह्यांसारखे विलासाचे भोग, हे होत.

दुसऱ्या गोष्टीचे परिणाम, घटस्फोटाचें प्रमाण, उपदंशादि विकारांचा सार्वत्रिक प्रसार, अनेक अमेरिकन पतींचें अकालीं प्राप्त होणारें पौरुषहीनत्व, आणि नीग्रो जातीच्या परिचारक–परिचारिकांशीं असलेले स्त्रीपुरुषांचे व्यभिचारी संबंध, हे होत.

ह्या बाबतींत, अमेरिकेंतील स्त्रीपुरुषसंबंधाविषयक सर्वांगीण शोध करून आपलीं मतें बनविलेल्या बरनार मॅकफेडन ह्यांचें मत आपल्यापुढें आहे.

---

* फिजिकल कल्चर मॅगेझीन, डिसेंबर १९२५.

त्यांच्या मताप्रमाणें, " आपण हल्लीं अशा युगांत रहात आहोंत कीं ज्यांत स्त्रीपुरुषांच्या परस्परसंबंधांत नैसर्गिक साधेपणा फारसा आढळतच नाहीं. हें युग असाधारण आहे, असें म्हणतां येईल. * येथें लग्न म्हणजे फक्त विषय-संभोग अविरतपणें घेत सुटण्याचा मार्ग, असाच अर्थ करण्यांत येतो, आणि म्हणून लग्न झालें म्हणजे मैथुन ही रोजची एक संवय होऊन ह्या बंधनाचा एक रोजच्या कंटाळवाण्या वाटूं लागणाऱ्या कटकटींत रूपांतर होत जातें."* अश्या प्रकारच्या संबंधामुळें पति पौरुषत्वविहीन बनतो. * ह्या कंटाळ्यामुळें पतिपत्नींच्या मनांतील आकर्षणभाव जाऊन त्याऐवजीं तिरस्काराचा प्रादुर्भाव होऊं लागतो. आणि त्यामुळेंच इतके विवाहित स्त्रीपुरुष घटस्फोटाच्या कोर्टांकडे धांव घेतांनां दिसतात. व कोर्टांत जो दावा दाखल करण्यांत येतो, त्या कागदावर तशीं वाटेल तीं कारणें देण्यांत आलीं असोत; परंतु त्या सर्वांच्या आड हा परस्परांबद्दल उत्पन्न झालेला तिरस्कारच असतो हें सत्य आहे.* त्याच लेखकाच्या मताप्रमाणें, वैवाहिक जीवनाचा अति-संभोगानें असा दुरुपयोग करण्यास मुख्यतः पत्नीच कारणीभूत होत असते. तो म्हणतो, " ह्या सर्व परिस्थितीची गुरुकिल्ली स्त्रीच्या मनोधर्मांतच सांपडते. कारण संभोगावर नियंत्रण राहणें न राहणें हें तिच्या संमतीवर किंवा अनिच्छेवरच अवलंबून असतें.*

जर तरुण वयांत असतांनांच जर असे नपुंसक होऊं लागले आणि तरुणींची कामवासना मात्र प्रबलच राहिली, तर मग अविवाहित दांपत्य-जीवन, संकेत स्थलें, सौंदर्यवर्धक गृहें (Beauty parlours) ह्यांची बेसुमार भरभराट होणें हें ओघानेंच येत नाहीं काय ?

संभोगविषयक अत्याचाराची दुसरी आणखी एक गोष्ट सांगायची राहिली आहे. येथें सर्वसाधारण व्यक्तीला नीग्रोशीं असे संबंध ठेवण्याचा तिटकारा असतो. विश्वविद्यालयांचे व विद्यापीठांचे तक्ते पाहतां, नीग्रो साधारणपणें बुद्धिमत्तेत

---

* मॅरीड अॅन्ड मॅरेज पान ६२, ५७, ५८, ४८, ५२ व ६०.

किंचित् कमी असेल कदाचित्, परंतु बाह्यांगाच्या दृष्टीनें, सौंदर्याच्या काकेशिअन कल्पनांच्या तुलनेनें, त्याचा तो काळाकुळकुळीत रंग, त्याचे ते ओबड धोबड अवयव, रौंठ व गुंतलेला केशसंभार, जाड व बाहेर आलेले ओंठ ह्या सर्व गोष्टी सौंदर्याला अगदीं विरोधी अश्याच असतात.

वर्ण संकरानें उत्पन्न झालेल्या प्रजेसंबंधीं आम्ही मागें एकदां उल्लेख केलेला आहे. अमेरिकेंत अशीं हजारों मुलें पैदा होत असतात, आणि ह्या सर्वांची उत्पत्ति नीग्रो मातेपासून झाली असतें असें म्हणतां येणार नाहीं.

सवर्णीयाशीं संभोग करण्याची इच्छा ही नैसर्गिक प्रवृत्ति समजली पाहिजे. त्या दृष्टीनें नीग्रोचा आश्रय घेऊन आपली बुभुक्षा तृप्त करून घेण्याची धडपड ही अनैसर्गिकच ठरेल. आत्यंतिक कामलालसा किंवा अधिक भीषण स्वरूपाच्या दुसऱ्या गुंतागुंतीच ह्या अशा असमानवर्णीय संभोगाच्या मुळाशीं असावयास पाहिजेत. अशी संभोगकृत्यें हीं नेहमीचींच आहेत. तेथील कित्येक विभागांतर हे प्रकार ह्मणजे पांढऱ्या संस्कृतीला लागलेला भयंकर काळाकुट्ट डाग आहे असें समजण्यांत येतें. कृष्णवर्ण कातड्याच्या प्राप्तीची अनावर इच्छा, हा ह्या पिढींतील एक नवा रोग आहे, आणि ह्यामुळेंच नीग्रो व पांढरा ह्या जातींजातींतील द्वेष फार तीव्र स्वरूपाचा होत आहे. मंगोलियन रजनीविलास गृहें अफुखाने आपल्या विषयवासना तृप्त करून घेण्यासाठीं चांगल्या मोठ-मोठ्या घराण्यांतल्या धरंदाज आणि सुशिक्षित स्त्रियांचे अशा विलासगृहातील सभासदत्वाचें वाढतें प्रमाण, यूर-एशिएटिक विवाहसंबंधांची होत असलेली वाढ, हे व ह्यांसारखे प्रश्न आजच्या कोणत्याही यूरोपिअन शहरापुढें मोठ्या भीषण स्वरूपांत उभे राहिलेले दिसत आहेत.

स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्याचा एक दुष्परिणाम झाला आहे तो अमान्य करतां येणें शक्य नाहीं; तो हा कीं, पूर्वीं त्यांच्या वर्तनावर जो आळा होता तें बंधन आतां उरलेलें नाहीं. आत्यंतिक कामलालसा असणाऱ्या स्त्रिया येथें नेहमींच असत, नाहीं असें नाहीं; परंतु वीस वर्षांपूर्वी अश्या स्त्रियांचें प्रमाण हल्लीपेक्षां कमीच असे; आणि त्यांनासुद्धां आपली इच्छा पूर्ण करून

चेण्यास फार झालें तर रेड इन्डिअन्स आणि ग्रेट डेन्स ह्यांच्या तोंडाकडे पहावे लागे. परंतु आतां पहावें तों रेड इन्डिअन आणि ग्रेट डेन्स ह्यांची संख्या नीग्रो बटलरपेक्षां कमीच असलेली आढळते; आणि नीग्रो बटलर आपल्या भरपूर चेतनाशक्तीनें व सुखदायक शरीरावयवादिकांमुळें फिफ्थ एव्हेन्यू मधील ह्या अप्सरांना अगदीं रतिवल्लभाइतकाच प्रिय वाटूं लागलेला दिसतो.

सर्वत्रच–विशेषत: उत्तरेकडील संस्थानांत तर ह्या नीग्रो–व्यभिचाराचें बंड इतकें बेसुमार वाढलें आहे कीं दररोज चर्चमध्यें पूजा आटोपल्यानंतर ह्याबद्दल धोक्याची सूचना करणें पाद्र्यांना आवश्यक वाटूं लागतें. रेव्हरंड वी. ए. ओन्स ह्या पाद्र्यानें नार्थ कॅरोलिना येथील पहिल्या बॅप्टिस्ट चर्चमध्यें आपलें धर्म–व्याख्यान आटोपल्यानंतर श्रोत्यांना असा उपदेश केला कीं, "तुह्मी आपल्या मुलींना शिक्षणासाठीं उत्तरेकडे पाठवूं नका! कारण दक्षिणेंतील संस्थानाप्रमाणें तेथें जातिविषयक व वर्णविषयक भेदभाव फारसा पाळण्यांत येत नाहीं! – तुमच्या मुली काळ्या रंगाचीं कुळकुळीत तान्ही बाळें घेऊनच तुमच्या घरीं परत येतील, हें ध्यानांत ठेवा!" ह्या धर्ममार्तंडानें आपल्या श्रद्धाळू भक्तांना असा उपदेश दिला! *

फिफ्थ एव्हेन्यूच्या पलीकडे हार्लेम आहे. हार्लेम ही नीग्रो लोकांची वस्ती आहे; तेव्हां येथें सर्व प्रकारचे अनाचार (?) आणि दुर्गुण (?) ह्यांचा धुमाकूळ असणारच! ह्या वस्तीच्या प्रारंभालाच न्यूयार्कच्या नगरपित्यांनीं रक्त–प्रदीप–लावून ठेवले असून धोक्याची सूचना देऊन ठेवलेली असते! १२५ व्या रस्त्याच्या वर आणि १४ व्या रस्त्याच्या खालीं नैतिक निर्बंध अजीबात नाहींसे केलेले आढळतात.× हार्लेम येथील रात्रीच्या जीवनक्रमांत निशाचरांचे प्रेमविलास फारच बोकाळलेले आढळून येतात.† ग्राहॅमसाहेब ह्मणतात, "ह्या अनाचारांचें पातक तेथें राहणाऱ्या काळ्या लोकांपेक्षां तेथें

---

* अमेरिकॅना, १९२५. पान १७५.

× न्यूयॉर्क नाइटस, पान २६२.

† अमेरिकॅना १९२५, पान १७५.

जाणाऱ्या पांढऱ्या लोकांकडेच विशेष आहे."* कोणत्याही रात्रीं हार्लेममधील कोणत्याही क्लबमध्यें शिरा. तेथें तुह्माला श्वेतवर्ण स्त्रिया नीग्रोंच्या आलिंगनांत गुरफटलेल्या असून अर्धनिमीलित नेत्रांनीं, देहभान विसरून जाऊन, जॅझच्या मधुर तालसुरावर नृत्याचीं पावलें टाकीत असतांना स्वर्ग-सुखाचा अनुभव घेत असलेल्या तुह्माला आढळतील! काळ्या मनुष्याच्या शरीरस्पर्शाचें रोमांचकारी सुख अनुभवण्यासाठीं रात्रीचे नैसर्गिक व रीतसर कार्यक्रम सोडून, देहभान विसरून वेड्या होणाऱ्या ह्या स्त्रिया ह्मणजे विलक्षणच ह्मटल्या पाहिजेत! *

शिकॅगोमध्येंही हाच प्रकार आहे, आणि इतरत्र सर्व शहरांतही हाच सांवळा गोंधळ चाललेला असतो. काळ्या कातडीच्या नीग्रोनें श्वेतवर्णीयांच्या क्लबमध्यें, रेस्टोरॉंमध्यें किंवा नाटकगृहामध्यें पाऊलही घातलें, तर तेवढ्यावरून किती तरी अनर्थ ओढवण्याचा संभव असतो; परंतु श्वेतकाय स्वतः मात्र मोठमोठ्या प्रमाणांत नीग्रो लोकांच्या करमणुकीच्या स्थलीं प्रत्यहीं जात असतात! शिकॅगो कमिशनपुढें असें सांगण्यांत आलें होतें कीं:-

" अशीं क्रीडागृहें भर लोकवस्तीमध्यें असतात. तेथें येणें न येणें त्याच प्रमाणें तेथें जाणाऱ्या इतर जनसमूहांत मिसळणें अथवा न मिसळणें हें ज्याच्या त्याच्या मर्जीवर अवलंबून असतें. तेथें गोऱ्या लोकांवर जुलूम करण्यांत येऊन त्यांना जबरदस्तीनें काळ्या लोकांच्या सोबतींत ठेवण्यांत येतें हें खोटें आहे. तसेंच, नीग्रो लोक स्वतः होऊन उत्तरेकडील किंवा पश्चिमेकडील वस्तींत गौरकायांचें सहवाससुख मिळविण्यासाठीं चोरून मारून घिरट्या घालीत हिंडत असतील असें समजणेंही चुकीचें आहे. परंतु हा मुद्दाच नाहीं. ह्या दोन वर्गांमधील तेढीचें विषदीकरण केलें तर हें स्पष्ट होतें कीं, धनी आणि नोकर ह्यांच्या परस्परसंबंधाच्या स्वरूपाला अतिक्रम होईल असें वर्तन निषिद्ध आहे हें सिद्ध करण्याचेंच हे उघड उघड मार्ग होत. नीग्रोच्या विरुद्ध ओरड-ह्मणजे जातिभेदाच्या द्वेषाची रागाची आरोळी होय! विविक्षित

---

* अमेरिकॅना १९२५ पान १७५ व ४१.

लोकसमुदाय एकमेकांपासून विभिन्नच रहावेत अशी मनुष्याची जी नैसर्गिक प्रवृत्ति कांहीं बाबतींत दिसून येते त्या मूढपणाच्या अंधश्रद्धेचीच ही ओरड-आहे. हें जातिविषयक भावनांचें असें विलक्षण संमिश्रण आहे कीं त्यांत विशिष्ट जातिविषयक सर्व वादविवादाचें अविष्करण होतें! "*

ग्रॅहॅम साहेबांच्या म्हणण्याप्रमाणें, फिफ्थ एव्हेन्यू मधील स्वर्गीय सौंदर्य प्रसाधनांचे सर्व मासले हार्लेम येथें दररोज (रोज म्हणण्यापेक्षां रात्री म्हणणें योग्य होईल) दृष्टीस पडतात. येथें पांढऱ्यावर काळेंच दिसतें; काळ्यावर पांढरें कधींच दिसत नाहीं.

यूरोपांतील मोठमोठ्या हॉटेलांत पुरुष गिऱ्हाइकांचें मन रमविण्यासाठीं व्यभिचारी स्त्रिया मुद्दाम नोकर ठेवण्यांत येत असतात, परंतु अमेरिकेंतील मोठ-मोठ्या हॉटेलांत स्त्री-गिऱ्हाइकांची इच्छा तृप्त करण्यासाठीं काळेकुट्ट नीग्रो नोकरीस ठेवण्यांत येतात, हें प्रस्तुत लेखकानें प्रत्यक्ष पाहिलें आहे!

अमेरिकेंतील नीग्रोच्या प्रश्नाचा जसजसा बारकाईनें विचार करावा, तसतसें असें वाटूं लागतें कीं, हा नुसता आर्थिक किंवा राजकीय स्वरूपाचा प्रश्न नाहीं. इतरत्र नीग्रो लोकाची स्वतंत्र राज्यें असली, तरी अमेरिकेंत ते लोक आपलें राज्य स्थापण्याचा प्रयत्न करतील अशी अमेरिकांनां भीती वाटत नाहीं. तेथील पांढऱ्या व काळ्या लोकांच्या संख्येंत महदंतर आहे; आणि पांढऱ्या लोकांतील प्रजोत्पत्तीचें प्रमाण असेंच खालीं घसरत शून्यांशांवर जरी गेलें, तरी गोऱ्या लोकांची संख्येच्या व संपत्तीच्या दृष्टीनें बरोबरी करण्यास नीग्रो लोकांनां आणखी किती तरी शतकें वाट पहावी लागेल. तेव्हां हा राजकीय किंवा आर्थिक प्रश्न नाहीं. हा म्हणजे एक अत्यंत महत्वाचा असा सामाजिक प्रश्न आहे. हा म्हणजे नैसर्गिक प्रवृत्तीमध्यें आणि मनुष्याचा अंधश्रद्धेमध्यें घालेलेला लढा आहे. आणि तरीही येथें पुरुषांनां लागू पडणारा कायदा स्त्रियांच्यासाठीं असलेल्या कायद्यापेक्षां भिन्न असलेला आढळतो! अमेरिकन पुरुषानें नीग्रो स्त्रीशीं

* नीग्रो इन शिकॅगो, पान ५९०.

जर संबंध केला, तर त्याकडे एका दृष्टीनें पाहण्यांत येतें तेंच गोऱ्या स्त्रीनें नीग्रो पुरुषाशीं संबंध केला, तर त्याकडे निराळ्याच दृष्टीनें पाहण्यांत येतें !

प्रचलित अमेरिकन समाजाची दिशा कोणती, तें आपण पाहिलें आहे. वैषयिक संभोगाचे व परस्पर नात्यागोत्याचें नियम कसे भग्न झाले आहेत, आजची तरुण कुमारिका होतकरू वेश्येचें आचारस्वातंत्र्य आपल्याला हक्काचें ह्मणून मिळाविण्यासाठीं कशी धडपडत असते, आज सुद्धां तरुण तरुणींचा मुख्य विलास ह्मणजे मादिरापान कसा आहे, शेंकडा ९० अमेरिकन पुरुष हस्तैमथुन किंवा उपदंशादि रोग ह्यांनां बळी पडून त्यामुळें येथील लक्षावधी तरुण नपुंसक व बलहीन कसे बनले आहेत आणि अमेरिकेंतील मैथुनक्रिया नैसर्गिक असण्यापेक्षां अनैसर्गिकच कशी आहे ह्या सर्व गोष्टी अधिकारी व्यक्तींच्या विश्वसनीय पुराव्यावरून सिद्ध झालेल्या आपण पाहिल्या आहेत. हल्लीं येथें प्रचारांत असलेल्या, आणि ज्यांचें जज्ज बेन लिंडसे सारखे लोक समर्थन करून त्यांना धार्मिक स्वरूप देण्याची खटपट करीत आहेत त्या नीतीच्या कल्पना आम्हाला करया त्याज्य व निंदनीय वाटतात, हें ही पूर्वीच ध्वनित केलें आहे.

ह्या वस्तुस्थितीवरून जो निष्कर्ष ओघानेंच काढणें प्राप्त होतें तो हा कीं वर्तनावर आळा घालणारे असे नैतिक निर्बंध जर कांहींच नसतील आणि स्त्रियांना आपल्या आवडीप्रमाणें निवड करण्याचे जर अधिकार असतील, तर त्यांची इच्छा असल्यास रेड इंडिअन, ग्रेट डेन, नीग्रो बटलर किंवा मंगोलिअन आफूबाज, कोणाच्याही बरोबर त्यांनीं दोन घटका मौज मारली तर, त्यांना नको कोण ह्मणूं शकणार ? जर त्यांचे पति त्यांची इच्छा तृप्त करण्यास असमर्थ असले, आणि आपल्या सुखासाठीं पैसे देणाऱ्या स्वैराचाऱ्याच्या अंगीं यौवनाचा भरपूर जोम जर असला, तर स्त्रियांनीं त्यांचाच आश्रय घेण्यांत चूक कोठें झाली ? आणि इथें तर स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळें त्यांनां हव्या त्या उपभोगाच्या वस्तु पैसे देऊन विकत घेतां येतात ! पैसा फेंकला, कीं मनाप्रमाणें मनुष्य, दोन घटका मजा उडविण्यासाठीं तेव्हांच मिळवितां येतो !

जर हा असा प्रकार अमेरिकेंत नसता, तर येथें जातीजातींतील हा भयंकर द्वेष, नीग्रोंचे खून करणें, त्यांना जिवंत जाळणें, इ. गोष्टी ज्या दिसून येतात त्या

आढळल्या ना ! सांपत्तिक दृष्ट्या ज़र एक वर्ग हीन दर्जाचा असेल तर दुसरा वर्ग त्यांना तिरस्कारानें लेखील, कदाचित त्यांच्याशीं एकत्र व्यवहारही करणार नाहीं. परंतु द्वेषाचें पिशाच्च अंतःकरणांत थैमान घालीत असल्यावांचून असले पाशवी अत्याचार करण्यास मात्र तो कधीं प्रवृत्त होणार नाहीं; आणि वारंवार प्रगट होणारे नीग्रोंच्या छळाचे अनान्वित प्रकारही त्याशिवाय घडूं शकणार नाहींतच. नीग्रोंना ज्या दुष्टतेनें वागविण्यांत येतें त्यांचें कारण दुसरें तिसरें कांहीं नसून हजारों श्वेतकाय स्त्रीपुरुषांचा नीग्रो स्त्रीपुरुषांशीं असलेला वैषयिक संबंध, हेंच आहे. आणि ह्या द्वेषाचें स्वरूप किती हिडीस आहे तें, अशी एखादी गोष्ट उघडकीस आली तर त्या नीग्रोवर घेण्यांत येणाऱ्या सूडावरून तें लक्षांत येतें !

प्रकरण १३ वें.

मेणकट डाग.

मार्गारेट अस्क्विथनें, लेखिका ह्मणून प्रसिद्ध होण्यापूर्वीच, आपल्या अश्रुतपूर्व आणि विचित्र वाटणाऱ्या स्पष्टोक्तींवद्दल बराच्सा लौकिक मिळवून ठेवला होता परंतु तिची अशी ख्याति असून सुद्धां रावर्ट लूई स्टीव्हन्स व त्यांची पत्नी हे ज्या शय्येवर झोंपलें होते, त्या शय्येवरील ओशट डागाचा जेव्हां ह्या बाईनें उल्लेख केलेला इंग्रज जनतेनें ऐकला, त्यावेळीं त्यांना किती चमत्कारिक वाटलें आणि ह्या उल्लेख करणाऱ्या व्यक्तीच्या विचिपणानें त्यांच्या अंतःकरणाला कसा धक्का बसला, हें अद्यापि लोक विसरलेले नाहींत. अमेरिकन वस्तुस्थितीचा आणि नीतिमत्तेचा अभ्यास केला असतां आपणांस असें दिसून येईल कीं हें 'ओशट' ह्मणजे कधींही न धुतले जाणारे डाग फक्त विवाहितांच्या शय्येवरच दिसूं शकतात असें नाहीं !

स्त्रीपुरुषसंबंधाचा प्रश्न ह्मणजे अमेरिकन जातीच्या जीवनाचा प्रश्न होऊन बसला आहे. त्यांत फरक होताहेत, प्रत्येक वर्षाला त्याचें स्वरूप

बदलते आहे, परंतु तरीही ह्या जीवनाच्या कठोर, अज्ञात आणि अनंत भासणाऱ्या स्रोताचें भीषण स्वरूप मात्र बदलत नाहीं. तें आहे तसे राहतें. ह्या जीवनौघाचे निरनिराळ्या देशांत तेथील वस्तुकालपरिस्थिती-प्रमाणें निरनिराळे रूपभेद असत असतील; त्यांतील गुंतागुंती आणि त्यांचें परिणाम हे जेथें तेथें निरानिराळ्या स्वरूपाचे असतील, परंतु प्रत्येक ठिकाणीं ह्या प्रश्नाचें मूळ स्वरूप एकच असतें. ह्या प्रश्नानें अमेरिकेंत कोणकोणतीं भीषण स्वरूपें अमेरिकेंत धारण केलेलीं आहेत, तें आपण पाहिलें आहे. हे अनीतीचे कधींही नाहींसे न होणारे कलंक शिक्षणाविषयक संस्थांत कसें आढळतात. येथें स्त्रियांचें पाऊल कसें वांकडें पडतें आणि विवाहाच्या पवित्र बंधनाची कशी टर उडविण्यांत येते, हें सर्व विवेचन पूर्वी करण्यांत आलें आहे आणि ह्या सर्व कलंकाचें यथातथ्य स्वरूप मार्गारेट अस्क्वथच्या शब्दप्रयोगानें जितकें विषद होऊं शकतें तितकें तें अन्य शब्दप्रयोगानें होऊं शकत नाहीं, असे आम्हाला पटल्यावरून आम्ही त्या शब्दांनीं ह्या प्रकरणास सुरुवात केली आहे.

दुसऱ्या व्यक्तीच्या किंवा देशाच्या नीतिमत्तेची निंदा करीत बसणें थोडेसें आनंददायक अथवा स्वत:ची उन्नति घडवुन आणणारें कार्य आहे असें नाहीं. अशी चर्चा करीत असतांनां ज्या तिरस्करणीय वस्तुस्थितीचा चिखल माजणें अपरिहार्य आहे, त्या चिखलांत लोळणें, हेंही कांहीं प्रीतिकर नाहीं. वेश्याव्यवसाय आणि अनीतीचे कलंक, हे जगांतील कोणत्याही देशांत सांपडणारच; वेश्या आणि गल्ल्याकुच्यांतून दिवसाढवळ्या हिंडणाऱ्या बाजार बसव्या ह्या फक्त अमेरिकेंतच आहेत असें नाहीं,-जगाच्या प्रवासास निघालेल्या प्रवाश्याला, थोडेसे पैसे खर्च करायची तयारी असल्यास, तो जाईल त्या देशांत आणि शहरांत ह्यांचें दर्शन होऊं शकतें. तेव्हां अमेरिकेंत वेश्याव्यवसाय आहे, एवढ्यावरूनच त्यावर कोरडे ओढण्याचें आणि त्यांची आंकडेवारी प्रसिद्ध करून त्यांच्याबद्दल तिरस्कार व्यक्त करण्याचें आम्हाला कांहीं कारण नाहीं. परंतु जेव्हां शामकाका, मी ख्रिश्चियन आहे असा तोरा मिरवितात, ज्यावेळेस ते माझा परमेश्वरावर विश्वास आहे आणि परमेश्वरानें बायबलमध्यें वर्णन केलेले आचारधर्म हेच खरे मनुष्याचे आचारधर्म आहेत,

असा माझा विश्वास आहे हें सर्व जगाला कंठरवानें ओरडून सांगतात; आणि जेव्हां दरवर्षीं जगांतील यच्चावत् रानटी असद्धर्मी लोकांमध्यें सद्धर्माचा प्रसार व्हावा म्हणून बायबलचीं कोट्यावधी पुस्तकें ते जगभर फुकट वाटीत सुटतात हें आपण पाहतों, त्यावेळीं, मोझेस व त्यानंतर आलेल्या देवदूतांनीं सांगितलेले नीतीचे नियम शेंकडा ७७ धार्मिक वृत्तीच्या लोकांच्या वसलेल्या* ह्या देशांत कसे काय पाळले जात आहेत त्याचें निरिक्षण करण्याचें कूतूहल आमच्या अंतःकरणांत उत्पन्न झालें तर ह्यांत कांहीं नवल नाहीं ! अविवाहित स्त्रीशीं व्यभिचार, परस्त्रीसंभोग, वेश्यागमन, भ्रूणहत्या, अनैसर्गिक संभोग इ. पापें हीं उरलेल्या २३ टक्के चर्चमध्यें न जाणाऱ्या आणि ३ टक्के बायबलच्या सत्यवादित्वावर विश्वास न ठेवणाऱ्या, अश्या असद्धर्मीय लोकांकडूनच येथें आचरण्यांत येतात कां ?

ह्या प्रश्नाचें उत्तर शोधतांना निदर्शनास आलेल्या अत्यंत असंभवनीय व सकृद्दर्शनीय अविश्वसनीय अश्या गोष्टीमुळेंच हे प्रकरण लिहावें लागत आहे.

मनुष्य समाजाच्या व समाजसंस्थांच्या इतिहासाचें पर्यालोचन केलें असतां आपणास असें दिसून येतें कीं प्रारंभांत विवाहाचे कोणतेही विधिनियम किंवा उपस्कार नव्हते; ते ओघाओघानें, अर्भकाचें प्रतिपालन, गर्भिणी स्त्रीबद्दलचा जबाबदारी, ह्या सारख्या आवश्यकता जसजशा भासूं लागल्या,: तसतसे अमलांत येऊं लागले. बहुपत्नीत्व किंवा बहुपतीत्व ह्या गोष्टी विशिष्ट जातीच्या अथवा समाजाच्या आवश्यकतेप्रमाणें तेथें तेथें मान्य करण्यांत आलें हें खरें, परंतु विवाहसंस्थेची जी वृद्धि झालेली आपणांस दिसते तीं सर्व, एकपत्नीत्व हेंच आदर्श असावें असें मानूनच घडविण्यांत आलेली आहे, हें अगदीं स्पष्ट आहे. तारुण्यांतील प्रीतिभावना व संभोगेच्छा, ह्यांतून, पुढें वयस्क स्थितींत मिळणाऱ्या सुखसमाधानाचें मधुर आश्वासन, यशसाधनासाठीं धडपडण्याचे, विफलतेला सफलतेचें व निराशेला आशेंत परिणत करण्याचे, मातीलाही सोने बनविण्याचे असे प्रयत्न करण्यास मनुष्याला प्रवृत्त करणारें आत्मिक सौहार्द, ह्या गोष्टीच

* पहा प्रकरण १४ वें.

एका पुरुषाला एकच स्त्री व एका स्त्रीला एकच पुरुष ह्या आदर्शाकडे समाजाला नेणाऱ्या प्रेरक शक्ति होत. सर्व युगांतील कवींनीं व लेखकांनीं ह्याच आदर्शाच्या कीर्तिगाथा वर्णिल्या आहेत, आणि प्रत्येक देशांतील तरुणाचें हेंच आदर्शजीवन असतें! अगदीं प्राचीन काळापासूनच वेश्यागमनाकडे धर्म व समाज तिरस्काराच्याच दृष्टीनें पहात असलेला आढळतो. मनुष्याच्या दुर्बलतेकडे दुर्लक्ष करण्याच्या बुद्धीनें आणि विशेषेंकरून वैयक्तिक खासगी नीतिसंबंधांत हात घालण्याच्या समाजाच्या असमर्थतेमुळेंच वेश्याव्यवसाय आजपर्यंत समाजांतून नष्ट होऊं शकलेला नाहीं. तरी पण लंपटता, पैशासाठीं भाड्यानें आपला देह वाटेल त्या पुरुषाला दुसरा कांहींही विचार न करतां विकावयास तयार होणें ही गोष्ट प्रत्येक धर्मानें अत्यंत तीव्रतेनें निषिद्धच ठरविलेली आहे. अगदीं इस्लाम धर्मामध्यें सुद्धां जेथें पुरुषानें वाटेल तितक्या बायका कराव्या अशी अनुज्ञा धर्मानें दिलेली आहे,—ही बहुपत्नीकत्वाची अनुज्ञा पुरुषांचा अनेक स्त्रियांशीं होणारा अनैतिक संबंध टाळण्यासाठीं व संबंधाने उत्पन्न झालेल्या मुलांची सोय करण्यासाठींच दिलेली आहे. आणि त्या धर्माची ही अनुज्ञा, अत्यंत कडक शिस्तीनें व कायद्यांनीं संरक्षिलेली आहे. इस्लाम धर्माच्या अनुयायांमध्यें वेश्यागमन हें मदिरापान किंवा डुकराचें मांस खाण्याइतकेंच निषिद्ध मानलेलें आहे. ख्रिश्चियन नीतिशास्त्र सुद्धां वेश्यागमनाबद्दल तिरस्कारच व्यक्त करतें. मनुष्याची निसर्गजात प्रवृत्ति एकभार्यत्वाकडे आहे किंवा बहुभार्यत्वाकडे आहे, ह्या गोष्टीचा उहापोह करणें येथें अप्रासंगिक होईल. पुरुषानें आजन्म आपलं प्रेम एका स्त्रीचे ठायींच स्थिर करून ठेवणें किंवा स्त्रीनें आपली संभोगेच्छा फक्त आपल्या पतीच्या सहवासानेंच पूर्ण करून समाधान मानणें हें खरोखरच कितपत शक्य आहे, हा एक मोठा प्रश्नच आहे. ह्या प्रश्नाकडे अशा दृष्टीनें पाहणाऱ्यांनां आज अस्तित्वांत असलेले विवाहाचे आदर्श म्हणजे ज्या युगांत स्त्री म्हणजे पुरुषांची गुलाम अशी समजूत रूढ होती, त्या प्राचीन रानटी काळाच्या संस्कारांचे अवशेष आहेत, असें वाटतें! "जें कांहीं माझें तें फक्त माझें स्वतःचेच आहे!" एकपत्नीत्वाची रूढि अमलांत आणण्याचें कारण कदाचित् पुत्राचें जनकत्

खात्रीलायक असावें आणि स्वतःच्या घराचें परक्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण व्हावें, ह्या हेतूंमध्येंच असावें. हीं कारणें अगदीं खरीं असतील, आणि विविधस्त्रीसंभोगेच्छा ही मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे हें ही कदाचित् खरें असेल; पण मग, आम्ही स्वाश्चेअन आहोंत असा आपण दिमाख तरी मिरवूं नये! आपण आपल्या सामाजिक आवश्यकतांनां अनुकूल अशी धर्माची पुनर्घटना तरी करून घेतली पाहिजे नाहीं तर धर्माला अनुरूप अशी समाजाची तरी घडी बसविली पाहिजे. जर स्त्री व पुरुष ह्यांची संभोगेच्छा खरोखरच नैसर्गिकपणेंच इतकी प्रबल असेल कीं त्यासाठीं विवाहाची पर्वा न करतां वाटेल तसे संबंध घडून येणें आवश्यक वाटावें, तर मग समाजानें मॉर्मानिझम्चा तिरस्कार करण्याचें सोडून द्यायला पाहिजे. बहुपत्नीकत्व मान्य केलें पाहिजे आणि बहुपतित्वाला कायदेशीर संमति दिली पाहिजे! अर्थातच, बायबल पुन्हा लिहायला पाहिजे आणि ६ वें कलम तर अजीबात पुसूनच टाकलें पाहिजे!

रानटी जातीमध्यें आज सुद्धां वेश्याव्यवसायाचें चिन्ह सुद्धां आढळत नाहीं, आणि लोकांचें मत कांहींहीं असो, परंतु हा व्यवसाय अश्या स्वरूपांत ह्या सुधारणेबरोबरच समाजांत शिरला आहे, ह्यांत संशय नाहीं. लग्नाशिवाय असणारा मैथुनविषयक संबंध, हाच वेश्याव्यवसायाचा अर्थ आहे. अर्थातच, समाजांत ज्या प्रमाणांत सुधारणा अधिक, त्या प्रमाणांत असें संबंध घडून येण्यास अनुकूल अश्या परिस्थितीची प्राप्तिही अधिक, हें उघड आहे! आजपर्यंत जगामध्यें वेश्याचार म्हणजे स्त्रीनें पैश्यासाठीं पुरुषाची कामलालसा तृप्त करण्यास आपला देह देणें असाच अर्थ केला जातो; परंतु पुढें वर्णन केलेल्या गोष्टींवरून, अमेरिकेंत ह्या शब्दाचा फक्त एवढाच अर्थ नसून त्यांत, स्त्रीनें आपली विषयवासना तृप्त करून घेण्यासाठीं पैसे देऊन पुरुषाचा देह भाड्यानें घेणें, असाही होतो, हें वाचकांच्या निदर्शनास येईल! कित्येक रानटी जातींमध्यें व्यभिचाराबद्दल जो जबरदस्त दंड देण्यांत येतो, त्यावरून तेथें वेश्याव्यवसाय अस्तित्वांत नाहीं हें सिद्ध होतें. युगांडामध्यें बेकायदेशीर अर्भकाच्या मातापित्यांना हातपाय बांधून लेक व्हिक्टोरिआमध्यें फेंकून देण्यांत

येतें. आस्ट्रोलियाच्या भूमीला इंग्लंडांतील लोकांचे पांढरे पाय लागण्यापूर्वी तेथील मूळ रहिवाशी अविवाहित स्त्रीशीं बदकर्म करणाऱ्याला मृत्यूची शिक्षा देत असत. पूर्व आफ्रिकेंतील ठेक्यू लोकांमध्यें जारकर्म करणाऱ्याला तीव्र शिक्षा ठोठावण्यांत येई जी त्या मुलीचा खून करणाऱ्यास देण्यांत आली असती. आपल्या स्त्रियांच्या व्यभिचाराकडे रानटी जाति कोणत्या दृष्टीनें पहात असतात, ह्याची अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. त्या लोकांना वेश्याव्यवसाय ठाऊकच नव्हता; परंतु आपल्या स्वातंत्र्याच्या व उदात्त संस्कृतीच्या पताका फडकवीत सुधारणा देवी तेथें शिरली आणि सर्वच प्रकार निराळा झाला !

एखाद्या हलक्या घाणेरड्या स्त्रीबरोबर प्रेमालाप करण्याची एखाद्या सदभिरुचिसंपन्न तरुणाला जी किळस वाटे ती, एखाद्या नरपशूच्या प्रेमाविलासास मान तुकविणाऱ्या अनिंद्य सुंदर युवतीच्या लज्जेपेक्षां अधिक असते कीं काय, ह्याबद्दल कदाचित् मतभेद असूं शकतील; परंतु आम्हाला हें मात्र ठाऊक आहे कीं, रस्त्यावरच्या भिकारणीशींही रणमाण होणाऱ्या गुलहौशी गुलजाराप्रमाणेंच, स्वखुशीनें ज्याला पशुवत् मानण्यांत येतें त्याच पुरुषाला देहसमर्पण करणाऱ्या श्वेतांगी अप्सरांची अमेरिकेंत कमतरता नाहीं !

१९१८ पावेतो, कायद्याची परिभाषा नसल्यामुळें, शब्दकोशांतील अर्थास अनुसरून, वेश्या ह्मणजे 'पैश्यासाठीं सारासारभेद न पाहतां बदकर्म करणारी स्त्री' असाच अर्थ यूनायटेड स्टेटसमध्यें करण्यांत येत असे. आयोवा आणि इलिआनॉइस येथें असा प्रश्न उपस्थित झाला होता कीं, स्त्रीप्रमाणें पुरुषही ह्या गुन्ह्याबाबत दोषी धरला जाऊं शकतो किंवा नाहीं ? परंतु त्यावेळीं तेथील कोर्टांनीं असा निकाल दिला की, ह्या व्याख्येंत फक्त स्त्रियांचाच तेवढा अंतर्भाव होऊं शकतो.* परंतु पुढें जेव्हां नंबर १ चा फॉर्मुला घडविण्यांत आला, त्यावेळीं वेश्याव्यवसाय करणाऱ्यांत स्त्रियाप्रमाणें पुरुषांचाही अंतर्भाव होऊं शकतो असें दिसून आल्यावरून त्या कलमांत पुरुषांनाही

* लॉज ऑफ सेक्स. पान ११६.

गुन्हाविषयांत आलें आणि त्याप्रमाणें घडविण्यांत आलेल्या कायद्यानें, पुष्कळश्या संस्थानांत खालील कलम लागू झालेलें आहे:—

"सेक्शन २. — 'वेश्याव्यवसाय' ह्या शब्दाचा अर्थ, पैशाच्या मोबदल्यांत संभोगासाठीं शरीर देणें किंवा घेणें असा करण्यांत येईल, व त्याचा, पैशाचा मोबदला न घेतांही मनसोक्त (अविचारपूर्ण) विषयसंभोगासाठीं देह देणें किंवा घेणें, असाही करण्यांत येईल."

हें कलम दोन मुद्यांसाठीं महत्वाचें आहे. ह्यांत दोन गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत; (१) ह्या व्यवसायांत पडणारी व्यक्ति स्त्रीच असली पाहिजे असें नाहीं, आणि (२) पैशाचा मोबदला न घेतांही वाटेल तितक्या वेळां व त्याला देह अर्पण करण्याची मुभा. जर ह्यांत फक्त स्त्रियांचाच समावेश होतो असें नाहीं. हें जर खरें, तर त्याचा असाच अर्थ होतो कीं, येथें स्त्रियांप्रमाणें पुरुषही स्त्रीच्या गरजेप्रमाणें आपला देह अर्पण करण्यास सिद्ध असतात हें येथील कायद्यानें लक्षांत घेतलें आहे. इतर देशांमध्यें वेश्या आपल्या देहदानाचा मोबदला पैशाच्या रूपांत घेते असेंच आपण ऐकतों; पैसे न घेतां सुद्धां मनसोक्त देहदान करणाऱ्या 'वेश्यांचें' उदाहरण आपण कधींच ऐकलेलें नाहीं. देहदानाबद्दल द्रव्यदान न स्वीकारणाऱ्या ह्या स्त्रिया असतात तरी कोण?

अमेरिकेंतील प्रचलित नीतिमत्तेवर, फॉर्म लॉ नं. १, सेक्शन २ ह्यापेक्षां अधिक विचारी अशी आणखी कोणती टीका असायला पाहिजे?

यूनायटेड स्टेट्समधील सर्व वेश्यांचा पूर्ण आंकडा आह्माला मिळत नाहीं; ह्याचें मुख्य कारण हेंच कीं पुष्कळश्या स्त्रिया हा धंदा करीत असूनही वेश्या म्हणून ओळखल्या जाऊं शकत नाहींत. परंतु जीं कांहीं प्रमाणें हातीं लागतात, तीं त्यांच्या खऱ्या परिस्थितीचें सत्यस्वरूप प्रदर्शित करावयास पुरेशीं असतात. हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया सर्व दर्जांच्या असतात. सभ्य, सभावित व श्रीमंत आईबापांच्या मुलीही पैसे न घेतां आपलें देहदान करतांना आढळतात इतकेंच नव्हे तर, त्या ह्या आनंदोपभोगाची प्राप्ति व्हावी म्हणून, कुंटिणखान्याच्या मालकिणींना ह्या पैसेही देतात. अश्या

वर्गातील तरुणी आपआपल्या घरींच राहतात आणि जेव्हां त्यांना बोलावण्यांत येईल त्यावेळीं किंवा जेव्हां स्वतःला इच्छा उत्पन्न होईल त्यावेळीं त्या संकेतगृहांत जाऊन येतात. अश्या सुखवस्तु विलासिनी वेश्यांचा आंकडा नक्की किती आहे तें समजणेंच शक्य नाहीं. तेव्हां ही सूचना करून ठेवून आतां आह्मी यूनायटेड स्टेटसमध्यें ज्या वेश्या ह्मणून ओळखल्या जातात अश्या स्त्रिया किती आहेत त्याची मोजदाद करण्याकडे वळतों.

१९११, १९१२, १९१३ ह्या वर्षांत न्यायखात्याच्या फेडरल खात्यानें ही मोजदाद करण्याचें व आंकडे जमा झाल्यानंतर सर्व दृष्टीनें विचार करून शेवटचा आंकडा ठरविण्याचें कार्य आरंभिलें; त्यांनीं असें ठरविलें कीं यूनायटेड स्टेटसमध्यें उघड उघड देहविक्रय करणाऱ्या १,००,००० स्त्रिया आहेत.* ह्यांत रस्तोरस्तीं जनसमुदायांत मिसळून गिऱ्हाईक धुंडाळीत हिंडणाऱ्या किंवा इतर सर्वविश्रुत मार्गानें देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांची गणना केलेले नव्हती. वोलेस्टनचें असें मत आहे कीं, येथें २,००,००० स्त्रिया अनीतीच्या मार्गाचें अनुसरण करणाऱ्या आहेत असें ह्मणणें सत्याला सोडून होणार नाहीं * आर. एन्. विल्सनच्या मतें तर यूनायटेड स्टेटस मधील वेश्यांची संख्या ५,००,००० पर्यंत असावी. हा आंकडा फारच मोठा वाटत असल्यास ही संख्या २,००,००० च्या वर आहे असें धरून चालण्यास हरकत नाहीं. आमचें असें मत आहे कीं आपण ३,००,००० आणि ४,००,००० मध्यें कोठें तरी ही संख्या असावी असें गृहीत धरलें तर तें चुकीचें ठरणार नाहीं.

पारिस्थितीचें पूर्ण ज्ञान असलेल्या संशोधकांचे असें मत आहे कीं वेश्या दर रोज पन्नास पन्नास पुरुषांची कामवासना तृप्त करतांना आढळतात. हें प्रमाण कांहीं बाबतींत जरी खरें असलें तरी सर्व साधारणपणें १० ते १५ गिऱ्हाइकांची गरज भागविणें हें काम प्रत्येक वेश्या दररोज करीत असते असें ह्मणतां येईल. ही गिऱ्हाईकें सर्व जातीचीं, वर्गांची, श्रीमंत, गरीब, वृद्ध, तरुण

---

* प्रास्टिटयूशन इन धि यूनायटेड स्टेटस, पान ३८.

विवाहित, अविवाहित,- प्रकारचे ज्यांनां ज्यानां ह्मणून बाहेरख्यालाचा सवय लागली आहे ते असतात ! स्त्रियांच्याच बाबतींत ह्मणायचें झालें, तर त्यांच्या पैकीं फारच थोड्यांचें गिऱ्हाइक बांधलेलें असें असतें; बहुतेकांनां नित्य नव्या-शींच प्रसंग असतो असें जरी असलें आणि एकच मनुष्य एकाच वेश्येच्या घरीं आठवड्यांतून दोन किंवा तीन वेळां जात नसावा असें जरी गृहीत धरलें, तरी आपल्यास कांहीं मोठे भयंकर स्वरूपाचे निष्कर्ष काढावे लागतील. वेश्यांची संख्या ३,००,००० आहे असें गृहीत धरलें आणि प्रत्येकीकडे दररोज १० गिऱ्हाईक फेरी घालतात असें मानलें तर यूनायटेड स्टेटसमध्यें दररोज १,००,०००० वेश्यामैथुनाचे प्रकार घडतात असें आपणांस दिसून येते. आठवड्यांतून फक्त एकदांच एक पुरुष विवाहित वेश्येच्या घरीं जातो असें जर आपण मानलें तर यूनायटेड स्टेटसच्या नागरिकांपैकीं ३५,००,००० पुरुष रंडीबाज आहेत हें सिद्ध होते. ह्यांत प्रवासी, कधीं कधीं मजा मारणारे इ० लोकांचा समावेश केलेला नाहीं. अशांची संख्या फार फार झाले तर २,००,००० च्या वर जाणार नाहीं, असें आपण गृहीत धरूं.

दराचें आंकडें एक डॉलर पासून तें एक हजार डॉलर पर्यंत गिऱ्हाईक माल आणि ज्या घरांत हा व्यवहार होणार असेल त्यांतील सुखसोयी इत्यादिकांवर अवलंबून असतो. वोलेस्टननें, एका खास राखून ठेवण्याचा, गिऱ्हाइकाच्या खर्चाचा खर्डा प्रसिद्ध केला आहे. हा खर्डा न्यायकोर्टांतील एका खटल्यांत पुढें मांडण्यांत आला होता.

सौ. एस्...नी अशी साक्ष दिली कीं सी...हा तिच्या घरीं १९१५ सालीं ३१ जानेवारीस सायंकाळीं आला आणि ५ फेब्रुवारीपर्यंत राहिला. साक्षीदारानें असेंही सांगितलें कीं त्याची खोली चांगल्या श्रीमंत वैभवानें भुषविलेली होती आणि त्यानें विनंती केल्यावरून तिनें त्याच्या उपहारासाठीं स्वतःच खर्च केला. त्याच्या उपहाराच्या व इतर कांहीं आवश्यक गोष्टींच्या बाबत झालेला खर्च खालीं दिला आहे:-

हेलेन आर. हिला दिले.	...	४००·०० सेंट
फ्लॉरेन्स एल. हिला दिले.	...	६४०·०० ,,
मेबेल टी. हिला दिले.	...	१२०·०० ,,
ॲना बी. हिला दिले.	...	२०.०० ,,
डॉक्टर एल. ह्यांना दिले.	...	२५·०० ,,
मद्य, सिगर, शँपेन सिगारेटस इ० वद्दल खर्च.	...	३९८·०० ,,
मथून जे कट्टून आणलेल्या जेवणाबद्दल दिले.	...	प्रत्येक जेवणाचे ५·०० ,,

(किती तें नमूद केले नाहीं)*

सर्वसाधारण मनुष्याला एवढा खर्च झेंपत नाही. आणि वेळेप्रमाणें एक पासून पांच डालर हा सर्वसाधारण दर आहे असें ह्मणतां येईल.

यूनायटेड स्टेटसमध्यें वेश्याव्यवसाय किती व कश्या स्वरूपांत चालतो त्याची यथार्थ कल्पना येण्यासाठीं तेथील कांहीं वेश्यागारांची वर्णनें देणें अवश्य आहे. येथें ह्या वेश्यागारांची स्वरूपें दोन प्रकारची असतात. एक, जेथें ठराव करण्यांत येतो आणि दुसरें जेथें प्रत्यक्ष सहवास होतो. पहिल्या वर्गांत राजरस्ते नृत्यगृहें, फिरायळा जाण्याची उद्यानें मेळे आणि तमाशे, करमणूकीची स्थळें, नोकरी देणाऱ्या संस्थांचीं ऑफिसें आणि आत्तां आत्तांच निर्माण झालेल्या नवीन सार्वजानिक मोटारगाड्या ह्यांचा समावेश होतो. दुसऱ्या वर्गांत कुंटणगृहें ज्यांना ब्रॉथेल किंवा पार्लर हौस असें ह्मणतात–हॉटेलें, संकेतगृहें, चंपी करण्याची दुकानें आणि नखें वगैरे स्वच्छ करून देण्यासाठीं असलेलें सौंदर्यप्रसाधानगृहें (Manicure soloras) हीं येतात.

गिऱ्हाईक मिळण्याचा खुला खुला मार्ग ह्मणजे रस्त्यांतच त्यांन गांठणें, हा होय. परंतु आतांशा रस्त्यावर गिऱ्हाईक मिळविण्याचा जुना प्रकार नाहींसा झाला आहे. ताज्या दम्याची व आजतागाईत अश्या मार्गांचा

* प्रास्टिटयूशन इन यूनायटेड स्टेटस पान ७९.

अवलंब करणारी पण्यांगना आपलें गिऱ्हाईक खेंचण्याचे नवीन मार्ग अमलांत आणीत असते. साध्या कपड्यांत रस्त्यांवरून हिंडणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांमुळें त्यांना आपल्या मार्गांमध्यें असे बदल करणें भाग पडलें आहे. आजकालची ही रस्त्याची राणी अगदीं झकपक पोषाख करून दुकानांच्या द्वारासमोर रेंगाळत उभी राहते, आणि होतकरू गिऱ्हाईकाला आपल्याशीं बोलणें सुरू करूं देऊन थोडें हिंड़ावयास येण्याविषयीं किंवा शेजारच्या उपहारगृहांत येण्याविषयीं विनंति करूं देते. तेथें गेल्यानंतर त्यांना सर्व सौदा नक्की ठरावेतां येतो. हा रस्त्यावरील प्रकार सायंकाळीं आठ पासून अकरा वाजेपर्यंत फारच धडाक्यांत सुरू असतो; परंतु तसें पाहिलें तर दोन प्रहर टळल्यानंतर लवकरच ह्या तरुणी रस्त्यांवर हिंडूं फिरूं लागतात. सुखाचा शोध करीत हिंडणाऱ्या तरुण-तरुणींचें आवडतीं भेटीचीं ठिकाणें ह्मणजे नाचगृह अथवा पार्क (उद्यान) होत. सार्वजनिक मोटारगाड्या ह्या असल्या दुर्गुणांना प्रोत्साहन देणारें एक नवीन साधन निर्माण झालेलें आहे; येथें पुष्कळ नवशिके पहिला धडा शिकतात. कांहीं कांहीं गाड्यांत तर आपल्या तरुण भाडेकऱ्यांची सोय करून मर्जी संपादन करून ठेवण्यासाठीं, ह्या स्वरूपाच्या खास सोयी करून ठेवलेल्या असतात.*

कुंटणखाने (Brothel अथवा Parlour House) ह्मणजे निव्वळ वेश्यासंभोगासाठींच खास राखून ठेवण्यांत आलेलीं घरें होत. वेश्या ह्या घरांत भाड्यानें राहतात व राहण्या व जेवणखाण्याबद्दल घर मालकिणीला भाडें देतात. ह्या घरांत पलंग असलेल्या खोल्यांच्या रांगाच्या रांगा असतात, आणि ह्यांपैकी एका खोलींत गिऱ्हाईकाला नेण्यांत येतें. कुंटणखान्यांत त्या लोकवस्तीच्या व गिऱ्हाईकांच्या दर्ज्याच्या मानानें श्रीमंती सामान सुमान वगैरे ठेवलेलें असतें, आणि तेथें जाणाऱ्या इसमापासून त्या विवक्षित कुंटणखान्याच्या दर्ज्याला साजेल असा दर आकारण्यांत येतो. वेश्याचारासाठीं हॉटेल्सचा करण्यांत येणारा उपयोग, हें अमेरिकेंतील बऱ्याचश्या प्रमुख शहरांचें एक मोठें दूषण आहे.

* प्रास्टिट्यूशन इन यूनायटेड स्टेटस. पान १५३.

पुष्कळशीं हॉटेले तर आपली गिऱ्हाइकी वाढवण्यासाठीं व बाहेर देशचे प्रवासी तेथेंच उतरावे ह्मणून सुंदर सुंदर वेश्या मुद्दाम आपल्या येथें ठेवून घेत असतात! यूनायटेड स्टेटसमध्यें प्रवास करीत असतांना माझ्या स्वतःच्याच निदर्शनास अशीं किती तरी हॉटेलें आलीं कीं ज्यांना हॉटेल ह्मणण्यापेक्षां एक दर्ज्याचें वेश्यागृह ह्मणणेंच अधिक सयुक्तिक झालें असतें. येथें अगदीं थोड्या किंमतींतच हॉटेलमध्यें राहणाऱ्या सुंदरींची ओळख करून घेणें अगदीं सहज असतें; आणि आपल्या गिऱ्हाईकांची वाढ करण्यासाठीं ह्या हॉटेलांत नीग्रो वाढपी नोकर ठेवण्यांत येतात, ज्यांच्याकरितां पुष्कळशीं स्त्री–गिऱ्हाइकेंही ह्याच हॉटेलांत येऊन उतरतात!

संकेतगृह आणि भेटण्याचें गृह (Call House) हीं दोन वेश्यागृहें फक्त अमेरिकेंतच आढळतात. संकेतगृह बाह्यतः कोणातरी सच्छील कुटुंबाचें राहण्याचें घर आहे असें वाटतें, आणि अश्या संरक्षणाचा फायदा घेऊन मारून धंदा करणाऱ्या स्त्रिया घेत असतात. अश्या घराच्या मालकांच्या किंवा मालकिणीच्या जवळ तेथें येऊं इच्छिणाऱ्या तरुणींची यादी असते. एखादा सोईस्कर होतकरू पुरुष तेथें आला, किंवा तरुणीलाच इच्छा झाली, कीं मग ते त्या घरीं जातात. असें कबूल करण्यांत आलेलें आहे कीं अगदीं सभ्य ह्मणविले जाणारे समाजाला भूषणभूत असे सद्गृहस्थ* आणि विवाहित सच्छील (?) गरती स्त्रिया* हे त्या घरीं जमा होत असतात. अश्या प्रकारचें संकेतगृह, फॉर्म ला १ सेक्शन दोन प्रमाणें वेश्या व्यवसायाची जी फार लांबरुंद व अतिव्यापी व्याख्या करण्यांत आली आहे त्याच्या कारणाचें समर्थन करतें; कारण येथें गोळा होणाऱ्या व्यक्ति "पैश्याचा मोबदला न घेतांही मनसोक्त व्यभिचार करणें ह्मणजे वेश्याव्यवसाय होय." ह्या व्याख्येच्या अंतर्भूत होतात, अश्या प्रकारचीं संकेतगृहें किती लोकप्रिय आहेत हें पुढें सांगितलेल्या गोष्टीकडे लक्ष दिल्यानें वाचकांच्या ध्यानांत येईल. शोध केल्यानंतर एका शहरांत अशीं ७८ घरें असलेलीं आढळून आलीं; दुसऱ्या

---

* प्रास्टिटयूशन इन यूनायटेड स्टेटस. पान १३८ व ९६.

एका शहरांत ३३ व तिसऱ्या शहरांत ४३ असे या संकेतागृहांचे आंकडे दिसून आले.* हीं गृहें ह्या शहरांतून उघड उघड कुंटिणखान्यांच्या व वेश्यांसाठीं राखून ठेविलेल्या भागाच्या बरोबरच अस्तित्वांत असतात, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. एका सूक्ष्म निरीक्षकाचें असें ह्मणणें आहे कीं, "अशा स्वरूपाचीं ठिकाणें अमेरिकन शहरांत थोडीं थोडकीं नाहींत!"*

कांहीं कांहीं वेश्यागृहामध्यें गिऱ्हाइकांना त्यांच्या हौशीप्रमाणें संभोगाचे अनैसर्गिक प्रकारही आचरूं देण्याची संधी देण्यांत येत असते. केशकर्तनगृह शरीरमर्दनगृह, सौंदर्यप्रसाधनगृह इत्यादि स्थलें ह्मणजे वेश्यागारांवरील अच्छादनाप्रमाणें उपयोगांत आणलीं जात असतात. अशा स्थळीं पुरुषांच्या शोधांत असलेल्या स्त्रिया आणि स्त्रियांच्या शोधांत असलेले पुरुष, असे सर्वच जातात. स्त्रीगिऱ्हाईकांनां येथील नीग्रो व मंगोलिअन परिचारकांबद्दल विशेष आवड असलेली आढळून येते:—

"एवढें सांगितलें ह्मणजे पुरे आहे कीं, बहुतेक सर्वच शरीरमर्दनगृहें शोधून पाहिलीं असतां तीं वेश्यागृहापेक्षां निराळीं नाहींत असेंच आढळून आलें. एवढेंच नव्हे, तर तीं वेश्यागृहांपेक्षाही अधिक वाईट होतीं – वाईट ह्या शब्दाचा अर्थ, ज्या गोष्टींचा विचार मनांत आणणें सुद्धां किळसवाणें वाटतें अशा कांहीं गोष्टी, असा आहे..... येथें स्त्रिया पुरुषांशीं जसें वागतात याचें वर्णन करणें ह्या पेक्षांही अधिक कठिण आहे."*

मद्याचा वेश्यासंभोगाशीं फार निकटचा संबंध आहे. सौंदर्य प्रसाधन गृहांतून बेकायदेशीर संभोगसुखाप्रमाणेंच बेकायदेशीर मद्याचीही लयलूट करण्यांत येतें, असें आढळतें. स्टीफन ग्रॅहम ह्मणतो:-

"त्या नंतर आम्ही एका फारच लोकप्रिय अशा सौंदर्यप्रसाधन गृहांत (Beauty parlour) गेलों. ह्या संस्थेची भरभराट कांहीं विचारायलाच नको, कारण येथें एकाच वेळीं दोन दोन धंदे चालविण्यांत

---

* प्रॉस्टिटयूशन इन यूनायटेड स्टेटस पान १३८ व १३९.
* रिपोर्ट ऑफ सोशल सर्व्हिस कमेटी, रोशेन्टोल १९५ पान १७.

येतात. मागच्या दालनांत एक खिडकी आहे. ह्या खिडकींतून मधून मधून एक केंसाळ हात बाहेर येतो आणि अदृश्य सुंदरींना त्यांना हव्या असलेल्या विलासाचें प्रदान करून पुन्हा अदृश्य होतो. फारच अजब ठिकाण बुवा! येथें आपलीं नखें स्वच्छ करण्याकरितां म्हणून तरुणी जाते व स्वर्गसुखाची प्राप्ति पदरांत पाडून परत येते; केंस कुरळे करून घेण्यासाठीं म्हणून जाते आणि संभोगसरोवरांत येथेच्छ डुबून परत येते!''*

अत्यंत अर्थपूर्ण आणि सूचक चित्रें छापून व कोणत्या ठिकाणीं गेल्यानें कामपूर्ति करतां येईल त्या ठिकाणाच्या अगदीं झिरझिरीत आवरणाखालीं दडविलेल्या जाहिराती प्रसिद्ध करून, वर्तमानपत्रेंही वेश्याव्यवसायाला उत्तेजन देत असतात. ह्या वर्तमानपत्रांचा सर्वत्रच विशेषतः तरुण वर्गांत फार मोठा खप असतो, हें विश्वविद्यालयांतून केलेल्या चौकशीवरून सिद्ध करून दाखविण्यांत आलें आहे.

ह्या वर्गाच्या वाङ्मयासंबंधी लिहितांना अमेरिकेचे प्रख्यात लेखक हेड्रोन्क व्हॉन लून म्हणतातः आमच्या देशाच्या पुस्तकविक्रेत्यांच्या दुकानांत मणावरी पडलेल्या घाणेरड्या चोपड्यांनां १४ व्या लुईने सुद्धां आग लावण्याची आज्ञा दिली असती, आणि कॅसिनोव्हाला सुद्धां त्यांच्याकडे पाहून शरमेनें खाली मान घालावी लागली असती! ज्या ह्या वाङ्मयाला अमेरिकन युनिव्हर्सिट्यांतून विलक्षण मागणी असते, तें म्हणजे'' आजपर्यंत लोकपुढें कधींही ठेवण्यांत आले नसेल इतकें गलिच्छ बेशरमपणाचें व हलकटपणाने खचलेलें असें असते.'' अशा कांहीं मासिकांचीं नांवें हीं:—आर्ट लव्हर:-जिम जॅम जीम; दि जिन्क्स; आर्टिस ॲन्ड मॉडेल्स; हॉट डॉग, धे न्यू इव्ह; ड्रीम वर्ल्ड ऑफ लव्ह ॲन्ड रोमांस टु रोमान्सेस थ्रिल्ज बॅन्ग डॉन्स, ट्रू कन्फेशन्स; आर्टस इ. हीं मासिकें नांवाला कलेसाठीं म्हणून असतील परंतु वाचकांच्या मनावर व नीतिमत्तेवर त्यांचा अत्यंत ऱ्हासकारक परिणाम होतो. कांहीं दैनिक पत्रांत तर सबंध एक पान अशा ठिकाणांच्या जाहिरातींसाठीं राखून ठेव-

---

* न्यूयार्क नाइटस्. पान ४७.

ण्यांत येतें कीं जेथें गेल्यानें मनुष्याला अथवा-स्त्रीला आपली विषयवासना तृप्त करून घेतां येईल.

सर्वसाधारण वेश्येच्या मैथुनविषयक अनुभवाचा प्रारंभापासूनचा इतिहास ही फार उद्बोधक असतो. येथें वाचकांनीं एक गोष्ट अवश्य ध्यानांत ठेवावी कीं अमेरिकेंत पौर्वात्य देशाप्रमाणें वंशपरंपरागत-किंवा आजन्म सुद्धां वेश्या अशी कोणीच नसते. वेश्येची मुलगीही वेश्याच असावी, असा निर्बंध येथें मुळींच नाहीं. अमेरिकेंत वेश्या आपला धंदा सरासरी ६ वर्षे पर्यंत करतें. पहिल्यांदा संभोगाचा अनुभव घेतल्यानंतर जवळ जवळ वर्षानें ती आपल्या धंद्यास सुरुवात करते व सहा वर्षें तो केल्यानंतर ती त्यांतून आंग काढून घेते.* ह्या दुर्गुणाची चौकशी करतांना एका गोष्टीबद्दल सर्वांचेच जवळ जवळ एकमत असलेलें आढळलें. ती गोष्ट ही कीं सरासरी ५० टकें वेश्या मोलकरणी व इतर गृहकृत्यें करणाऱ्या स्त्री वर्गापैकीं असतात. ह्यावरून कुटुंबातील नोकरांचें वातावरण कसें असावे हें वाचकांच्या ध्यानात येईल * उरलेल्या ५० टक्के वेश्या निरनिराळे उद्योग करणाऱ्या स्त्री वर्गापैकीं असतात उदाहरणार्थ चित्रकारापुढें बसणाऱ्या (Artist Models) लघुलिपी लेखिका (stenographers) दुकानांत विक्री करणाऱ्या, नर्सेस इत्यादी पुष्कळ वेळांत वेश्येचा धंदा सुरू केल्यानंतर सुद्धा गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं म्हणून ह्या स्त्रिया हे निरनिराळे व्यवसाय सुरूंच ठेवतात. मुलींचे अल्पवयांतच अधःपतन हें त्यांच्या पुढील आयुष्याची अशी नासाडी करणारे एक प्रमुख कारण आहे. चौकशीअंतीं* असें दिसून आलें आहे कीं १७ टक्यापेक्षां अधिक वेश्यांचें पहिले वांकडे पाऊल त्यांच्या वयाच्या १५ व्या व त्याच्याही खालील वर्षीं पडलेलें असते. इतक्यांच स्त्रियानीं १६ वें वर्षीं पहिल्यांदा मैथुनोपभोग घेतलेला असतो आणि शेंकडा ३२ स्त्रियांनीं १७ व्या व १८ व्या वर्षांच्या दरम्यान ह्या मौजेचा आस्वाद चाखलेला असतो. त्याचा अर्थ असा कीं

---

* प्रास्टिटयूशन इन यूनायटेड स्टेटस. पान ४२, ६४, ६९.

* व लॉज ऑफ सेक्स. पान ६९.

शेकडा ६८ ह्मणजे वेश्याव्यवसायांत असणाऱ्यापैकीं जवळ जवळ तीन चतुर्थांश स्त्रिया वयाच्या १८ वे वर्षाचे आंतच वाटेफेडी बनलेल्या असतात त्याच आंकड्यावरून असेंही दिसून येतें कीं शेंकडा ३४ वेश्या १७ व्या वर्षा पूर्वीच आपल्या धंद्याला सुरवात करीत असतात. आणि ४६ टक्के वेश्या १७ व्या व २० व्या वर्षाचे दरम्यान तो सुरू करतात. ह्याचा अर्थ असा कीं शेंकडा ८० वेश्या २० व्या व तत्पूर्वीच्या वयांत वेश्याव्यवसायांत पडतात.* स्त्रीचा पहिला व्यभिचार हा बहुधा भुलावणी दिल्याचा किंवा बलात्काराचा परिणाम असतो. नीलँडनें केलेल्या शोधावरून असें आढळलें कीं न्यूयार्क शहरांत शेंकडा ५९ भ्रष्टाकारांची जबाबदारी भुलावणी किंवा बळजबरी ह्यांकडे असते, आणि हजारांपेक्षां अधिक गुन्ह्यापैकीं अर्धेअधिक गुन्हे तर अगदीं अनोळखी तिऱ्हाईत इसमांच्या द्वारें स्त्रियाकडून करविले गेले होते.* हे आंकडे फक्त अश्याच दुराचरणांचे आहेत कीं ज्यांचें रूपांतर पुढें वेश्या व्यवसायांत झालेलें आढळलें. ह्यापेक्षां अन्य अशीं प्रलोभनाचीं आणि बलात्काराचीं अशीं हजारों उदाहरणें आहेत कीं त्यांचा शोध लावणें किंवा त्यांची छाननी करणेंच मुळीं अशक्य आहे !

लहान मुलांवर केल्या जाणाऱ्या अत्याचारांबद्दल डॉ. हूकर ह्मणतात:—

"लहान मुलांवरील अत्याचारांचे प्रमाण किती भयंकर आहे ह्याची सर्वसाधारण जनतेला कल्पनाही नसेल; कारण अश्या कृत्यांपैकीं बहुतेक कधीं कोर्टापुढें येतच नाहींत.....बाल्टिमोर येथील एका वैद्यानें असें सांगितलें आहे कीं, नुसत्या बाल्टिमोर शहरांतच एका वर्षांत आंत १२ वर्षाचे खालील एक हजारापेक्षां अधिक मुली नरपशूंच्या अत्याचारांस बळी पडलेल्या आढळल्या.....गुन्हेगारांला जी साधारणपणें शिक्षा देण्यांत आली ती तीन महिन्यांपेक्षांही कमी तुरुंगवासाची होती !" ×

परंतु पुढें असें दिसून येतें कीं मुलगी बारा वर्षाची झाली कीं मग एकदम ती स्वतःच ह्या गोष्टींत पुढाकार घेऊं लागते. जज्ज लिंडसेनें

---

* प्रास्टिटयूशन इन यूनायटेड स्टेटस. पान ६९ व ७१.

× लॉज ऑफ सेक्स. पान १७७.

पाहिलेल्या ३१३ मुलींपैकीं २८५ मुलींना ११ व्या १२ व्या व १३ व्या वर्षींच ऋतु प्राप्त झाला आणि फक्त २८ मुलींनाच काय तो १४ व्या, १५ व्या व १६ व्या वर्षीं ऋतु प्राप्त झाला. अशा ११ आणि १२ वर्षांच्या मुलींमध्यें सुद्धां २८ वर्षांच्या तरुणीच्या सर्व भावना व वासना पूर्ण तीव्रतेनें जागृत होत्या असें त्यांना दिसून आलें.* परंतु लहान वयातच मुलीनें विषयसंभोगाबद्दल तत्परता दर्शाविणें, हें त्या राष्ट्रानें त्यांच्या ह्या वर्तनाकडे दुर्लक्ष करण्यास योग्य कारण केव्हांही होऊं शकत नाहीं. सांसारिक नीतिमत्तेच्या बाबतींत स्त्रीनें आपल्या मालमत्तेच्या पाहण्याची जबाबदारीचा अंगीकार करण्यास वयाच्या २१ वर्षांची आडकाठी ठरवून ठेवण्यांत सरकारला कांहींच प्रत्यवाय वाटत नाहीं; परंतु ज्या गोष्टीचा मुलीच्या व राष्ट्राच्याही भावी कल्याणावर फार घातुक परिणाम होतो, त्या बाबतींत मात्र सरकारनें मुलीला अगदीं १२ वर्षांच्या अल्प वयांतच मनसोक्त आचरण करून आपल्या शरीराचा व नीतिमत्तेचा सत्यानाश करून घेण्यास पूर्ण मुभा ठेवावी, हें आश्चर्य नव्हे काय?

हें अल्पवयांत मिळविलेलें विषयसुख फक्त एकाच तरुणाच्या अथवा मुलाच्या सहवासावर अवलंबून नसतें, आणि एकदां ह्याची चट लागल्यानंतर तें मिळेल तेवढें थोडेंच कसें वाटूं लागते, हें मागें एके ठिकाणीं दाखविलें आहेच.

यूनायटेड स्टेटसमध्यें शाळेंत जाणाऱ्या १५ वर्षें वयाच्या कच्च्या छोकऱ्यानेंहीं कामदंडाचा प्रभाव अनुभवलेला असतो आणि अगदीं आत्तां आत्तांपर्यंत तो वेश्यांच्या वस्तीचा एक नेहमींचा फिरस्ता असे. परंतु हॉयस्कुलांत मुलींची भरती करणें सुरू झाल्यापासून वेश्यांशीं स्पर्धा करणाऱ्या ह्या आपल्या संवगाडणींच्या प्रेमप्रसादाखातर त्यानें भाडोत्री वेश्यांचें डंबरढे झिडकाविण्याचें आतां टाकून दिलें आहे. जज लिंडसेला असें आढळून आलें कीं ७६९ मुलींच्या वरोवर २००० पेक्षां अधिक तरुण गुरफटलेले होते. ह्या लहान वयात घेतलेल्या अनुभवांचा व जडलेल्या संवयीचा परिणाम म्हणून, पुढें संकेतगृहांचे उंबरडे ह्यांनीं झिजवावे, हें अगदीं साहजिकच आहे.

---

* धि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ पान ८२ तें ८६.

संभोगाचे गुन्हे किती होत असतात ह्याची कांहींशी कल्पना उघडकीस आलेल्या गर्भपातांच्या व बेकायदेशीर अनाथ मुलांच्या संख्येवरून करतां येण्यासारखी आहे. असें सांगतात कीं अमेरिकेंत दर साल २५००० भ्रूणहत्या घडतात आणि दरसाल जगास दान करण्यांत येणाऱ्या बेवारशी मुलांची संख्या किती तरी हजारांवर आहे. जर आपण असें गृहीत धरलें कीं दर पांच भ्रूणहत्यामागें एक बेवारशी अपत्याचा जन्म होतो आणि मातृपद टाळण्याच्या इच्छेचें प्रमाण विवाहित व अविवाहितांचें १ ला ३ असें आहे, (ही आंकडेवारी अगदीं कमींतकमी ह्मणून गृहीत धरली आहे.) तर पुरुषांच्या संबंधापासून २२५००० बाबतीत इच्छेविरुद्ध मातृपद प्राप्त झालेलें असतें असें आपणास दिसून येईल. जज्ज लिंडसेच्या ह्मणण्याप्रमाणें बेकायदेशीर व्यभिचार करणाऱ्यांपैकीं २० ष गर्भार होतात आणि गर्भधारणेपासून वांचलेल्यांचें प्रमाण एकाला एकोणवीस असें पडतें ह्या वरून २२५००० बाबतींत जर गर्भधारणा होते तर एकंदर ४५००००० स्त्रिया संभोगरत झालेल्या असल्या पाहिजेत, आणि ह्या पैकीं ४२७५००० स्त्रिया पकडल्या न जातां अचानकपणें मोकळ्या राहिलेल्या असतात. प्रत्येक व्यभिचारकृत्यांत दोन व्यक्ति सामील असतांतच, ह्यावरून जवळ जवळ ९००००० तरुण यूनायटेड स्टेटसमध्यें बदकर्म करीत असतात असें ह्मणावें लागते.

मी हीं अनुमानें कांहींशी भीतभीतच्य काढलेलीं आहेत. कारण अशा प्रसंगीं चलाख आंकडेशास्त्रज्ञ झटकन पुढें सरसावतात आणि आंकड्यावरून काढलेली अनुमानें चुकीचीं आहेत हे लीलेनें सिद्ध करून टाकतात. साधारणपणें पाहतां घेतांनाच्य आकडा कमी ह्मणून धरला, तर त्या पासून निष्पन्न होणारे अनुमान सत्याला सोडून असत नाहीं. सार्वजनिक रीतीनें प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांची बोटावर केलेली बेरीज ही सामाजिक सुव्यवस्थेसंबंधी जेवढी खरी खरी माहिती देऊं शकते, तेवढी शब्दकोशांतील सर्व विशेषणें ही देऊं शकत नाहीत, हें अगदी खरें आहे. तेव्हां ह्या आकड्याविरुद्ध शंख करण्यांत काहीं तात्पर्य नाही. अमेरिकेतील ह्या ९००००० व्यभिचररत तरुण स्त्रीपुरुषांचा एकंदर समाजावर काय परिणाम होत असेल

आणि ह्यावरून जगाने ह्या राष्ट्रासंबंधीं व येथील सुधारणे संबंधीं कोणती बुद्धि बाळगावी तें वाचकांनींच ठरवावे.

बहुतेक वेश्या १८ व २७ ह्या वर्षांच्या दरम्यानांतल्या असतात, असें आढळतें, कारण ह्याच वयांत तारुण्याचा ऐन बहर असतो, आणि शारीरिक वासना पराकाष्टेला पोहोंचलेल्या असतात. हा व्यवसाय न करणाऱ्या परंतु अधःपतित झालेल्या अशा दुसऱ्या स्त्रियांसही हाच नियम लागू केल्यास (तो तसा लागू कां करूं नये, ह्याला काहींच कारण असूं शकत नाहीं), ह्या अनीतिमान स्त्री समाजातील वऱ्याचशा स्त्रिया तरुण वयाच्याच असाव्या, असें सिद्ध होते. नोलेंडनें विचार करून असें ठरविलें आहे कीं, शेंकडा ८०टक्के वेश्या १८ ते २० वर्षांच्या तरुण स्त्रिया असतात. अनीतिमान स्त्रियांचे बाबतींतही हेंच प्रमाण लागू केलें असतां आपणास असें दिसून येईल कीं, एकंदर ४५०००० व्यभिचारिणी स्त्रियां पैकीं जवळ ३००००० स्त्रिया ह्या वयाच्या असाव्या. हा निष्कर्ष दुसऱ्या एका प्रकरणांत अन्य मार्गानें काढलेल्या निष्कर्षालाच पाठिंबा देत आहे कीं, शीलानें शुद्ध अशी स्त्री अमेरिकेंत सांपडणें कठिण आहे. ह्या व अशाच अन्य पुराव्यावरच ह्या प्रकारणांतील मुख्य तत्त्वाचा आधार आहे. अमेरिकेंत अभीतीचे हे कधींही न धुतले जाणारे ओंगणाचे डाग फक्त विवाहितांच्या शय्येवरच आढळतात असें नाहीं.

" एका प्रमुख समाजसुधारकाचें असें मत असल्याचें सांगतात कीं, न्यू यार्क शहरांतील विवाहितांपैकीं पूर्ण एकतृतीयांश लोक शरीरावरील नियंत्रणांना न जुमानणारे असे असतात. आणि न्यू यार्क शहर ह्या देशांतील इतर भागापेक्षां भिन्न आहे असें काहीं नाहीं. " ×

यूनायटेड स्टेटस मधील उपदंशादि रोगांचें स्वरूप आणि प्रमाण ह्याचें पूर्वीच्या एका प्रकरणांत विवेचन झालेलें आहेच. ह्या रोगाचिकित्सक तज्ज्ञांचें असें मत आहे कीं शेंकडा ९५ धंदेवाईक वेश्या ह्या रोगांनीं पछाडलेल्या असतात. ह्याचा अर्थ असा कीं यूनायटेड स्टेटसमध्यें दर रोज ३००००० मनुष्यें ह्या रोगाला बळी पडण्याचा संभव असतो. कोणत्या रोगाला किंवा अनर्थाला प्रसार पावण्यास ह्यापेक्षां अधिक अनुकूल संधीची आवश्यकता आहे.

कॉलरा किंवा ट्युबरक्युलॉसिस ह्यासारख्या रोगांची कोठें दोन चार तुरळक उदाहरणें आढळली न आढळलीं तों सबंध गांवच्या लोकांची अगदीं पांचावर धारण बसते; परंतु सिफिलिस, गनोरिआ, कॉन्सिरॉइड ह्यां सारख्या महा भयंकर व्याधी गावांत गल्लोगल्लीं दर पावलागणिक आपला नंगा नाच मांडीत असतांना यूनायटेड स्टेटस् मधील जनता ह्या बद्दल मात्र अगदीं बेफिकीर, असलेली आढळते! जर यूनायटेड स्टेटसमध्यें ३०००० वेश्या असून ह्यां पैकीं शेंकडा ९५ उपरिनिर्दित रोगानीं पीडिलेल्या असतात, आणि जर प्रयेक वेश्या दररोज साधारणतः १० पुरुषांशीं रत होते, हें जर खरें आहे तर दररोज ३००००० लोक ह्या रोगांनीं आक्रांत होण्याचा संभव आहे, हें ओळखण्यास कोणी पंडित असावयास पाहिजे असें नाहीं. जर एडिथ हूकरचे हें म्हणणें गृहीत मानले कीं, आजकाल येथील बहुतेक पुरुष अन्य स्त्रियांसी व्यभिचाररत झालेले असतात, त्याच प्रमाणें ह्या नूतन संपादित रोगाचें बीज ह्या स्त्रिया पुन्हा आपल्या नित्य नव्या वल्लभाला प्रदान करतात, तर मग आपल्याला असें म्हणणे भाग आहे कीं, यूनायटेड स्टेटस् म्हणजे व्यभिचार आणि अनीति ह्यानेच केवळ नव्हे तर अत्यंत भयंकर रोगांनींही गजबजलेला नरक आहे! तरुणीनां उपदेशीत असतां डॉ. लॉनोर म्हणतोः—

"ह्या रोगाचे समाजांतील प्रमाण जर तुम्ही लक्षांत घेतलें तर तुम्हाला असें दिसून येईल कीं, कोणतीही तरुणी व्यभिचारांत शिरली कीं कधीं ना कधीं ती ह्या रोगानें पछाडली गेल्या वाचून राहणें शक्य नाहीं ; कदाचित् अगदीं पहिल्या प्रसंगालाच ती ह्याला बळी पडेल.*

डॉ. मॅरोचें असें मत आहे कीं ह्या रोगाचा प्रादुर्भाव बाजारबसव्यापेक्षां घरती स्त्रियांतच विशेषत्वानें दिसून येतो.+ नोएगॅरेथच्या मताप्रमाणें हें प्रमाण शेंकड ८० असें आहे परंतु मॅरोचें मत असें आहे कीं जवळ जवळ शेंकडा ६०

---

* हरसेल्फ, पान ११६.

+ लॉज ऑफ सेक्स, पान १५९

विवाहित व अविवाहित पुरुषांनां उपदंशाचा विकार असतो. बरनार मॅकफेडनच्या मतें ९० टक्के पुरुषांत हा रोग सांपडतो हीं निरनिराळीं प्रमाणें व त्यातील भेद जरी सोडले, तरी एवढे मात्र खरें कीं ह्या रोगाचें प्रमाण ह्या देशांत फार भयंकर स्वरूपाचें आहे ह्यांत शंका नाहीं.

यूनायटेड स्टेटस्च्या शिरगणतीखात्यानें एक मोठी विचारार्ह माहिती प्रसिध्द केलेली आहे तें खातें असें सांगतें कीं युनायटेड स्टेटस्मध्ये नुसत्या उपदंशादि रोगांमुळें जेवढे मृत्यु होतात, तेवढे दुसऱ्या कोणत्याही रोगानें होत नाहींत. टयुबरक्युलॉसीस सोडून इतर सर्व रोगांपासून होणाऱ्या मृत्यूची संख्या एक केली तर ती ह्या मृत्युसंख्येच्या बरोबरीला येईल. ह्या रोगचिकित्सेंत पारंगत अशा शस्त्रवैद्यांचें असें एकमत आहे कीं स्त्रियांच्या गुह्येंद्रियावर करण्यांत येणाऱ्या मोठमोठ्या शस्त्रक्रिया पैकीं शेंकडा शस्त्रक्रियांचें कारण पती पासून किंवा अन्य पुरुषा पासून त्याना जडलेला उपदंशाचा रोग हें होय.

घटस्फोटा विरुद्ध प्रत्यंत जोरानें ओरड करणाऱ्यां पैकीं कोणताही पुरुष ह्या विवक्षित परिस्थितीत स्त्रीपुरुषांनीं एकत्र रहावें असें उपदेशिण्याचें धाडस करणार नाहीं. दुष्टपणाच्या वर्तनाच्या नांधाखालीं पुष्कळदां जो घटस्फोट मिळावण्यांत येतो, त्यांत दुष्टपणाचें वर्तन हें खरें कारण नसून दोहोपैकीं कोणाला तरी एकाला हा भीषण रोग जडलेला असतो म्हणून ते घटस्फोट मागतात, हें अशी विरुद्ध ओरड करणाऱ्यां पैकीं किती जणांना ठाऊक असेल देव जाणे! एखाद्या पुरुषाबरोबर संसार करून त्याच्या संसर्गानें हें रोगाचें विष आपल्या शरीरांत भिनवून घेऊन मृत्यू जवळ ओढण्यास अथवा आपले अवयव कायमचे नष्ट करून घेण्यास जर एखाद्या स्त्रीनें नाकबुली दर्शविली, तर त्याबद्दल तिला कोणताही सहृदय पुरुष दोष देईल असें मला वाटत नाहीं." *

बहुतेक शस्त्रक्रियाचा परिणाम स्त्रिया कायमच्या वंध्या होण्यात होतो, असें जेव्हां आपणास खात्रीलायक पुराव्यांवरून दिसून येतें, त्या वेळीं हे उपदंशादि रोग राष्ट्रीय दृष्टीनें कसे घातुक आहेत, त्याचें महत्वही आपल्या

---

* लॉज ऑफ सेक्स, पान २०४.

चित्तावर बिंबल्या वांचून राहणार नाहीं. होतकरू वेश्यांचें वाढतें प्रमाण, शाळेंतच आपल्या शीलापासून भ्रष्ट होणाऱ्या आणि त्यानंतर त्या अधःपाताच्या मार्गानेंच जात असलेल्या अविवाहित तरुणी, संकेतगृहामध्यें व दुसऱ्या व्यभिचार गृहामध्यें जाऊन मजा मारणाऱ्या विवाहित स्त्रिया, व्यापार व सरकारी कचेऱ्या ह्यांत कामें करून कामानंतरच्या वेळांत उद्योगाचें मजेशीं मिश्रण करणारा फार मोठा स्त्रीवर्ग-ह्या सर्व प्रकारामुळें ह्या रोगांवर निर्बंध घालणें अशक्यप्राय झालें आहे.

मैथुनावर व रोगप्रसारावर निर्बंध घालण्याचे कांहीं प्रयत्न करण्यांत आले आहेत, नाहीं असें नाहीं. परंतु व्यभिचाराच्या व रोगाच्या प्रमाणाचे मानानें ह्या प्रतिबंधक प्रयत्नांचें स्वरूपही विराट व असावयास पाहिजे. पुष्कळशा संस्थानांत अविवाहित तरुणीशीं किंवा विवाहित तरुणीशीं बदकर्म करण्याच्या गुन्ह्याला तुरुंगवास किंवा दंड अशी शिक्षा सांगण्यांत आलेली आहे परंतु हा कायदा पुस्तकांतच राहतो. वेश्यांची वस्ती निराळी असावी, त्यांचें नांव रजिष्टरांत दाखल असावें, उपदंशादि रोगांचीही नोंद असावी, वगैरेही कायदे अस्तित्वांत आहेत;-परंतु शासकाका कायदे करण्यांत जितकी तत्परता दाखवितात, तितकी ते पाळण्यांत मात्र दाखवीत नाहीत. एतत्संबंधीं कायदे नुसते पुस्तकी आहेत, एवढेंच नव्हे, तर ते पैसे उकळण्यास व जुलुम जबरदस्ती करण्यासही कारणीभूत होत असतात. शासकाका आपली लोकशाही कशी गाजवितात त्यावरील आणखी टीका ही पहा:-

दुसऱ्या कोणत्याही कायद्यांच्या अंमलबजावणीपेक्षां स्त्रीपुरुषसंबंधविषयक कायद्यांच्या अंमलबजावणीचे बाबतींतच, त्या कायद्याच्या सहाय्यकांकडून व विरोधकांकडूनही पोलिस अधिकाऱ्यांवर अत्यंत कडक टीका करण्यांत येत आहे.*

कायद्याच्या अंमलबजावणीच्या बाबत राज्याचें धोरण काय असतें, ह्याविषयीं लिहितांना तोच ग्रंथकार ह्मणतो:-

---

* प्रास्टिटयूशन इन दि यूनायटेड स्टेटस, पान २०५.

"कायद्याची अंमलबजावणी करण्यास जे शपथेनें बांधलेले असतात तें स्थानिक अधिकारी पुष्कळवेळां ह्या पास झालेल्या कायद्यांबद्दल सहानुभूतिशून्य असतात असें आढळून येतें."*

ह्याच संबंधांत, रेमंड बी फॉडस्टिक ह्यानें नुकतेंच प्रसिद्ध केलेलें पुस्तक 'अमिरेकन पोलिस ॲन्ड स्टेट.' काय ह्मणतें ते आपण पाहूं:—

कित्येकांच्या बुद्धीला व दुसऱ्या कित्येकांच्या स्वभावाला अनीतिमान किंवा दुष्टपणाच्या वाटणाऱ्या गोष्टींनांच ते 'गुन्हा' असें लेखूं लागतात..... समाजनियामक अशा दुसऱ्या कांहीं खात्यांतील उणीवांची भरपाई करून घेण्यासाठीं तें ह्या कायद्यांचा अवलंब करतांना आढळतात. ज्या गोष्टीवर स्वभावतःच दुसऱ्यांचें नियंत्रण किंवा दडपण असण्याचें मुळींच कारण नाहीं अशा वैयक्तिक आचरणावरसुद्धां कायद्याचें दडपण आणून वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा ते प्रयत्न करतात!"+

वोलॅस्टनच्या मतें:—

"लोकांपैकीं बहुतेक तर असोतच परंतु पुष्कळसे जर एखाद्या कायद्याच्या अंमलबजावणीला विरोधक असले, तर त्या राज्यव्यवस्थेचें कार्य अत्यंत दुर्बल होत असतें. असें असल्यामुळेंच दारू बंदीचा कायदा ह्मणजे नुसता हास्यास्पद प्रकार झाला आहे, आणि पोटाचा धंदा ह्मणून वेश्याव्यवसायाची चोरून दारू विकणें व जुगार खेळणें ह्या धंद्यांशीं सहज बरोबरी होऊं शकते.

"ह्या सर्व प्रकारांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं, बेकायदेशीरपणें इच्छित वस्तूची प्राप्ति करून घेण्यासाठीं अवाच्या सवा किंमत देण्यास लोक तयार असतात, आणि लोकांच्या ह्या दुर्बलतेचा फायदा घेऊन नफा करून घेणारे धूर्त व्यापारी, आपल्या नफ्यांत, असा बेकायदेशीर व्यवसाय होत असलेला पाहून सुद्धां त्याकडे कानाडोळा करणाऱ्या सरकारी

---

* प्रास्टिटयूशन इन दि यूनायटेड स्टेटस. पान २०५

\+ अमेरिकन पोलिस सिस्टिम, पान ४६ व ४७.

अधिकाऱ्यांची भागीदारी ठेवतात. कायद्याची अशी पायमल्ली होत आहे, हें कदाचित पुष्कळशा लोकांच्या ध्यानांत सुद्धां येत नाहीं, आणि आपल्या अधिकाऱ्यांच्या वर्तनाची दाद घेणें हें राज्यव्यवस्थेला सुद्धां आवश्यक वाटत नाहीं. आणि ह्मणूनच पोलिस अधिकारी जेव्हां, एखाद्या कायद्याच्या अंमलबजावणीचे बाबतींत आपल्या बुद्धीचा उपयोग करण्याची संधी आपणास मिळाली आहे असें पाहतात, तेव्हां, ते सोपा असाच मार्ग धोखाकून हे दुर्गुणाचे अड्डे, गोष्ट चवाट्यावर येऊन जातीच्या नांवावर कलंक लागण्याची पाळी येईपर्यंत मनमुराद चालूं देत असतात. पुष्कळदा कायदा तोडण्यास असें सहाय्य करणें हें फायद्याचें असतें, असेंही त्यांना आढळून येतें.”*

अधिकाऱ्यांच्या ह्या नीतिभ्रष्टतेबद्दल व इमानदारीबद्दल लिहीत असतां तोच लेखक ह्मणतो:—

“ गस्तवाल्यानें लांच घेणें व बेकायदेशीर संस्थांचें संरक्षण करणे ह्या बद्दल पुष्कळशा ठिकाणी उल्लेख आलेलाच आहे. लेक्सो इन्व्हेस्टिगेशन केस मध्यें इन्स्पेक्टर स्मिदबर्गर याने दिलेली जबानी, मॅकएडू ह्या न्यायाधिशानें दिलेली जबानी, बेकर ट्रायलचा निकाल आणि इतरही पुष्कळशी पोलिसखात्याची चौकशी, ह्या वरून न्यू यार्क मधील अधिकारीवर्ग भ्रष्ट होता ह्याबद्दल संशयच उरत नाहीं. दुसऱ्या ६–७ अमेरिकन शहरांच्या बाबतीतही तसलाच पुरावा पुढें आणतां येईल. एका मिडवेस्टर्न शहरामध्यें आपल्या वरिष्ट अधिकाऱ्यासाठीं निरनिराळ्या संस्थाकडून “ हक्काच्या कमाईचा ” पैसा गोळा करीत हिंडणारा एक सरकारी नोकर ह्या लेखकालाच भेटला होता; तसेंच १८६० ते १८७० च्या दरम्यानांत ह्या अशा गोष्टीं सर्रासपणे चालत असून तदनंतरही त्या बंद पडल्या नाहींत. ..... वेश्यापासून पैसा उकळण्याचा एक मार्ग असा होता; प्रत्येक शनिवारी रात्रीं त्यांच्या घरावर अचानक हल्ला करण्याचा हुकुम देण्यांत येई आणि प्रत्येक घरमालाकेणीमागे २५ डॉलर्स व घरांतील प्रत्येक व्यक्तीमागे १० डॉलर्स अशी रक्कम आकारण्यांत येई. दर शनिवारी कोणत्याना

---

* प्रास्टिटयूशन इन धि यूनायटेड स्टेटस, पान २०५.

कोणत्या १२-१५ वेश्यागारांवर असा हल्ला करण्यांत येऊन त्यांच्या पासून द्रव्य उकळण्यात येई. आणि तें ही, त्या वेश्यागृहांच्या धनिणी आपला जादा कर कायद्याप्रमाणें भरत होत्या तरीही घेण्यात येई! हें द्रव्य नंतर सर्व पोलिस नोकर व अधिकारी आपसांत वाटून घेत! *

कमिटी आफ फोर्टीन ने नमूद करून ठेवल्या प्रमाणें न्यू यार्क व यूनायटेड स्टेटस् मधील दुसरी मोठमोठाली शहरे ह्यांतील दुर्गुणांचें स्वरुप काय आहे. त्याचा थोडासा उल्लेख करून मग मी हे अनीतीच्या मेणकट डागाचे प्रकरण संपवितों.

'कमिटी ऑफ फोर्टीन' (चौदामाणसाची समिती) ह्मणजे कांहीं खासगी गृहस्थाची समिती होय. गेल्या २५ वर्षां पासून ही आपले कार्य करीत आहे. हिने पगारी नोकर ठेवले असून त्याचे कार्य ह्मणजे सबंध वर्षभर ह्यां राष्ट्रातील दुर्गुणांचें स्वरुप कसें आहे त्याचा अभ्यास करावयाचा व पोलिस खात्याच्या सहाय्यानें समाजाची उन्नती घडवून आणावयाची हें आहे. ह्या कामेटीचा वार्षिक अहवाल ह्मणजे प्रचलित अवस्थेवर सर्व उपायांनीं शोध करून केलेली टीका असून ती अत्यंत विश्वसनीय अशी लेखली जाते. नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या प्रसिद्धी पत्रकांत असें नमूद करण्यांत आले आहे कीं न्यू यार्क मधील हलींच्या दुर्गुणाचें स्वरुप पूर्वीच्या दहा वर्षात नव्हते इतकें भीषण झालेलें आहे. रात्रीचे क्लब व खासगी संमेलन संस्था हीं वेश्यागृहें बनलीं आहेत, असें तो रिपोर्ट ह्मणतो. खोरून दारू विकणे हें आतां इतकें बोकाळलें आहे कीं, त्यामुळें उपरिनिर्दिष्ट क्लबांनां चोरून दारू विकणें फायदेशीर होत नाहींसें झाल्यामुळें त्यांना त्याच्या जोडीला वेश्याव्यवसाय आपल्या येथें सुरू करावा लागला आहे. त्यामुळें, होतकरू गिऱ्हाईकांनां भेटता येईल अशीं किती तरी ठिकाणें गेल्या १५ वर्षांत वेश्यांना खुली झालेली आहेत. ही अवस्था जवळ जवळ प्रत्येक नाईटक्लब मध्यें व 'स्पीक इझी' मध्यें सांपडतें काहीं 'खासगी' नृत्यांवरही

* प्रास्टिटयूशन इन धि यूनायटेड स्टेटस, पान २१९.

ह्या रिपोर्टींत बरींच टीका करण्यांत आली आहे. येथें खासगी समारंभ ह्मणून नृत्य ठरविण्यांत येतें, व फक्त पुरुषांनाच निमंत्रण देण्यांत येते. ते तेथें जाऊन तरुणी बरोबर नृत्यविलास करितात. ह्या बद्दल तात्पुरत्या 'घरांतल्या' ह्मणून मिरविणाऱ्या ह्या तरुणींनां, हा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिकडून पैसे देण्यांत येतात. रिपोर्टाचें असें मत आहे कीं, हे प्रकार अनीतीचे जनक होत.

थोड्या दिवसापूर्वीच 'न्यू यार्क' ग्राफिक मध्ये लिहीत असतां कॉंग्रेसमन फिओरेल्ला लेग्वार्डिआ ह्यानें असें विधान केले आहे कीं, नुसत्या न्यू यार्क शहरांतच २२०० 'स्पीक ईझी' (गुप चुप बोला) संस्था असून त्या स्वसंरक्षणार्थ लांच ह्मणून दरवर्षीं ५००००० पौंडाच्यावर खर्च करीत असतात! हे आंकडे ह्मणजे कदाचित निव्वळ तर्क असतील; परंतु ज्या अर्थीं १३६ माणसामागें एक 'गपचुप' संस्था असणें व प्रत्येक संस्थेंने लाच ह्मणून दर आठवड्यास पांच पौंड खर्च करणें हे पूर्वी दाखविलेल्या आंकड्यांवरून असंभाव्य स्वरूपाचे वाटत नाहीं त्या अर्थीं हें विधान वस्तुस्थितीला सोडून फारसे असेल असें वाटत नाहीं.

ते कांहीं जरी असलें तरी एक गोष्ट मात्र खरीं कीं रिपोर्टात नमूद केलेल्या सर्व साधारण गोष्टी अस्तित्वांत आहेत हें सर्व लोक चांगलें जाणतात शहरांतील व्यवस्थेच्या बाबतींत फाजील पवित्राचाराचे बंड माजविण्यांत येणार नाहीं अशी समजूत ठरवून घेऊनच मग हल्लीं म्युनिसिपल निवडणुकी झालेल्या आहेत. आणि त्या प्रमाणें हे म्युनिसिपल अधिकारी फाजील पवित्राचारांचें स्तोम माजविणारें नाहींतही!

हे मेणकट डाग अशामुळें फार विस्तृत आणि भानगडीचें असें झालेले आहेत.

उपदंश हा सर्वांत अधिक घातकी रोग आहे.



प्रकरण १४ वें.

देव, धर्म आणि कं. (इनकार्पोरेटेड.)

सॅमकाका व त्यांची प्रजा ह्यांच्या चारित्र्याचें विवेचन, त्यांच्या धर्मसंस्थांचा व त्यांच्या अत्यंत धार्मिक वृत्तीचा कांहीं उल्लेख केल्यावांचून पूर्ण होणार नाहीं. परंतु पुढील विवेचन वाचल्यानंतर, सॅमकाकाचा परमेश्वर, अब्राहामला किंवा आयझाकला वाटणारा तोच परमेश्वर किंवा येसूख्रिस्ताचा पिता म्हणून ओळखला जाणारा परमेश्वर नाहीं, त्याची चर्चें व धर्मसंस्था म्हणजे ढोंगीपणाचा व भोंदूपणाचा व्यवसायच आहे दुसरें

कांहीं नाहीं, आणि अमेरिकन लोक म्हणजे अत्यंत धर्माचरणी, ही ख्याति म्हणजे निव्वळ पोकळ अवडंबर आहें, असें जर वाचकांना आढळून आलें तर त्याबद्दल त्यांना आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

'रिलीजन' म्हणजे धर्म हा इंग्रजी भाषेंतील शब्द मुळ लॅटिन भाषेंतील 'रिलिजो' (Religo) ह्या धातूपासून बनला आहे. कोणत्याही लॅटिन शब्दकोषांत ह्या 'रिलिजो' शब्दाचा अर्थ काय असें जर आपण पाहूं लागलों, तर त्याचा असा अर्थ दिलेला आढळून येतो. "पक्कें बांधून ठेवणें; सुटलेल्या पुन्हां बांधणें," (To bind fast; to bind back;) ह्या धात्वर्थापासून, धर्म (Religion) हा शब्द निर्माण करते वेळीं ज्या अर्थाच्या जाणिवेने तो निर्माण करण्यांत आला असेल, त्याची आपणांस कल्पना करतां येते. त्याचा मूळचा हेतू, एकाच नैतिक ध्येयवादित्वानें व अनुभूतीचें मनुष्यसमाजांना एकत्र आखणें असाच असावा, आणि, हें सर्वांचे एकाच स्वरुपाचें असलेलें ध्येय म्हणजे, कांहीं विशिष्ट वैयक्तिक नीतीच्या व नियमांच्या आचरणानें मृत्युनंतरची स्वर्गीय मुक्ति प्राप्त करून घेणे हाच असावा, हें उघड आहे. परंतु निरनिराळ्या युगांतून धर्माची स्वरुपें कसकशी बदलत गेली हें जर आपण इतिहासावरून पाहूं लागलो तर आपणांस असेंच दिसून येतें कीं, धर्म हा मनुष्यसमाजांला एका सूत्रांत बद्ध करून ठेवण्या ऐवजी त्यांच्या मध्यें अत्यंत भीषण स्वरुपाच्या लढायाँ निर्माण करण्यास मात्र एक अत्यंत प्रबळ असें कारण बनलेला आहे. धर्माच्या खातर ह्मणून करण्यांत आली नाहींत अशीं कृष्णकृत्ये थोडीच असतील. ह्यामुळेंच प्रोटेस्टंट ख्रिश्चिअनांतच फूट पडून, आपआपसांत तंटे भांडणें व हाणामाऱ्या करणारें विरोधी पक्ष निर्माण झाले. जेथें धर्मामुळें एकात्मितपणा निर्माण होतो, तेथें हटवाद अज्ञान आणि असहिष्णुता ह्यांचा गोंधळ माजतोच! हें फक्त अमेरिकेच्याच बाबतींत सत्य आहे असें नाहीं, तर ज्या ज्या देशांत अथवा समाजांत धर्म ह्मणजे एक आत्यंतिक तीव्र भावना व परमेश्वर ह्मणजे भक्तिवेड अशी स्थिती असेल, तेथें हाच प्रकार दिसतो!

थोड्या दिवसां पुर्वी अमेरिकेतील सरासरी २०० वृत्तपत्रांनीं प्रश्नपत्रिका पाठवून केलेल्या चौकशीचा निकाल प्रसिद्ध झाल्या नंतर 'मिलवाकीं जर्नल' नें एक सुटकेच्या समाधानाचा निःश्वास टाकून असें उद्‌गार काढले वाः! अमेरिकेचा देवावर विश्वास आहे तर! * अमेरिकेच्या इन्टरनॅशनल एडव्हर्टाइझींग असोसिएशनच्या चर्चे प्रसिद्धि खात्याच्या सूचनावरून ही प्रश्नपत्रिका काढण्यांत आली होती, आणि ती शंभर धर्माधिकाऱ्यांनीं तयार केली असून धर्माच्या मूल तत्त्व विषयीं अमेरिकेला काय काय वाटते ह्याची चौकशी करण्यासाठीं त्यांनीं ती चोहीकडे पाठविली होती. सबंध अमेरिकेंत चर्चच्या सदस्याची संख्या वाढविण्याच्या प्रचंड कार्यक्रमांतील ही पाहिली पायरी होती. ह्या प्रश्नांना उत्तरे पाठविली ती फार थोड्या लोकांनीं; परंतु ह्या गोष्टीचा जगभर डांगोरा पिटण्यासाठींच लेखण्या परजून सज्ज झालेल्या संपादकांच्या तांड्याना, लोकमतांची दिशा ओळखण्यास एवढाच पुरावा पुरेसा वाटून त्यावरून त्यांनीं निष्कर्षही काढावयाचे ते काढलेच! एकंदर १२५००० लोकांनीं उत्तरें पाठविलीं. त्यापैकीं शेकडा ९१ माणसांनीं आपला परमेश्वरांवर विश्वास असल्याचें कबूल केलें, परंतु फक्त शेंकडा ७७ माणसांनींच आपण चर्चचे सदस्य आहोंत असें सांगितलें; शेंकडा ८५ जणांना बायबल हा ईश्वर प्रेरित ग्रंथ वाटत होता. परंतु घरांत देवपुजा वगैरे करणारे असें शेंकडा ४२ च निघाले. ह्या प्रश्नपत्रिकेने असें सिद्ध केलें कीं यूनायटेड स्टेटसमध्यें अद्यापिही पुराण मताभिमानाचा वास आहे. परंतु परमेश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यापेक्षां चर्चमध्यें जाणाऱ्यांची संख्या अगदींच अल्प आहे. धार्मिक लोकांच्या गणतीचे संचालक डॉ. स्टीझल ह्मणतात "ह्या प्रश्नपत्रिकेची उत्तरें असें सांगतात कीं अमेरिकेमध्यें धर्म हा फार पुराणप्रिय आहे. निरंतर विचारांत गढून गेलेल्या व विद्वत्तेचे गड्डे ह्मणून गणले गेलेल्या माणसांच्या शब्दांनीं ह्यांच्या मतांवर कोणताच परिणाम घडून येत नाहीं. इतर बाबतींत हें नव्याचा कितीही पुरस्कार करोत; परंतु धर्माचा प्रश्न आला कीं त्यांना एकदम जुनेंपुराणेंच आवडूं लागलें.

---

* लिटररी डायजेस्ट, १५ जानेवारी, १९२७.

ह्या चौकशीचा निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर सबंध अमेरिकेंत उत्साहाची आणि सदसद्विवेक बुद्धीच्या समाधानाची एक प्रचंड लाट उसळली "अमेरिकेचा परमेश्वरावर विश्वास आहे!" आणि "आमच्या देशांतिल जवळ जवळ प्रत्येक व्यक्तीच्या बाबतींत, प्रत्येक सत्यकृत्याचे परमेश्वरच अधिष्ठान असतो." ही दोन विधानें जातकुळीनें पूर्ण अमेरिकन अशा अभिमानाची निदर्शक होत ! धर्मावर आणि परमेश्वरावर नुसती क्रियाशून्य श्रद्धा आहे असें ह्मणणारें व ह्या श्रद्धेमुळे आपल्या आचरणावर नियंत्रण ठेवणारे ह्या मधील भेदाची तोंड मिळवणी ह्या प्रश्नपत्रिकेला आलेल्या उत्तरांवरून करूं पाहणें हें कितपत समंजसपणाचे होईल ह्याबद्दल संशय प्रगट करण्याचें धाडस फक्त "ग्रांड रॅपिडसू प्रेस" ह्या एकाच वृत्तपत्राला करवलें गेले, हें लक्षांत ठेवण्या सारखे आहे. वर्तमानपत्राच्या मतें:—

"यूनायटेड स्टेटस् खिश्चियन तर राहोच परंतु धार्मिक वृत्तीचें तरी आहेच असे ह्या प्रश्नपत्रिकेच्या उत्तरावरून सिद्ध होऊच शकत नाहीं. ह्या लोकांपेक्षां तर अंधश्रद्धाळू रानटी लोकच अधिक धार्मिक ह्मटलें पाहिजेत कारण त्यांचें भय व श्रद्धा ह्यांचें तरी नियंत्रण त्यांच्या आचरणावर असते. नुसते शाब्दिक नव्हे तर अर्थिक सत्य व श्रद्धा किती आहे, हा मुख्य प्रश्न आहे. नुसत्या शेंकडा ९० किंवा ९५ लोकांनीं परमेश्वरावर विश्वास आहे असे मत देणे ह्मणजे कांहीं आपण अभिमानानें फुगून जाण्यास पुरेसें कारण होऊं शकत नाही कागदावरील त्या खुणेंवरून कांहीं तरी बोध घेऊन, अधिक महत्वाचें असें कांहीं तरी कार्य करण्यास प्रवृत्त करणारें असें हें कारण झालें पाहिजे."*

थोडक्यांत प्रश्नांचें स्वरूप मांडावयाचे ह्मणजे तें हें आहे; ह्या तोंडच्या शब्दांत आणि प्रत्यक्ष कृतींत अंतर किती आहे ? ह्या चौकशी वरून आपणास असें दिसून येते कीं शेंकडा ९० पेक्षां जास्त लोक परमेश्वरावर विश्वास ठेवणारे आहेत. ७७ टक्के चर्च मध्ये जाणारे आहेत. ८५ टक्के येसूच्या अवतारावद्दल विश्वास बाळगणारे आहेत. तितकेच बायबल ईश्वरप्रणीत आहे

---

* लिटररी, डायजेस्ट, १५ जानेवारी १९२७.

असें मानणारे आहेत, आणि ८७ टक्के लोक धर्म हा मनुष्याच्या दैनिक आचारक्रमातील एक महत्वाचें अंग असला पाहिजे, असे ह्मणणारे आहेत. ह्या आंकड्यांत जी कांहीं थोडी फार चूक असेल तिच्याकडे व तज्जन्य भेदांकडे तात्पुरते दुर्लक्ष केलें आणि हे आंकडें वस्तुस्थितेनिदर्शक आहेत व त्याला तेथील लोक व्यवहारांतून दुसरे पुष्कळ पुरावे आहेत असें जर सिद्ध झाले, तर अमेरिकेला आपल्या सुधारणेचा व राष्ट्रीय आणि आध्यात्मिक जीवनाचा अभिमान वाटावा असें तें जीवन आहें त्यांत शंका नाहीं. परंतु परमेश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यांपैकीं किती लोक परमेश्वराच्या इच्छेला मान देतांना दिसतात! येशूख्रिस्ताला मानणारे किती लोक त्याची शिकवण आचरण्याचा प्रयत्न करतात? आणि बायबलला मान्यता देणाऱ्या सहस्रावधि लोकांपैकीं किती लोक दहा आज्ञांना रोजच्या जीवन क्रमांत स्थान देतात?

१९ व्या शतकांत भिन्न धर्माचा ऐतिहासिक अभ्यास सुरू होईपर्यंत धर्माची वाईट व चांगला धर्म अशी विभागणी मानण्यांत येई व ख्रिस्ती धर्म हाच एक चांगला असून इतरांना टाकाऊ मानण्यांत येई. पाद्री लोक अजून त्या जुन्या विचारसरणीला चिकटून राहण्याचा प्रयत्न करीत असले तरी वाढत्या प्रमाणांत अलीकडे लोक धर्मासंबंधीं सूक्ष्मतर कल्पना मान्य करूं लागले आहेत.

सीबेकनें धर्माची अशी विभागणी करण्याचा प्रयत्न केला तरी त्याला मुक्ति मिळवून देणारा असा सर्वश्रेष्ठ ख्रिस्तीधर्मच आहे असें ह्मटल्यावांचून राहवेना. पण प्रस्तुतः सर्व धर्म– मग त्यातला एखादा कितीही ओबडधोबड कां असेना –मुक्तिमार्गदर्शकच आहेत. कारण सर्व धर्मात मानवी जीवन व सृष्टी यांचें वैय्यर्थ्यच वर्णिलें असून कांहीं तरी विशेष शोधाच्या व शाश्वत सुखाच्या मागें ते लागणारे असतात. हिंदु व बुद्ध धर्मात वासनांचे दमन करणें हा राजमार्ग समजण्यांत आला आहे. ख्रिस्ती धर्मात चांगल्या व वाईट वागणुकीचे नियम दिले असून चांगल्या वागणुकीला स्वर्ग बक्षिस मिळेल ह्मणून सांगण्यांत आलें आहे. याशिवाय या स्वर्गवासाच्या उमेदवाराचा

ख्रिस्ताचें देवत्व, इश्वराचें पितृत्व आणिं " होली स्पिरिट " " फादर " आणि " सन " यांच्या त्रिमूर्तींत विश्वास असला पाहिजे.

अमेरिकेंतील ख्रिस्तीधर्माचा इतिहास हा मात्र थोतांडानें परिपूर्ण असून एकीकडे मुक्तीच्या वलगना चालू ठेवणें व दुसरीकडे नीतिमत्तेचे नियम हद्दपार करणें हें तेथील धोरण आहे. वरपांगी ख्रिस्तदेवाची स्तुतिस्तोत्रें गाण्याचें त्यांना समजतें. शेंकडा ९१ चा ख्रिस्तीधर्मावर विश्वास असूं शकेल किंबहुना शेंकडा ७७ चर्चमध्यें नियमितपणें जाणारेहि असूं शकतील पण ख्रिस्ती धर्माच्या शिकवणीप्रमाणें वर्तन किती जणांचें आहे हें मात्र सांगणें कठीण आहे.

" माझ्यापुढें त्वां इतर कोणत्याही देवास मानूं नये " ही जुदाइझ्म् व ख्रिस्तीधर्म यांची एक शिकवण असून इचा च प्रतिध्वनी इस्लाममध्येंहि ऐकूं येतो. पण अमेरिका ईश्वरापेक्षांहि मोठी आहे.

१९२५ मध्यें प्रसिडेंट कूलिज यांनीं बॉयस्काऊटसना दूरध्वनिवाहक यंत्रद्वारा जो उपदेश केला त्यांत त्यांनीं प्रथम देशाच्या कायद्याला व नंतर ईश्वराला मान द्या असें सांगितलें. लढाईच्या काळांत जगानें कैसरला ईश्वराला दुय्यम स्थान देण्याबद्दल दोष दिला पण अमेरिकेच्या प्रेसिडेंटनें अमेरिकेला ईश्वराच्या डोक्यावर बसविलें तर हरकत नाहीं. एकदां १९१७ मध्यें ओशन अव्हेन्यू, ब्रूकलीन मधील सेंट मार्कच्या चर्चमध्यें एक पाद्री सभेंत म्हणाला " मला जर माझा देव व माझा देश यापैकीं निवड करण्याचा प्रसंग आला तर मी आपल्या देवाला सोडणार नाहीं; मी अमेरिकन असलो तरी प्रथम ख्रिस्ती आहें. " असें म्हणतांच ५०० लोकांनी त्याला अव्दातव्दा बोलण्यास सुरू करून सरतेशेवटीं इतका गोंगाट केला कीं त्याला त्याचें भाषण तेथेंच आटोपतें घ्यावें लागले. अमेरिकेत धर्मही देशाभिमानाचें एक उपखाते बनलें आहे. प्रत्येक सेंटनाण्यावर " आमचा ईश्वरावर विश्वास आहे " असें कोरले असतें. एका डॉलरमध्यें १०० सेंटस् असतात पण डॉलरला ईश्वराची कदर बाळगण्याची गरज नाहीं. किंबहुना अमेरिकेंत डॉलर म्हणजेच सर्व शक्ती परमेश्वर आहे.

ह्या सर्व विवेचनाचें खुल्यादिलानें पर्यालोचन करणाऱ्यापेकीं एकाला तरी असें ह्मटल्यावांचून राहवेल का ? कीं ख्रिस्त धर्मानुयायी अमेरिकेचा इतिहास येशूच्या उपदेशांचा अगदी बुद्धिपुरःसर व व्यवस्थितपणें केलेला इनकारच आहे ! आजच्या संपत्तीच्या मागें वेड्या झालेल्या अमेरिकेंत आत्मोत्सर्ग करणाऱ्या ख्रिस्ताचा अवशेष कोठें तरी दिसतो आहे, असें ह्मणण्याचें कोणाला धाडस करवेल का ?

सहिष्णुता ही ख्रिस्ताच्या शिकवणुकी पैकीं एक प्रमुख शिकवण आहे सॅमॅरिटनची कथा, व्यभिचारिणीवर दगड मारण्याचा प्रसंग, " देवा, ते काय करीत आहेत तें त्यांनांच कळत नाहीं; ह्यास्तव तूं त्यांना क्षमा कर ! " ह्या शब्दांनीं परमेश्वराची प्रार्थना करून आपल्या शत्रूंनां क्षमा करणारा येशू - इ. ख्रिस्ताच्या जीवनांतिल प्रसंग ह्मणजे त्या धर्माच्या इतिहासांतिल एकमेवाद्वितीय प्रसंग असून आदर्शाची अत्यंत उच्च गिरिशिखरें होत. ख्रिस्तधर्माच्या संस्थापकानें असें ह्मटलें आहे कीं, " जे जुलूम सहन करणारे गरीब आहेत, धन्य होत; कारण त्यांनां स्वर्गाचें साम्राज्य प्राप्त होणार आहे ! " (**Blessed are the meek, for they shall inherit the Kingdom of Heaven**) पण ह्या शिकवणुकीच्या आधारावर उभारलेल्या धर्माचें पालन करणारी अमेरिका ह्याच्या किती विरुद्ध आचरण करीत आहे !

खून, दरोडे, अनैसर्गिक संभोग इ. प्रकारापासून धर्माधिकारी आणि पाद्रीही अलिप्त नाहींत हें आपण मागें पाहिले आहेच. १९१९ मध्यें महायुद्धाच्या तहाने शेवट झाल्यानंतर ट्रेमॉन्ट टेंपलमध्यें वार्षिक यूनिटेरिअन कॉन्व्हेन्शनप्रसंगीं धर्माधिकाऱ्यांच्या मनोवृत्तीचें फारच मौजेचें विषदीकरण झालेल्यावेळी प्रेसिडेंट विल्सन सर्व जगाला न्यायी व दयाशील होण्याचा जीव तोडून उपदेश करीत होते. धर्म संरक्षकांच्या व सद्धर्मप्रतिपालकाच्या ह्या सभेपुढें हेन्री डब्ल्यू. पेंकहॅमनें बायबलमधील पुढील वाक्य उच्चारलें, " जर तुझा शत्रू भुकेला झाला असेल, तर त्याला खावयास दे; जर

तहानेनें व्याकुळ झाला असेल तर त्याची तृषा शांत कर ! ' (If thine enemy hunger, feed him; if he thirst, give him drink.) ख्रिस्ताच्या अनुयांनीं हें वाक्य ऐकलें आणि त्यांनीं आरोळ्या आणि दंगलीच्या गोंगाटांत तें जागच्या जागीं जिरवून टाकलें ! अशाच अर्थाचे दुसरें एक वाक्य एका सार्वजनीक प्रसंगी उच्चारल्याबद्दल श्री० पेन्कहॅम ह्यांनां असें सांगण्यांत आलें होतें कीं त्यांचा आत्मा कार्बोलिक ऑसिडमध्यें धुतला जाऊन स्वच्छ केला गेला पाहिजे, इतकी त्यांत घाण झालेली आहे ! सॅमरिटनची बायबल मधील कथा वाचा आणि तिच्या अंतर्गत तत्वाशी साम्य असलेली विंक्सबर्ग येथें घडलेली ही गोष्ट ध्यानांत आणा :-

" त्या नीग्रोला पांच फूट उंचीवर लटकाविण्यांत आलें परंतु तो खालीं घसरल्याच " लोकांच्या घोळक्यांतून त्याचा तो नागवा उघडा देह तर उचलला जातांना पाहून लोकांची मनें अधिकच क्षुब्ध झालीं. कोणी-तरी ओरडलें. " त्याला गोळी घाला ! " दुसरें कोणीतरी उद्गारलें, " नको, नको, त्याला हळूं हळूंच मरूं द्या ! " तो नुसता लोंबकळत असल्यामुळें त्याला व्हावा तसा त्रास होत नाहीं असें पाहून खालीं उभे असलेल्या लोकांपैकीं कांहीं त्याच्या पायांना हिसडे मारून त्याचा देह इकडून तिकडे फेंकूं लागलें, दुसऱ्या कांहींनीं त्याच्या सर्वांगावर केरो-सीन तेल ओतले आणि तिसऱ्या एकानें खालीं अग्निज्वाला भडकाविण्याची सिद्धता केली त्या निग्रोनें आपलें दोन्ही हात जोडून ते आकाशाकडे केले व तो—मनांतच परमेश्वराचें स्मरण करूं लागला ? हा सर्व प्रकार जेल पासूनच ह्या घोळक्याच्या मागोमाग आलेल्या व रस्त्यांत ही आपापल्या घरांतून येऊन मिळालेल्या कित्येक कोमल-हृदयी स्त्रियाही सस्मितवदनानें अवलोकीत होत्या.*"

---

* अमेरिकॅना १९२५, पान १३५.

गरीब बिचारें साधें भोळें बायबल आपल्या अनुयायांना उपदेश करतें "चोरी करूं नये !" (Thou shalt not steal) आणि तरीही:—

" चोरीच्या आरोपावरून माझ्यापुढें उभी करण्यांत आलेलीं मुलें बहुधा चांगल्या चांगल्या शाळांतून, सर्वोत्कृष्ट गणल्या गेलेल्या रविवारच्या शाळांतून आणि त्यां पैकीं पुष्कळ तर सर्व देशभर विख्यात असलेल्या संस्थामधून शिक्षण घेत असलेलीं अशी होतीं, आणि ह्या सर्व संस्था ह्या मुलांना उत्तम वळण लावून त्यांचे आदर्श नागरिक बनविण्यासाठीं ह्मणून अस्तित्वांत आल्या आहेत !" +

पण ह्यात आश्चर्य वाटण्यासारखें तरी काय आहे ? जसा बाप तसा मुलगा ! बाप संस्थानाच्या, फेडरल खात्याच्या किंवा आपल्या शहरांतील सार्वजनिक अधिकाराच्या जागेवरून सार्वजनिक पैशाची चोरी करतो; मुलगा आपल्या सोबत्यांच्या किंवा शिक्षकांच्या खिशांतून किंवा शाळेच्या दुकानांतून पैसे लांबवितो ! मुलगा रविवारच्या शाळेंत जातो, बाप चर्चे मध्यें जातो.

बायबलचा दुसरा एक दंडक असा आहे, " हत्या करूं नये. " (Thou shalt not kill) नामदार वेलँड डी० स्टीअर्स ह्यांच्या ह्मणण्या प्रमाणें नुसत्या डिट्राइट मध्येंच दरवर्षीं सबंध इंग्लंड पेक्षां दहापटीनें अधिक खून होतात. * जगांतील कोणत्याही मोठ्या शहरांपेक्षां येथील खुनांची संख्या अधिक आहे, ही गोष्ट शिकागो शहराला अभिमानाची वाटते ! * रूरल लुासेॲना ही मेथॉडिस्ट पंथाची व धर्मप्रवण ह्मणून विख्यात आहे, आणि तरी ही तेथें कोणाचाही बेकायदेशीरपणें प्राण घेण्याचें प्रकार सर्रास सुरूं असतात !* वेस्ट व्हर्जीनिआ हा प्रांत खुनाखुनी आणि प्राणांतीक मारामाऱ्या ह्या बद्दल प्रख्यात असून

+ धि रिव्होल्ट ऑफ मॉडर्न यूथ, पान ९७,

* अमेरिकेना १९२५, पान. १२३, २९०, २९१.

असले प्रकार ह्मणजे तेथें नित्याचेच झालेले आहेत.* क्लॅनच्या बुरख्याखालीं दुष्टपणाचे व रानटी असे वाटतील तसे अत्याचार घुडगूस घालीत असतात, आणि एखाद्या गोष्टीचा पत्ता लागला कीं ह्या भानगडींत चर्च मधील धर्माधिकारी मोठ्या प्रमुखत्वानें भाग घेत असतात!

आणखी एक दंडक:-" व्यभिचार करूं नये " **(Thou shalt not commit adultery)** लग्न करणाऱ्यांपैकीं निम्मी माणसें विवाह झाल्यानंतर दोन वर्षांचे आंत काडीमोड करतात, हें आपण पाहिलेलच आहे. अनेक पत्नित्वाची रुढी अस्तित्वांत असून अनेक पतित्व ह्मणजे शिष्टपणाच्या प्रकार समजण्यांत येतो, असा पुरावा आपल्या पुढें आहे! कुमारिकांच्या कौमार्याचा कसा भंग होत असतो, विवाहित स्त्रिया जारकर्मांत कशा रत झालेल्या आढळतात, आणि निग्रोशीं श्वेतकायांचे वैषयिक संभोग किती विस्तृत प्रमाणावर घडत असतात, अनीतीचे बेछूटपणाचे मार्ग आचरण्यांत येऊन त्याचें दुष्परिणामही कसे भोगावे लागतात, हें सर्व आपण पाहिलें आहे. वायबलचे फारच थोडे दंडक अमेरिका पाळते; पण ६ व्या दंडकाच्या बाबतींत तर हा देश फारच बेफिकीर असलेला आढळून येतो.

सेंट लुई येथील ख्रिस्ती धर्माचरणाचा आढावा नुकताच 'न्यू यॉर्क टाईम्सनें' प्रसिद्ध केला आहे:-

" आज सिटी कोर्टात सौ. कोरा येटस् ह्या बाईला तेरावे वेळीं घटस्फोट देण्यांत आला. तिचा पति अलेक्झँडर येटस् हा तिच्याशीं इमानानें वागत नसे, असा साक्षीदारानें पुरावा सादर केला. ह्याच कोर्टात मागील वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या ११ व्या तारखेस ह्याच बाईनें आलबर्ट लिली पासून घटस्फोट मिळवून आपला वैवाहिक संबंध मोडला होता. ह्या आलबर्ट लिलीशीं ती तीन वेळ विवाहानें बद्ध झाली होती. वारंवार करण्यांत येणाऱ्या आत्यंतिक अत्याचारांचा त्याच्यावर आरोप करण्यांत आला होता. लिलीशीं पहिल्यांदा लग्न करण्यापूर्वी ह्या बयेनें ९ जणांशीं लग्नें केलेलीं होतीं, आणि आपल्या वैवाहिक जीवनांत

* अमेरिकॅना १९२५, पान २९९.

तिनें पुढील पुरुषांच्या नांवानें सौभाग्य धारण केलें होतें, वॉकर, टूंकर, जाइस, बार्न्स, बुचर, क्रो, व्हिटनें, लिली, पोर्टर, स्वॅन्सन, आणि येटस्!" परंतु, हे प्रकार येथें नेहमींचेंच आहेत. ते नेहमींचेंच कसें असणार नाहींत? जेथें मुली १५ वर्षांच्या वयांत आणि कधीं कधीं तर त्या आठ वर्षाच्या असतांनाच नेकिंग आणि पेटिंगचे आस्वाद चाखूं लागतात, व ह्याची खट त्यांना २० व्या वर्षापर्यंत मनमुराद उपभोगावयास मिळते; त्यानंतर कोठें त्या आयुष्यांतील संवयींना नवीन वळण देऊन २० व्या शतकाच्या ह्या दोन वर्षांच्या विवाहाच्या नीतिमत्तेचे धडे गिरवूं लागतात, तेथें असें प्रकार होणें हें साहजिक नाहीं असें कोण ह्मणेल? ज्याकडे परमेश्वर तिरस्कारपूर्ण दृष्टीनें अवलोकन करतो असें व्यभिचार हें पातक राहिलें नाहीं का आतां?

"दुसऱ्याच्या स्त्रीकडे पापदृष्टीनें पाहुं नये" वगैरे आणखी किती तरी नियम आहेत; परंतु तरीही अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांचे वाढतें प्रमाण येथील प्रसिद्ध झालेल्या आंकडेवारी वरून सिद्ध होत आहे. ह्या शेंकडा शंभर अमेरिकनांच्या धार्मिक आचरणाचा आणखी भक्कम पुरावा पहा!

ख्रिस्ती धर्माच्या नीतितत्वांनां येथें असें दूर झुगारून देण्यांत येतें, त्याबरोबरच ह्या धर्माच्या कांहीं दुय्यम महत्वाच्या बाबतींत पराकाष्टेची अंधश्रद्धा आणि असहिष्णुता माजलेलीही आढळून येते. ह्यांचेंच उदाहरण ह्मणून बायबलची उत्पत्ति ह्या प्रश्नासंबंधीं लोकसमुदायांत जीं विलक्षण मतें प्रचलित आहेत, त्याचें देतां येईल. 'धि न्यू यार्क सन' ह्या वर्तमान पत्रानें ख्रिस्ती धर्म आणि बायबल ह्यांचा सार्वजनिक सभांमधून उहापोह करण्यांस यावा कीं नाहीं, असा प्रश्न सर्व जनतेपुढें मांडला त्या प्रश्नाला जीं निरनिराळीं उत्तरें मिळालीं त्यापैकीं कांहीं विशिष्ट स्वरूपाचीं ह्मणून खालीं दिलीं आहेत:—

१. उत्तर पाठविणार, फ्रँक मिलर, एम्. डी., १०० ईस्ट ७४ वा रस्ता:—सार्वजनिक सभामध्यें ख्रिस्तीधर्माची विशेषत: परमेश्वराच्या वचनाच्या सत्यासत्यते संबंधीं चर्चा व्हावी, हें मला मुळींच पसंत नाहीं. नवयुगवाद, आदिभौतिकवाद इतकेंच काय परंतु जुनें बोबिलोनचें तत्वज्ञानही आज ह्या देशांत कित्येक ठिकाणीं शिकवण्यांत येत आहे.

२. एच्. हॅरिस; एकेकाळीं व्यापार करीत असलेला, ५६ कॉन्कार्ड स्ट्रीट, ब्रोक्लीन:-मुळींच नाहीं. बायबल हा प्रत्यक्ष परमेश्वराचा शब्द आहे हें आज कित्येक शतकांच्या अनुभवानें सिद्ध केलें आहे.

३. टर्नर ए. मन्रो. अकौंटन्ट; १२० ब्रॉडवे:-माझें असें मत आहे कीं बायबल हा ईश्वरप्रणीत ग्रंथ आहे किंवा नाहीं त्याची चर्चा सार्वजनिक स्थळीं करीत बसण्यापेक्षां पाद्रीलोक जर आपलें धर्मोपदेश खासगी रीतीनेंच जनतेला देत राहतील, तर अधिक बरें होईल. बायबलची चिंता त्यांनीं करायला नको; स्वत:ची काळजी घ्यायला बायबल समर्थ आहे !

४. जे. सी. क्लॉर्क, खाणावळवाला; १३४ वेस्ट, ४७ वा रस्ता:-प्रत्येकाला मत स्वातंत्र्य आहे. आपलें मत उघडपणें बोलून दाखविण्याचें स्वातंत्र्य ह्या देशांत प्रत्येक व्यक्तीला आहे. परंतु सार्वजनिक स्थळीं बायबलें संबंधीं अशी चर्चा करणें म्हणजे अतिप्रसंग करणें होय. मला हें मुळींच खपणार नाहीं.

५. पी. डी. फ्लीस, सावकार, ११० ब्रॉडवे;-बायबलच्या सत्यासत्यते बद्दल चर्चा करण्याचें प्रयोजनच काय तें मला कळत नाहीं ! ईश्वराचा हा एवढाच ग्रंथ काय तो आपल्याजवळ आहे, आणे ख्रिस्ती धर्म मरणें किंवा तरणें हें त्याच्या खरेखोटेपणावरच अवलंबून आहे.

मानवी बुद्धीला अगम्य अशा विलक्षण तर्कशास्त्राच्या उत्पत्तीचा मान ट्रिनिडॅड येथील एका सन्मान्य धर्माधिकाऱ्यांकडे आहे:--

" मर्त्य मनुष्यानें कांहीं बायबल लिहीलेलें नाहीं ! चांगल्या माणसाला हें बायबल लिहितांच आलें नसतें; आणि वाईट मनुष्याला तें लिहितां येणें शक्य असतें तरी त्याने तें लिहिलेंच नसतें; चांगल्या माणसानें हें लिहिलें नाहीं ह्याचें कारण असें. प्रत्यक्ष बायबलमध्येंच २००८ वेळां असें म्हटलें आहे कीं बायबल हा ईश्वरप्रणीत ग्रंथ आहे; तेव्हां जर मनुष्यानेंच हें लिहिलें आहे असें म्हणावें तर तो मिथ्याभाषी असला पाहिजे, व मिथ्याभाषी मनुष्य चांगला असूं शकत नाहीं; म्हणून बायबल चांगल्या माणसानें लिहिलेलें नाहीं. आतां वाईट माणूस

तें लिहिणार नाहीं, असें ह्मणण्याचें कारण, तो कसा असतो हें त्यांत सांगितलेलें आहे, आणि ह्या वर्णनावर विश्वास ठेवण्याची कोणाही वाईट मनुष्याची इच्छा असणार नाहीं. कारण त्यांवर जर त्यानें विश्वास ठेवला, तर त्याला पश्चाताप होऊन तो मुक्त होईपर्यंत रात्रीं त्याच्या डोळ्याला डोळा लागणार नाहीं, कीं दिवसां त्याला चैन पडणार नाहीं ! ह्मणून वाईट माणसानेंही बायबल लिहिलेलें नाहीं !—ह्मणून तें परमेश्वरानेंच लिहिलें असलें पाहिजे ! ”

‘ धि लुकऔट मॅगझीन ऑफ खिश्चन एज्युकेशन ’ ह्या मासिकानें एका संपादकीय लेखांत खालीलप्रमाणें विषादपूर्ण तक्रार केली आहे:—

“अमेरिकेंतील प्रत्येक कॉलेजमध्यें, टॅसिटस्, व्हर्जिल, होमर, सोफोक्लीस युरिपिडीस, एचिलीस, प्लेटो, ऑरिस्टॉट्ल् ह्यांचे ग्रंथ शिकवून मुलांना असद्धर्माचें शिक्षण देण्यांत येत आहे ! ह्यांच्या ऐवजी, मॅथ्यू, मार्क, ल्यूक, जॉन, पॉल, इसाया, जरामिआ, एझेकील किंवा एतत्सदृष आणखी कांहीं इतर उदात्त लेखकांचीं पुस्तकें कॉलेजांतून लावण्याचें नांव काढण्याचाच अवकाश कीं ह्या शिक्षकांच्या कपाळाला आंठ्यांचें जाळें पडलेंच ! आणि तरीही अमेरिकेंतील खिश्चन जे पैसे देतात त्यांच्याच बळावर हीं कॉलेजे पोसली जात आहेत ! हर हर !”

धार्मिक गोष्टीवरील अंधश्रद्धेच्या निदर्शक अशा ह्या गोष्टींनीं बरीचशी जागा व्यापिली आहे. आधुनिक भौतिक शास्त्रांतील शोधावरून हें स्पष्टपणें सिद्ध झालें आहे कीं, ऐतिहासिक दृष्टया सत्यसंशोधनाचे बाबतींत बायबलचा पुरावा अगदींच मिथ्या आणि ह्मणूनच टाकाऊ आहे. त्यांत गोंवलेलीं कांहीं तत्वें आध्यात्मिक व नैतिक दृष्टीनें श्रेष्ठ दर्ज्याचीं आहेत, एवढेंच काय तें त्या ग्रंथाचें महत्व !

ॲडॅम आणि ईव्ह ह्यांची उत्पत्ती व जेनेसिसमध्यें वर्णन केल्याप्रमाणें जगाची उत्पत्ती हा सर्व इतिहास ६००० वर्षांपेक्षां अधिक जुना नाहीं. ह्मणजे ६००० वर्षांपूर्वी मनुष्यप्राणी अस्तित्वांत नव्हता, असें बायबलचें मत. आणि कोलोराडो येथें केनिआन्सच्या खाणींत सांपडलेल्या मस्तकाच्या कवट्यांनीं असें

साधार सिद्ध केलें आहे कीं, सृष्टीचें अस्तित्व ७५०००००० वर्षांपूर्वींही होतेंच, व त्या जुनाट काळींही उत्क्रान्तीचा व्यापार सुरूंच होता. दुसरे आणखीही इतर कांहीं पुरावे असे आहेत, कीं, त्यांच्यापुढें बायबलचें ऐतिहासिक सत्य डरंगळून कोसळतें ! बायबलचें महत्व कुराण व इतर ' ईश्वरप्रणित ' धर्मग्रंथाप्रमाणें मनुष्याला सुधारण्यासाठीं व्यापक स्वरूपाच्या नीतीचे धडे देण्याचे बाबतींत काय तें असूं शकतें. पण, त्या नीतिशिक्षणाचे हेतु मात्र त्या धर्माचे अनुयायी विसरतात; आणि त्याच्या मूलभूत तत्वांऐवजीं बाह्य स्वरूपावरच भाळून जाऊन त्याच्या मोठेपणाच्या नांवानें डांगोरा पिटीत सुटून डौल मिरवीत हिंडणें, हेंच मात्र खरें खरें धर्म प्रवणतेचें लक्षण आहे असें मानूं लागतात !

आजकाल ढोंगी लब्धप्रतिष्ठाचें बंडही मनस्वी माजलें असल्याबद्दल वार्ता कानीं एक सारख्या येत असतात. कोणती प्रगतीची किंवा सुधारणेची गोष्ट झटली कीं ती बद्दल ह्या भोंदूपणाला विशेषतः चर्चमधून वगैरे तर नुसता ऊत आलेला आढळतो. ढोंगी किंवा भोंदू ह्या व्यक्तीची व्याख्या ह्मणजे, जें आपल्या जवळ नाहीं, तें आहे असें भासवून दुसऱ्यांना लुबाडणारा, अशी आहे. तुमच्या शेजाऱ्यांशीं कांहीं बाबतींत तुमचा मतभेद असला, ह्मणजे तेवढ्यावरूनच त्याच्यावर भोंदूपणाचा आरोप करणें केव्हांही समंजसपणाचें होणार नाहीं हें उघड आहे; आणि तरीही, स्वत:ला जगाला बुद्धिमत्तेचे मार्ग प्रदर्शक ह्मणविणाऱ्या अहंमन्याच्या तोंडीं त्याच्याशीं मतविरोध असणाऱ्यांच्या संबंधीं असलीच घाणेरडी भाषा खिळलेली, आपणांस आढळते !

पारलौकिक जीवनाचें ज्ञान करून घेण्यासाठीं जेथें जनसमुदाय प्रत्यहीं गोळा होत असतो तीं चर्चमंदिरेंच खरें पाहिलें असतां, भोंदूपणाचीं स्मारकें होत, असें, मुक्ति, स्वर्ग, नरक इ० च्या बाबतींत ह्यांच्याहून निराळीं मतें बाळगणाऱ्यांचें ह्मणणें ऐकून घेतल्यानंतर आपणांस दिसून येतें ! भोंदू तोच कीं जो एखादा सिद्धांत जगापुढें मांडतो, परंतु तो सिद्ध करून दाखविण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वस्तुस्थितीचा त्याला कांहींच आधार असत नाहीं. हें गृहीत धरल्यानंतर, फक्त आपल्याच दृष्टीस दिसूं शकणाऱ्या किंवा आपल्या वाचकांना

ऐकूं येणाऱ्या अशा गोष्टींचा प्रत्यक्ष पुरावा दुसऱ्यांपुढें मांडण्याचा प्रसंग आल्यानंतर, आपणापेक्षां कोण भोंदू ठरणार नाहीं ?

ज्याचा ते एवढा आभेमान बाळगतात, त्या मुक्तिदानावद्दल कोणताही खात्रीचा असा पुरावा पुढें मांडण्याचे बाबतींत अमेरिकन मिशनरी अगदींच असमर्थ असतात; आणि तरीही, आत्म्याला परमेश्वराच्या सांनिध्यांत आणण्यांच्या बुरख्याखालीं, त्यांच्या पेक्षां निराळ्या धर्म मतांच्या माणसांना वाटेल तसे वागाविण्यांस कायद्यानें ह्यांनां सर्रास मोहोलत दिलेली आढळते ?

जुनापुराणा धर्मविश्वास अद्यापिही अमेरिकेंत पूर्ववत् टिकून आहे हें विधान अजीबात खोटें आहे, हें थोडासा विचार केल्यानंतर अगदीं स्पष्टपणें दिसून येईल ! चर्चचा लोकांवरील स्वतंत्र ताबा सुटून जाऊन त्याला राज्यशासनांचा आधार कां घ्यावा लागला असावा, ह्याचा कारण ही अगदी उघड आहेत. १८ व्या आणि १९ व्या शतकांत केवळ आदी-भौतिक उत्कर्षाच्या वेडानें पिसाळलेल्या अमेरिकनांच्या अंध दृष्टीला, निव्वळ परंपरागत आणि कल्पनेंतच अस्तित्वात असणाऱ्या अशा गोष्टींकडे लक्ष द्यावयास सवड नव्हती; आणि यूरोपियन संस्कारांशीं आपला नातिच्छेद करून घेण्यांत त्यांनीं ख्रिस्ती धर्मांत जे कांहीं सत्याचे अवशेष असतील त्या पासूनही हात धुवून घेतले ! मृताविषयीं किंवा जिंवताविषयीं परमार्थ साधावयाचा असल्यास नाण्याचा खुळखुळाट करावा, हें रोमन कॅथालिकांचे सांगणें किंवा अन्य धर्मियामध्यें वायबलाचा प्रसार करा किंवा चर्चच्या खजिन्यांत आपल्या द्रव्याची भर घातली ह्मणजे पापापासून मुक्ति करून देऊं अशी नॉन कनफॉर्मिस्ट किंवा प्रॉटेस्टंट धर्माची आश्वासनें, हीं सर्व धर्म मतें धनकनक संपन्न अमेरिकनांना सोईस्कर अशींच होती. खासगी किंवा सार्वजनिक जीवनांतील अनीतिमय व्यापारांशींही ह्या धर्ममतांचे चांगलेंच सूत जमते होत असें; कारण सार्वजानेक सेवेस वाहिलेला अधिकारी कितीही नीच असला आणि

खासगी जीवनांत मनुष्य कितीही अधःपतित झाला, तरी ह्या सर्वांपासून मुक्तता करून घेण्याचा मार्ग म्हणजे द्रव्य होय, ही जाणीव सर्व लोकांमध्यें प्रचलित होती. परमेश्वराची जी कांहीं किंमत असेल तेवढी ह्या दलालांना पटाविली कीं त्याची प्राप्ती झालीच ! आणि एकदां आपल्या उत्पत्तिकर्त्याशीं अशा रीतीनें दिलजमाई करून घेतली, कीं मग त्या व्यक्तिच्या जीवनक्रमाकडे चौकशींच्या किंवा संशयाच्या वांकड्या दृष्टीनें पाहण्याची कोणाची प्राज्ञा आहे ?

ह्या आणि अशाच इतर कांहीं गोष्टी, अमेरिकेंत चर्च संस्थांची नाचकी होण्यास कारणीभूत झालेल्या आहेत. विशेष फिस्कच्या म्हणण्याप्रमाणें येथें धर्माच्या आकुंचितत्वेंवें, मुर्खपणाचे व प्यूरिटनपंथाच्या निंदकतेचें प्रमाणही कांहीं कमी नाहीं ! धर्माचे आचार्य, आणि त्यांचा उपदेश ग्रहण करणारा जनसमाज, दोन्हीं आध्यात्मिक उन्नतीच्या बाबतींत एकाच लायकीचे असतात, विशेषसुद्धां धर्माचार्य म्हणून ओळखला जाणें कठीण आहे, आणि आपली संन्यासाची वस्त्रें फेंकून कोणासही सर्व साधारण गुलहौशी रंगेल इसमाप्रमाणें वेष धारण करून आगगाडींत धूम्रपान करण्यांसाठीं राखून ठेवलेल्या डब्यांत इतर चारचौघांच्या सहवासांत मजा मारीत बसण्यास तो केव्हांही एका पायावर तयार असतो ?*

यूनायटेड स्टेटस् मधील सर्व साधारण व्यक्तिच्या नीतिविषयक कल्पनांतील मुख्य असा चमकारिक विशेष म्हटला म्हणजे दोन प्रकारचा असतो. एक तर शाळेंत जाण्यापासूनच बुद्धिपुरस्सर ज्याला स्वैरता देण्यात येते असा संभोगविषयक अत्याचार, आणि दुसरें म्हणजे सबंध देशभर पसरलेल्या व देशाच्या सार्वजनिक जीवनातील प्रत्येक अंग व्यापिलेल्या अशा राज्याधिकाऱ्यांच्या बेमानीच्या कर्तव्यपालनाच्या कल्पना, ह्या होत.

इन्जीनीअर, केमिस्ट, डॉक्टर, वकील ह्यांसारखे लोकही आपले प्रतिष्ठित उद्योग सोडून विक्री करणाऱ्याचा (Salesman) धंदा

---

* लिटररी, डायजेस्ट, १५ ऑक्टोबर १९२६.

पत्करल्याचीं उदाहरणें कांहीं थोडीं थोडकीं नाहींत; त्यांत गंमत ही कीं हे लोक आपापल्या उद्योगांत कुशल व अनुभवी असें असूनही असें करतात !

अमेरिकेंत कोणत्याही वस्तूचें व्यवहारिक दृष्ट्या महत्व प्रस्थापित होण्यासाठीं, व्यापारी बुद्धीच्या सर्व कौशल्याच्या सामुग्रीसह ती बाजारांत मांडली जाणें हें अत्यावश्यक असतें. फार काय, पण धर्मसुद्धां येथें बाजारांत मांडला जातो ! कांहीं वर्षांपासून धर्मविषयाला वाहिलेल्या नियतकालिकांचे व इतरही संपादक, माल खपविण्याच्या व जाहिरातीच्या मार्गांचा मार्मिक अभ्यास व उपयोग केला नसल्यामुळें ख्रिस्ती धर्माची येथील धर्मरक्षक लोकांत व्हावी तशी विक्री करूं शकत नाहीं, ह्याबद्दल सारखी ओरड करीत असतात. उदाहरणार्थ, 'बोस्टन हेरॉल्ड' काय ह्मणतो, तें पहा:—

"जाहिरातीच्या धंद्याकडे बऱ्याचशा होतकरू तरुणांचें लक्ष वेधलें जात आहे, हें आह्माला ठाऊक आहे. कारण हा धंदा वाढता असून तो दिवसें-दिवस अधिकाधिक परिणामकारक व यशस्वी होत चालला आहे. प्रत्येक गोष्ट 'विकली' गेली पाहिजे, असें मत आज चोहींकडे ऐकावयास मिळतें. प्रेसिडेंटला आपली योजना व मतें 'विकावी' लागतात, कॉलेजेंही शिक्षण 'विकत' देतात, कलाही आपल्या आदर्शाचे व मालाचें दुकान थाटते. नुसते व्यापारी लोकच फक्त आपल्या मालाचें प्रदर्शन मांडून त्याचा विक्रय करीत असतात असें नाहीं, तर मोठमोठाल्या लोककल्याणासाठीं निर्माण झालेल्या उपकारी संस्थाही जाहिरात देऊन गिऱ्हाईक वाढविण्याच्या ह्या कलेंत फार वाकबगार असलेल्या दृष्टीस पडतात. मग हाच उपाय धर्मप्रवचनांनांही कां लागू करूं नये? धर्मोपदेशकांनींही प्रथम आपल्या प्रवचनांचा 'माल' तयार करण्यांत आपल्या रक्ताचें पाणी करावें व नंतर तो माल जनतेला विकावा, ह्यांत वावगें असें काय आहे?"

शिकागो येथील 'मूडी बायबल इन्स्टिटयूट मन्थली' ह्या मासिकांतील कांहीं जाहिराती खालीं देतों, त्यावरून चर्चमध्यें जागाऱ्या अमेरिकनांना धर्माची व देवाची प्राप्ति कशी करून देण्यांत येते तें वाचकांच्या ध्यानांत येईल:—

रोलिंग मिल इव्हेन्जिालिस्ट.— पूर्वी 'रोलिंग मिल्सचा' मॅनेजर असलेले उपदेशक. ठराव करण्यास तयार आहेत.— जार्ज. डब्ल्यू. प्रिमॉस, पो. बॉक्स नं. ३४.

रेव्हरंड चार्लस. ई. ड्रायव्हर.—अगदीं खात्रीचा, निधायक इव्हेन्जिलिझमचा उपदेश—पूर्वी पेस्टर (पाद्री) असलेले फार अनुभवी असा उपदेशक,— फारच यशस्वी झालेला.— मोठमोठ्यांची शिफारसपत्रें— वेळ ठरविण्यासाठीं पत्रव्यवहार करा. पालमिरा, न्यूयार्क.—

उपदेशक व बायबल- शिक्षक:— जूनस व्हूकर. पाद्रीपणाचा, उपदेशकाचा आणि बायबल शिकाविण्याचा २८ वर्षांचा अनुभव आहे.— बायबल पाठासाठीं व उपदेश दानासाठीं कांहीं दिवस मोकळा आहे. वाटल्यास व्यक्तिशः भेटीस यावें. किंवा आपसांत ठरवून सामुदायिक स्वरूपांत ठराव करावा. शिफारसी, तारीख इ. चा ठराव करण्यासाठीं पत्र पाठवा. पत्ता—स्प्रिंगफील्ड, ओहिओ.

आजच डॉलर पाठवा आणि एका अत्यंत होतकरू चिनी मुलाला त्याच्या लोकांतच, धर्मोपदेशक बनविण्याच्या कार्यास हातभार लावा परमेश्वर तुमचें भलें करील. कितीही रक्कम पाठविली तरी तिचा स्वीकार केला जाईल. नांवावर लिहिलेले चेक घेतले जातील. (चीनला पोस्टेज पांच सेंट द्यावें लागतें.) रेव्हरंड एच. जी. मिलर, वूचाअ, क्वांगाई, चीन.

खिस्ती लोकांचीं नांवें व पत्ते पाहिजेत:—अरिझोनाचा प्रवास करून सद्धर्माचा प्रसार करण्यासाठीं खर्च पुरविण्याची कबुली देणाऱ्या खिस्ती लोकांचीं नांवें पाहिजेत. पत्ता—राबर्ट मॅक्मुर्डो, पीओरिआ, आरिझ.

२५०००० डॉलर्स-किंमतीची दिखाऊ नाणीं:—दहा डॉलरची एक अशा २५० नोटा, ह्यांच्या मागें बायबलमधील उपदेश वचनें छापली आहेत. किंमत २५ सेंट. ह्या शिवाय दुसऱ्या असल्याच गंमतीच्या वस्तूंचे नमुने फुकट. गॉस्पेल कंपनी. स्टॅटपलटन, न्यू यार्क. *

---

* अमेरिकेना १९२५, पान. ६५.

एखाद्या धर्मोपदेशकानें आपले उपदेश विकण्याची कला हस्तगत केली, ह्मणजे मग त्याला चांगले पैसे देणाऱ्या धर्मोपदेश श्रवण करणाऱ्यांची वाण कधींच पडत नाहीं. कॉन्ससमधील ओवेन्सबोरो गांवांत राहणाऱ्या रेव्हरंड बी. जी. हॉज नामक उपदेशकानें तेथेंच प्रसिद्ध होणाऱ्या "मेसेंजर" नामक पत्रांत खालीलप्रमाणें जाहिरात दिली, तेव्हां त्याचा उपदेश श्रवण करण्यासाठीं हजारों लोकांची गर्दी लोटली होती:-

"सालोमन ह्मणजे सहा सिलेंडरची स्पोर्ट मॉडेलची मोटार गाडी:-ह्या 'जुन्या खाडू' इतक्या बायका आणि रखेल्या ठेवण्याची तुमच्यांत शक्ती आहे कां? रेव्हरंड बी. जी. हॉज रविवारीं रात्रौ सीटल मेमोरियल येथें ह्या विषयावर प्रवचन करतील प्रत्येकानें यावें."*

एका धाडसी पाद्र्याला आकाशांतील बापानें कसा हात दिला त्याची हकीगत वर्तमानपत्रांतून पुढील प्रमाणें प्रसिद्ध झाली आहे:-

"रा. वॉकर.....हे पहिल्या कांग्रिगेशनल चर्चनें पाद्री आहेत. हे इंद्रधनुष्याच्या सर्व रंगांत कॅलेंडर छापवून तें प्रत्येक आठवड्यास २००० च्या पेक्षां अधिक लोकांकडे पाठवीत असतात. आपलीं वचनें मोठमोठाल्या अक्षरांत ते रस्तोरस्तीं भिंतीवर फडकावीत असतात. वर्तमानपत्रांत त्यांच्या मोठमोठाल्या भडक जाहिराती प्रसिद्ध होतात. प्रवचनाचें प्रसंगीं, व्यासपीठाचें आंवती भोंवती मंद पिवळा प्रकाश सोडण्यांत येतो; त्या व्यतिरिक्त इतर सर्व चर्चमध्यें अंधःकारच असतो. त्यांच्या घरीं आठवड्यापेक्षां प्रत्येक दिवशीं रात्रौ नाचतमाशे, रेडिओचे प्रोग्राम, पत्त्याचे अड्डे, आणि इतर सर्व प्रकारच्या करमणुकीचें कार्यक्रम सुरू असतात. त्यांच्या घरीं तरुण वर्गांतील स्त्रीपुरुषांची प्रत्यहीं बरीच गर्दी जमत असते. दोन वर्षांपूर्वी त्यांच्या घरी जमणाऱ्यांची संख्या साधारणपणे २०० च्या जवळपास असे; आजला ती १००० पेक्षांही अधिक बनली आहे.*

---

* अमेरिकॅना १९२५, पान ८९ व १०३.

अंधःकारपूर्ण वातावरणांत विविक्षित वस्तूवरच प्रकाश पाडून ती लोकांच्या नजरेंत भरविण्याच्या मार्गाचाही उपयोग थोडाथोडका होतो असें नाहीं; आणि हा उपयोग ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचे कामी करून घेण्यात येतो, तो असा:-

" रॉजर्स पार्क बॅप्टिस्ट चर्च येथील पाद्री ग्रिफिन ह्यानें आपल्या श्रोतृ-समुदायापुढें पांच प्रकारच्या युवतींचें प्रदर्शन मांडलें. त्यानें प्रवचना करतां घेतलेला विषय " विवाहास योग्य अशा प्रकारची तरुणी " हा होता. चर्चच्या पुढील भागांतच एक मोठी थोरली चौकट असून ती पुष्पमालांनीं अलंकृत केली होती. त्या चौकटीचा पुढील भाग पारदर्शक अशा कागदानें मढविलेला होता. ह्या चौकटीच्या मागें एक एक मुलगी आळीपाळीनें येऊन उभी राही व मग ह्या चौकटीवर विजेच्या दिव्याचा प्रकाश पाडण्यांत येई. "*

मिचलीन संस्थानांतील कालामाझू ह्या पापभीरु शहरांत ईश्वराचा संदेश कसा पसराविण्यांत येतो तें पुढील हकीगतीवरून दिसून येईल:-

रविवार रात्रीचा चमत्कार !

सुहास्यवदन असे चोपदार तुम्हाला आरामदायक अशा खुर्च्यांवर नेऊन बसावितील. चोहोंकडे लावलेल्या झगझगीत दिपमाला तुमचे स्वागत करतील. बरोबर सायंकाळीं ७ वाजतां रा. क्रुप हे आपल्या रि-जाय-सिंग नामक गायकांच्या मेळ्यांसह बायबलांतील गीतें गावयास प्रारंभ करतील;-अहाहा ? ह्या पैकीं प्रत्येक जण किती सुरेख गातो ह्मणून सांगावें ! त्यानंतर चर्चची वर्दी घातलेल्या

कोरस कायरची

खास निवडक पद्यें ह्मणण्याची पाळी येईल. लवकरच टक् टक् असा आवाज होऊन चोहोंकडे पसरलेला प्रखर प्रकाश बंद होऊन डॉ. जी. एच्. पॅस्टर ह्यांच्यांवर प्रकाश सोडण्यांत येईल. हे ' **जगांतील आधुनिक सात महाद्याश्चर्यें** ' ह्या विषयावर एक लहानसे सुश्राव्य

---

* अमेरिकॅना, १९२५. पान १०३.

व्याख्यान देतील. हें व्याख्यान सर्वस्वी धर्मविषयकच राहील ! पाद्री साहेबाचे व्याख्यान आटोपण्याचे सुमारास (एका अल्पवयी बलाख मुलाकडून वाजविण्यांत येणाऱ्या) वांसरीचे मंजुळ आलाप तुमच्याकानीं येतील आणि त्याच्या लागोपाठ **लोरीन श्वीकरचा** मादक मंजुळ गायन स्वर तुमच्या कर्णांनां रिझवील. ह्यानंतर-पुन्हां चोहींकडे दिव्याचा झगझगाट ! आणि चर्च मधून निघतेवेळीं दाराशींच एका २५ सेंट किंमतीचा लोकप्रिय मासिकाचा अगदीं ताजा अंक त्या मासिकाच्या संपादकाच्या भेटी दाखल तुमच्या हातीं पडेल. होय हा अंक तुह्मांला फुकटच देण्यांत येणार आहे; त्याबद्दल कांहींच किंमत तुह्माला पडणार नाहीं:-पण जीवनांतील सर्वच सुंदर व महत्वाच्या गोष्टी-उदाहरणार्थ सूर्यप्रकाश, प्रेम, धर्म, हास्य-ह्या सुद्धां आपल्याला कांहीं किंमत न पडतां फुकटच मिळत नाहींत कां ?

उद्यांची देणग्यांची रात्र !

रविवारीं सायंकाळीं ७ वाजतां.

पहिल्या बप्तिस्ट चर्चमध्यें !

शहराच्या अगदीं मध्यवस्तीत ! *

' व्हीलिंग रजिस्टर ' मध्यें प्रसिद्ध झालेलें धर्मप्रवचनाचें दुसरें स्वरूप हें पहा:-

" रविवारीं सायंकाळीं वे टेंपल येथील रेव्हरंड विलियम इलिअट हमॉन हे खालील प्रश्न चर्चेसाठीं घेतील:-

लठ्ठंभारती आर्बुकलशीं तुह्मी जी भेट घेतली, त्यांतून काय निष्पन्न झालें?

आर्बुलकला, तुझें ८० पौंड वजन कसें कमी झालें ह्या प्रश्न तुह्मी विचारल्यावर तुह्माला काय सांगितलें ?

मोठीं पाउलें असणाऱ्या मुलींनीं दंतवैद्य व्हावें काय ?

मृतांबरोबर पुरलेल्या इतर वस्तूंचा आत्म्यावर परिणाम घडतो कीं काय ?

---

* अमेरिकॅना १९२७, पान १२६.

रेमन हिचकॉक ह्याच्या आवडत्या अंध विश्वासांबद्दल तुमचें काय मत आहे ?

आपल्या स्नेह्याच्या मृतात्म्यांवर एकाग्र चित्त केलें असतां त्यांचें लक्ष आपल्याकडे वेधेल कीं नाहीं ?

आपल्या प्रिय व्यक्तीच्या मरणानंतर तिच्यासाठीं शोक करीत राहण्याच्या त्या व्यक्तीच्या आत्म्यावर कांहीं परिणाम होतो कीं काय ?

यूनायटेड स्टेटस्‌नें पुढील युद्धाच्या तयारीस लागावें कीं नाहीं ? "*

ह्या व इतर उदाहरणांवरून असें सिद्ध होतें कीं अमेरिकेंत चर्च ह्मणजे मालाची एक भली मोठी वखार—व्यापाराची एक भली थोरली पेढीच आहे, आणि येथें नैतिक किंवा धार्मिक योग्यतेपेक्षां माल खपाविण्यास आवश्यक असणारी व्यापारी हुशारीच अधिक उपयुक्त ठरते ! देवाच्या धर्माचा विक्रय करावा लागतो ! पुष्कळसे लोक जमा होत असतील, मोठमोठाल्या देणग्या मिळत असतील, आणे पुष्कळ शिल्लक गोळा करण्याची सांधे मिळत असेल, तर चर्चला नाटक गृहाचे स्वरूप देण्यास काय हरकत आहे ? ' देव धर्म आणि कंपनी ' इनकार्पोरेटेड ह्या पेढीच्या वहीखात्यावर परमेश्वर, ख्रिस्त आणि बायबल हीं नांवें व्यापाराचा 'माल' ह्मणून नमूद केलेली आहेत, आणि ह्या संस्थेची उभारणी पाद्री, साधु व ' सार्वजनिक नीतिमत्तेची सुधारणा घडवून आणणाऱ्या संस्थेच्या सन्मान्य सभासदांनीं ' केलेली आहे ! ह्या मालाची टिमकी जितकी भडक व ठसकेबाज स्वरूपांत वाजवावी, तितकाच खप जास्त होऊन अधिक नफा भागीदारांच्या पदरांत पडतो. ह्या व्यापारीमंडळाचा नफा दुःखाचा नायनाट, नीतीची जाणीव, धार्मिकता, ह्या स्वरुपांत नसतो, तर तो रुपये, आणे आणि पै ह्या स्वरूपांत असतो आणि तो नफा त्या लोकांमध्यें विभागला जातो. त्यांचें वर्णन विशद फिस्क पुढीलप्रमाणें करतात. " हे ह्मणजे चर्चमध्यें ज्यांचा सुळसुळाट झालेला आहे असे नष्टतेज लफंगे

---

* अमेरिकॅना १९२७, पान २६९.

भोंदू, धर्मोपदेशक असतात, आणि त्यांच्या मूर्खपणाचा व चारित्र्यहीनतेचा इतका कळस झालेला असतो कीं त्यामुळें दुसऱ्यांना 'पाद्री' ह्मणवून घेण्याचीही लाज वाटावी!" *

ही सर्व व्यापारी कुशलता चर्च-आधिकाऱ्याकडून अवलंबिली जात असूनही चर्चचें महत्व दिवसें दिवस कमी कमी होत आहे, आणि समाजांत बौद्धिक, नैतिक आणि आत्मिक ऱ्हास सपाट्यानें सुरू आहे ह्या बद्दल बिशप फिस्क व इतर लेखकांचे पुरावे जर मान्य केले तर मग, चर्चच्या जाहिरात खात्यानें चौकशी करून, शेंकडा ७७ स्वर्गमध्यें जाणारे व शेंकडा ९१ परमेश्वरावर श्रद्धा बाळगणारे लोक अमेरिकेंत आहेत, ही बातमी जी जगाला सांगितली, तिच्यावर विश्वास ठेवण्याचें कोणाला कांहींच कारण नाहीं!

ह्या प्रश्नाचा जों जों अधिक विचार करावा तों तों, ह्या चौकशींच्या निकालांवर कमी कमी विश्वास ठेवावासें वाटूं लागतें अमेरिकेत पुराणमतामिमानी लोक आहेत असेंही ऐकावयास मिळतें. आतां मूर्खपणाच्या ह्मणून सिद्ध झालेल्या अनेक मतमतांतरांनां उराशीं घट्ट वाळगणाऱ्या, व निष्ठुर, मूर्ख, धर्मांध व पूर्वग्रहदूषित अशा धर्माधिकाऱ्यांचाही येथें सुळसुळाट आहे असेही आपणास आढळतें. यूनायटेडस्टेटस्चा स्वर्गातील परमेश्वराच्या साम्राज्याशीं अगदीं निकट संबंध आहे, येथें ९१ टक्के लोक ईश्वरावर विश्वास ठेवणारे, ८५ टक्के येशू व बाप्तिस्माला मानणारे व ७१ टक्के प्रत्यही न चुकता चर्चमध्यें जाणारे आहेत, असेही सांगण्यांत येतें. पण तुह्माला सत्य हवें असेल, उघड उघड सत्य ह असेल, भोंदूपणा व नकलीपणाचा बुरखा दूर सारलेलें खरें खरें सत्य हवें ल तर, अमेरिका अ-ख्रिस्ती आहे, अमेरिका परमेश्वराला न मानणारा देश आहे, अमेरिका अधार्मिक आहे, अमेरिका मूर्खपणा, भोंदूपणा आणि ॲडॅम आणि ईव्ह पासून तो अगदीं येशूच्या १२ सच्छिष्यां पर्यंत जीं जीं ह्मणून पातकें घडलीं असतील ह्या सर्व पातकांचा बुजबुजाट झालेला देश आहे!

---

* लिटररी डायजेस्ट, १६ आक्टोबर, १९२६.

अमेरिकेचा सोशीकपणा, उद्योगप्रियता, धडाडी, कल्पकता, इ. गोष्टींची स्तुति केली तर ती योग्य आहे असें आह्मी ह्मणूं. पण अमेरिकन जीवन, नीतिमत्ता, इमान, धर्म इ. गोष्टी जर ख्रिस्ती धर्माच्या निदर्शक ह्मणून ह्मणावयाच्या असतील तर आमचें असें स्पष्ट मत आहे कीं, वायबलची सार्वजनिक होळी करून चर्चचीं शिखरें जमीनदोस्त जितक्या लवकर करण्यांत येतील तितकें अधिक बरें ! लोकांच्या नीतिमत्तेवर नियंत्रण ह्मणून घालून देण्यांत आलेल्या नियमांबरोबरच इतक्या मूर्खपणाचे व नंगेपणाचे प्रकार हमखास चालूं देण्यांत येतात कीं त्यांना कोणत्याही दुसऱ्या देशांत मोकळी वाव मिळणें शक्य नाहीं.

" कोनी बेटामध्यें एक कोटीच्यावर करमणुकीचे प्रकार आहेत, आणि ह्यांपैकीं प्रत्येक संबंध जगांत अद्वितीय असा आहे. ह्या दृष्टीनें कल्पकता शिकविण्याचे बाबतींत हा आदर्शभूत आहे.....पण ह्या सर्वांपैकीं एक स्थळ असें आहे कीं, तेथें जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या पैशाचा भरपूर मोबदला मिळाला असें वाटल्या वांचून रहात नाहीं. हें स्थळ ह्मणजे 'स्टीपल चेस पार्क' ! हें ह्मणजे मोकळ्या गमतींचें ठिकाण समजले जातें. येथें असणारी प्रत्येक गोष्ट कशी गुदगुल्या करणारी असतें. येथील मुख्य आकर्षण ह्मणजे 'कामेडी लेन' हा विभाग होय; आणि ह्या कॉमेडी लेन मधील प्रमुख आकर्षण ह्मणजे एक विशिष्ठ जागा आहे. ह्या जागीं जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या झग्याखालीं अगदीं एकाएकीं व अकल्पितपणें वाऱ्याचा एक प्रचंड झोत सोडण्यांत येतो....."

" हें स्थळ एका लाकडी रंगभूमीवर होतें. ह्या ठिकाणीं मागच्या बाजूनें प्रवेश करण्याची सोय होती, व रंगस्थलावर प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना आपण पुढें स्टेजवर जाणार असून तेथें हजारों प्रेक्षकांचा समुदाय गोळा झालेला असेल ह्याची कल्पना नसते. वीस वीस पंचवीस पंचविसांच्या तरुणींच्या टोळ्यांनीं स्टेजवर प्रवेश केला कीं, त्यांच्या झग्याखालीं एकदम तो वारा सोडण्यांत येई, व त्याच्या सोसाट्यानें त्या सर्वांचे झगे एकदम वर फेंकले जात.

"वाऱ्याच्या प्रत्येक झोतासरशीं ह्या प्रकाराची पुनरावृत्ति होई व त्यासरशीं प्रेक्षकांत हंशाची एकच प्रचंड लाट उसळें !"

बर्लेस्क हा अमेरिकन नाटकांतील दुसरा एक हास्यरसप्रधान व विशेष गमतीचा असा नाट्यप्रकार आहे:—

"ज्या नाटकाला मी गेलों होतों त्यांतील प्रमुख प्रवेश ह्मणजे स्टेजवर नग्न होणें हा होता. गायक मुलींची जी नेत्री होती तिचें सर्व शरीर अगदीं तलम व पारदर्शक अशा वस्त्रानें आच्छादित होतें व त्यावर तिनें आणखी पांच सहा वस्त्रांचीं आवरणें घातलीं होतीं. हळू हळू एका मागून एक ती हीं वस्त्रें काढून टाकी आणि तरीही तिच्या वर्तनांत पोलिसला आक्षेपार्ह असें काहींच आढळेना ! आपल्या ताफ्यासह एका लोकप्रिय पदाची कडवीं ती पुन्हां पुन्हां घोळून ह्मणत होती, व प्रत्येक खेपेस एक एक वस्त्र अंगावरून काढून ती दूर भिरकावीत होती व नृत्यांतील निरानिराळे अंगविक्षेप करीत होती, आणि तिला प्रेक्षकांकडून उत्तेजनही भरपूर मिळत होते. अनुभवी प्रेक्षकांनां ती आजिबात विवस्त्र कधींच होणार नाहीं हें ठाउक होते, आणि तरीही ती तशी होईल अशी अपेक्षा मात्र त्यांच्या अंत:करणांत वावरत असें. अशाप्रकारे आपल्या मनोवृत्तीवर करण्यांत येणारे आघात त्यांना आवडत नसूनही (?) ते टाळ्या वाजवून व अन्य प्रकारांनीं आपला आनंद व्यक्त करीत होते! पांढऱ्या त्रिकोणाकृति वीतभर वस्त्राच्यावर कोळ्याच्या जाळ्या इतक्या पातळ वस्त्रांचें आवरण राहण्या पुरती त्या स्त्रीची पाळी आली, ह्मणजे शीळ घालण्यांत येऊन प्रेक्षकांच्या दृष्टीपुढें पडदा सोडण्यांत आला ! 'आ: ! कांरे, तुला कसें वाटतें रे ? हें पाहिल्या नंतर आतां रात्रीं झोंप तरी कशी येणार ? असे उद्‌गार चोहींकडे निघूं लागले.

"प्रेक्षकांमध्यें चांगल्या धष्टपुष्ट तरुणांची गर्दी होती पाहिलेल्या दृश्याचा त्यांच्या मनांवर व देहावर परिणाम झाला असून ते बसल्याजागीं चुळबुळ करीत होते. त्याच्या ह्या अस्वस्थतेची छाया सबंध वातावरणावरही

पसरल्यासारखी वाटत होती. काय हें दृश्य ! असें सांगतात कीं, ह्या तापल्यांत नोकरी पाहिजे असेल तर तरुणीचें वजन १५० पौंड असावें लागतें. शरीरानें चांगलींशी असलेल्या स्त्रीला प्रेक्षक आपल्या डोळ्यानें जणूं काय लचके तोडून खातच असतात, असें वाटतें ! प्रेक्षक ह्मणजे कावळे व अशी स्त्री हें त्यांचे भक्ष्य असेंच ह्मणावें लागतें. सेल्ट व अँग्लो-सॅक्सन प्रेक्षकांनां स्त्रियांच्या नग्न व सुदृढ मांड्यांत विशेष सौंदर्य प्रत्ययास येते तर ज्यू आणि स्लॉव्ह लोकांनां त्यांच्या पीन व उठावदार स्तन मंडळाकडेच पहात रहावेंसें वाटत असतें.

" शेवटीं मोठ्या तापयाची पाळी आली आणि त्यांत शरीरांतील गुह्य भागांचे प्रदर्शन करून नृत्यास प्रारंभ करण्यांत आला. हालचाल न करणारा आणि तरीही अत्यंत आल्हादायक असा जो स्त्री देहातील अवयव त्याची ही विलक्षण करामत पाहून प्रेक्षक दगडी पुतळ्याप्रमाणें स्तब्ध बसून होते. सालोमनचें आपल्या प्रियकरणीची प्रशंसा केली होती, त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच कारण नव्हतें, असें त्या दिवशीं मला दिसून आलें ! परंतु ज्यांचा सालोमनवर विश्वास नाहीं अशा लोकांसमोर हें प्रदर्शन मांडणें ह्मणजे भयंकरच आहे ! ह्या अवयवाचा संबंध, मूर्तिकाराशीं, चित्रकाराशीं, प्रणयी पुरुषांशीं किंवा परमेश्वराशीं-शिवाय ह्या अवयवांचे विक्षेप हेच मुळीं हिडीस वाटत होते. प्रेक्षकांनां हसांवेण्यासाठींच स्त्रीनें आपल्या सौंदर्याची व देहाची अशी विडंबना करून घ्यावी हें खरोखर अक्षम्य पाप होय !.....

" गुलाबी पुष्पांचें झुबकें स्तनांच्या अग्रभागीं लावलें ह्मणजे त्यांचे स्तन वर्तुलाकार फिरूं लागत आणि फिरत्या विजेच्या पंख्याप्रमाणें ते दिसूं लागत ह्या सर्व प्रकाराकडे प्रेक्षक सस्मित वदनानें टक लावून पहात होते !"

ज्या देशांत असें प्रकार घडत असतात, जेथें नीतीचा ह्रास झालेला स्पष्टपणें दिसत आहे, जेथें व्यभिचाराचें अड्डे सर्रास चालूं आहेत, जेथें भर रस्त्यावर जिवंत माणसाला छळून छळून मारण्यांत स्त्रियाहि भाग घेतात,

जेथें स्त्रियांवर हल्ला करून त्यांच्यावर जबरी करण्याचा सैनिक उघडपणें धाक दाखवितात, जेथें धर्मसंरक्षक खुनासारख्या गुन्ह्यांत भाग घेतात, जेथें लग्न ह्मणजे थट्टा असून संभोगाची तृष्णा बेसुमार वाढलेली आहे, जेथें जगांत कुठेंही नसतील इकडे भोंदू वावरत आहेत, जेथें स्वार्थसाधूपणाचें अड्डे, मोठ्या हिततत्पर संस्थाच्या नांवाखालीं खुशाल चालविण्यांत येत आहेंत, जेथे भ्रमाचे व अंधविश्वासाचें प्रकार जगांत कुठेंहीं नसतील इतके आढळून येतात, जेथें देशाचें कायदे खुशाल धुडकावून लावण्यांत येतात जेथें क्षुल्लक गुन्ह्यां बद्दल भयंकर शिक्षा देण्यांत येऊन भयंकर गुन्ह्याकडें खुशाल कानाडोळा करण्यांत येतो, जेथें शिरगणतीचें आंकडे खोटे प्रसिद्ध करण्यांत येतात. तेथें "अमेरिका हा आज इतिहासांतील नीतिमत्तेचा विराट पुरुष आहे." असें ह्मणण्यांचें धाडस करावयास अमेरिकनच पाहिजे; दुसऱ्याची ती छाती नाहीं ? पण प्रेसिडेंटच्या पदासाठीं उमेदवार असणाऱ्या ह्या महनीय व्यक्तीचे हें उद्गार ह्मणजे शंभर टक्के अमेरिकनाचें, शंभर टक्के लफंग्यांचें उद्गार होत! मधून मधून क्वचित एकदा असा सचीचा लाल भेटतो कीं जो वस्तुस्थितीच्या सत्य स्वरुपाबद्दल कबुली द्यावयास तयार असतो.

शंभर टक्के अमेरिकन, ७० टक्के चर्च मध्यें जाणारा व ९१ टक्के ईश्वरावर श्रद्धा बाळगणारा हा अमेरिकेच्या नीतिमत्तेचा विराट पुतळा कसा आहे त्याचा समारोप प्रख्यात कवि क्लॉड मॅक्के असा करतो:-

"(युनायटेड स्टेटस्च्या सुधारणा ज्यांत पूर्णत्वानें अवतरल्या आहेत अशा) स्प्रिंगफील्ड फ्रॉम इन्डिआना ह्या गांवांत अमेरिकाची नवी युद्ध-शक्ति संकलित झाली आहे; ही शक्ति ह्मणजे वेस्ट इंडीज, फिलिपाईन बेटें, यूरोप व पूर्व ह्यांतील सर्व संस्कृतीचा आपल्या हातांनी अमेरिकन भोंदूपणा व डॉलर ह्या अस्त्रांनीं संहार करणारी शक्ति होय. सार्वजनिक ठिकाणीं निरपराध्यांना छळून छळून मारणें, व्यभिचार, सिनेमा, रविवारचे खास अत्याचार, निवडणुकीचे निंद्य प्रकार, अमेरिकन स्टेटचा गळेकापूपणा, इ. कृत्यांत आवश्यक असणारी निघडी छाती ह्या विराट पुरुषाचीच ! हा ह्मणजे अत्यंत

प्रबळ व भावनामय असा कृत्रिम पुरुष आहे; कोणत्याही अवस्थेंत बुद्धीचा उपयोग ह्मणून करायचाच नाहीं, हा याचा बाणा आहे; आणि स्नेह, मित्रत्व, स्त्री–पुरुष–संबंध, कर्तव्य, जें जें ह्मणून सुधारलेल्या समाजांत सुंदर व श्रेयस्कर असें गणलें गेलें असेल, त्याला आपल्या पाशवी हस्तस्पर्शानें दूषित करणारें असें हें पिशाच्च आहे !

प्रकरण १५ वें.

बंडखोरीचा एक प्रयोग !

रशियाच्या समतावादी लोकांकडून, किंवा एखाद्या स्वयंमन्य मूर्ख राजकारणज्ञा (?) कडूनच नव्हे, तर न्यायाधीश, समतोल बुद्धीचे संपादक, राजसभांमधील लोकनियुक्त सभासद व अमेरिकन राज्य घटनेमधील इतर जबाबदार अधिकारी ह्यांच्याकडूनही जेव्हां 'खून' असा शब्द अमेरिकन राज्यघटनेवर लादण्यांत येतो, तेव्हां हें आहे तरी काय, ह्याचा थोडासा विचार आवश्यक वाटल्या वांचून रहात नाहीं !

मद्यपाननिषेधाच्या प्रश्नाच्या बरेवाईटपणाविषयीं आम्हाला येथें कांहींच कर्तव्य नाहीं. राज्यव्यवस्थेनें व्यक्तीच्या खासगी आवडी नावडी मध्यें हात घालावा किंवां नाहीं, आणि मद्यपाननिषेधाचे कायदे राज्याधिकाऱ्यांकडून योग्य रीतीनें बजावले जाऊं शकतात किंवा नाहीं. ह्याबद्दल चुक्कळशा अधिकारी लोकांनीं विचार केलेला आहे पण हें कांहीं जरी असलें. तरी एवढें मात्र खरें आहे कीं, आजच्या आमच्या ह्या सुधारणेच्या युगांतील मद्यपान हा एक महत्वाचा प्रश्न आहे ! वेश्यागमन, व्यभिचार बळजबरी, अनैसर्गिक मैथुन, चोरी, जुवेबाजी ह्या सारख्या भयंकर गुन्ह्यांनां प्रवृत्त करणारी ही गोष्ट आहे, आणि ह्याचा शेवट गृहसौख्याच्या नाशांत, कुटुंबाची वाताहत होण्यास आणि वैयक्तिक नीतिमत्तेची

धुळधाण होण्यांतच होतो, हें सर्वमान्य आहे! हे व इतर मुद्दे ॲन्टि-सलून लीग ऑफ अमेरीका" ह्या संस्थेने अमेरिकेच्या मस्तकी जेव्हां मारले, तो प्रसंग ह्मणजे अमेरिकेतिल सामाजिक क्रांतीच्या इतिहासांतील फार महत्वाचा होता. मद्यपान निषेधाचा १८ वा कायदा येथें अस्तित्वांत येण्याच्या पुष्कळ पूर्वी पासून पानगृहांच्या (Saloons) विरुद्ध चांगलेंच युद्ध सुरू होतें आणि हें युद्ध सुरू करणाऱ्या संस्थेनें आपलें कार्य यशस्वी व्हावें एतदर्थ लक्षावधी डॉलर्सचा चुराडा केला. प्रसिद्ध झालेले आंकडे असें दाखवितात कीं १९१९ साल पर्यंत एकंदर पांच कोट डॉलर खर्च झाले आणि १९१९ ते १९२५ मध्यें आणखी ११००००० डालरच्या खर्चाची भर पडली! नुसते निषेध प्रदर्शक वाङ्मयच जवळ जवळ ७५०००००००० पृष्ठांचे ह्मणजे पांच पांचशें पृष्टाचें एक एक पुस्तक असा १५०००००० पुस्तकांच्या ग्रंथालयाच्या इतकें प्रसिद्ध करण्यांत आले.

मद्याच्या विरुद्ध पुकारलेल्या ह्या युद्धांत चर्चचे तसें स्त्रियांचेही सहाय्य घेण्यांस आलें होतें. शेवटीं ह्या प्रतिरोधी शक्तींचा जय झाला परंतु हा जय फारच थोडे दिवस पर्यंत टिकला. १८ वें कालम पास होऊन थोडे दिवस लोटतात न लोटतात तोंच त्या कलमाचा नायनाट करण्याच्या प्रयत्नांस सुरुवात झाली वर्तमानपत्रांतून, व नैतिक अधःपाताच्या मार्गास लागलेल्या स्त्री-पुरुष विद्यार्थ्यांनी भरलेल्या शाळा-कालेजांतून, ह्या निषेधाला प्रतिनिषेधात्मक अशी चळवळ सुरू झाली!

१८ व्या कलमानें 'प्रतिबंधाचा' अगदीं स्पष्ट, थोडक्या व गर्भ-पूर्ण भाषेंत अर्थ व्यक्त केलेला होता. त्या कायद्यानें असें ठरविलें होते होते कीं, "..... ह्या कायद्यानें युनायटेड स्टेटस् व त्यांच्याखालीं येणाऱ्या सर्व संस्थानांच्या हद्दींत, दारू बनाविण्यासाठीं मादक द्रव्य तयार करणें, विकणें किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणें, किंवा बाहेरून ह्या हद्दींत आणणें, ही गोष्ट गुन्हा ह्मणून समजली जाईल!" ह्या कायद्याचा अर्थ अर्थातच अगदीं स्पष्ट होता. ह्या प्रतिबंधाचा अर्थ

कोणीही मद्याचा उपयोग करूं नये किंवा तें बरोबर घेऊन हिंडू नये असा होता.

पण हा प्रतिबंध खरोखर अमलांत आणला गेला आहे कां? खरोखरच ह्या शब्दाचा अर्थ, वास्तविकपणें आणि इमानदारीनें, असा आहे. १८ वें कलम आणि व्हॉलस्टेड ॲक्ट हे बाह्यतः अगदीं खरेखरे प्रतिबंधक कायदे असावें असें दिसतें, हें खरें आहे. कायद्यांचे बंधन पाळणाऱ्या सज्जन नागरिकांचें ह्या नंतरचे वर्तन कसें असावयास पाहिजे तेंही अगदीं स्पष्ट होतें. ह्या कायद्याला ४६ अंतर्गत संस्थानांनीं मान्यता दिली होती; फक्त कनेक्टिकट आणि व्होडस् बेटें यांनीं मात्र मान्यता दिली नाहीं. इतर सर्व संस्थानांनी, ह्या कायद्याच्या अंमलबजावणी-साठीं आपापल्या सीमेंतही तसेंच कायदे लागू केलें. ह्या कलमाच्या अंमलबजावणीचा कायदा जर कोणी रद्द केला असेल, तर तो मात्र फक्त एका न्यू यार्क स्टेटनेंच !

ह्या सुधारणेची किंवा वॉलस्टीड ॲक्टची अंमलबजावणी करण्यासाठीं कायद्यांत कांहीं नवीन फेरबदल करावे लागणार होते असें मुळींच नाहीं. फौजदारी कायद्यामध्यें किंवा त्या कायद्यांच्या वहिवाटीच्या स्वरूपांत, ह्या एवढ्या सुधारणेसाठींच म्हणून कांहीं फेरबदल करावा लागणार होता, असेंही नाहीं. जी कांहीं कायद्यांच्या अंमलबजावणीची व वहिवाटीची व्यवस्था अस्तित्वांत होती, तीच ह्या सुधारणेच्या वहिवाटीला पुरेशी पडणारी अशी होती, आणि सबंध युनायटेड स्टेट्समध्यें ह्या कायद्याची अंमलबजावणी होण्यास कोणतीही अडचण असण्याचें कारण नव्हतें !

परंतु कायद्याच्या अंमल बजावणीचे दोन अर्थ असूं शकतात.

एक अर्थ ह्मणजे, देशानें लागू केलेल्या कायद्याचे पालन करणें. ही जबाबदारी युनायटेड स्टेट्सच्या सरहद्दींत येणाऱ्या प्रत्येक नागरिकावर व राज्याधिकाऱ्यावर होती. आणि ती जबाबदारी त्यांच्यांकडून पाळली जावी,

एतदर्थ यूनायटेड स्टेटस्च्या वरिष्ठ कोर्टाकडून पुढीलप्रमाणें आज्ञापत्र काढण्यांत आलें होतें:—

"हा कायदा युनायटेड स्टेटस्मध्यें मोडणाऱ्या सर्व प्रदेशास लागू होईल; सर्व कायदेकारी मंडळें, न्यायालयें, राज्याधिकारी, आणि व्यक्तिशः प्रजाजन ह्यांचा ह्या बंधनाखालीं अंतर्भाव होतो; आणि ह्या कायदाच्या बळानें, ह्या कायद्याच्या गोष्टींनां प्रतिबंध आहे अशा कोणत्याही गोष्टीला कोणत्याही कायदेकारी मंडळानें, कांग्रेसनें किंवा संस्थानी कायदे मंडळानें अथवा स्थानिक असेंब्लीनें मान्यता दिली, तर ती रद्द समजण्यांत येईल."*

ह्यावरून हें उघड आहे कीं १८ व्या सुधारणेच्या किंवा व्हालस्टीड ॲक्टाच्या मर्यादेच्या बाहेर, किंवा त्यापेक्षां अधिक अधिकार स्वातंत्र्य असलेली अशी कोणतीच व्यक्ति युनायटेड स्टेटस्मध्यें राहूं शकत नाहीं. ह्या दोन्हीही कायद्याची मर्यादा एकसारखीच आहे.

१९१९ च्या १६ जानेवारीला हें १८ वें कलम पास झालें. एका सर्वमान्य अशा सार्वजनिक दुष्ट खोडीचें निर्मूलन करण्यासाठीं ह्मणून निर्माण झालेलें हें द्राविडी मार्गानें जाणारें कां होईना, पण हेतुशुद्ध असें शस्त्र होतें. परंतु परिणामांनीं पुन्हां एकवार असें सिद्ध करून दाखविलें कीं सामाजिक बाबतींत कायद्याचें निर्बंध घालतांना, प्रत्यक्ष दोषालाच आळा घालणें हें, त्याला पायबंद घालण्यासाठीं, त्याच्या आनुषंगिक किंवा कारण स्वरूपी अशा गोष्टींनां आळा घालण्यापेक्षां अधिक परिणामकारक होत असतें. कायद्यानें स्पष्ट शब्दांत मद्याची उत्पत्ति, विक्रय किंवा स्थलांतर ह्याला अगदीं स्पष्ट शब्दांत मनाई केली, परंतु त्याचा पेय ह्मणून उपयोग करण्याच्या बाबतींत मात्र प्रत्यक्ष अशी मनाई मात्र करण्यांत आली नाहीं. व्यभिचाराच्या अथवा अनैसर्गिक मैथुनाच्या बाबतींत, राज्यानें प्रत्यक्ष संभोगालाच प्रतिबंध केला आहे; त्या बाबतींत कांहीं पलंग, गाद्या, उशा, गिर्दा इ. उपकरणांच्या खरेदीविक्रीला किंवा उपयोगाला कायद्यानें हरकत घेतलेली नाहीं ! ह्यामुळें कोणालाही असा

---

* नॅशनल प्रोहिबिशन केसेस २५३ वि. ३५०.

प्रश्न विचारण्याचा हक्क आहे कीं, जर मद्यपानाला कायद्यानें हरकत घेण्यांत येत नाहीं तर तत्संबंधीं इतर गोष्टींच गुन्हां ह्मणून कां लेखण्यांत याव्या ? मुख्य दोष–मदिरासेवन व तज्जन्य परिणाम–तो तसाच अप्रतिबद्धराहतो. ह्याचा प्रतिकार करणें हींच काय ती अमेरिकेतील खासगी] व राजकीय जीवनांमधील भिन्नता निदर्शक रेषा ठरली आहे.

ह्या घटनेकडे दुर्लक्ष करण्यास काँग्रेसकडूनच सुरुवात झाली. १९१९ च्या १६ जानेवारीला हें १८ वें कलम मान्य करण्यांत आलें, आणि त्यानंतर ७ महिन्यांचे आंतच त्याची पायमल्ली करण्यास कांग्रेसनें प्रारंभ केला. राज्यघटनेनें कायद्यांत असा स्पष्ट उल्लेख केलेला होता कीं, कोणत्याही विशेषण किंवा अपवादांवाचून, मादक वस्तूंचा पेयांसाठीं ह्मणून विक्रय करणें निषिद्ध आहे. ह्या कलमाला कायद्याचें स्वरुप देणारा एनफोर्समेंट ॲक्ट (व्हॉलस्टीड ॲक्ट) हा प्रतिनिधी मंडळांत २२ जुलै रोजीं आणि सीनेटकडून ४ सप्टेंबरला आणि प्रेसिडेंट विल्सननें व्हेटोनें नकार दिल्यामुळें, पुन्हां १७ आक्टोबरला पास करण्यांत आला. १८ व्या कलमानें 'सर्व प्रकारच्या पेयांसाठीं निषेध केला होता; परंतु व्हॉलस्टीड ॲक्टानें ह्यांत चर्चमधील व औषधीसाठीं अशा दोन प्रकारांखेरीज इतर कोणत्याही पेयासाठीं, असा भेद केला. ह्यावरून, कांग्रेसनेंच कॉन्स्टिटयूशनला धाब्यावर बसविण्याचा पायंडा घालून दिला असें ह्मणणें प्राप्त आहे.

जेव्हां मद्य निषेधक कायदा करण्यांत आला त्यानंतर ह्या विषयावर लेखनांच्या व भाषणांच्या द्वारें बरीच चर्चा झाली. कायदा पास झाल्यापासून आजपर्यंत ह्या आठ नऊ वर्षांच्या काळांत असा एकही दैनिकपत्राचा अंक प्रसिद्ध झाला नसेल कीं, ज्यांत, ह्या १८ व्या कलमाच्या अंमलबजावणीच्या परिणामस्वरूपी अशा एखाद्या घटनेचा किंवा तिच्या एखाद्या विवक्षित स्वरुपाबद्दलचा उल्लेख करण्यांत आला नसेल.

थोड्याच दिवसांपूर्वीं एका सीनेटोरिअल कमिटीपुढें, ह्या निषेधामुळें उत्पन्न झालेल्या लढ्याच्या दोन्हीही बाजू मांडण्यांत आल्या होत्या. आपल्या पक्षाचें समर्थन करीत असतांना, प्रतिबंधानुकूल पक्षाचे कमांडर वूथ ह्मणाले:–

"मद्यपान आणि स्त्रियांचें अधःपतन, ह्या दोन गोष्टींचा एकमेकांशीं फार निकटचा संबंध आहे. कायदा पास होण्यापूर्वीच्या काळीं मद्यपानगृह आणि व्यभिचारगृह ह्या दोन्ही संस्था (!) एकाच कपराखालीं गळ्यांत गळे घालून नांदतांना आढळत. परंतु मद्यपानगृहांतील व्यभिचार आतां पूर्वकालीन गोष्ट समजली जाऊं लागली आहे. अमेरिकन स्त्रियांच्या मार्गाभोंवतीं संरक्षणाच्या आधाराचें कवच पसरणाऱ्या ह्या कायद्याला आपण मनःपूर्वक यश चिंतू या; कारण आपल्या समाजांतील स्त्रियांच्या नैतिक आणि चारित्र्यविषयक दर्ज्यापेक्षां अधिक उच्च असें समाजाला केव्हांही जातां येणें शक्य नाहीं!

"जमीन महसूल खात्यावरील माझ्या हाताखालचा कार्यकारी अधिकारी मला असें सांगतो कीं आतां नर्सरीमधील किंवा किंडरगार्टनमधील मुलें मुलीं अधिक सुस्वस्थ, चांगले कपडे घातलेलीं, बरें अन्न खावयास मिळणारीं, अधिक सुखी व ज्यांना स्पर्श करावयाचा आतां कंटाळा वाटत नाहीं अशीं दिसूं लागलीं आहेत."

"ह्या कायद्याच्या भंगाचें पातक जे समाजांत घडत असेल, त्याचा दोष ह्या कायद्याच्या मस्तकीं मारणें ह्मणजे, मनुष्याच्या सर्व दुष्कृत्यांबद्दल परमेश्वराच्या दहा पवित्र आज्ञांना जबाबदार धरण्यासारखेंच होणार आहे! अशी सूचना करणें सुद्धां मनांत तिरस्कार उत्पन्न करील!"*

'करंट हिस्ट्री'मध्यें लिहीत असतांना फ्रान्सिस् स्कॉट् मॅक्ब्राईड ह्यानेंही ह्याच अर्थाचे उद्गार काढले आहेत तो लिहतो:-

"साधारणपणें पाहूं जातां, प्रत्येक इसमाला आपले तारुण्याचे दिवस आठवले ह्मणजे, आपलीं मुलेंबाळें तरी निराळ्या सामाजिक परिस्थितींत वाढतील ह्याबद्दल परमेश्वराचे आभार मानावेसे वाटतात; हा प्रतिबंध काढून घेण्यांत यावा ह्मणून जी कांहीं पत्रकें प्रसिद्ध करण्यांत येतात, ती ह्मणजे गुत्तेवाल्यांनीं आपल्या वैयक्तिक लाभासाठीं ह्मणून काढलेलीं ह्मणून तो दूर

* लिटररी डायजेस्ट १ मे, १९२६.

भिरकावून देतो, आणि नोंदणीच्या स्थळीं जाऊन तो आपलें मत देऊन प्रतिबंधक कंपूतील मतदारांची संख्या एकानें वाढवितो, ह्या देशांतून मद्याचें उच्चाटन झालें आहे, तें दिवसें दिवस अधिकाधिक तीव्र होत जाईल, आणि शेवटीं एक दिवस असा उगवेल कीं ज्या दिवशीं ह्या भूमींत मद्याचा एक थेंबही कोठें दृष्टीस पडणार नाहीं ! हें आतां कशानेंही थांबणें शक्य नाहीं ! "*

शब्दांची करामत प्रतिबंधानुकूल पक्षाचे बाबतींत अधिक दिसून येते; परंतु वस्तुस्थितीकडे पाहतां विजय मात्र ह्या मनाईला प्रतिकूल नसणाऱ्यांच्याच हातीं असलेला दिसतो. प्रस्तुत लेखकाला मद्यपानस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांचे विषयीं कांहीं विशिष्ट सहानुभूति आहे असें मात्र कोणी समजूं नये. हा लेखक आजवर मद्याला स्पर्शही न केलेला आणि मद्यपान प्रतिबंधाचा कट्टा पुरस्कर्ता आहे; परंतु येथें जी कांहीं परिस्थिती प्रत्यक्ष दिसून येते, ती शब्दशः वाचकांपुढें मांडणें हें त्याचें कर्तव्यच आहे ! राष्ट्रीय तशीच वैयक्तिक उन्नति अत्यंत कडक मद्यत्यागाशीं कायमची निगडित झालेली आहे, असा ह्या लेखकाचा पूर्ण विश्वास आहे. आणि म्हणूनच हें नमूद करतांना त्याला अत्यंत खेद होतो कीं, ही प्रतिबंधक चळवळ यूनायटेड स्टेटस्मध्यें अयशस्वी फारच वाईट रीतीनें अयशस्वी ठरली आहे.

ही चळवळ यशस्वी कां झाली नाहीं ह्या कारणांची मीमांसा करतांना ह्या मुद्याच्या गुणावगुणांचें चर्वितचर्वण करणें व्यर्थ आहे. आपल्याला फक्त पास करण्यांत आलेल्या कायद्याकडे आणि त्याच्या हेतुकडे व अर्थाकडे पहावयाचे आहे. आणि त्याच्या पदरीं यशाचा कितपत वांटा पडला तें प्रत्यक्ष प्रमाणावरून लक्षांत घ्यावयाचें आहे. राज्यघटनेचा हुकूम पाळला गेला आहे काय? हा हुकूम न मानणाऱ्यांना कांहीं शासन करण्यांत आलें किंवा नाहीं? पूर्वीपेक्षां आता मद्यपानाचें प्रमाण कमी झालें आहे काय? मद्यापासून होणाऱ्या मृत्यूच्या व गुन्ह्यांच्या संख्येंत कांहीं कमी झालेली आढळून आली कीं काय? अनीतीला उतरतीकळा लागून सार्वजनिक जीवन साधारणतः अधिक वांछनीय झालें

---

* लिटररी डायजेस्ट एप्रिल १९२८.

आहे किंवा अशा सारखे प्रश्न आपण विचारावयाचें व त्यांचीं उत्तरें शोधावयाचीं हाच काय तो ह्या कायद्याचे परिणाम ताडून पाहण्याचा मार्ग आहे.

वस्तुस्थितीकडे पाहातां पुढील गोष्टी दिसून येतात. (१) कायद्याबद्दल जनसमुदायाची बेदरकार वृत्ति; (२) कोणत्याही अर्थाने तो कायदा लोकावर लागू करण्याची अ-तत्परता; (३) गुन्ह्याच्या संख्येंत डोळ्यांत येण्याजोगी वाढ (४) मद्यपानापासून झालेल्या मृत्यूंचे वाढलेलें प्रमाण.

ह्या बाबतींत लोकमत काय आहे ते गेल्या आठ वर्षांत वर्तमानपत्राच्या स्तंभांतून व इतर मार्गांनीही प्रगट झालें आहेच. वृत्तपत्रांच्या संपादकीय लेखांतून राष्ट्रीय प्रतिबंधाच्या ह्या प्रश्नाबद्दल जनतेचें मत काय आहे त्यांचा प्रतिध्वनी उठत असतो. ह्या चळवळीबद्दल नापसंती व्यक्त करणारे ठराव सर्व देशभर निरनिराळ्या संस्थांनीं मंजूर केले आहेत; सर्व राष्ट्रीय आणि सांस्थानिक लेबर यूनिअन्सनीं आपलें असमाधान व्यक्त केलें आहे; सर्व राष्ट्रीय आणि सांस्थानिक मेडीकल असोसिएशनांनी ह्या चळवळीचा निषेध व्यक्त केला आहे; बार असोसिएशन्स, संस्थानिक कायदेमंडळें व नगर सभांनी ह्या प्रतिबंधामुळें निर्माण झालेल्या परिस्थितींबद्दल शोक प्रदर्शित करणारे ठराव पास केलें आहेत ह्या सर्व गोष्टी जनसमाजाच्या मनाच्या निदर्शकच आहेत.

१९२२ सालीं, 'लिटररी डायजेस्ट'नं केलेल्या मतांच्या नोंदणींत एकंदर ९०५००४ मतें नोंदलीं गेलीं; पैकीं ५५०३६४ मतें हा कायदा रद्द करण्याबद्दल निरनिराळ्या स्वरूपांत आपलें मत व्यक्त करणारी होतीं आणि ३५४७४० मतें प्रतिबंधक कायदा अमलांत आणावा अशीं होतीं. ह्या नंतर चार वर्षांनीं युनायटेड स्टेटस्मधील ४०० वर्तमानपत्रांनीं ह्या बाबतींत लोकमत अजमावण्यासाठीं फार विस्तृत प्रमाणावर मतें घेतली ह्याचा निकाल काय झाला तें ऐकून वाचकांना आश्चर्य वाटेल. प्रतिबंधक कायदा ठेवण्यांत यावा असें जर एक मत असेल, तर त्याचा नायनाट व्हावा-निदान बऱ्याचशा सवलती तरी लोकांना देण्यांत याव्या अशा

अर्थाची पांचव्यावर मतें, ह्या प्रमाणांत एकंदर मतें पडली. प्रत्यक्ष आंकडेच द्यावयाचे झाले तर प्रतिबंधास अनुकूल ६८७३७६ मतें आणि प्रतिबंधास प्रतिकूल अशीं ३७०५०९२ मतें अशी मोजणी झाली १९२६ सालीं नोव्हेंबर महिन्यांत न्यू यार्क, इलिनाइस, मिसूरी, विस्-कॉन्सिन, मोन्टाना, कोलोराडो, नेव्हाडा आणि कॉलिफोर्निआ ह्या युनायटेड स्टेटस् मधील १।४ लोकवस्तीच्या आठ संस्थानांनीं पुन्हां ह्या प्रश्नाबद्दल लोकमत अजमावण्यासाठीं मतें घेतलीं. पुष्कळसे प्रश्न असें होते, कीं ज्यामुळें प्रत्येकाला आपलें मत नोंदणें शक्य झालें नाहीं, तरी पण एकंदर ६६६०००० मतें नोंदली गेलीं आणि ह्यापैकी शेंकडा ६० मतें मात्र स्वातंत्र्यास अनुकूल अशी पडली. अशा प्रकारें, वर्तमानपत्रां-कडून किंवा अन्य संस्थांनाकडून घेण्यांत येणाऱ्या मतांखेरीज ह्या कायद्याचें परिणाम पडताळण्यांसाठीं दुसरेही उपाय ह्या व इतर संस्था कडून व व्यक्तीकडून अवलंबिले गेलें आहेत. ह्या सर्व निरीक्षणांवरून असेंच आढळून येते कीं सर्व राष्ट्रभर मद्याला प्रतिबंध करण्याच्या ह्या खटाटोपाला यश मिळालेले नाहीं. ह्या वरूनही प्रस्तुत प्रश्नाबाबत लोकांचें मत काय असेल त्याबद्दल शंका असूं शकते कां ?

प्रतिबंधात्मक कायद्याची अंमलबजावणी झाली; परंतु ह्या प्रतिबंधा-बद्दल समाजांत बेदरकार वृत्ति तर आहेच परंतु कायदा न जुमानण्याकडे ही लोकांची प्रवृत्ति असलेली आढळून येते.

" न्यूयार्क व इतर मोठमोठाल्या शहरांत आजकाल " स्पीक ईझी " (Speak easy) ह्या गुप्त-पानगृहांचा बराच सुळसुळाट झालेला आढळतो हीं पानगृहें ह्मणजे आधुनिक जीवनांतील एक नूतन विशेष आहे. जेव्हां जेव्हां मनुष्य येथें दारूचे दोन घोट घेऊन आपली तृषा शांत करावयास जातो, तेव्हां तेव्हां ह्या एकंदर प्रकारांत कांहींतरी असाधारणत्वाचा - विक्षिप्ततेचा आस्वादही त्यास चाखावयांस मिळतो. एखाद्या चोराच्या गुहेंत शिरतानां दरोडेखोराचे सोंग घेतल्यानें विशेषच मौज वाटते, असें मला वाटते ह्या " स्पीक ईझी " पानगृहांत प्रवेश

करावयाचा ह्मणजे प्रथम एका कुलुप लागलेल्या दाराजवळ जायचे. लाकडी फळ्यांची भिंत असलेल्या त्या घरांतून भोंकांच्या व फटीच्या द्वारें आंतून कांहीं डोळे आपलें निरीक्षण करीत असतात. आपल्याला आंत घ्यायचे ह्मणजे कोण यातायात ? पहिल्यांदा जाणाऱ्याला तर कोणी तरी जामीनच पाहिजे. आंत प्रवेश करून घेतल्यानंतर आपल्याला एका पुस्तकांत सही करून द्यावी लागते ती झाली कीं मग आपल्या हातीं, नुसता एक आंकडा वर छापलेलें व बाह्यतः अर्थशून्य भासणारें असें एक कार्ड देण्यांत येतें. पुढें दुसऱ्या एका द्वाररक्षकाच्या कानाशीं आपण आपल्या नांवाचा उच्चार केल्यानंतर, तोही आपल्याला, 'कृपा करून आपला पत्ता आपण लक्षांत असूंद्या ! असें सांगतो. ह्या नंतर आपल्याला मागील दारानें एका दालनांत प्रवेश मिळतो येथें पूर्वीच येऊन बसलेले कांहीं मादिराभक्त आपल्या पेयांवर ताव मारीत बसलेले असतातच येथें प्रत्यक्ष दोन तीन बाटल्यांपेक्षां अधिक माल कदाचित दिसत नसेल, परंतु सर्व सांठा दुसरीकडेच कोठेंतरी गुप्त ठिकाणीं लपवून ठेवलेलाच असतोच ह्या खोलींतच. एक लाल रंगाचा विजेचा दिवाही लागलेला असतो, आणि ह्याचें बटन बाहेरील व्यवस्थापकाच्या बैठकी जवळ असते बाहेरून पोलिस वगैरे अधिकारी जर आंत येण्याचा प्रयत्न करूं लागले तर तो ताबडतोब हे बटन दाबून आंतील मंडळीला इशारत देतो, आणि त्या बरोबर ह्या तीन बाटल्यामधील जो काहीं अवशेष असेल, तो सर्व खिडकीवाटे बाहेर रस्त्यावर फेंकण्यांत येऊन, आंतील पानगृहाचीं सर्व चिन्हें ताबडतोब नाहींशीं करण्यांत येतात !" *

हीं स्पीक-ईझी (Speak easy) नामक पानगृहें पुरुषासाठीं त्याचप्रमाणें स्त्रियासाठींही असतात, ह्या पानगृहांतही, इतर स्थलांप्रमाणेंच कुलपें लावलेले दरवाजे, फटींतून पाहणारे डोळे, गुलाबी रंग दिलेल्या भिंतींचीं दालनें, डँटेचा पुतळा, फ्लारेंस, रोम, पिसा येथील झुकता मनोरा इ. ची चित्रें,

---

* न्यू यॉर्क नाइटस् पान ७७.

वसावयास कांहींशा अवघड अशा तीन पायाच्या लाकडी खुर्च्या, आफिसचें नाह्य स्वरूप दाखविण्यासाठीं मुद्दाम रचून ठेवलेलीं टेबलें, इत्यादि सर्व सामुग्री असतेच.*

" ह्या पान-गृहांतील बहुतेक सर्व गिऱ्हाईक स्त्री वर्गातीलच होतें. येथें येण्यास सवकलेल्या स्त्रिया नेहमीं वरचेवर आपल्या नव्या मैत्रिणींनां आणून येथें दीक्षा देत असत; इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं तर त्या आपल्या पुरुष-मित्रांनांही समागमे घेऊन येत. टोनीला नेहमी पुरुषांपासून द्रव्य घेण्याची संवयच होती ह्मणा; पण स्त्रियांपासूनही पैसे उकळण्याची. त्याला विशेषच आवड असावी असें वाटतें. आजकालच्या ह्या उलट्या काळांत स्त्रियांच्या पैशावर पुरुषांनीं मौज उडविणें हें क्वचित् प्रसंगीं रंगेलपणाचे द्योतक समजलें जाऊं लागलें आहे. आणि एवढ्या एका बाबतींत तरी तो कमालीचा रंगेल होता खास ! अर्धनिमीलित मदिरालस नेत्रांनी आपल्या शेजारच्या टेबलांशीं बसले-ल्याकडे माना हालविणाऱ्या व सुंदर परिवेशांत सज्ज असलेल्या स्त्रिया तेथें सर्व टेबलांशीं बसलेल्या दिसत होत्या. हें स्त्रियांसाठीं राखून ठेवलेलें स्त्रीक-ईझी पानगृह होतें ! "*

ही चोरटी मौज उपभोगण्याची लालसा जितकी पुरुषांनां तितकीच ती स्त्रियांनांही असतेच. कित्येक वेळां तर एखाद्या चांगल्याशा व खऱ्या खऱ्या शंभर नंबरी अशा पानगृहाचा मार्ग दाखविण्यास एखादी आपल्या परिच-याची तरुण छबेलीच तयार असते:-

" फ्रान्समध्येंही तुह्मांला मिळाली नसेल इतकी सुंदर बेनिडिक्टाईन दारू जेथें आकंठ प्यावयास मिळतें, अशा एका ठिकाणीं आज मी तुह्मांला घेऊन जातें, चला आज रात्रीं साधारणपणें ११॥ च्या सुमारास तुह्मी मोकळेच आहांत ना ? झालं तर मग. हें ठीक जमलं. माझ्या बरोबर तुह्मी टोनकिडे या आणि स्वत:च अनुभव घेऊन पहा मी ह्मणते तें खरे आहे कीं नाहीं तें ! मग काय, येणार ना ? हं. पण पहा बरं, वेळेवर यायला विसरूं नका !

---

* न्यू यॉर्क नाईटस, पान ५७ व ५२.

नाहीं तर ठेवाळ मळाच तिथं तिष्ठत ! त्या दिवशी असंच मी दुसऱ्या एका माझ्या मित्राला ११॥ वाजतां तेथें मला भेटण्याबद्दल निमंत्रण दिलं, आणि तो मध्यरात्र उलटून जाईपर्यंत आलाच नाहीं. त्यावेळीं अधिक दारु मला प्यायची नव्हती पण टोनीच्या निरानिराळ्या दारूच्या यादींत मला ॲबसिन्थ फ्रॅप् (Absinthe Frappe) हें नांव दिसले, आणि मग बाई माझ्या जिभेला पाणी सुटलें ! अहो, फ्रान्समध्ये देखील ही ॲबसिन्थ दारू मिळण्याची मारा-मार पडते, पण आमच्या देशांत मात्र प्रतिबंध असूनसुद्धां ती मिळूं शकते, बाई ! खरंच सांगतें, त्या दिवशीं कारण नसतांनां सुद्धां मला माझ्या ह्या 'सॅम काका' वद्दल अपार आदर वाटूं लागला पहा ! मी तावडतोब 'अबसिन्थ फ्रॅप्' मागितलें. एक पेला झाल्यानंतर मी पुन्हां त्याचाच दुसरा पेला मागविला. पण तरीही माझा मित्र येतां दिसेना, ह्मणून मी पेल्या मागून पेले चढवूं लागलें. शेवटीं बराच वेळ गेल्यानंतर मी दाराकडे पाहिलें, तों तो आंत येत होता. तों पर्यंत मी ह्या अबसिन्थ फ्रॅप्चे पांच पेले झोंकलें होते.

" त्यावेळीं मला अगदीं विलक्षण वर उंच तरंगत असल्यासारखें वाटत होतें बघा ! मी प्रत्यक्ष येशु ख्रिस्ताची आईच आहे कीं काय, इतका अपूर्व आल्हाद मला वाटत होता ! छेः, छे ग बाई ! अशी अपूर्व गंमत मला माझ्या सबंध आयुष्यांत नाहीं ग बाई कधीं चाखायला मिळाली ! "*

न्यू यॉर्क मधील टॅक्सस् ग्वाइनान्स ह्या रजनी-विलासगृहामध्यें पुढील प्रमाणें दृष्य दिसून येतें:-

" येथें येणाऱ्या प्रत्येक सदस्यानें आपल्या समागमें एखादी बाटली दडवून आणलेली असतेच; आणि आपल्या वस्त्रांत बाटली दडवून ठेवल्यामुळे त्यांच्या पोशाखांची शोभा बिघडते, ह्यांत शंका नाहीं. सायंकाळचा पोषाखच असा असतो कीं, अगदीं लहानशी चपटी बाटली जरी खिशांत असली, तरी तेवढ्यानें तो बिघल्याशिवाय रहात नाहींच. जे श्रीमंत किंवा सौंदर्याची

---

* न्यू यॉर्क नाईटस, पान १०३.

अभिरुचि असलेले असे तरुण असतात, अशांना तर खिशांत बाटली ठेवून एखाद्या तरुणी बरोबर नृत्य करणें मुळींच आवडत नाहीं. स्त्रियांनां मात्र, नाचतांनां आपापल्या बाटल्या टेबलांवर ठेवण्याखेरीज गत्यंतरच नसतें ! त्या दिवशीं मात्र एका सुंदरीला, आपल्याबहुमोल व मनोहर पोषाखाखालीं उराशी व्हिस्कीची बाटली कवटाळलेली व वरून पारदर्शक रेशमी शालीचें आवरण घेतलेलें पाहून मला तिची किंवा आली.*

बोवरेच्या दक्षिणप्रांतांत तर ह्या गुप्तपणाची सुद्धां अवश्यकता वाटत नाहीं असें स्पष्ट दिसतें. तेथें ह्या प्रतिबंधक कायद्याला अगदीं उघडपणेंच धाब्यावर बसाविण्यांत येते.* येथील रहिवाशांचें वर्तन—बेकायदेशीर वर्तन, ह्मणजे मद्यप्रतिबंधावरील एक कडक टीकाच होय, असें ह्मटले पाहिजे. येथील गरीब लोकांचे वस्तीत हा कायदा उघडपणें मोडला जातो, तरी पोलीस ह्याची दादही घेत नाहींत; ह्याचें कारणही उघड्च आहे. धरपकड केली, तरी सुटका करून घेण्यासाठी त्या गुन्हेगाराकडून कांहीं चिरीमिरी मिळेल ही आशाच त्यांनां नाहीं मग त्यांनीं ह्या पंचाइतींत पडावे तरी कशाला ?

" पूर्व विभागांत मद्यार्काचा जो प्रवाह उघड उघड वहात असतो, त्या बद्दल आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. येथें कोणत्याही दुकानांत शिरावें आणि एक पेग मागावा, कीं तो मिळतोच ! मग न्यू यार्कच्या इतर भागांतच एखादा पेग मिळवायला इतकीं यातायात करावी लागते व खबरदारी बाळगावी लागतें ह्याचें कारण तरी काय ? तेथें पहावे, तो दाराला कुलुप कड्या घातलेल्या फटींतून डोळे किलकिले करून डोकावून पहात असतात ! आंत प्रवेश करून घेण्यासाठीं कुठें तावदानावर हाताचा पंजाच ठेवा, नाहीं तर बोटानें ठराविक संकेत तरी दाखवा तेव्हां कोठें आंत प्रवेश मिळणार ! त्या पानगृहांत जेथें लॉरा-सला भेटली तेथें नांव विचारतांच सौ. वॅर्सफोल्ड हेंच नांव सांगितले पाहिजे असाच नियम होता मग तुम्ही असा कोणीही पण सौ. वॅर्सफोल्ड आहांत असें सांगितल्या बरोबर तुह्माला आंत सोडण्यांत येतें मी आपलें खरें खरें

---

* न्यू यॉर्क नाईटस, पान ७७ व १६१.

स्टीफन ग्राहाम हें नांव सांगितलें असतें, तर मला अंत घेतलेच नसतें; दुसऱ्या कित्येक ठिकाणीं एक विविक्षित अक्षरे लिहिलेले चित्रविचित्र कार्ड जवळ असलें तरच आंत जाऊं देतात. आणखी दुसऱ्या कांहीं ठिकाणीं तर तुम्ही त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाचे असाल तर ठिक, नाहींपक्षीं, तुम्हाला मज्जावच असतो ! पण त्या बोवरीमध्यें मौज आहे बुवा ! येथें कोणत्याही दुकानांत अगदीं भर दिवसा उघडपणे शिरावे, आणि मन मानेल तशी दारू प्यावी ! हांक नाही कीं बोंब नाहीं येथें चैन आहे बुवा ! " *

यूनायटेड स्टेट्समध्यें तुम्ही कोठेही जा मग तें पोलिस अधिकाऱ्याच्या घरी असो, सायंकाळच्या मेजवानीला असो क्लबांत असो किंवा आपल्या मित्रमैत्रिणीच्या घरी असो जाण्यांची वेळ झाली कीं तुम्ही ज्याच्या कडे गेला असाल ते हळूंच तुमच्या कानांत एखाद्या गुत्तपानगृहाचा पत्ता पुटपुटतात. तुम्ही तो अत्यंत काळजी पूर्वक, फार महत्वाची बातमी म्हणून आपल्या नोटबुकांत टिपून घ्यायचा असतो !

न्यू यार्क मध्यें चोरून मारून दारू पिण्यामुळें घडलेल्या मृत्यूबद्दल डॉ. चार्लस जी. नॉरिस त्यांनीं केलेल्या चौकशीवरून पाहतां, कायद्याबद्दल अनादर, त्याची पायमल्ली करण्याकडे लोकांची प्रवृत्ति ह्या बद्दलचे भरपूर पुरावे निदर्शनास आले आहेत. डॉ. नॉरिस त्यांना असें दिसून आलें कीं, " प्रत्यक्ष प्रतिबंध " असा म्हणून नाहींच; आणि, " हा प्रतिबंध कायदा अस्तित्वांत येण्यापूर्वी जे लोक दारू पिऊन झिंगत असत, ते आजही-जिवंत राहिले असल्यास-असेच पूर्ववत् झिंगत असतात ":-

" कायदेशीर नोंद झालेल्या, व केव्हांही कायदेशीर रीतीनें तपासणी करतां येते अशा क्लबां खेरीज, अशा किती तरी 'शीक-ईझीं' सारख्या गुप्त संस्था आतां अस्तित्वांत आल्या आहेत. कीं जेथें दारूचा विक्रय यथास्थित चालतो. ह्या संस्थांची संख्या पूर्वीच्या गुत्त्यांच्या संख्येपेक्षांही अधिक आहे. ह्या परिस्थिती वर दाब ठेवणें संस्थानिक किंवा म्युनिसिपल अधिकाऱ्यांना शक्य

* न्यू यॉर्क नाईटस्, पान १६१.

नाहीं. ह्या ' स्पीक इझी ' संस्था ह्मणजे आपल्या सामाजिक जीवनावरील गळूं किंवा व्रण आहे असेंच ह्मटलें पाहिंजे. म्युनिसिपालिटीची तपासणीही आतां नसल्यामुळें विकण्यांत येणारी दारू कितपत शुद्ध आहे किंवा नाहीं, तेंही पाहणें अशक्य झालें आहे. एखादा असा गुप्त गुत्ता चवाठ्यावर येऊन तो बंद करण्यांत आला कीं त्याच ठिकाणीं थोडक्याच काळांत दुसरे अनेक गुत्ते उघडले जातात ? .....अशा प्रकारें विकण्यांत येणारी दारू अधिक विषारी असल्यामुळें, सार्वजनिक स्वास्थ्याला लागलेली ही कीड शक्य तेवढ्या त्वरेनें थांबविणें भाग आहे. नुसत्या ह्या कारणामुळें घडणाऱ्या मृत्यूंची संख्या वाहनांच्या अपघातांमुळें व गॅसच्या अपघातांमुळें घडणाऱ्या मृत्यूंच्या बेरजेपेक्षांहीं किती तरी पटीनें अधिक आहे. ह्या बद्दल माझी पूर्ण खात्री आहे !" *

इतरही मार्गांनीं पुढें आलेल्या गोष्टींचा ह्या निष्कर्षाला आधार आहे. उदाहरणार्थ, व्योमिंग गांवाहून किल्मिंगटन न्यूज पत्राकडे पाठविण्यांत आलेल्या पत्रांतील लोअर डीलावेअर मधील मद्यपानप्रतिबंधाच्या उपकारक चळवळीचा प्रभाव काय आहे त्याचा निदर्शक असा खालील उतारा पहावा:-

" राज्यप्रबंधातर्फे मद्याला प्रतिबंध करणारा कायदा अमलांत आणला गेला..... पण त्या नंतरच्या काळांत पहावें तों, नुसतीं हायस्कुलांत जाणारींं मुलेंच नव्हे, तर लहान लहान कोंवळ्या वयाच्या मुलीही पुन्हां पुन्हां दारू पिऊन झिंगलेल्या अवस्थेंत असलेल्या दृष्टीस पडतात."

सॅन फ्रॅन्सिस्को मध्यें ह्या व्हॅालस्टीड ॲक्टची फलश्रुति कोणत्या स्वरूपाची झाली त्याचें वर्णन स्थानिक 'एक्झामिनर' नामक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आहे तें असें:-

" सॅन मॅटीओ येथें रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या घरांत किती तरी तरुणी आणि तरुण मद्यपानानें बेहोष होऊन पडलेल्या स्थितींत प्रतिबंध कार्यकर्त्यांनीं पकडले. ह्या पैकीं काहीं तरुणी फक्त १४।१५ वर्षें वयाच्या असून त्यांचे तरुण जोडीदार त्यांच्या पेक्षां पुष्कळ व अधिक वयाचे होते, असें ह्या अधिका-

---

* लिटररी डायजेस्ट, २६ फेब्रुआरी, १९२७.

च्यांचें म्हणणें आहे. दारूची धुंदी बुद्धीवर चढल्या कारणानें, तरुणांनीं चालविलेल्या प्रेमाराधनाला अडथळा करणें त्या मुलींनां अशक्य झालें होतें !"

ऑनरेबल जे. ई. हाऊस ह्यांनीं फिलाडेलाफिआ, येथील पब्लिक लेजर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केल्या प्रमाणें, फ्रान्समध्यें पानप्रतिबंधाचें स्वरूप असें आहे:—

"न्यू यॉर्क, पेनसिल्हेनिच्या आणि न्यू जरसी ह्या ठिकाणाप्रमाणेंच कॉन्ससमध्येंही मद्यप्रतिबंधाचें स्वरूप, जसें मानावें तसें आहे. जर कोणाला असें मानून घ्यायचें असेल कीं प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी येथें जोरांत सुरू आहे, तर त्याच्या होला हो देणारे हजारों सभ्य नागरिक आढळतील ! त्याच्या उलट, हा कायदा लोकांकडून तुडाविला जात आहे असें जर त्याचें मत असेल. तर त्यालाही पुरावे थोडेसे पैसे खर्च केले कीं हवे तेवढे मिळणें अगदीं सहज आहे. पण हें आपलें मत कोणी उघडपणें मात्र कॉन्ससमध्यें बोलून दाखवूं नये, एवढें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे ज्याचें बरोबरीनें आपण ख्यालींखुशालीत व चैन उडविण्यांत भाग घेत असूं, अशा आपल्या जिगरजान दोस्तांनांच फक्त ही बातमी हळूंच कानांत सांगावी. प्रतिबंधक कायदे येथें अमलांत आलेले नाहींत असे उघडपणें म्हणणें हे येथें सभ्यपणाचें समजलें जात नाहीं. लोकाचाराच्या किंवा रूढीच्या विरुद्ध वर्तन करण्याची इच्छा येथील लोकांमध्यें फारशी असत नाहीं. ज्या गोष्टी न्यू यार्क, न्यू जरसी पॅनसिल्व्हेनिआ इ. ठिकाणी कायद्याला धाब्यावर बसवून भरल्यांत उघडपणें करण्यांत येतात, त्या येथें अगदीं गुप्तपणें सात पडद्यांच्या आंत झांकून ठेवून करण्यांत येतात, एवढाच काय तो फरक ! ते जी दारू पितात त्या दारूची त्यांनां भीति वाटत नाहीं, पण ती बद्दल उघडपणें बोलण्याची मात्र त्यांनां भिती वाटतें हें खरें आहे. कॉन्ससमध्यें दारूला बंदी नाहीं. असे जर कोणी उघड उघड विधान केलें, तर संकटांत सांपडेल. म्हणून ज्यांनां ही गोष्ट ठाऊक आहे,— आणि

अशांची संख्या कांही थोडी थोडकी नाहीं, – आपलें गुह्य आपल्या किंवा स्वसदृश अशा जिवलगांपाशींच फक्त ठेवीत असतात ! ”

ह्याच विषयावर, ऑनरेबल ई. डब्ल्यू होवे ह्यांचाही पुरावा पहाः–

“ कॉन्ससमध्ये ज्यागांवीं मी राहतो त्याच्या शेजारीच राहणाऱ्या कांहीं लोकांची मुख्य ओरड ह्मणजे आह्मां शहरवासीयांच्या दुर्गुणाबद्दलची असे. पण एके दिवशीं शेरिफनें मध्यरात्रीं ह्यांच्या गांवावर हल्ला केला व तपासणी अंती गुप्तपणें बेकायदेशीर रीतीनें व्हिस्की बनविणाऱ्या बारा कारखानदारास पकडलें हे सर्वच दारू बनाविणारें शेतकरी वर्गापैकी होतें. ह्याच्याच जवळपासच्या एका ठिकाणी पकडला गेलेल्या दुसऱ्या एका इसमाची चोरीनें दारू तयार करण्याची भट्टी तर सबंध युनायटेड स्टेटस् मध्यें मोठी अशी होती. हाही इसम शेतकरीच होता व निरंतर शहरांत राहणाऱ्या लोकांच्या दारूबाजीच्या नांवानें बोटे मोडीत असें ! ”

खेड्यापाड्यांत ह्यासंबंधीं काय दिसतें तें पहाः–

“ शहरातींल दारूबाजी संबंधीं बोलणें ऐकायचेंच असेल जर तें ह्या असल्या ठिकाणीं येऊन ऐकावें ! पूर्वी एक काळ असा होता कीं, एखादा शहरांतील श्रीमंताचा उच्छृंखल पुत्र जर दारू पिऊन आपलें स्वास्थ्य बिघडवून घेऊं लागला, तर त्याला खेडेगांवातील स्वच्छ व निसर्गसुंदर वातावरणांत सुधारण्यांसाठीं पाठवून देण्यांत येत असे, परंतु आतां, आपल्या संवयी सुधारून गमाविलेलें स्वास्थ्य परत मिळविण्यासाठीं शेतकऱ्याच्या दारूबाज मुलाला शहरांत पाठविण्याची पाळी येऊं लागली आहे ! अटचिसन येथें बाजाराला ह्मणून तुह्मी 'जा, ह्मणजे येथें बेकायदेशीर दारूचा जो विलक्षण साठा दृष्टीस पडतो तो पाहून मनुष्य स्तंभित होतो अटचिसन येथें राहणारे असे कित्येक लोक मला ठाऊक आहेत कीं ज्यांच्या तळघरांत कमींत कमी दोन दोन पिंपें तरी दारूनें नेहमी भरलेली यार असतात ! ,,

डॉ, नेरिस ह्यांचें असें ह्मणणें आहे कीं, " मद्याकर्षापासून होणारें मृत्यु हे प्रतिबंधामुळें होत नसून, कायद्याविरुद्ध करण्यांत येणाऱ्या उघड उघड बंडखोरीमुळें होत असतात !"* डॉ. नोरिस ह्यांच्या रिपोर्टावर टीका करतांनां हॅटफोर्ड येथील ' कूरेंट ' पत्र ह्मणतें:-

" दारूबाजीच्या जोडीला आणखी लांचखाऊपणा, अनीति आणि सर्व देशभर पसरलेल्या भोंदूपणाची भर पडली आहे !"

युनायटेड स्टेटस्मध्यें तयार होऊन पिण्यांत येणाऱ्या दारूचे प्रमाण तीन गोष्टीवरून ठरविण्यांत येणें शक्य आहे, ह्या विषयावरील आंकड्यांच्या सत्यासत्यतेबद्दल कितीही भिन्नमतें असलीं तरी ह्या तीन गोष्टी बद्दल मात्र मतविरोध किंवा मतवैचित्र्य नाहीं, एवढें मात्र खरें ! १८ व्या कलमाला कायद्याची संमति मिळण्यापूर्वी जितक्या भट्ट्या देशांत अस्तित्वांत होत्या, त्यापेक्षां कितीतरी अधिक भट्ट्या आतां आहेत युनायटेड स्टेटस्मध्यें चोरून मारून कोट्यावधि गॅलन्स दारूचा खप चालू आहे; आणि सबंध देशानें मद्याचा त्याग करणें ही गोष्ट पूर्वीप्रमाणें आजही निव्वळ कल्पनेंतच वास करणारी अशी आहे ?

ह्या गोष्टींनां विश्वसनीय अशा पुराव्यांचा आधार आहे. लायसेन्स असलेलीं पानगृहें आतां आढळत नाहींत, कारण पानगृहांना लायसेन्स देण्यांत येत नाहीं. परंतु विगरपरवाना चालणारीं, ' बूटलेगर ' ' स्पीक ईझी,' ' ब्लाइंड पिग,' इ. नांवानीं ओळखलीं जाणारीं गुप्तपणें मद्याचा विक्रय करणारीं पानगृहें यथास्थितपणें पूर्ववत् दारूचा विक्रय करीतच असतात उदाहरणार्थ, हा कायदा पास होण्याच्या पूर्वीच्या काळांत, युनाटेड स्टेटस्मध्यें जवळ जवळ ४०० भट्ट्या होत्या, १९२० नंतर सात वर्षांचें अवधींत ट्रेझरी खात्यानें असें प्रसिद्ध केलें आहें कीं, ७९४३७ भट्ट्या आणि ९३८२१ ' स्टिल्स , पकडण्यांत आले. पूर्वी प्रोहिबेशन

---

* लिटररी डायजेस्ट २६ फेब्रुआरी, १९२६.

कमिश्नर असलेले जनरल अँड्यूज हे असें ह्मणतात कीं, जे गुत्ते पकडण्यांत आले आहेत. त्यांची संख्या अस्तित्वांत असलेल्या गुत्त्यांच्या एक दशांशापेक्षां कांहीं अधिक नसावी. आतां पूर्वीच्या गुत्तेवाल्यांची जागा गुप्तपणें घरोघरी दारू पुरविणाऱ्या बूटलेगरनें व्यापिली आहे गुत्तेवाल्यांचे बाबतींत निदान एक तरी समाधानाची जागा होती, कीं त्याला एकाच ठिकाणीं बसून आपला व्यवसाय चालवावा लागे, त्यामुळें गुत्त्यामध्यें न जाण्याइतकी मानसिक शक्ती ज्यांचें ठायी असेल ते ह्या दुष्ट खोडीपासून वांचू शकत असत. परंतु आतां घरीं दारीं, कचेऱ्यांत आणि क्लबांत, जेथें पहावें तेथें ह्या 'बूटलेगरचा' प्रवेश असल्या कारणानें बचावाचा हा एवढा मार्गही शिल्लक राहिलेला नाहीं.*

ह्या प्रतिबंधाच्या अवधींत किती दारू पिण्यांत आली असावी त्याचे नक्की प्रमाण सांगतां येणें कदाचित् कठिण जाईल. परंतु एवढें मात्र खरें कीं दोन्ही पक्षांतर्फे जे लक्षावधीचे आंकडे मांडण्यांत येतात त्यांच्यामध्यें कोठेतरी हा आंकडा असावा. डिस्ट्रिक्ट अटर्नी मि. बंकर ह्यांचें अनुमान असें होतें कीं, १९२५ मध्यें ६०००००० गॅलन दारू चोरून विकण्यांत आली असावी. प्रतिबंधक कंमूतलि डॉ. जे. एम्. डोरन ह्यांचें मत असें आहे कीं, एकशें तीस पासून एकशें चाळीस लक्ष गॅलन दारू ह्या चोरट्या विक्रेत्यांच्याहातीं लागली असावी परंतु हें दुसरें विधान जरी सत्य ह्मणून गृहीत धरलें तरी सुद्धां प्रतिबंधन कायद्याच्या अंमलबजावणीची निष्क्रियता त्याबद्दल चांगलींच सिद्ध होते. ह्याच आंकड्यांत, कायदेशीर रीतीनें योग्य कारणासाठीं कायद्याच्या संमतीनें जी सुमारें ९० लक्ष गॅलन दारू विकण्यांत आली, त्यांचीही भर घातली पाहिजे. रा. स्टेआन ह्यांचे आंकडे, १७००००० गॅलन दारू चोरून विकली गेली आणि १९२६ मध्यें नुसती 'बिअर' नामक दारू ६०००००००० गॅलन विकली गेली असें दर्शवितात.

---

* करंट हिस्ट्री एप्रिल १९२८.

न्यू यॉर्क स्टेटचे डिस्ट्रिक्ट फेडलर अटर्नी मि. वंकर ह्यांनीं कांग्रेसच्या कमिटी पुढें असें निवेदन केले कीं, त्या प्रांतांत जी 'व्हिस्की' विकण्यांत येते तिच्यातील अंतर्भूत द्रव्यांचें प्रमाण खालीं दिल्याप्रमाणे असते:—

१ क्वार्ट पाणी मिसळेलली व्हिस्की.
१ गॅलन शुद्ध अल्कोहोल.
३ क्वार्ट पाणी.

ह्या मिश्रणाला एकंदरीत तीन डॉलर खर्च येतो आणि निरनिराळ्या लोकवस्तीत ते, प्रत्येक क्वार्टरला पांच पासून दहा डॉलर ह्या भावानें विकण्यांत येतें:-

"ह्या पेयाबद्दल आपण अधिक खोलांत जाऊन निरीक्षण करूं या. कोणताही रंग नसलेलें हें पेय पाहून ह्या बद्दल कुतूहल उत्पन्न होते. रंग जर त्याला असता, तर त्याला रंगदार व्हिस्की ह्मणता आले असतें. पण हें पेय असावें तरी कोणतें? हें 'व्होड्का' तर नाहीं खास मेंढ्याच्या शिंगांतून देण्यांत येणारे, पिंवळसर रंगाचे, सुगंधयुक्त, पिणाऱ्याच्या मेंदूचा तात्काळ व पूर्ण ताबा घेणारे असें ते पार्वत्य प्रदेशात बनविण्यांत येणारें पेय कांहीं हें नाहीं खास! ह्याचा पहिला घोट कांहीं तसा वाईट लागत नाहीं. त्यामुळें, पहिल्या घोंटासरशीं जी कल्पना येते, ती ही, - हें कोणतेतरी नवीन परंतु चांगल्यापैकींच पेय असलें पाहिजे परंतु हा विचार येतो न येतो तोंच तो पहिला घोंट पोटाच्या तळाशीं जाऊन पोहोंचलेला असतो, आणि बेंबीच्या देंठापासून जो दुसरा विचार पिणाऱ्याच्या मनांत उत्पन्न होतो तो हा, कीं हें पेय नसून शुद्ध जहर आहे. सर्व शरीरांतून मेंदू पर्यंत एक भीषण भयाची इमारत विजेच्या झटक्याप्रमाणें झर्रकन् निघून जाते. ह्या पेयाचे दोन प्याले घशाखालीं गेले कीं दोन दिवसपर्यंत तरी हे विष अंगांत भिनले राहीलच, ह्या बद्दल खात्री बाळगावी; नाकाच्या शिरा त्यांचें प्रमाण दर्शवीत असतात.

ह्या पेयाचा परिणामही अधिक बोलगे किंवा दुसऱ्यांच्या सहवासाची इच्छा उत्पन्न होणें असा होत नसून मेंदू पुढें एखादा जाड पडदा पडला असावा, एवढीच फक्त जाणीव मनांत उरते. हें चमत्कारिक पेय जेथें विक्रयांत येतें, त्या ठिकाणीं संभाषणाचा गोंगाट फारच क्वचित् ऐकावयास मिळतो. हें पेय वास्तविकपणें मनुष्याला ठार करणारें असतें, आणि तरीही त्याचा आस्वाद घेण्याची इच्छा मनुष्याला अनावर होते."*

जर अमेरिकेंत पिण्यांत येणाऱ्या मदिरेच्या गॅलन्सचा आंकडा कमी झाला असेल, तर त्याचें श्रेय प्रतिबंधक कायद्याला नाहीं. ह्या कायद्याची कशी दुर्दशा करण्यांत येते, तें आपण पाहिलें आहेच. तेव्हां ह्यासाठीं हें प्रमाण कमी झालें आहे असें ह्मणतां येत नाहीं. परंतु हा कायदा अस्तित्वांत आल्यापासून हें प्रमाण खालीं कां उतरलें आहे, त्याची कारणमीमांसा 'न्यू एज' वर्तमानपत्रानें पुढील प्रमाणें केली आहे:—

"हा कायदा पास झाल्यापासून, दारू पिणाऱ्याला फक्त दोनच मार्ग शिल्लक उरलेले आहेत. एक तर ह्या 'बूट लेगर' पासून विकत मिळणाऱ्या शुद्ध अल्कोहोलच्या मिश्रणापासून बनविलेल्या पेयावर आपली तृषा भागवून दवाखान्यांत आजारासाठीं जाऊन पडणें, किंवा दुसरें ह्मणजे दारू अजीबात सोडणें. गेल्या दोन चार वर्षांत, ह्यांपैकीं कोणता मार्ग पत्करावा, ह्याबद्दल पुष्कळांनीं पुष्कळच विचार केला आहे, आणि शेवटीं कांहींनीं अगदीं अनिच्छेनें नुसत्या पाण्यावर काम भागविण्याचें ठरविलें आहे."

पण हें मत जर खरें असेल, आणि सरकारी धोरणाप्रमाणें आलकोहोलच्या अशा उपयोगामुळें, नाइलाजास्तव दारूचें प्रमाण कमी झालें असेल. तर, मद्यार्कापासून घडणाऱ्या मृत्यूंची संख्या कमी होण्याऐवजीं सारखी वाढतच आहे, कारण ह्या गोष्टीचें कारण काय असावें ?

न्यू यॉर्क येथील गेल्या कांहीं वर्षांतील ह्या संबंधींचे आंकडे पहा:—

---

* न्यू यॉर्क नाईटस, पान १७०.

वर्ष	मद्यार्कोत्पन्न रोगामुळें दवाखान्यांत असलेले रोगी.	मद्यार्कामुळें घडलेले मृत्यू.
१९१८	३७४१	२५२
१९१९	३५४०	१७६
१९२०	३३२५	९८
१९२१	३८६२	११९
१९२२	६८००	२७४
१९२३	९३४२	४२९
१९२४	१०३९८	५१३
१९२५	१०३६१	६८२
१९२६	(उपलब्ध नाहीं:)	७५०

ह्या विषयासंबंधी जी टीका करण्यांत येते, ती कायद्याच्या किंवा कायद्याची अंमल बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध करण्यांत येत नसून, साधारण मद्यार्कामध्यें विषारीपणापर्यंत जाऊन पोहोंचणाऱ्या मद्यार्काचा जालिम उपयोग करण्यास भाग पाडणाऱ्या सरकारी धोरणाबद्दल ही टीका करण्यांत येते, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. प्रतिबंधाला अनुकूल असें जें लोकमत आहे, तें अर्थातच, सरकारच्या ह्या धोरणाबद्दल समाधानच व्यक्त करतें.

"सरकारनें लोकांना असें स्पष्टपणें जाहीर केलें आहे कीं, चोरून विकण्यांत येणाऱ्या ह्या दारूमध्यें विषारी मद्यार्काचें मिश्रण असतें. ह्या उपरही जर कोणी जाणून बुजून तें पिऊंच लागला, तर उघड उघड औषधीच्या दुकानांत जाऊन विषाची चिठ्ठी लागलेली कार्बोलिक ॲसिडची बाटली विकत घेऊन जाणून बुजून तीं उदरस्थ करणाऱ्या आत्मघातक्यामध्यें आणि ह्या इसमामध्यें भेद तो कोणता राहिला ?

सरकार जेव्हां एका वर्षाचे आंतच त्यांच्या कायद्याची पायमल्ली करण्यांत येईल असे कायदे प्रस्थापित करण्याचें धोरण स्वीकारते, तेव्हां तें सरकार फार वेळपर्यंत टिकूंच शकत नाहीं. तें खालीं कोलमडून पडलेंच पाहिजे."

ह्या प्रतिबंधाला विरोध करणाऱ्या पक्षाकडे पाहिलें ह्मणजे, लोकमत एखाद्या नावडत्या बाबतींत किती वजनदार व प्रक्षुब्ध बनूं शकतें, ह्या गोष्टीची कल्पना येते. प्रसंगोपात ह्या पक्षाकडून जी भाषा वापरण्यांत येते, ती ऐकली ह्मणजे, अगदींच अश्रुतपूर्व, जुन्या काळच्या पार्लमेंटच्या भाषण पद्धतीशी मुळींच साम्य नसलेली ही पद्धति मनाला क्षणभर स्तिमित केल्यावांचून रहात नाहीं.

न्यू यार्क सिटी सेशन्सचे जज् एफ. एक्स्. मॅनुस्को ह्मणतातः—

" मद्यार्कामुळें घडणारा प्रत्येक मृत्यु ह्मणजे हेतपूर्वक व बुद्धिपुरःसर राज्याधिकाऱ्यांकडून करण्यांत आलेला खून होय ! "

मिसूरी येथील सीनेटर जेम्स ए. रीड ह्मणतातः—

" प्रतिबंधक कायद्याचा भंग करूनही जरी एखाद्यानें मद्यपान केलें, तरी तेवढ्यामुळें त्याची दृष्टि कायमची जावी, किंवा तो मृत्युमुखीं पडावा अशी इच्छा व व्यवस्था शुद्ध वन्य पशूंची मनें असलेल्या खेरीज दुसरें कोणीही करणार नाहीं ! "

रिप्रेझेंटेटिव्ह सेलरः—

" हा शुद्ध खून आहे ! "

ब्रुकलिन येथील रेव्हरंड डॉ. एस्. एड्. यंगः—

" उंदरांप्रमाणें आपल्या बांधवांना मृत्युमुखीं घालण्याचा हा प्रकार २० व्या शतकांतील अमेरिकेला शोभणारा नसून तो १७ व्या शतकांतील रशियालाच अनुरूप असा आहे ! "

दारू पिऊन धुंद असलेल्या स्थितींत किती माणसें पोलिसां करवीं पकडण्यांत येतात, त्यावरूनही दारूबाजीचें प्रमाण थोडेंफार वाचकांच्या ध्यानांत येण्यासारखें आहे. न्यू यार्क येथील ' मॉडरेशन लीग ' नामक संस्थेनें निरनिराळ्या ५३४ शहरांतील पोलिस खात्याच्या रिपोर्टावरून असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, दारू पिऊन झिंगल्या बद्दल जेथें १९२० साली एकंदर

२८१६५१ माणसें कैदेंत ठेवण्यांत आली होतीं, तेथें १९२६ सालांत हा आंकडा ६६४१०४ वर गेलेला आढळला. त्याशिवाय मद्यपानामुळें घडणाऱ्या मृत्यूंची संख्याही, हा प्रतिबंधक कायदा अस्तित्वांत आल्यापासून उत्तरोत्तर वाढतच आहे. उदाहरणार्थ 'धि मेट्रापॉलिटन लाईफ इन्शुरन्स कंपनी'चा रिपोर्ट असें दाखवितो कीं, युनायटेड स्टेटस् मधील ह्या कंपनीच्या पॉलिसी व्होल्डरांपैकीं दारूमुळें मृत्युमुखीं पडलेल्यांची संख्या कॅनडा मधील पॉलिसी व्होल्डरांपैकीं दारूमुळेंच मेलेल्यांच्या पेक्षां नऊ पटींनें अधिक होती. येथें सात मोठमोठ्या प्रांतांत मद्यपान प्रतिबंधक कायदे लागू करण्यांत आले असून त्यांची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न राज्याधिकाऱ्यांकडून करण्यांत येत असतात.

जेव्हां मादक पेयांच्या प्रतिबंधार्थ संयुक्त संस्थानांनीं कायदे तयार केले, त्यावेळीं, त्याच शहरांत १९१४ सालीं ह्या गुन्ह्यांबद्दल जी धरपकड झालेली होती त्याच्या निम्म्यानें ही कमी झाली होती, असें दिसून आलें होतें. सार्वत्रिक प्रतिबंधाचे १९२० हें पहिलें वर्ष होतें; आणि ह्या वर्षीं १९१५ च्या गुन्हेगारांच्या संख्येंत शेंकडा ६६ तूट पडलेली दिसून आली. ह्या कायद्याची अंमलबजावणी करणें ज्या खात्याकडे होतें, त्यानें असें प्रसिद्ध केलें कीं, दक्षिण आणि पश्चिम विभागांत शेंकडा शंभर माणसांनीं दारूचा त्याग केला आहे आणि पूर्व विभागांतील बराचसा भागही जवळ जवळ तशाच अवस्थेंत आहे. पण हळूं हळूं, दारू मिळविण्याचे नवे नवे मार्ग जसजसे उपलब्ध होऊं लागले, तसतसे ह्या बाबतीत गुन्ह्यांचे आंकडे वाढावयास लागून ते महायुद्धापूर्वीच्या आंकड्याच्या जोडीस जाऊन बसले.

स्टेटन ह्मणतो:—

"तरुण व कच्या वयाच्या स्त्रीपुरुषांमध्यें निशाबाजी वाढत्या प्रमाणांत आहे, ह्याची प्रमाणे चोहोकडे दृष्टोत्पत्तीस येत आहेत. लहान मुलांच्या चौकशीकोर्टाच्या न्यायाधीशांची अशी ओरड आहे कीं, मद्यानें धुंद झालेल्या गुन्हेगार मुलांचीं संख्या आंताएवढी पूर्वी केव्हांही त्यांच्या पुढें चौकशीसाठीं आली नव्हती. कांहीं प्रमुख अशा 'प्रतिबंधक' मताच्या

ज्यूरींनीं, संस्थानांतील मुलांच्या वाढल्या भयंकर गुन्हेगार प्रवृत्तीच्या कांहीं गुन्ह्यांची चौकशी संपविल्या नंतर असें उद्‌गार काढले कीं "आमच्या कोर्टांत चौकशीसाठीं आलेले बहुतेक गुन्हे २५ वर्षांच्या खालील वयाच्या मुलामुलीं कडून आचरण्यांत आलें होते; आणि ह्यांपैकीं बहुतेक गुन्हेगार चोरून विकत घेतलेल्या दारूच्या अमलाखालीं होते, असें आह्मांस दिसून आलें. पोलीस रेकार्डावरून पाहतां बेहोशीच्या गुन्ह्याबाबत पकडले जाणाऱ्या गुन्हेगारांची संख्या प्रत्यही वाढतच असून, ह्या गुन्ह्या बद्दल अल्पवयाच्या गुन्हेगारांची संख्या तर भीषण प्रमाणांत वाढली आहे. वाशिंगटन शहरांतील पोलीस रेकार्डवरून असें दिसतें कीं २२ वर्षांच्या खालींल गुन्हेगाराची संख्या १९१९ पेक्षां शेंकडा दोनशें पेक्षांही वर गेलेली आहे. आहे ती परिस्थिति अशींच चालूं राहिली, तर लवकरच आमची तरुण पिढी तीव्र मद्यार्काच्या चटावलेंली अशी बनून जाईल ह्यांत शंका नाहीं"*

ज्यावेळीं १८ वें कलम पास होऊन व्हॉलस्टीड ॲक्ट अमलांत आला त्यावेळीं, प्रतिबंधक मार्गावर विश्वास असणाऱ्यांना असें वाटले; कीं आतां हा प्रश्न कायमचा सुटला, पण त्यांची ही समजूत चुकीची होती १८ व्या कलमामुळें अधिकाऱ्यांना मद्यपानाला बंदी करणें आंता किती तरी कठिण मात्र होऊन बसलें. असें होण्याला कारणेही होती. व्हॉलस्टीड ॲक्टा-मुळें दारूच्या किंमती भलत्याशाच चढल्या, आणि जेथें पूर्वी एकच माणूस धंदा करीत असे तेथें आता दहा माणसें तो करूं लागली. त्या कायद्या-मुळें चोरून दारू विकणें हें इतके फायद्याचे झाले कीं पूर्वीच्या परिस्थितींत ज्यांनीं दारूचे दुकान घालण्याचें मनांत सुद्धां आणले नसते, तेच आतां हा धंदा आनंदाने करूं लागलें.×

आनरेबल जे. इ. हौस ह्यांच्या मताप्रमाणें मद्यप्रतिबंधाची स्थिती येथें मानावी तशी आहे, हें मागें एका ठिकाणीं सांगितलें आहेच. प्रतिबंध

---

* करंट हिस्ट्री, एप्रिल १९२८.

× अमेरिकेना १९२५, पान १०२.

अस्तित्वांत नाहीं, हें पहावयाचें असेल, तर थोडीशी किंमत दिली कीं ह्या गोष्टीचा पुरावा आपल्याला मिळूं शकतो. बरें, प्रतिबंध यशस्वी झाला असें आपल्याला ह्मणावयाचें असेल, तरीही हरकत नाहीं, हजारों शिष्ट गृहस्थ ह्या मताला मान तुकवावयास येथें केव्हांही तयारच आहेत. प्रतिबंध अस्तित्वांत नाहीं, हें सिद्ध करून दाखविण्यासाठीं आह्मीं पुरावे पूर्वी पुढें मांडलें आहेतच. नॉरफोक (व्हर्जिनिआ) येथील खालील बातमी, ह्या आदर्श संस्थानांतील मद्यप्रतिबंधाचें स्वरूप कसें आहे तें पाहण्यासाठीं वाचकापुढें ठेवतों:—

" जुला रोज नामक एका नीग्रेसनें केलेल्या दारूविक्रीच्या गुन्ह्याबद्दल चौकशी करून जूरी मंडील सर्व सभासद निकाल ठरविण्यासाठीं ह्मणून आपल्या आसनांवरून उठले आणि अंतर्भागाकडे जाऊं लागले. इतक्यांत प्लाटफार्मावर धपकन आवाज झाला आणि पाहतात तों सतरंजीवर पोषाखांतून खालीं गळून पडलेली दारूची अर्ध्या पिंटची एक चपटी बाटली !

" प्रतिबंधक अधिकाऱ्यांपैकीं एस्. सी. बर्जेस नामक अधिकाऱ्यानें ती बाटली हस्तगत करून घेण्यासाठीं धडपडणाऱ्या इतर सहा अधिकाऱ्यांशीं भांडून ती स्वतः हस्तगत करून घेतली."

"ही बाटली येथें कोठून आली"? जज्ज जोन्हरनें विचारलें.

" ती खालीं पडलेली कशी सांपडली तें बर्जेसनें समजावून सांगितलें."

" ती जूरी पैकीं कोणाच्या तरी खिशांतून खालीं पडली काय"? जज्ज-साहेबांनीं पुन्हां पृच्छा केली.

" पण ह्याला कोण उत्तर देणार? पुढें कांहीं घडण्यापूर्वीच सर्व जूरीचे सभासद आपल्या खोलींतून बाहेर आले, आणि ह्या बाबतींत कांहीं भानगड होण्याचे पूर्वीच, गुन्हेगार अपराधी आहे असा निकाल सांगून त्यांनीं त्या अप्रिय प्रसंगाचा शेवट केला ! "*

---

* अमेरिकॅना, १९१५, पान २५७.

प्रतिबंधक चळवळीचा परिणाम कसा झाला आहे, त्यांचा थोडक्यांत समारोप करण्यांत आला आहे:—

" प्रतिबंधाच्या मार्गावर विश्वास बाळगणाऱ्या साध्याभोळ्या माणसांच्या अपेक्षेच्या विरुद्ध, अमेरिका ह्या उपायांनीं मादिरेच्या कैदींतून सुटण्या ऐवजीं गेल्या ८ वर्षांच्या अवधींत अगोदरच नमूद केलेल्या गुन्हेगारींच्या जोडीनें आणखी कोणत्या गुन्हेगारीच्या विपरीत तावडींत सांपडली आहे, तें पुढें सांगितलें आहे. सरकारच्या उत्पन्नांत फार मोठी तूट; चोरून दारूची विक्री करणाऱ्यांवर देखरेख करण्यासाठीं जादा खर्च; समाजाच्या सर्व भागांत व अधिकारी वर्गांतही प्रतिबंधक कायद्याची पायमल्ली सर्वत्र कायद्यांबद्दल अनादरांची वाढती वृत्ति, गुन्हेगारांनीं तुडुंब भरलेले जेलखानें, व त्यामुळें तुरुंगांत जागा होण्याची वाट पहात बसलेले हजारों कच्च्या कैदेंतील गुन्हेगार; कच्च्या मद्यार्काच्या प्रमाणांत नसलेली कमतरता; (ह्या साठीं १९२६ मध्यें १८ नोव्हेंबरला अप्रोप्रिएशन कमिटी पुढें जनरल एन्ड्रयूज ह्यांनीं दिलेली साक्ष पहा.) दंड वसूल करण्यासाठीं अवलंबण्यांत येणारे जबरदस्तीचे मालमत्ता जप्त करण्याचे मार्ग व त्यांचा करांवर होणार उलट परिणाम; प्रतिबंधार्थ नेमलेल्या अधिकारी वर्गातील बदफैलीपणा व तज्जन्य शेंकडा २५ अधिकाऱ्यानां काढून टाकणें; खासगी घरांवर छापे घालणें, तलाशी घेणें, जप्ती आणणें, हल्ले आणि शिवीगाळ करणें, आणि कधीं कधीं तर कायद्याची पर्वा न करतां खून करेपर्यंत पाळी येणें; जनतेमध्यें वाढतें असमाधान व त्यामुळें कायद्याबद्दल उत्पन्न झालेली बेगुमान पणाची वृत्ति; १९२० पासून एक सारखी कमी होत असलेली जमिनीची किंमत, ह्याला प्रतिबंधक कायद्यामुळें मदत झालेली आहे; चर्चेसच्या व धर्माधिकाऱ्यांच्या नैतिक अधिकारांचें उच्चाटण जनतेनें प्रतिबंधाला विरुद्ध असलेलें आपलें मत कांहीं अस्पष्ट शब्दांत व्यक्त केलेले नाहीं: ह्या कायद्याला कायदा ह्मणून पूर्वी मान्यता प्रगट करणाऱ्या किती तरी स्त्री-पुरुषांनां ह्या कायद्यांच्या परिणामांनीं शत्रु बनवून सोडलें आहे. प्रत्यक्ष निदर्शनास येणाऱ्या पुराव्या पुढें त्यांनां आपलें मत बदलणें भागच पडलें. मृत्युसंख्या, बेहोषी आणि कायद्याची पायमल्ली ह्या सर्वांचें वाढतें प्रमाणच त्यांच्या दृष्टी-

प्रत्तीस येत आहे. जुने गुन्हे आहेत तसे आहेतच, ह्या कायद्यांमुळें नवीन गुन्ह्यांची मात्र त्यांत अधिक भर पडली आहे, हें त्यांनां दिसून आलें आहे. त्याशिवाय ह्या कायद्याची अंमल बजावणी करण्यांत गुंतलेल्या नीतिभ्रष्ट आणि बदफैली अधिकाऱ्यांचें वर्तनही ते पहातच आहेत. गेल्या आठ नऊ वर्षांपासून ज्या कायद्याच्या अमलाखालीं आम्ही रहात आहोंत त्याचा नायनाट ह्या प्रचंड लोकमतामुळेंच होणार; कारण १२००००००० लोकांवर लादला जाणारा व त्यांच्या वर्तनावर आळा घालूं पाहणारा कायदा प्रचंड लोकमताच्या आधारा वांचून जगूंच शकत नाहीं !"*

हें १८ वें कलम व मद्यपानप्रतिबंधक चळवळ ही आजपर्यंतच्च सामाजिक क्रांतीमध्यें सर्वांत मोठ्या अशा क्रांतीचा प्रयत्न आहे, असें तिचें वर्णन आम्ही केलें आहे. परंतु त्याच्या परिणामांकडे पाहतां हा लोकांच्या सामाजिक उन्नतीचा प्रयत्न ह्मणण्यापेक्षां बंडखोरीचा एक प्रयत्न असें नांव याला देणें हेंच अधिक योग्य होईल. जगाच्या इतिहासांतही लोकमताचा एवढा प्रचंड विरोध असलेला आणि ज्याचें उद्दिष्ट इतकें स्पष्टपणें असाध्यच राहिलें आहे असा ह्या व्हॉलस्टीड कायद्याखेरीज दुसरा एखादा कायदा असेल किंवा नाहीं, ह्याची शंकाच आहे. निश्चयपूर्वक पास करून घेतलेले पण अंमलबजावणी करण्यास कठीण असे कायदे प्रत्येक देशांतच असतील, परंतु अमेरिकेंतील त्या कायद्याच्या बाबतींत जसें दृष्टोत्पत्तीस येतें तसें अराजकतेचें, अनीतीचें, सार्वजनिक, जीवनांतील सांवळ्यागोंधळाचें आणि इच्छित परिणामांच्या अगदीं विरुद्ध अशा गोष्टी घडल्याचें दुसरें स्वरुप मात्र कुठेंच पहावयास मिळणार नाहीं. परंतु प्रतिबंधानुकूल व तत्प्रातिकूल अशा मतांचा हा वाद, हें फक्त ह्या कायद्यानंतर अमेरिकेंतील सामाजिक जीवनांत माजलेल्या अंदाधुंदीचें व अराजकतेचें फक्त एकच स्वरुप आहे !

---

* करंट हिस्ट्री एप्रिल १९२८.

प्रकरण १६ वें.

युद्ध-बहिष्कार !

१९२८ च्या फेब्रुवारी महिन्याच्या ६ तारखेला वाशिंग्टन येथें फ्रॅन्को-अमेरिकन तहावर सह्या झाल्या आणि त्यानंतर मि. केलॉग ह्यांनीं जगांतील सर्व राष्ट्रांना संघटित होऊन युद्धाचा नायनाट करण्यासाठीं एकत्रित होण्यास निमंत्रण केलें. पुन्हां एकदां युनायटेड स्टेटस्‌नें शांतिप्रस्थापक देवदूताची भूमिका स्वीकारिली. विद्युद्दीपांच्या लखलखाटांत, चलच्चित्रपटाचे कॅमेरे फोटो घेत असतांना यूनायटेड स्टेटस्‌चे सेक्रेटरी केलॉग हे हजर असतांना, क्वाय डी ऑर्से येथील क्षोभिवंत दिवाणखान्यांत इंग्लंडचे तात्पुरते मुख्यमंत्री आणि इतर शंभर राष्ट्रांचे प्रतिनिधि बसले असतांना, १९२८ च्या २७ आगष्ट रोजीं, युद्धाच्या जुलूमांतून जगाची सुटका करणाऱ्या ह्या स्वातंत्र्य-पत्रिकेवर स्वाक्षरें करण्यांत आलीं ! हें वृत्त सर्व जगभर ताबडतोब कळविण्यांत आलें, आणि युद्धामुळें जर्जर झालेल्या जगाच्या पूर्वविभागानें, हा सुखाचा आणि शांतीचा संदेश घेऊन आपल्या एक मात्र सेक्रेटरी केलॉगला अटलांटिक सागराच्या दुसऱ्या कांठावर पाठविणाऱ्या प्रेसिडेंट कूलिज पुढें आदरानें गुडघे नमविले ! संरक्षक केलॉगच्या भोंवती नवीन मतप्रस्थापकत्वाचें दिव्य प्रकाशवलय निर्माण करण्यांत येऊं लागलें. मनुष्यांमनुष्यांमध्येंच सहानुभूति आणि शांति नांदली ह्मणजे पुरे आहे, असें येशु ख्रिस्ताचें ह्मणणें होतें; परंतु केलॉग साहेबांचा संदेश ह्यापेक्षांही अधिक व्यापक स्वरुपाचा होता, राष्ट्रांराष्ट्रांमध्यें ह्या भावना निर्माण व्हाव्या, असें त्यांचें सांगणें होतें. आपला संदेश सांगून व टोकिओ, डी ओर्से, डौनिंग स्ट्रीट इ. ठिकाणांहून आलेले मंत्री जे त्यांचे शिष्य त्यांना योग्य तो उपदेश देऊन, सर्व पूर्व गोलार्धाचें हृदय आपल्या वियोगानें विव्हल करीत केलॉग साहेब आपल्यापेक्षांही अधिक श्रेष्ठ, अधिक उच्च, त्यांनाच इकडे पाठविणाऱ्या अशा महामहिम्नित व्यक्तीकडे, पिताश्री कूलिजकडे परत निघून गेले.

कूलिज आणि सर्व मनुष्य जातीचा पिता परमेश्वर, ह्या दोहोंची तुलना वर सूचित केलेली पाहून कोणाला कदाचित् कसेसेंच वाटेल, परंतु तसें वाटूं देण्यासें कारण नाहीं. अमेरिकेंत परमेश्वराला ही प्रेसिडेंटच्या नंतरचा दुय्यम दर्जाचाच मान क्सा देण्यांत येतो, ह्याचें विवरण मागील एक प्रकरणांत आलेलें आहे.

पण हें जाऊं द्या: हें झालें मुद्याला सोडून. राष्ट्रांराष्ट्रांमध्यें सहानुभूति आणि शांति नांदावी, ह्या विषयींच्या कल्पनेचा जो उगम अमेरिकेंत व्हाईट हॉलमध्यें झाला, आणि जी कल्पना फ्रान्समध्यें जगाला सांगण्यांत आली, त्या बाबतींत विश्वास ठेवण्यापेक्षां विश्वास न ठेवणाऱ्यांचीच संख्या फार मोठी आहे, असें ह्मणणें, हें सुद्धां अधार्मिकतेचें द्योतक होईल कां?

युद्धबहिष्काराची कल्पना नवीन आहे असें नाहीं. सर्व मनुष्य जातीच्या सुखाचा शत्रू होऊन बसलेल्या ह्या घरघुशा पाहुण्याला हांकून लावण्याचे प्रयत्न मध्ययुगापासून सुरूं आहेत पण ह्या सर्व प्रयत्नांना कांहींच यश अद्यापि मिळालेलें नाहीं. नुसते तह करून आणि कायदे घडवून युद्धाचा नायनाट होऊं शकत नाहीं: त्यासाठीं मनोवृत्तींत बदल झाला पाहिजे, परसहिष्णुता वाढली पाहिजे आणि युद्धास उपयोगी असणाऱ्या साधनांचा नायनाट केला पाहिजे.

सेक्रेटरी केलॉग हे शांतिधर्माचे प्रवर्तक ह्मणून मिरवूं लागले, एवढ्यावरूनच यूरोपांतील राष्ट्रें युद्धाचा बहिष्कार पुकारतील, असें मुळींच नाहीं. व्हाईनच्या किनाऱ्यावरील जुने तंटे, बाल्कन लोकांचे बखेडे, सोव्हिअट राशियाची वाढती शक्ति, जर्मन व्यापारांचें चढाऊ धोरण, इ. प्रश्न इतके बिकट आणि गुंतागुंतीचे आहेत कीं, नुसत्या सद्धेतुमूलक आश्वासनांनीं ते सुटले जाऊं शकत नाहींत. पूर्व गोलार्धातील युद्ध प्रवणता, साम्राज्यवाद, ढोंगीपणा इ. लक्षांत घेतां येथील राष्ट्रें अत्यंत हीन दर्ज्याचीं आहेत, तें आह्माला मान्य आहे; इंग्लंड, फ्रान्स, राशेया, जपान इ. राष्ट्रांचीं मंत्रिमंडळें शांतिपाटकानीं भरलेलीं नाहींत, हेंही आह्मी जाणतो; ह्या राष्ट्रांच्या राज्य पद्धतीकडे लक्ष

पुरविलें असतां येथें उच्चार आणि आचार ह्यांत फार भेद दिसून येतो, हेंही आह्माला मान्य आहे ! पण युनायटेड स्टेटस् मध्यें तरी दुसरें काय आहे ?

तहामध्यें विवेकाचे योग्य प्रमाणही असावे आणि विजयाचा उन्माद दयाशून्य होऊं नये एवढ्यासाठीं वुड्रो विल्सन युरोपांत आले, हें आह्माला ठाऊक आहे. वॉरेन जी. हार्डिंग ह्यांनीं शस्त्रसंन्यास परिषद बोलाविली, आणि कॉल्व्हिन कूलिजनें पिसाळलेल्या यूरोपनें आपल्या वाजवी हक्कांचा निवाडा करून घेण्याचा मार्ग ह्मणून स्वीकारलेल्या युद्धाचें उच्चाटन करण्यासाठीं केलॉगला पाठविलें, हें ही आह्मी जाणतों. पण ह्या बरोबरच आह्मांला ह्या गोष्टीही विदित आहेत कीं, प्रेसिडेंट विल्सननें न्याय देतांना विवेकाची पर्वा बाळगलेली नाहीं; शस्त्रसंन्यास करण्याचें ठरलें असूनही वाशिंग्टन आणि लंडन येथें आपापलें नौकासामर्थ्य वाढविण्याच्या बाबतींत चढाओढ लागलेली आहे; ज्यावेळीं सेक्रेटरी केलॉग आपल्या शांति संदेशाचें पाठ फ्रान्समध्यें गात होते, त्याचवेळीं निकाराग्वामध्यें युनायटेड स्टेटस्च्या तोफांच्या धडधडाटींनें कानठळ्या बसत होत्या; आणि ह्या शांतितहावर सह्या करणाऱ्या राष्ट्रांचे युद्धमंत्री आपल्या नरभक्षक साधन सामुग्रीची जमवाजमव करण्यांत अत्यंत तत्परतेनें मग्न झाले होते !

युरोप वाईट आहे, फार वाईट आहे, त्याला सुधारणें कठीण आहे. युरोप साम्राज्यवादी आहे, युरोप जुन्या मतांनां उराशीं धरून बसणारें आहे. युरोपला 'लीग ऑफ नेशन्स' आणि हेग येथील तहपरिषदेचा उपयोग करून घेतां येत नाहीं. आपल्या सर्व तक्रारी तरवारीच्या बळावर मिटवून घेण्याची युरोपला संवय झालेली आहे. अगदीं रिश्ल्यू पासून तों बेथमन हॉलपेगपर्यंत सर्व मुत्सद्यांचा विश्वास 'जो समर्थ असेल तो जिवंत राहील, ह्या तत्वावर आहे. एक पंधरा इंच लाबींचें जळजळीत पातें हाच सुधारणेचा व शांतीचा खरा खरा उपाय आहे असें युरोपच्या अंतःकरणाला खरोखरच वाटतें आहे. खरोखरच, युरोप अत्यंत वाईट आहे यांत संशय नाहीं !

परंतु इतिहासांतील सर्वश्रेष्ठ अशा नीतीच्या विराट पुरुषांबद्दल, शांततेचा दिव्य संदेश जगाला प्रदान करणाऱ्या परमेश्वराच्या दूताबद्दल, लोक

सत्तेच्या सर्वांत मोठ्या पुरस्कर्त्याबद्दल,—सॅम काकाबद्दल तरी काय? त्यानें तरी आपल्या शेजाऱ्यांनां कोणतें उदाहरण घालून दिलें आहे? युरोपनें त्याच्या बद्दल जें मत बनवावें अशी त्याची इच्छा आहे, तें मत त्याच्या निकटवर्ती राष्ट्रांचे तरी त्याच्याबद्दल आहे काय? मला असें भय वाटतें कीं, इतिहासाचा पुरावा घेतल्यास कांहीं भलत्याच प्रकार निदर्शनास येईल!

चार्ल्स् आणि मेरी बिअर्ड ह्यांनीं अमेरिकन साम्राज्याचा उदय कसा झाला, त्यासें फार उत्तम विवेचन केलें आहे:-

"वर्षोंवर्षीं लागोपाठ उत्पन्न होणाऱ्या कल्पनातीत पिकांमुळें दरवर्षीं उरणाऱ्या शिलकींतून, वाढ्य देशांतील बाजार कावीज करण्याच्या धोरणामुळें वाढत्या उद्योगधंद्यामुळें, नित्यशः सांठत असलेल्या द्रव्यराशींतून, सोनेरी लकाकानें झळकणाऱ्या व विपुल ज्ञानसंस्कारयुक्त अशा उन्नत अवस्थेंतून अमेरिकन साम्राज्याच्या शक्यतेचा आणि इच्छेचा उदय झाला. आणि एकदां आपली साम्राज्य-सत्ता प्रस्थापित करण्याच्या मार्गावर अमेरिकन राष्ट्र अग्रेसर झाल्यानंतर, राजकारणाच्या अगदीं वरच्या सृष्टींत-जहाजाचे उदाहरण घ्यायचें झालें तर कप्तानाच्या खोलींत, मानवी शक्तीशीं संबद्ध असलेले सर्व हेतु आणि आकांक्षा ह्या एकजुटीनें साम्राज्याची नौका इच्छित मार्गानें नेण्यास बद्धपरिकर झाल्या! राजकारणांतील प्रसंगोपात घडणाऱ्या उलाढालीमुळें अमेरिकन प्रेसिडेंटचा वंशवृक्ष दाखवितो त्याप्रमाणें, मॅक् किन्ले, रूझवेल्ट टॅफ्ट, विल्सन, हर्डिंग आणि कूलिज ह्या निरनिराळ्या व्यक्ति एकामागून एक प्रेसिडेंटच्या सिंहासनावर विराजमान झाल्या; परंतु त्यांपैकीं एकानेंही आपल्या कारकीर्दींत ह्या साम्राज्य नौकेच्या आंखलेल्या मार्गांत मात्र यत्किंचितही फेरबदल केला नाहीं."*

मॅक किन्ले हा श्रीमंतांनीं व झुंबूशाहीनें अधिष्ठित केलेला प्रेसिडेंट होता. ह्याच्या नेतृत्वाखालीं १८९७ सालीं औद्योगिक हितसंबंध पुन्हां प्रबल

---

* 'राईज ऑफ अमेरिकन सिव्हिलिझेशन, पान ४८० (मॅकमिलन कं., न्यू यॉर्क.)

झालें, आणि त्यामुळें परराष्ट्रांशीं अमेरिकेचें संबंध कसे असावें, तें नक्की ठरलें. ह्या पूर्वी कांहीं महिन्यापासून मॅक्सिकन खाडींत आणि क्यूबामध्यें स्पेनशीं वऱ्याचशा भानगडी सुरूं होत्या, व त्या दररोज अधिकाधिक वाईट स्वरूपास प्राप्त होत चालल्या होत्या. अर्थातच, येथें असणाऱ्या अमेरिकन लोकांचें जीवित सुरक्षित राखणें हें अमेरिकेंचें कर्तव्यच होतें. ह्याच्या बरोबरच, ओघानेंच आलें म्हणून सांगतों कीं, ह्या ठिकाणीं ५ कोटी डॉलर भांडवलांत गुंतलेलें होते आणि दर वर्षाला एक कोटीचा नफा ह्या व्यापारापासून येत होता, त्याचेंही संरक्षण करणें अमेरिकेला प्राप्तच होतें. प्रेसिडेंट किन्लेचा हेतु अत्यंत शुद्ध आणि उदात्त असाच होता. १९२७ सालच्या डिसेंबर महिन्यांतील आपल्या संदेशांत त्यांनीं असें जाहीर केलें कीं, " जबरदस्तीनें देश काबीज करून घेणें.....हा आमचा धर्म नाहीं. असें करणें म्हणजे गुन्हा होईल. " आणि पुढें होणारें युद्ध हा स्वातंत्र्याचा लढा आहे, असें रिपब्लिकन पार्टीनें जाहीर केलें ! हर्स्ट वर्तमानपत्रांनीं मोठमोठाल्या अक्षरांत सात्विक पाविऱ्यासाठीं युद्धांची आवश्यकता असल्याचें प्रसिद्ध केलें ! उत्तम प्रकारें चालविलेलीं वर्तमानपत्रें, मनुष्यत्वाची हांक, आणि युनायटेड स्टेटसचे औद्योगिक हितसंबंध, ह्या सर्वांच्या दडपणामुळें युनायटेड स्टेटसनें १८९८ सालच्या एप्रिलच्या १९ तारखेस युरोपांतील एका अत्यंत निर्बल आणि अधःपतित राष्ट्राबरोबर युद्धाची घोषणा केली ! हें युद्ध फार काळपर्यंत चाललें नाहीं. युनायटेड स्टेटस्च्या प्रबल सैन्यानें तडाक्यानें विजयश्री संपादन केली. पराजित आणि हताश झालेल्या मॉड्रिडनें तह व्हावा अशी प्रार्थना केली, आणि १८९८ च्या १२ एप्रिलला तह घडून आला. प्रेसिडेंट मॅककिन्ले आठवणीचे फारच धडे होते. "लढाई थांबली आहे; आतां आपणास हवे तें आपलें करून घेण्यास हरकत नाहीं. " असें ते म्हणाले व त्याप्रमाणें त्यांनीं केलेंही. क्युबा 'स्वतंत्र' झाला, पण त्याच्यावर देखरेख करण्याची कामगिरी अमेरिकेकडे आली, आणि शेवटचा निकाल होईपर्यंत फिलिपाईन बेटें अमेरिकेच्या अधिकाराखाली असावीं, असें ठरले. फिलिपाईन बेटें अद्यापहि अमे-

रिकेच्याच अधिकाराखालीं आहेत; तेथील मूळ रहिवाशांच्या विनंतीवरून ही देखरेख अमेरिकेनें स्वत:च्या आधीन ठेवली आहे !

आपल्या मेथाडिस्ट बांधवांपुढें व्याख्यान देत असतांना, प्रेसिडेंट मॅककिन्ले ह्यांनीं ह्या दिवसें दिवस अधिकाधिक विशाल स्वरूप धारण करणाऱ्या विराटपुरुषाच्या बुद्धिमत्तेचें व नीतीमार्गाचें विवेचन केलें होतें. ते म्हणाले होते, "मी व्हाईट हौसच्या दालनांमधून रात्रीच्या रात्री हिंडण्यांत व विचार करण्यांत घालविलेल्या आहेत; आणि हे सभ्य गृहस्थांनों, मला हें कबूल करण्यांत कोणत्याही प्रकारची लाज वाटत नाहीं कीं, ह्यांपैकीं किती तरी रात्री मी गुढगे टेंकून ईश्वराला मनोमन भजण्यांत आणि मार्ग दाखविण्याबद्दल विनंति करण्यांत घालविलेल्या आहेत. आणि एके रात्रीं,–ह्यावेळीं रात्र फार झालेली होती, अशा वेळीं, कोणास ठाऊक तें नकळें, परंतु माझ्या मनांत एकाएकीं, यदृच्छेनेंच म्हणा, पण पुढीलप्रमाणें भावना स्फुरली·····त्या सर्व फिलिपिनो लोकांनां आपलेंसें करावें, त्यांनां सुशिक्षणाचें प्रदान करावें. त्यांची उन्नति करून, त्यांना सुसंस्कृत मनुष्यें बनवून, त्यांनां ख्रिस्ती धर्माची दीक्षा द्यावी, आणि ज्यांच्यांसाठीं श्रीख्रिस्ती भगवानानेंसुद्धां आपला देह अर्पण केला त्याच आपल्या पतित बांधवांच्या उद्धारासाठीं जें जें आपल्याला करतां येणें शक्य असेल, तें तें करावें! हें स्फुरण झाल्यानंतर माझ्या चित्तावर अपार शांति पसरली. मी गेलों आणि शय्येवर आंग टाकलें, तोंच मला अत्यंत प्रगाढ अशी शांत निद्रा लागली !"

ह्या दैवी स्फूर्तिप्रमाणें अध:पतित फिलिपिनो जातीला शिक्षण देऊन, सुसंस्कृत करून, सद्धर्माची दीक्षा देऊन जनावरांचीं माणसे बनविण्याची कल्पना लवकरच मूर्त स्वरूपांत परिणत झाली ! आपल्या राज्यकर्त्यांमध्यें झालेल्या अदलाबदलीची बातमी जेव्हां मनिलानिवासीयांच्या कानीं जाऊन पोहोंचली, त्यावेळीं, एग्विनॅल्डो नामक एका वेड्या पिराच्या (?) अधिपत्याखालीं तेथील लोकांनीं आपल्या मनाची अस्वस्थता प्रगट करण्याचा थोडासा प्रयत्न केला. स्पेनशीं युनायटेड स्टेटस्‌नें युद्ध सुरूं केलें असतां ह्याच एग्विनाल्डोनें युनायटेड स्टेटसला सहाय्य केलें होतें आणि ते एकच शर्तीवर कीं युद्ध समाप्त झाल्यानंतर ह्या बेटाला त्याचें स्वातंत्र्य परत मिळेल

पण एग्विनाल्डोला अनुभवानें निराळ्याच गोष्टी दाखविल्या. लढाईमुळें आपल्या राज्यकर्त्यांमध्यें फरक घडवून आणण्यापलीकडे दुसरें कांहींच साध्य होऊं शकले नाहीं, हें त्याला दिसून आलें. १८९९ च्या फेब्रुआरी महिन्यामध्यें एग्विनाल्डोशीं युनायडेट स्टेटस्चें युद्ध सुरूं झालें. कोणत्या परिस्थितीखालीं ह्या युद्धाला प्रारंभ झाला, तें कांहीं फारसें उजेडांत आलेलें नाहीं; परंतु साधारणपणें जगाला जें कारण सांगण्यांत येतें तें हें कीं, अमेरिकन सरहद्दीजवळून जात असलेल्या चार सैनिकांनां गोळ्या घालून ठार मारण्यांत आले ! एग्विनाल्डोनें ताबडतोब शांतता प्रस्थापित करण्याचा व घडलेल्या गोष्टीबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून तह घडवून आणण्याचा पुष्कळच प्रयत्न केला; परंतु जागेवर असलेल्या अमेरिकन सेनाधिकाऱ्यांनीं तें मान्य न करतां, एवढ्यावरून युद्धाचा वणवा भडकविला !

ह्या बंडाचा बीमोड करण्यासाठीं अमेरिकेला तीन वर्षें शेंकडो जीव आणि १७५ कोटी डालर, एवढें बळी द्यावे लागले. लढाई चालूं असतांनां, प्रेसिडेंट मॅक किन्लेच्या ख्रिश्चिअन सैनिकांनां सुधारलेल्या युद्धनीतिचें विस्मरण झालें आणि त्यांनीं प्रतिपक्षाला जेरीस आणण्यासाठीं अशा कांहीं मार्गांचें अवलंबन केलें कीं तें पाहून मार्क ट्वेन सारख्या लेखकाला, बंदुकीच्या दस्त्याच्या बळावर लोकांनां सुसंस्कृत आणि ख्रिस्ती बनविण्याच्या व ज्याला अमेरिकन लोक 'जलशुद्धि' (Water Cure) असें नांव देतात त्या विलक्षण उपायाबद्दल एक अत्यंत रानटीपणाचा लेख लिहिण्याची इच्छा उत्पन्न झाली ! साऊथ कॅरोलिना येथील एका सीनेटरनें असा खुलासा केला, " दक्षिणेंतील नीग्रो लोकांना मतदानाचा हक्क असावा कीं नाहीं ह्या प्रश्नाची योग्यायोग्यता किंवा न्याय्यान्याय्यता विचारांत घेण्याची आतां रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्यांची प्राज्ञा नाहीं ! पूर्वकालापासून ज्या शस्त्रप्रचारांचा उपयोग आपण करीत आलों आहोंत,--सर्व माणसें एकाच परमेश्वराचीं लेंकरें अतएव बांधवच आहेत, वगैरे गोष्टींची मुळें आतां फार खोल जाऊन रुजलीं आहेत. मॅसॅचुसेट्स येथील सीनेटर होर ह्यांनीं तर असें उघड उघड विधान केलें कीं, ते स्वतः

जर फिलिपिनो असते, तर तेही ह्या प्रसंगीं निकरानें अमेरिकेशीं लढलेच असते !

फिलेपाईन बेटांतील अमेरिकेची राज्यव्यवस्था कोणत्या स्वरूपाची आहे, त्याचें खोल विवरण ह्या ठिकाणीं करता येणें अशक्य आहे; पण एवढें मात्र खरें कीं, अमेरिकेनें येथें अमलांत आणलेल्या राज्यपद्धतींत व दुसऱ्या कोणत्याही साम्राज्यशाहीच्या सोटेशाही राज्यपद्धतींत फरक असा नाहींच ! प्रेसिडेंट हार्डिंग ह्यांनीं फिलेपाईन बेटांवर राज्य चालाविण्याकरितां म्हणून पाठविलेला जनरल लिओनार्ड वुड म्हणतो कीं, येथून अमेरिकेनें आपलें सैन्य काढून घेतलें, कीं येथील हजारों निस्सहाय रहिवाशी येथीलच लहान लहान लोकनायकांच्या भक्ष्यस्थानीं पडल्यावांचून राहणार नाहींत. असल्या लोक-कल्याणकारी नाजुक भावनांकडे तुच्छतेनें हंसण्याचें यूरोपांतील राष्ट्रांना धाडस होईल काय ? ब्रिटिश राज्याखालीं गुलामगिरींत कुजत असलेल्या व स्वायत्त आणि सनदशीर अशी स्वयंशासित राज्यव्यवस्था मिळविण्यासाठीं तळमळत असलेल्या कोट्यावधि लोकांच्याबद्दल ब्रिटेश मुत्सद्दी अगदीं हेच उद्गार काढत नाहींत कां ? पण पूर्वीच सांगितल्याप्रमाणें, यूरोपच्या बाबतींत हे अपराध म्हणजे नवे नाहींत.

फिलेपिनो लोकांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या महत्वाकांक्षेसंबंधीं युनायटेड स्टेटसची प्रवृत्ती कशी आहे, त्याची कल्पना करणें कांहीं फारसें कठिण नाहीं. ह्या बाबतींत त्यांनीं पांघरलेला मानभावीपणाचा आणि ढोंगीपणाचा बुरखा, जुनाट अशा सोटावादी सम्राटांच्यापेक्षां कोणत्याही बाबतींत निराळा नाहीं.

प्रेसिडेंट कूलिज ह्यांनीं ओहिओ मुत्सद्द्यांपैकीं येथील 'हार्डिंग-डॉटरी' मंडळांतील एक कॉमीं थॉम्पसन ह्यांना परिस्थितीचें निरीक्षण करून आपलें मत सादर करण्यास फर्माविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं जो आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला, आणि १९२६ च्या सॅप्टेंबर महिन्यांत ह्या रिपोर्टाला पुष्टि देण्यासाठीं अमेरिकेच्या राज्याधिकाऱ्यांचें उन्हाळ्यांतील निवासस्थान जें बेग्विओ, तेथून जो विद्युत्संदेश पाठविण्यांत आला, त्यावरून फिली-

फाईन बेटासंबंधीं अमेरिकन सरकारचें धोरण काय आहे ते आपल्या लक्षांत येते:—

" पूर्वेच्या द्वाराशीं निसर्गानेंच मोठ्या मुत्सद्दीपणानें ज्यांची मांडणी केली आहे, अशा ह्या बेटावरून जर आम्ही आपला अधिकार काढून घेतला तर एशिआमधील एक प्रबल शक्ति असल्याचें जें आम्हाला स्थान आहे, त्यालाही आम्ही मुकूंच ! आमच्या व्यापारी आणि लष्करी शक्तीचें ठाणें असें जें फिलिपाईन बेट, त्याचा आम्ही त्याग केला तर चीन मधील सर्व देशांशीं स्वतंत्र व्यापाराचें खुलें धोरण आम्हाला स्वीकारतां येणार नाहीं, पूर्वेमध्यें जी जागृति होत आहे तिच्या बरोबर आपोआपच खुल्या होणाऱ्या नव्या नव्या व्यापार मार्गांचा आम्हाला फायदा घेतां येणार नाहीं, आणि आमचे स्वत:चे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठीं युद्ध करण्याचे प्रसंगीं यशस्वीपणानें युद्धही आम्हाला करतां येणें अशक्य होईल, हें उघड आहे. ह्या मुद्याचें समर्थन आम्ही एकच गोष्ट सांगून करूं शकतों, ती ही कीं फिलिपाईन हें एकच बेट असें अमेरिकेच्या ताब्यांत आहे कीं जें ह्या स्वरूपाच्या आमच्या हालचालींना आधारभूत असें निसर्गानेंच निर्माण केलेलें स्थल आहे. पॅसेफिक महासागरावरून एशिआ खंडापर्यंत जर एक भिंत कल्पिली तर तींतून आम्हाला आंत प्रवेश मिळवून देणारे जपानच्या दक्षिणेस व बोर्नियोच्या उत्तरेस असलेलें फिलिपाईन बेटांचा समूह हें एक द्वार आहे. हे महत्वाचें व्यूहस्थल जर आम्ही आमच्या ताब्यांतून जाऊं दिलें तर पूर्वेच्या जीवनांतील व्यापारविषयक व अंतराष्ट्रीय जीवनांतील एक महत्वाचें अंग असें जें अमेरिकेचें स्वरूप आज आहे तें तात्काल नष्ट होईल, असा मुद्दा फिलिपाईन बेटांच्या स्वातंत्र्यदानाच्या आड येतो !"

अमेरिकेच्या राज्यघटनेप्रमाणें वसाहती वाढावेणें किंवा त्यांच्यावर राज्यें करणें हें क्षम्य आहे कीं काय, अशी शंका साहजिकपणेंच उपस्थित होते. ही राज्यघटना आंखणाऱ्यांपुढें पोर्टो रिको, किंवा क्युबा किंवा मॉनिला ह्या स्थलांची कल्पना तरी विद्यमान होती किंवा नाहीं, ही शंकाच आहे. अमेरिकन राज्यपद्ध-

तविद्दल साशंक असण्याचा एका संपादकाला वरिष्ठ कोर्टाकडून एकदां असें सांगण्यांत आलें कीं, राज्यघटनेच्या पहिल्या कलमान्वयें अशा अघळ पघळ मागण्या मुळीं करतांच येत नाहींत. ह्या विषयासंबंधीं ज्या कांहीं शंका कुशंका व मर्यादा एखाद दुसऱ्या सद्सद्विवेक बुद्धि जागृत असलेल्या इसमाच्या अंतःकरणांत उद्भवतील, त्या सर्व, वरिष्ठ कोर्टानें 'इन्सुलर केसेस' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या बऱ्याचशा निकालांनीं जागच्या जागीं दाबून टाकून असें जगापुढें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, भौगोलिक सत्ता वाढविण्याच्या व वसाहती आपल्या साम्राज्याला जोडण्याच्या बाबतींत अमेरिकन राज्यघटनेनें आपल्या भोंवतीं मर्यादेचें बंधन कोणतेंच निर्माण करून ठेवलेलें नाहीं. "येथिल राज्यघटना आपल्या राष्ट्रध्वजाच्या कल्पनेबरहुकूम वर्तन करते का?" ह्या नेहमींच विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नाला मि. डूले ह्यांनीं एक कायम ठशाचें उत्तर तयार करून ठेवलें आहे. तें हें,– "सुप्रीम कोर्ट हें निवडणुकीप्रमाणें आपले धोरण आणि वर्तन आंखीत असतें!"

युनायटेड स्टेटस्च्या वसाहतींची वृद्धी ही सीनेटर नॉक्समुळें 'डॉलरचे राज्यकारण' ह्या नांवानें प्रसिद्धि पावली आहे. ह्या बाबतींत ज्या कांहीं घटना एका पाठीमागून एक घडत गेल्या, त्या बाबतींत अमेरिकन राज्यतंत्रानें कोणताही विरोध किंवा असमाधान व्यक्त केलें नाहीं. उलट, रूझव्हेल्ट, टॅफ्ट, विल्सन, हार्डिंग आणि कूलिज इ. प्रेसिडेंटांचें असेंच मत पडलें कीं, युनायटेड स्टेटस्चे ह्या वर्तनाच्या मुळांतील हेतु शुद्ध व श्लाघ्यच होते. प्रेसिडेंट विल्सननें असें जाहीरपणें बोलून दाखविलें कीं, "आह्मी त्यांचे मित्र व सहाय्यकर्ते आहोंत. हें आपण त्यांना समानत्वाच्या पायावर उभें राहून समजावून दिलें पाहिजे.....त्यांचा खराखुरा फायदा कशांत आहे त्याचा प्रत्यक्ष परिचय करून घेऊन आमच्या फायद्याशीं त्यांच्या फायद्याची जुळणी होऊं शकते कीं नाहीं तें पाहून मग बरोबरीच्या नात्यानें आह्मी त्यांचे मित्र बनलों पाहिजे."

आपल्या व दुसऱ्यांच्या सन्मानाचें संरक्षण करणाऱ्यांच्या मार्गांवरील व आचरणावरील अत्युत्कृष्ट टीका ह्मणजे हेटीचें प्रकरण होय.

१८०३ सालीं हेटीने फ्रान्सच्या गुलामगिरीचे जोखड मानेवरून झुगारून दिले व लोकसत्ता प्रस्थापित केली. परंतु ह्या लोकसत्ताक पद्धतीचा मार्ग कांहीं निष्कंटक नव्हता. खून, मारामाऱ्या, बंड, त्याच्याविरुद्ध दुसरें बंड व बिमोड करण्यासाठीं दुसरे अत्याचार, अशी परंपरा सुरू होणें हे अवश्यंभावीच होते. इकडे स्थानिक व्यापारांत गुंतविलेल्या भांडवलावर शेंकडा दहा पंधरा टक्के उत्पन्न होत असतांनाही, वॉलस्ट्रीटच्या कुबेरांना हेटीमध्यें चाललेल्या उलाढालीकडे आपले लक्ष वेधावयास अवकाश नसल्यामुळें अशक्य झाले होते. परंतु १९ व्या शतकाच्या शेवटीं युनायेटड स्टेटस्ची सांपत्तिक सुस्थिती नीटपणें जमून आल्यानंतर, ह्या छोट्याशा लोकशाहीच्या सुखसोयीबद्दल पराकोष्टची कळकळ युनायटेड स्टेटस्च्या हृदयांत खळबळ माजवूं लागली. आपल्या सन्मानास बाध न येऊं देतां समानत्वाच्या नात्यानें मित्रत्व प्रस्थापित करण्याची संधी १९०२ मध्यें प्राप्त झाली. हेटीच्या सरकारनें न्यूयार्क मधून जवळ जवळ शेंकडा १२ टक्के व्याजाच्या दरानें कर्ज काढले आणि अमेरिकन दारूगोळ्यामध्यें बरेचसे पैसे गुंतविले. अमेरिकेंतील दारूगोळा तयार करणाऱ्यांनीं ह्या व्यवहारांत आपला माल दुप्पट तिप्पट दरानें विकून आपलें उखळ चांगलेंच पांढरें करून घेतलें हा भाग निराळा. अमेरिकन मरीननें आपलें सोने स्थानिक हेटीअन नॅशनल बँक मधून काढून घेऊन तें प्रथम एका अमेरिकन लढाऊ जहाजावर आणि तेथून पुढें न्यूयार्कमध्यें नेऊंन ठेवलें ही ठेव परत आपल्याकडे यावी ह्मणून हेटिअन सरकार शंखच्च करीत राहिलें. १९१६ मध्यें, जगाच्या सर्व राष्ट्रांचें लक्ष दुसरीकडेच गुंतलें असतांना, वाशिंग्टन येथील स्टेट डिपार्टमेंटनें आपल्या मित्रत्वाच्या 'हेतूंना' आणि 'आकांक्षांना' अधिक कार्यक्षम बनविलें. ह्याचें पहिलें निदर्शन ह्मणून, अडमिरल केपरटन हे 'वाशिंग्टन' नामक आपल्या लढाऊ जहाजांत हेटिअन समुद्रांत जाऊन थडकले. त्यांनीं तेथें जाऊन, सरकारी अधिकार स्थलांचा ताबा घेतला, मार्शल लॉचा अंमल जारी केला, आणि युनायटेड स्टेटस्च्या हितांस अनुकूल अशा एका जनरल डॉर्टिग्विनेव्ह नामक गृहस्थाला तेथील प्रेसिडेंट ह्मणून निवड करवून घेतली ! युनायटेड स्टेटस्च्या सीनेटनें लवकरच १९१९ मध्यें

हेटिअन सरकारशीं शांततेचा व मित्रत्वाचा, तहनामा करून त्यावर सही करून तो पासही करून घेतलाच !

१९१६ ते १९२१ पर्यंत २००० पेक्षां अधिक हेटिअन लोकांमां ठार मारणें अमेरिकन सैन्याला भागच पडलें ना ? हे बळी पडलेले सर्व लोक दरोडेखोर होते ! कायद्याची आणि शांततेची अंमलबजावणी जारीनें सुरू झाली, आणि ह्या गोष्टीला ज्यांनीं ज्यांनीं आपली प्रतिकूलता दाखविली त्यांना ताबडतोबच असें करणें आपल्या बऱ्याचे नव्हे, असें पटवून देण्यांत आले. तेथील रहिवाशांच्या ह्या खुनांबद्दल तक्रार करणाऱ्या एका अमेरिकन पाद्र्याला अंधारकोठडीचे निरीक्षण करण्यास रवाना करण्यांत आले अमेरिकन मरीन खात्याविरुद्ध खटला भरणाऱ्या एका अमेरिकन व्यापाऱ्याला त्याच्या खटल्याचा निकाल ऐकण्यासाठीं परमेश्वराच्या दरबारांत रवाना करण्यांत आले.

" हेटिअन लोकांपैकीं ज्यांनां गोळ्या घालून किंवा अन्य उपायांनीं ठार मारण्यांत आले त्यांना झालेली शिक्षा योग्यच होती असें जरी गृहीत धरलें तरी शांतता प्रस्थापण्याच्या ह्या मार्गातून जे सहीसलामत बचावले त्यांनांही ही नवीन कारकीर्द समाधानकारक वाटत होती, असें ह्मणतां येणार नाहीं. ते कांहीं जरी असले तरी एवढें मात्र खरें कीं, तहांतील कलमान्वयें ह्या भूमार्गातील प्रदेशांतील शेतीची वैगेरे वाढ करण्यास जेव्हां सरकार खटपट करूं लागलें त्या वेळीं स्थानिक मजुरांना रस्ते तयार करण्याच्या कामीं लावण्यास दंडुक्यांच्या प्रयोगाशिवाय गत्यंतर उरलें नव्हते. ह्या शिवाय, अमेरिकन बातमीदारांचें असें ह्मणणें आहे कीं, हेटीच्या फायदेशीर राज्यव्यवस्थेला सहाय्य करणाऱ्या अमेरिकन अधिकाऱ्यांच्या विरुद्ध स्थानिक वक्त्यांनीं व वृत्तपत्रकारांनीं अशी संघटीत खळबळ चालविली की, येथील संरक्षकांनां सार्वजनिक सभांची व वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करून त्यांना बंद पाडणें आणि कोर्ट मार्शल करून गुन्हेगारांची चौकशी करून त्यांनां कायदेशीर शिक्षा ठोठावणें भागच पडलें !

" जमिनीच्या प्रश्नाबाबत स्थानिक असंतोष हा अगदीं स्पष्टपणेंच प्रत्ययास येत होता. जुन्या कायद्याप्रमाणें हेटीमधील जमीन फक्त येथील रहिवाशांच्याच मालकीची असावी, असा निर्बंध होता; परंतु त्यामुळें तहाच्या कलमाप्रमाणें येथील शेतकी धंद्याची वाढ करण्यास आतुर झालेल्या अमेरिकन व्यापारी मंडळांच्या मार्गांत अगदीं कायदेशीर धोंडच येऊन पडल्यासारखें झालें होते. येथील लोकांच्या प्रगतीच्या आड येणारी ही धोंड नाहींशी करण्याच्या उद्देशानें वाशिंगटन येथील कुशल मुत्सद्यांनीं नेमके हेंच कलम वगळून दुसरी एक घटना तयार केली आणि तिला मान्यता देण्यासाठीं ती हेटीअन सरकारपुढें सादर केली. परंतु ह्याच सुमारास ज्या प्रमाणें कॅलेफोर्निअन लोकांनां जपानी घरघुशेपणाचा द्वेष वाटत होता तसाच द्वेष ह्या अमेरिकन घरघुशांबद्दल बाळगणाऱ्या येथील रहिवाशांच्या क्रोधानें असे कांहीं नरसिंहाचे स्वरूप धारण केलें कीं त्यामुळें वाशिंगटन मधून तयार होऊन आलेल्या ह्या नवीन घटनेला मान्यता देण्याचें असेंब्लीला साहस झालें नाहीं. कायद्याच्या उपचारांना मान देण्याच्या ह्या हेतूचा अशा रीतीनें बोजवारा उडाला असें पाहून अमेरिकन सरकारनें आपले वास्तविक स्वरूप अखेर प्रगट केलें. सरळ मार्गानें हे लोक आपलें ऐकत नाहींत असें पाहून त्यांनीं असेंब्ली रद्द केली, बाहेर न पडणाऱ्या सभासदांनां जबरदस्तीनें हांकून लावण्याचा सैनिकांना हुकूम सोडला, आणि असे ठरवून टाकले, कीं, हेटीमध्यें बाहेरच्या माणसांनांही जमिनी घेऊन राहण्याचा अधिकार देणारी ही नवी योजना अमेरिकन सैन्याच्या शिस्तवार देखरेखी खालीं हेटीअन जनतेपुढेंच मान्यतेसाठीं ठेवण्यांत आली आहे ! "*

हेटिअन लोकांच्या स्वातंत्र्यस्थापनेला ज्यावेळीं अशा रीतीनें सहाय्य करण्यांत येत होते, आणि फिलिपाईन बेटांमध्यें लोकसत्तेची स्थापना करण्यांत येत होती, त्यावेळीं वाशिंगटन येथील सरकार व तेलाच्या, शेतकीच्या व सावकारीच्या पेढ्यासारखे सरकारचे इतर मंत्री व सहाय्यक ह्यांच्या अंत:करणांत, निराळ्याच उदात्त व महनीय अशा हेतूंचें स्फुरण होऊं लागले होतें.

---

* राईज ऑफ अमेरिकन सिव्हिलिझेशन, पान ६०९.

१९११ सालीं निकारागवा येथें लढाऊ जहाज रवाना करणें; १९०५ सालीं डोमिनिकन समुद्रांत आपलें लढाऊ आरमार नेऊन उभें करणें, १९१७ मध्यें डेनमार्कपासून व्हर्जिन बेटें विकत घेणें, १९२४ मध्यें अमेरिकन आरमारानें हांडुरासची सफर करणें, १९२१ मध्यें गुटॅमालाची स्थापना करण्याकरितां आपल्या लढाऊ जहाजाचीं मदत पाठविणें, आणि पनामाच्या हमरस्त्याची उभारणी व व्यवस्था करणें, ह्या सर्व गोष्टी ह्याच उदात्त, उच्च, महनीय अशा हेतूच्या निदर्शक होत ! कॅरिबिअनमध्यें शांति प्रस्थापण्याच्या व लोकसत्तेची वृद्धि करण्याच्या दुर्घट कार्यांतही आपल्या अचाट सामर्थ्याची व कर्तबगारीची चुणूक दाखविलेलें आरमारच १९२१ मध्यें निकारागवा मध्यें व १९२८ मध्यें निकारागवा मधील निवडणुकीचें कार्य आपल्या देखरेखीखालीं पार पाडण्यामध्यें गुंतलेलें होतें !:–

" त्या पक्षभेदांमुळें जेरीस आलेल्या देशांत, स्वातंत्र्य व कायदेशीर राज्य स्थापन करण्याच्या स्तुत्य हेतूनें प्रेरित होऊन, दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या संमतीनेंच, निकारागवा येथील निवडणुकींवर देखरेख ठेवण्यासाठीं, आरमार हल्लीं तेथें ठेवण्यांत आलें आहे. जर तेथून आरमार काढून घेण्याची घाई केली, तर आज पर्यंत जेवढें कांहीं मिळविलें आहे तें सर्व मातीमोल झाल्यावांचून राहणार नाहीं ! "

ऐतिहासिक सत्याला अनुसरून ह्मणावयाचें ह्मणजे ह्या निकारागवा प्रकरणाचें बाबतींत जी कांहीं कारवाई करण्यांत आली, तिला एकमतानें पाठिंबा होता असें मात्र नाहीं, कॅलिफोर्निआ येथील रिव्हरसाईड प्रेसच्या ह्मणण्याप्रमाणें:–

" ह्या भानगडींत अद्यापपर्यंत अमेरिकेचे पंधरा लक्ष डॉलर गुंतविण्यांत आले आहेत; आणि अक्टोंबरमध्यें निकारागवा मधील निवडणुकी संपेपर्यंत हा खर्च २० लक्षापर्यंत सहज जाईल. आणि ह्या बेसुमार खर्चाला योग्य कारण ह्मणून, अमेरिकन हितसंबंधांचें संरक्षण हें सांगण्यांत येतें ! परंतु अमेरिकेचे हितसंबंध कोणत्याही प्रकारें धोक्यांत आहेत, ह्याचें प्रमाण मात्र कुठेंच सांपडत नाहीं ! रोजच्या नव्या नव्या

बातम्या येत आहेत त्यावरून तरी निदान अद्यापि एकाहि अमेरिकन राहिवाशाला धोका पोहोंचला असल्याचें ऐकिवांत आलेलें नाहीं. आणि तेथें गुंतलेल्या अमेरिकन भांडवलांबद्दल म्हणायचें झालें तर, त्याचा धोका हा वास्तविकपेक्षां कल्पनेंतच अधिक वसतो आहे ! "

रिचमंड येथील ' टाइम्स डिसपॅच ' ला मात्र निराळेंच वाटतें:-

"निकाराग्वा मधील भानगडींत अमेरिका जो भाग घेत आहे त्यांत, त्या बाबत होणारा खर्च हा कांहीं महत्वाचा मुद्दा नाहीं. आरमार खात्याकडून असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे कीं, सॅन्डिनोच्या माणसांशीं झालेल्या झटापटींत २१ खलाशी कामास आले आहेत, युद्धाचे वेळीं एवढी प्राणहानि म्हणजे कांहींच नाहीं, असें मानण्यांत आलें असतें; परंतु युद्ध सुरूं नसतां शांतीच्या काळांत ती भयंकरच समजली पाहिजे !"

" ह्या भानगडीमुळें आपण काय मिळविलें आहे किंवा काय मिळविणार आहोंत, तें एक कूलिज साहेबाशिवाय दुसऱ्या कोणालाही ठाऊक नाहीं; आणि अमेरिकन जनतेला आपलें गुपित सांगण्याइतका मोठेपणा देण्यास प्रेसिडेंट साहेब तयार नाहींत ! सर्व साधारणपणें जें येथील आणि निकाराग्वामधील प्रजाजनांना ठाऊक आहे तें एवढेंच कीं, अवाढव्य खर्च व निष्कारण जीव-हत्या घडवून आणणारें एक अनधिकृत युद्ध सुरूं आहे ! कदाचित् त्यामुळें, ह्या आपल्या देशांत महागनी लांकुड व केळीं ह्यांच्या व्यापारांत लक्ष असलेल्या व्यापाऱ्यांच्या हिताच्या अशा कांहीं गोष्टी साध्य झाल्या असल्यास न कळे !

निकाराग्वामध्यें युनायटेड स्टेट्सनें आपला पाय ठेवला आहे तो केवळ तेथील निवडणुकी सुरळीतपणें पार पडाव्या एवढ्या साठींच, असें सांगण्यांत येतें. डॉलॉस न्यूज नांवचें वृत्तपत्र लिहितें, " पोलिसच्या कर्मचाऱ्यांची येथें कांहीं बरी गत नाहीं ! " प्रेसिडेंट कूलिजला निकाराग्वामध्यें वाटेल त्या बाबतींत ढवळाढवळ करण्याची मुभा मिळाली, हें स्वयंभूर्ण

तत्वांच्या व समंजसपणा ह्या गुणाला मिळालेल्या विजयाचेंच द्योतक होय असें ह्मणून प्रेसिडेंट साहेबांना मनमोकळे वर्तन करण्यास संमति देणाऱ्या सीनेटचे न्यू यार्क मधील 'हेराल्ड ट्रिब्यून' नामक पत्रानें मनापासून अभिनंदन केलें होते. ह्या स्वयंपूर्ण तत्वांच्या व समंजसपणाच्या विजयाच्या मुळाशीं ज्या अनेक कारणांची परंपरा लागलेली आहे, तिंचें वर्णन १९२८ च्या मार्चच्या 'करंट हिस्ट्री' मध्यें खालीलप्रमाणें केलेलें आहे:—

"निकारागवा:—जनरल आगस्टिनो सँडिनो, लिबरल पक्षाच्या सैन्याचे एक नेते, ह्यांनीं स्टिम्सन प्लन प्रमाणें निवडणुकीला कबुली देण्याचें नाकारलें; आणि ह्मणून त्यांना जानेवारी महिन्यांत स्थानिक सैन्याशीं व अमेरिकन आरमारांशीं झुंज करावी लागली शेवटीं त्याचा पराभव झाला. त्या महिन्यांत जसजसे दिवस लोटूं लागले, तसतशी यूनायटेड स्टेटसमधून कुमक पाठविण्यांत येऊं लागली; आणि विशेष महत्वाची गोष्ट ह्मणजे आरमार खात्यातील बरीचशीं बांबगोळे फेंकणारी विमानेंही पाठविण्यांत आलीं. जानेवारीच्या १४ तारखेस ह्या विमानापैकीं एक, ज्याचे कॅप्टन एल्. एम्. बोर्न होते तें फ्ला मधील मिएमि-स्थाना पासून जें उडालों तें मध्यें कोठेंही न थांबतां थेट मॅनेग्वा येथेंच जाऊन उतरले! जानेवारीच्या ९ तारखेस अमेरिकेच्या निरनिराळ्या बंदरांतून १२०० आरमारी सैनिक मेजर गेनच्या नेतृत्वाखालीं निकारागवाकडे जाण्यांस निघाले. आरमार खात्याचे कमांडंट जनरल लेजून हे ही ह्या आरमाराबरोबर होते; ह्यांचा निकारागवा येथें जाण्यांत, आपल्या हाताखालील सैनिकांचें नायकत्व पत्करावें असा मात्र मुळींच नव्हता! ते फक्त एक पंधरवडाभर फेरफटका करून यावा व निकारगवा येथील पाहणीही उरकून घ्यावी, एवढ्यासाठींच ह्यावेळीं तेथें गेले होतें! जानेवारीच्या ३१ तारखेस, जनरल लीजून बरोबरच्या कोरिंटो येथें पंधरा तारखेस येऊन दाखल झालेल्या ब्रिगेडिअर जनरल लोगन फ्रेलंड ह्यांनां कर्नल गुलिखच्या वर आरमारांचे अधिकारी नेमण्यांत आलें, डिसेंबरच्या ३० तारखेस क्विलेली येथें झालेल्या एका घनघोर संग्रामानंतर, जनरल सँडिनोने एल्. चिपोटे नामक ६००० फूट उंचीच्या पर्वतशृंगावर वसलेल्या व अभेद्य समजल्या जाणाऱ्या एका किल्ल्यांत आपलें ठाणें नेलें. कांहीं दिवस पर्यंत

अमेरिकन सैन्याशीं तोंड देण्यांचें त्यानें टाळले, पण ११ जानेवारीला, न्युएवा सीगोवी प्रांतातील किचलॅली गांवाच्या उत्तरेस चार मैलावर आपली जमवा-जमव करण्याचा ज्यावेळीं ह्या बंडखोरानीं पुन्हां घाट घातला, त्या वेळीं ह्यांच्या वर आकाशांतून एका लढाऊ विमानांतून बांब टाकण्यांत येऊन त्यांचा पांगापांग करण्यांत आली. आपल्या अमेरिकन सैनिकांनां त्याचा समाचार घेण्यास पाठवावें व मध्येंच कांहीं दगाफटका होऊन विनाकारण आपल्या सैनिकाची हत्या करून घ्यावयाची त्यापेक्षां वर आकाशांतूनच बांब टाकणें अधिक बरें असें कर्नल गुलिकनें ठरविलें होतें. जानेवारीच्या १४ तारखेस कांहीं लढाऊ विमानानीं खालीं टाकलेल्या बांबमुळें चिपेटे येथील चाळीस बंडखोर सैनिक कामास आले; ह्याच वेळेस जनरल संडिनोही मरण पावला अशी अफवा पसरली होती, परंतु लवकरच, ती खोटी आहे असें सिद्ध झालें. जानेवारीच्या २३ तारखेस न्यूएव्हा सीगोवी येथें जाण्यासाठीं लीआन येथून आणखी १००० सैनिकांची कुमक रवाना करण्यांत आली; आणि शेवटीं पांगापांग झालेल्या बंडखोर सैनिकाकडून ह्या तुकडीला थोडाफार अडथळा झाल्यानंतर लवकरच जानेवारीच्या २४ ता० ला तिनें एल. चिपेटोचा पूर्ण कबजा घेतला ! पराजयानंतर बंडखोर कांहीं दिवसापुरतें अजीबात अदृश्य झाले. पण फेब्रुवारीं ५ ता. ला दुसरी बातमी येऊन थडकली. चांगल्या सशस्त्र घोडेस्वारांच्या पलटणीच्या साह्यानें मॅटागॅल्याच्या उत्तरेस १५ मैलांवर जिनोटेगामध्यें जनरल संडिनोनें पुन्हां धुमाकुळ मांडला असून त्या प्रदेशांतील शेतांनां व मळ्यांनां त्यांच्यापासून धोका होण्याचा संभव आहे, अशी ती बातमी होती.

'स्टिम्सन तहान्वयें प्रेसिडेंट डिआझनें निकारागुअन कांग्रेसपुढें निवडणुकीचा एक कायदा मान्यतेसाठीं ठेवला. ह्या कायद्याप्रमाणें, चालू असलेले निवडणुकीचे नियम रद्द समजले जाऊन पुढील आक्टोबर महिन्यांत होणाऱ्या निवडणुकी नंतर राज्यव्यस्थेचें सर्व नियंतृकत्व अमेरिकेकडेच पर्यायानें जाणार असें होते ! ह्या कायद्याचें मुख्य कलम म्हणजे, अगदीं लहान सहान मतनोंदणीखालीं सुद्धां अमेरिकन अध्यक्षच असावा, ही मागणी होय. मध्यवर्ती निवडणुकीच्या मंडळाचें नेतृत्व तर अर्थातच अमेरिकनाच्याच अधिकारांत होते ? ह्या दुसऱ्या

यदावर प्रेसिडेंट कूलिजनें जनरल फ्रंक आर. मॅककॉय ह्याची नेमणूक केली होती. ही योजना सीनेटमध्यें होती तशीच पास करण्यांत आली; चेंबर ऑफ डेप्युटीज मध्यें मात्र ती पास करून घेण्यास थोड्याफार अडचणी सोसाव्या लागल्या ! अमेरिकेनें योजलेला निवडणुकीचा हा अध्यक्ष हा मध्यवर्ती बोर्डाचा सूचना देणारा एक मंत्रीच असावा, ह्यापेक्षां अधिक अधिकार त्याला देण्यांत येऊं नये कारण कांग्रेसच्या ऐवजीं तिऱ्हाईत माणसाची निवडणुकीच्या बाबतींत योजना करणें हें नियम बाह्य आहे, असा मुद्दा पुढें आणून अमेरिकन सर्वाधिकाऱ्याचे हात बांधून टाकण्याचा कांझर्वेटिव पक्षाच्या लोकांनीं डाव मांडला. ह्याचें कारण आपली निवडणुकीवर देखरेख नसली, तर निवडणुकीचे निष्पन्न आपल्याला अनुकूल असें राहणार नाहीं अशी भीति त्यांनां वाटत होती हेंच होय. जानेवारीच्या १७ तारखेस ह्या बिलाचें दुसरें वाचन झालें, आणि लिबरल पक्षानें पूर्वीचें प्रेसिडेंड जनरल शामॅरो ह्यांच्यावर अन्याय्य मार्गानीं सदस्यांवर आपलें वजन खर्च केल्याचें आरोपही पुष्कळच केले. परंतु हें कलम पुढें गेलें तेव्हां सुद्धां चेंबर आफ डेप्युटीजमध्यें निवडणुकीच्या कायद्याच्या बाबतींत विरुद्ध मतांचीच बहुसंख्या होती, आणि कांझर्वेटिव पक्षाच्या ह्या बिला संबंधींच्या विरोधी धोरणांत कोणताही फरक झालेला नव्हता !

" आतांशां लिबरल व कांझर्वेटिव्ह ह्या दोन पक्षांमधील विरोध पुष्कळच तीव्र झालेले आहेत, आणि त्यामुळें तर अमेरिकेच्या शांति-प्रस्थापकाच्या स्वरूपांत मध्यें उडी घेणें भागच आहे ! प्रत्येक पक्ष आपल्या प्रतिपक्षांवर जनरल संडिनोला सहाय्य करीत असल्याचे आरोप ठेवीत असतो. जानेवारी १२ ला आपल्या मुलाखतींत, लिबरल पक्षाचे नेते जनरल मोकॅडो हे असें म्हणाले कीं संडिनोला कांझर्वेटिव्ह पक्षाची मदत मिळते; त्याचा हेतु, देशांत अस्वस्थता सुरूं ठेवली आणि अशा रीतीनें स्टिम्सन तहाप्रमाणें होणाऱ्या निवडणुकी होऊं देऊं नयेत, असाच आहे असेंही ते म्हणाले ! ह्या आरोपामुळें चिडून जाऊन, जनरल शमोरो ह्यांनीं, ह्या आरोपाचा प्रतिवाद तर केलाच, परंतु त्या बरोबरच ह्या बंडखोराला नेस्तनाबुद करण्यास अमेरिकन सैन्याचे जे प्रयत्न चालले होते त्यांना सहाय्य करण्याचेंही त्यांनीं आपण होऊन कबूल केलें.

जनरल शमोराला हद्दपार करण्यांत यावें कारण तो देशांत अशांतता माजविण्यास मदत करीत आहे, अशी ओरड लिबरल पक्षानें सुरू केली; आणि, वर असें सोंग आणून गुप्तपणें मात्र जनरल सांडिनोला सहाय्य करीत असल्याचा जनरल मकोडोवर आरोप करून त्यालाच हद्दपार करणें कसें इष्ट आहे हें कांझर्वेटिव्ह पक्ष सिद्ध करण्याची खटपट करूं लागला. कित्येक त्रयस्थांनां तर अशा परिस्थितींत अमेरिकेनें निवडणुकीचीं सूत्रें हातीं घेतलीं, तरी निवडणुकी घडवून आणणें शक्य होईल किंवा नाहीं, ह्या बद्दलच संशय वाटत होता ! "

निकाराग्वा मधील ह्या उलाढालींकडे पाहिलें ह्मणजे येथें युद्धाचीच परिस्थिति निर्माण झालेली असावी, असेंच कोणालाही वाटेल; परंतु सॅम काकाला मात्र तसें वाटत नाहीं ! सर्व जगानें असेंच मानावें कीं, आपण निव्वळ परोपकारासाठींच आपल्या माणसांची व संपत्तीची हानि करीत आहोंत, अशी सॅम काकाची इच्छा आहे ! निकाराग्वा मधील घडामोडीचें दुसरीं राष्ट्रेंही बारीक निरीक्षण करीत आहेत ! जपानांतील कांहीं लोकांना हें सर्व पाहून असें वाटूं लागले आहे कीं, मंचुरिआमध्यें तेथील लोकांमध्यें आपापसांतच जें युद्ध होऊं घातलें आहे, त्यांत पडून तें मिटवावें, हें आपलें कर्तव्यच आहे ! कारण जपानचें असें मत आहे कीं, " यूनायटेड स्टेटसचे निकाराग्वामध्यें जेवढें हितसंबंध आहेत, त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक हितसंबंध जपानचे मंचूरिआमध्यें गुंतलेलें आहेत ! " आह्माला हेंही ठाऊक आहे कीं दुसऱ्याच्या भानगडींत पडण्याची जपानांतील लोकांचीही मुळींसुद्धां इच्छा नाहीं; चिनी लोकांनीं आपल्या भानगडी स्वतःच सांभाळल्या तर मग ह्यांना तरी तेथें हात घालून काय करावयाचें आहे ? पण चिनी लोकांमध्यें इतकें शहाणपण कुठलें यायला ? ते बेटे मूर्खच ! खाणी, रेल्वे इ. भानगडींची योग्य व्यवस्था लावण्यासाठीं त्यांनां सुद्धां निकाराग्वन लोकांनां अमेरिकनांच्या सहाय्या इतकीच, जपानी सहाय्याची आवश्यकता आहे ! लोकसत्ताक निवडणुकी निकाराग्वामध्यें तरी यूनायटेड स्टेटसच्या मदतीवांचून कुठें पार पडूं शकतात ? जर जपानचीही सहाय्यबुद्धीची ढवळाढवळ चालू राहण्यास केलॉग साहेबांनीं हरकत घेतली नाहीं, तर मग जपान सुद्धां निकाराग्वामधील निवडणुकीस सहाय्य करण्यास

अमेरिकेला हरकत घेणार नाहीं ! सर्व मोठमोठालीं मतें विचाराच्या एकाच रूळावरून जात असतात ! फिलाडेल्फिआ लेजर आणि टोकिओ येथील निश निश् ह्या दोहोंमधील पुढील उताऱ्यांची तुलना करून पहावी ! :-

धि फिलाडेलफिअन लेजर.

" आह्मी निकाराग्वाच्या कारभारांत हात घातला ह्याचें कारण तेथील राज्यव्यवस्था ढांसळून पडली आणि कोणत्याही पक्षाचें अंगीं आपला कारभार पाहण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं. तेथें असलेल्या अमेरिकन व त्याच प्रमाणें इतर यूरोपीय देशस्थ रहिवाशांच्या जीवाला अपाय होण्याचा संभव होता, आणे आह्मी तेथें जाऊन परिस्थिति आमच्या हातांत घेतली नसती तर, लवकरच मनरो डॉक्ट्रीन असून सुद्धां दुसऱ्या कोणत्या तरी राष्ट्राला आपलें सैन्य तेथें रवाना करणें भागच पडलें असतें ! आंतर्राष्ट्रीय हितसंबंधासाठीं आह्माला ह्या भानगडींत पडणेंच भाग पडलें ! आणि येथें आह्मी जें कांहीं केलें तें सर्व दोन्ही पक्षांच्या संमतीनेंच केलें असून मतदारांनां आपलीं मतें नोंदण्यास पूर्ण स्वातंत्र्य मिळावें ह्मणून आह्मी नोंदणी-अध्यक्ष सुद्धां आमचाच नेमला जावा अशी व्यवस्था करून टाकली आहे ! "

" धि टोकिओ निश् निश् "

" मंचूरिआमधील आपल्या विविक्षित हिताचें संरक्षण करण्याचा जपाननें केव्हांहीं आव आणला नाहीं. जपानच्या इंपीरिअल गव्हर्नमेंटची ह्या पूर्वेकडील तीन प्रांतांत पूर्ण शांतता नांदावी, एवढीच काय ती मनापासून इच्छा आहे, हें जपानी कागदपत्रें पाहून मि. केलॉग सुद्धां मान्य करतील ! "

परंतु ह्यावर सेक्रेटरी केलॉग ह्यांनीं असें उत्तर दिलें कीं, युनायटेड स्टेटस्च्या मतें मंचुरिआ हा चीनचा प्रांत आहे आणि जपानचे आपल्या पूर्वीच्या मान्यतेस अनुसरून ह्या प्रांतांत कांहीं विशिष्ट हक्क आहेत, हें जपानचें ह्मणणें स्टेटस्ला मान्य नाहीं. हें ऐकून जपान मधील एकूण एक वर्तमान पत्राला महदाश्चर्य वाटले. मिस्टर केलॉग ह्यांनां असें स्पष्ट शब्दांत बजावण्यांत

आलें कीं, " असल्या विधानांमुळें एका मित्र राष्ट्राच्या मनोवृत्ति दुखावल्या जात आहेत आणि त्याचा परिणाम अमेरिका व जपानमधील असलेले मित्रत्वाचे संबंध सुटून वितुष्ट येण्यांत झाल्याविना राहणार नाहीं ! "

मेक्सिको मधील पार्वत्य प्रदेश, व त्यामुळें आडून हल्ले करण्यास अनुकूल अशी भौगोलिक परिस्थिति आहे, ह्मणूनच केवळ मेक्सिको हा अद्यापि स्वतंत्र देश राहूं शकला आहे. कॅरिबिअन देशांपैकीं बहुतेक लहान लहानशीं प्रजासत्ताक राज्येंच होतीं; आणि त्यांच्या सीमेच्या आंतील व्यापारांवर देखरेख करण्यास निव्वळ प्रेसिडेंटच्या आज्ञेवरहुकूम कामें करणारी आरमारी शक्तिसुद्धां पुरेशी होती; कांग्रेसनें ज्याला मान्यता द्यावी एवढ्या मोठ्या प्रमाणावरील युद्धाची सुद्धां ह्यासाठीं आवश्यकता नव्हती. मेक्सिकोमधील प्रश्न मात्र इतक्या सहज मार्गानें सुटण्यासारखे नाहींत ! मि. केलागचे युद्ध बहिष्काराचे व शांतिप्रस्थापनाचे प्रयत्नही ज्यांचा नायनाट करूं शकले नाहींत असे प्रबल मतप्रवाह अद्यापिही अमेरिकेंत आहेतच, व त्यांची अशी अपेक्षा आहे कीं, मेक्सिको मधील अमेरिकेच्या सांपत्तिक प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक करण्यासाठीं लवकरच एक अमेरिको मेक्सिकन युद्ध व्हावेंच लागेल !

दक्षिणेंतील स्वायत्त प्रांतांना लावण्यांत आलेली चीनच्या ' खुल्या द्वारा'ची मनरो डॉक्ट्रीन ह्मणजे डॉलरच्या राजकारणाचें एक दुसरें स्वरूप आहे. ह्या विषयावर किती तरी सांगतां येण्यासारखे आहे. व्हाईटहौसमध्यें अधिष्ठित झाल्यानंतर लवकरच प्रेसिडेंट विल्सननें ' नवीन स्वातंत्र्याच्या ' योजनेची घोषणा केली; ह्या घोषणेनें अमेरिकेचे चीनशीं व लॅटिन अमेरिकेशीं असलेले आपले धोरण व्यक्त केलें होतें. नुसत्या भाषेपुरता त्यांच्या चौदा कलमाप्रमाणें हा मसुदाही अगदीं स्पष्ट होता; परंतु वाशिंगटन येथील राजकीय खात्याच्या ह्या स्पष्ट (?) घोषणेंतील व्यावहारिक अर्थ चोखाळणें हें निकाराग्वा, हेटी, मेक्सिको, चीन इ. देशांना बरेंच कठिण वाटलें. आतां प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींकडे पाहतां, ह्या विचाऱ्यांच्या शंका अनाठायीं नव्हत्या, हेंच सिद्ध होतें आहे !

इकडे निकाराग्वामध्यें बाटेल तसे अत्याचार करण्याची सीनेटनें कूलिज साहेबांनां पूर्ण परवानगी देऊनच ठेवलेली होती; आणि तिकडे पहावें तों

'युद्ध-बहिकाराच्या' अमेरिकन चळवळीस ऊत आला होता. मुख्य मुख्य मतांची नोंदणी केल्यानंतर असें जाहीर करण्यांत आलें कीं ६४ राष्ट्रांपैकीं ५१ राष्ट्रांनीं ह्या संघाच्या तत्वांनां मान्यता दिली आहे. परंतु अद्यापिहि अधिक लढाऊ जहाजे कोणी बांधावयाची, ह्याबद्दल व्हाईट हॉल व वाशिंग्टन ह्यामध्यें चाललेल्या चढाओढी थांबल्याचें मात्र कांहींच चिन्ह दिसत नाहीं. ब्रिटिश साम्राज्याच्या बरोबरीनें आपलें आरमारी सामर्थ्य असावें असें आपलें यूनायटेड स्टेटसला वाटतें. त्या वाटण्याच्या मुळाशीं नुसती आपली भावनाच आहे असें स्पष्टपणें वाटतें. कूलिज आणि केलाग ह्यांनीं उच्चारलेल्या 'युद्ध बहिष्काराच्या' तत्वांची घोषणा झाली असूनही इंग्लंडांतील आरमारी अधिकारी आपली शक्ती अमेरिकेच्या 'भावनेच्या' जोडीला आणून बसवावयास तयार होत नाहींत. भीतीनें थरथरा कांपत असलेलें कमांडर केनवर्दी ही अवस्था पाहून विचारतात, " सर्व संस्कृतीची युद्धाचें धुमश्चक्रींत लय होणार आहे कीं काय ! " जर यूनायटेड स्टेटस व ब्रिटिश साम्राज्य ह्यांच्यामध्यें युद्ध सुरू झालें, तर खात्रीनेंच तसें होईल, ह्यांत शंका नाहीं. आणि हें युद्ध पेटणें असंभाव्यही नाहीं !

वाशिंग्टन स्टेट डिपार्टमेंट आणि ब्रिटिश, फ्रेंच व जर्मन परराष्ट्रीय खातीं, ह्यां मधील भाषेंतील शब्दांची तडजोड करण्यास केलाग पॅक्ट समर्थ झालें आहे. परंतु अर्थातच, पॅक्टनें निकाराग्वा वरील चढाईचा मुळींच उल्लेख केलेला नाहीं. त्याचप्रमाणें ग्रेट ब्रिटनचे इजिप्टशीं, फ्रान्सचे मोरोक्कोशीं किंवा इटलीचे अल्बानिआशीं जे संबंध घडले आहेत व त्यांच्याशीं त्यांचें जे वर्तन घडत आहे, त्याबद्दल ही पॅक्टनें उल्लेख करण्याचें टाळलें आहे. लढाईचें चढाऊ धोरण आणि बचावाचें धोरण ह्यांत फरक करण्यांत यावा असा फ्रान्सचा फार आग्रह होता. अंतर्राष्ट्रीय धोरणाखातर पॅक्ट मधून बचावासाठीं लढाईचे उच्चाटन करण्यांत आलें आहे; परंतु ज्या वादावर, 'राष्ट्रीय हक्काचें संरक्षण करण्यासाठी किंवा राष्ट्राचा सन्मान राखण्यासाठीं' असा रंग चढवितां येणार नाहीं असा वाद किंवा मुद्दाच असूं शकेल, असें आम्हाला वाटत नाहीं.

बहुधा युद्ध संपल्यानंतर होणारा तह म्हणजे त्यानंतर चिरकालपर्यंत ह्या उभय पक्षामध्यें वितुष्ट येणार नाहीं, असेंच म्हणतो, परंतु आरमागेडानचा

तर झाल्यापासून आजपर्यंत असा एक दिवस गेलेला आढळणार नाहीं कीं ज्या वेळीं, एका सुशस्त्रसज्जित जनसमूहानें दुसऱ्या सशस्त्र - किंवा निःशस्त्रही-स्त्रीपुरुषांवर हल्ला केलेला नाहीं. " युद्ध बहिष्कारा " च्या चळवळीनें युद्धाचा नायनाट होणें शक्य नाहीं; त्यामुळें, आक्रमक बदमाष राष्ट्र आपल्या आक्रमणाला ' युद्ध ' न म्हणतां दुसरें एखादें नांव देईल, फार झाले तर. परंतु युद्ध बंद मात्र होणार नाहीं:-

" मुत्सद्दी लोक युद्ध बहिष्काराचा विचार करीत असतां, रोजर्सनें असें सुचविलें कीं, नुसत्या मनुष्यशक्तीवरच नियंत्रण ठेवूं नका, तर जनतेच्या द्रव्यावरही शांतिसंधाचे नियंत्रण असूं द्या. वालस्ट्रीटच्या कोट्याधीशाला ज्या वेळीं असें दिसेल कीं तुम्ही त्याच्या कचेरींतील कारकुनांवरच नव्हे तर त्याच्या तिजोरीवरही हक्क चालविला, त्यावेळीं, युद्ध थांबलेंच असें समजा. पण ह्या नंतर तुम्हाला लोक असें विचारतील, होय तुमचें म्हणणें खरें आहे पण हें घडवून आणायचें कसें ? श्रीमंत लोकांची ह्या सुचनेला मान्यता मिळणें शक्य नाहीं आणि गरिबांनां तर ह्याबद्दल विचारण्याचें कारण नाहीं ! अशा अवस्थेंत ही सूचना मान्य होणार कशी ? "

राष्ट्रीय व अंतर्राष्ट्रीय संबंधांतिल वर्तमान व मनोवृत्तींत बदल घडवून आणल्यानेंच युद्ध बहिष्कार होणें शक्य आहे ! जो पर्यंत जुन्या मतांचा व जुन्या रूढींचा नायनाट होत नाहीं, जो पर्यंत गुंतविलेल्या भांडवलापेक्षां मनुष्यांच्या जीविताची व सुखाची किंमत अधिक आहे हें राष्ट्रानां पटत नाहीं, तो पर्यंत युद्ध ही संस्था मानवी समाजांतून नाहींशीं होणें अशक्य आहे.

प्रकरण १७ वें.

अंकल शॅम !

मागील वर्षी हवाना येथें भरलेल्या पॅन-अमेरिकन कांग्रेसच्या अधिवेशनांत सॅम काकाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेसिडेंट कूलिज, ह्यांनीं आपल्या अत्यंत भावनापूर्ण भाषणांत पुढील आशयाचे उद्गार काढले होते:-

" लोकसत्तेच्या तत्वांचा व मनोवृत्तीचा प्रसार करणें व त्याची स्थापना करणें, ही आमच्या स्वाधीन केली गेलेली अत्यंत पवित्र ठेव त्या पूर्वीही आह्मी समजत होतों, व आजही आमची तीच समजूत कायम आहे. परंतु, जनतेच्या शहाणपणावरच शेवटीं आमची सर्व भिस्त आह्मांस ठेवणें प्राप्त आहे. त्यांच्या बुद्धिमत्तेवर, त्यांच्या इमानदारीवर व त्यांच्या सच्चारित्र्यावर भरंवसा टाकावयास हरकत नाहीं, असें आमचें मत आहे. दुसऱ्या कोणी त्यांच्यावर सत्ता गाजविण्यापेक्षां, तेच स्वतःचा कारभार पहावयास सर्वथैव समर्थ आहेत, ह्या तत्वाशीं आह्मी पूर्णत्वानें समरस झालों आहोंत !

" स्वायत्ततेच्या तत्वाच्या खालोखाल जर कोणत्या दुसऱ्या तत्वाबद्दल आह्माला जिव्हाळा वाटत असेल, तर तो शांतता प्रस्थापन करण्याच्या धोरणाबद्दल होय !

" पृथ्वीच्या ह्याच गोलार्धांत अशा लोकसत्ताक राज्याची प्रस्थापना झालेली आहे कीं जेथें वैयक्तिक हक्कांना अधिकांत अधिक मान देण्यांत येतो, आणि जेथें राजकीय स्वातंत्र्य, व समता, आणि आर्थिक सुव्यवस्था ह्यांच्या योगानें लोकांची अभूतपूर्ण भरभराट झालेली दृष्टीस पडते.

" ह्या भूभागांत वसलेलें प्रत्येक राष्ट्र स्वतंत्रपणें समान दर्ज्याच्या पायावरच उभें आहे. लहानांत लहान व सर्वांत अधिक निर्बल असें राष्ट्रही येथें, एखाद्या मोठ्या व प्रबल राष्ट्राच्या इतक्याच अधिकारानें बोलूं वागूं शकतें ! "

हें पुस्तक लिहिण्याचें कार्य हें मला फारसें आवडलेलें आहे असें नाहीं. त्याच्या ह्या शेवटच्या प्रकरणांत हवाना येथें ज्या असत्याग्रहांचा डंब माजविण्यांत आला त्याचे लांबलचक विवरण करीत बसणें हें माझ्या जिवावर आलें आहे. युनायटेड स्टेटसच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्याच्या यशस्वितेचा फोलपणा सिद्ध करून दाखविण्यासही आतां माझें मन घेत नाहीं. तें काहींहीं जरी असलें तरी, एवढें बरोक खरें कीं, ह्या पुस्तकांत आतांपर्यंत रेखाटलेल्या सत्य घटनांशीं प्रेसिडेंट कूलिजच्या आशावादाची तोंडमिळणी करणें, हें कार्य कठिण आहे !

तेव्हां झच्वूशाहीच्या सत्तेमुळें, क्लॅनच्या धुमाकुळामुळें, पेट्रोलिअम आणि लोखंड ह्यांच्या व्यापाऱ्यांच्या सांपत्तिक प्रबलतेमुळें, लोकस्वातंत्र्याचें व स्वायत्ततेचें तत्व येथें पक्कें बिंबविण्यांत आलें आहे ह्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास कोण

तयार होईल ? निकाराग्वा, फिलिपाईन बेटें, हेटी, क्यूबा, इ. देशांत ज्या कांहीं गोष्टी घडल्या, त्या सर्व अवलोकन केल्यानंतरही, अमेरिकेंतील सर्व लहान मोठे देश समान हक्काच्या एकाच पायावर उभे आहेत, हें खरें आहे काय अशी शंका प्रदर्शित करण्यास कोणासही भरपूर जागा आहे ! त्याच प्रमाणें अमेरिकन जन-समुदायांकडून दाखविण्यांत येणारें क्रौर्य, अगदीं क्षुल्लक अशा अपराधांसाठीं करण्यांत येणारे घोर दंड, स्टेटच्या व फेडरल खात्यांत चालू असलेले अनीतीचे प्रकार, श्रीमंतांच्या हातीं असलेले कायदे व गरीबांची होत असलेली कुचंबणा, काळा-गोरा असा करण्यांत येणारा भेदभाव,कायद्याची होत असलेली उघड उघड पायमल्ली, इत्यादि गोष्टी पाहिल्या, ह्मणजे, यूनायटेड स्टेटसमध्यें वैयक्तिक स्वातंत्र्याच्या तत्त्वाची पूर्ण अंमल बजावणी झालेली आहे, आणि राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक सुव्यवस्था यांमुळें समाजाची आत्यंतिक भरभराट झालेली आहे. ह्या प्रेसिडेंट कूलिजच्या विधानांत सत्यांश कितपत आहे, ह्या बद्दलही संशय उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं.

अमेरिकन गुण ह्मणजे वरून सुंदर मुलामा दिलेला, दिखाऊ नटवेपणानें नटविलेला व ज्याची जाहिरात खूबच फडकाविण्यांत आलेली आहे असा एक नकली पदार्थ आहे. त्याचा खपही बराच आहे. त्याच्या वास्तविक किंमतीबद्दल उहापोह ह्या पुस्तकांत करण्यांत आला आहे.

माल खपविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या समूहांत अमेरिकनांची बरोबरी करूं शकेल असा मनुष्य जगाच्या पाठिवर सांपडणें असंभाव्य आहे ! अशा यशस्वी व्यापाऱ्यांचीं वाणी मोठी प्रेमळ, भाषा मोठी रिझविणारी, बाह्य स्वरूप मोठे आल्हाददायक व वागण्याचे रीतिरिवाज अगदीं भुरळ पडणारे, असे असतात ! आपल्या मालावर त्यांचा भरंवसा असतो, आणि त्याबद्दल ते दुसऱ्यांच्याही अंत:करणांत विश्वास उत्पन्न करूं शकतात. मोटारीचा कारखानदार तुह्माला आपली फोर्ड गाडी विकतो, आणि त्याला किंमतीचा चेक लिहीत असतांना तुमच्या मनाची अशी भावना असतें कीं ही गाडी रोल्स राईस गाडीपेक्षांही अधिक चांगली आहे; अमेरिकन इसम तुह्माला आपले केळाचे सरबत विकतो पण तें प्यायल्यानंतर देहांत अननुभूत चैतन्याचा संचार झाला आहे असें तुह्माला वाटूं लागते; अमेरिकन व्यापारी तुह्माला केलॉग पॅक्ट विकतो, आणि

तुह्माला वाटूं लागतें कीं आतां ह्या पुढें दुसऱ्या लोकांच्या आक्रमणाचे भय उरलें नाहीं, अमेरिकन व्यापारी आपले अमेरिकन रंग ढंग हजार स्वरूपांत तुह्माला विकीत असतो ! चलाच्चित्रपटांचे दिखाऊ लाभ, टिनांत बंद केलेले खाद्य पदार्थ, सकाळची न्याहारी, शस्त्रसंन्यासाची चळवळ–एक ना दोन ! अमेरिकेच्या मालाचे स्वरूप जितके दिखाऊ तितकेच विविधही आहे ! माल विकत घेतल्यानंतर मागाहून, मालावद्दल दिलेली किंमत तो बनविण्यास लागलेल्या खर्चापेक्षां फारच अवाढव्य प्रमाणांत मोठी आहे हें पाहून तुमची निराशा होत असेल, हें खरें आहे ! अमेरिकन वस्तूला जर शंभर रुपये किमत पडली असेल तर ह्या पैकीं, पांच पासून फार झाले तर दहा रुपये तो जिन्नस बनविण्याचा खर्च, जवळ जवळ दहाच रुपये कारखानदाराचा नफा आणि उरलेले ८० रुपये, दसपट किंमत घेऊन हा माल तुमच्या गळ्यांत बांधणाऱ्या 'अमेरिका' संस्थेच्या पदरांत, अशी ह्या रकमेची विभागणी आहे. ८० टक्के अमेरिकॅनिझम आणि २० टक्के मालाची खरी किंमत असें हें प्रमाण आहे.

अमेरिकॅनिझम ह्मणजे व्यापारी कौशल्य ! व्यापारी कौशल्य ह्मणजे वंचना !–आणि वंचना ह्या शद्वाचा भाषेंत अर्थ पाहूं गेल्यास, दिखाऊपणा, फसवेगिरी, जें आपण नाहीं ते आहों असें दाखविणें, असा होतो ! हें पुस्तक साद्यंत वाचल्यानंतर कदाचित् वाचकाला आपण होऊनच असें वाटावयास लागेल कीं, ह्या घमेंडखोर अमेरिकनाच्या गर्वोक्तींत हा दिखाऊपणाच भरलेला आहे, आणि शाम काकाच्या लहान मोठ्या सर्व अधिकाऱ्यांच्या बोलण्यांत व वातावरणांतही हाच भोंदूपणा प्रत्ययास येतो !

ह्या पुस्तकांत वर्णन केलेली वस्तुस्थिति जर सत्य असेल, आणि ती आजच्या अमेरिकन लोकसमाजाची व राज्यपद्धतीची पुरेशी द्योतक असेल तर मग, सॅम काकाला शॅम काका ह्मणणें ह्यांत गैरवाजवी असें कांहीं होईल असें आह्मास वाटत नाहीं.

शेवटीं, शेंकडा शंभर टक्के अमेरिकन नसलेला, जो महायुद्धांत विजय आमच्यामुळें मिळाला असें ह्मणत नाहीं, ज्याला खोरून दारू विकण्याबद्दल किंवा निकाराग्वामधील अत्याचारांबद्दल किंचितही सहानुभूति नाहीं, जो

वाशिंग्टन कानफरन्सचें खरें स्वरूप कोणतें तें जाणूं शकतो, जो कदाचित चर्चे-मध्यें जात नसेल परंतु आपल्या हृदयमंदिरांतच परमेश्वराचें पूजन करीत असेल, आणि जो चर्चची विटंबना व्हाईट हौसच्या ढोंगीपणा व श्रीमंत व्यापाऱ्यांची कृष्णकृत्यें उघड्या डोळ्यांनीं पाहूनही, अमेरिका नीतिमत्तेचा विराट पुरुष आहे असें ह्मणण्याचें धाडस करीत नसेल, असा एखादा अमेरि-कन असेल, तर त्याची क्षमा मागणें हें माझें कर्तव्य आहे. त्याच्या महत्वा-कांक्षेला विराट पुरुषाचीच आवश्यकता आहे असें नाहीं; ह्या पुस्तकांत अमेरिकन नीतिमत्तेच्या ज्या खुरट वनमनुष्यांच्या मूर्तींचें चित्र काढलें आहे, त्याच्या शरीराचें प्रमाण त्या अमेरिकन सद्गृस्थाच्या आकांक्षांस पुरें पडेल ! शारीरिक शक्ति, सामर्थ्य, उत्साह व धडाडी ह्या गुणांची जातिभेद व अवस्थाभेद ह्यांच्याशीं कशी जुळणी करावी हें जाणणाऱ्या ह्या सभ्य गृहस्थाला मी असें मोकळेपणानें सांगतों, कीं मी जें लिहिलें त्याबद्दल मला खेद होतो;-मला क्षमा कर !

परंतु इतर सर्वसाधारण शंभर नंबरी अमेरिकन इसमाला माझा संदेश हाच राहील कीं:-तुझ्या राष्ट्राच्या कायद्याचा अर्थ धुंडाळणें, तुझ्या नेत्यांची नीतिमत्ता व सार्वजनिक भाषणें ह्यांवर प्रकाश पाडणें, तुझ्या संस्थांचें सत्य स्वरूप विशद करणें, तुझ्या समाजांतील, तरुण तरुणींची नीतिमत्ता चव्हाट्यावर आणणें, हीं क्रिया मला अत्यंत तापदायक व न आवडणारी अशी आहे ! तुझ्याबद्दल हें सर्व लिहित असतांना, युरोपमध्यें काय चाललें आहे तिकडे मी डोळेझांक करूं शकत नाहीं ! तुझ्या करमणुकीवर टीका करीत असतांना, तुझ्या खुशाल चेंडू व फॅशनेबल समाजांकडे, फॉलीज ब्रिगेडिअर, कोट डि एझूर कोसिनास इ. ठिकाणच्या नंग्या नाचाकडे माझें लक्ष गेलें नाहीं, असें समजूं नकोस. परंतु यूरोपनें आपल्या नीतिमत्तेच्या बाता मारण्याचें दिवस आतां राहिलेले नाहींत ! ज्या वेळेस, युद्धांत विजय माझ्यामुळें मिळाला अशी फुशा-रकी तूं मिरवितोस, त्यावेळीं गरीब बिचारें यूरोप दुसऱ्याच भानगडींत इतकें गुंतलेलें असतें कीं, वस्तुस्थिति अशी नसून, युद्धांत विजय फॉकनें मिळविला, वेल्शमधील त्या छोट्याशा जादूगारानें-लॉइड जार्जनें तो मिळविला, किंवा जेलिकोनें जर्मनीची अन्नसामुग्री खुंटविल्यामुळें तो मिळाला, किंवा मँजिननें

मार्न येथें लोंढा पलटविला, किंवा नार्थक्लिफच्या वर्तमानपत्रांनीं जर्मन लोकाचा बुद्धिभेद केला इ. गोष्टी सांगण्यास त्याला वेळच नाहीं ! आपल्या सरहद्दीवरील देशांत चाललेल्या उलाढालींमुळें इंग्लंडला दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष द्यायला फुरसत नाहीं. आणि जर्मनीचें सर्व लक्ष आपला गेलेला व्यापार पुन्हा हस्तगत करण्याकडे व पांगलेल्या सत्तेचें एकीकरण करण्याकडे गुंतलेलें आहे. इटालीचे मुसोलोनी व अल्बिनिआ त्याकडे, फ्रांसची तिजोरी रिकामी झालेली, रशियाचें लक्ष मंचुरिआमध्यें बंड कोणत्या उपायांनीं उभें करावें, ह्याकडे ! परंतु आज जरी अशी स्थिति असली तरी पुढें मागें केव्हां ना केव्हां तरी कोणी तरी उभा राहून सवाल विचारील कीं, महायुद्धांत विजय कोणी मिळविला ! "

दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षां आज अमेरिकेचीच परिस्थिति स्वस्थपणाची आहे, चार्ल्सटन, ब्लॅक बॉटम, येल ब्लूज इ. गोष्टींत फॅशन घालून देण्यास, घटस्फोटाचे सुलभ मार्ग व त्यापेक्षां सुलभ रीतीनें विवाह घडवून आणण्याचे उपाय शोधून काढण्यास, रानटी धर्मांचें पवित्र धर्मांशीं एकजीव करण्यास पुराण प्रवचन आणि धर्मलंडपणा चर्च आणि भौतिक उत्कर्ष प्युरिटॅनिझम् आणि स्वैराचार, युद्ध बहिष्कार आणि वाढतें प्रबल आरमार, लोकसत्ता आणि प्रशिआ व फिलिपाईन मधील अत्याचार, इत्यादि विरोधी गोष्टींची सांगड घालीत बसल्यास त्यांनांच वेळ आहे व सर्व दृष्टीनें परिस्थिती अनुकूल आहे.

अमेरिकन ज्या गोष्टींचा अभिमान बाळगतात अशा कांहीं गोष्टींची येथें छाननी करण्यांत आलेली आहे; त्यांतून निघालेला निष्कर्ष जर त्यांना न आवडणारा असा असला तर त्याचा दोष लेखकाकडे नाहीं. अमेरिकन लोकसत्ता ह्मणजे मानवी सुधारणेचा बोजवारा आहे, अंकल सॅम ह्मणजे अंकल शॅम् आहेत. असें जर दिसून आलें तर वस्तुस्थितीच्या निरीक्षणावरून काका साहेबांबद्दल असे आरोपी उद्गार करण्यास गुन्हेगारानें दिलेली कैफियतच कारणीभूत आहे. हें पुस्तक द्वेषबुद्धीनें प्रेरित होऊन, लोकांत खळबळ उडविण्यासाठींच यूनायटेड स्टेट्सबद्दल फाजीलपणा करण्यासाठीं ह्मणून लिहिलें गेलें नाहीं. सर्व जगाचे नेतृत्व आपल्याकडे घेऊं पाहणाऱ्या ह्या प्रेसिडेंट साहेबांचें व ह्या भौतिक उत्कर्षाला वाहिलेल्या युगांत त्यांच्या हाताखालीं असणाऱ्या निरनिराळ्या समर्थ खात्याचे खरें स्वरूप काय आहे तें उघड

करून दाखविणें एवढाच ह्या पुस्तकाचा उद्देश आहे. मागील प्रकरणांत जें कांहीं लिहिलें आहे त्यावरून जगाला कांहीं बोध घेतां आला, यूनायटेड स्टेटसच्या पावलांवर पाऊल टाकण्याच्या घातकी प्रवृत्तीपासून इतर देशांनां जर परावृत्त करतां आलें, २० व्या शतकांतील सुधारणेंत माजलेली घाण जर उपसून काढतां आलीं, अंकल सॅमला जर आपलें सत्य स्वरूप ह्या आरश्यांत पाहतां आलें, बोलल्याप्रमाणें वर्तन करण्यास, धर्माप्रमाणें आचरण करण्यास ज्यासाठीं लिंकननें देह अर्पण केला व वाशिंग्टननें स्फूर्ति दिली त्या तत्वाची अंमल बजावणी करण्यास जर सॅम काकाला प्रवृत्त करतां आलें, तर ह्या पुस्तकासाठीं जी मेहेनत करावी लागली, पुरावे जमविण्याचा जो खटाटोप करावा लागला, व मनाच्या विरुद्ध नावडत्या विषयावर लेखणी चालवित्यामुळें जे त्रास सहन करावा लागला, त्याचें सार्थक झालें असें मी ह्मणेन !

× × × ×

आतां ज्या अर्थीं माझें कार्य संपलेलें आहे व हिशेबाची नोंदणी पूर्ण झालेली आहे, त्या अर्थीं जमा आणि खर्चाचा आढावा काढून शिल्लक दाखवून शेवटची रेघ ओढणें एवढेंच कार्य आतां उरलें आहे. बहुतेक लोक असें ह्मणतात कीं, एखाद्या विशिष्ट तत्वाचा किंवा मताचा प्रसार करण्यास प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला ह्मणजे त्या प्रत्युत्तरांतही, मूळ प्रचारकर्त्याच्या गुण दोषाचा समावेश झाल्यावांचून राहणें शक्य नाहीं. " अंकल शॅम " हें पुस्तक अशा प्रकारच्या प्रचारक ग्रंथांतील जे नेहमींचे दोष ह्मणजे एकांगीपणा व वस्तुस्थितींतील घोंटाळा, त्यापासून कसें अलिप्त आहे हें उपोद्घातांत सांगितलें आहे. परंतु शेवटीं ह्या प्रसंगींही त्याच पुढाऱ्यांच्या खात्रीच्या आधाराबद्दल पुन्हा एकदां असें सांगणें हें लेखकाचें कर्तव्य आहे कीं, अमेरिकन समाजाची जी कांहीं दुसरी बाजू चांगली आहे, जी सर्व जगाला चांगली विश्रुत असून जिच्या बद्दल सर्व मनुष्य समाजाला आदर वाटतो, त्या चांगल्या बाजू बद्दल प्रस्तुत लेखकालाही पराकाष्ठेचा आदरच वाटत आहे. ती चांगली बाजू अजिबात अस्तित्वांतच नाहीं, असें विधान कोठेंही करण्यांत आलेले नाहीं; उलट त्याचा उल्लेख वारंवार करण्यांत आलेला आहे. युद्ध पूर्वकाळांत हे

सद्गुण विशेष प्रामुख्यानें अमेरिकेंत वसत होते; युद्धानंतर त्यांचें प्रमाण फारच क्षुद्र झालेलें आहे, कारण दुसऱ्या विरुद्ध गुणांचा त्यांच्यावर जबरदस्त पगडा बसला आहे. आणि ह्मणून, ह्या पुस्तकांत वर्णिलेली अमेरिका ह्मणजे जिची सर्वत्र निंदा करण्यांत येते तेवढीच अमेरिका आहे हें केव्हांहीं उघड आहे.

ह्यापुढें, एखाद्या मतप्रचारकाच्या धंदेवाईक कसावास अनुसरून मी असेंही ह्मणणार नाहीं कीं, हिंदुत्वांतील अंतर्भूत तत्वांच्या सौंदर्याबद्दल व श्रेष्ठत्वाबद्दल आजपर्यंत इतक्या विविध लेखकांनीं लिहून ठेवलें आहे कीं, एखाद्या विरोधी लेखकानें आपली लेखणी जरी यथेच्छ पारजली, तरी त्यामुळें हिंदुस्थानचें कांहींच नुकसान होणार नाहीं. ह्या पुस्तकाचें शेवटीं, मी पुन्हां एकदां जें सांगितलें तेंच सांगतों कीं, अमेरिकेनें केलेली शास्त्रीय प्रगति तिचें वर्चस्व व तिची शक्ति, ह्यांत जो अमेरिकेचा मोठेपणा आहें (असें जग समजतें) त्याबद्दल कोणालाच शंका नाहीं. परंतु जगाच्या सुधारणेचा हा ढोलारा कोलमंडून पडण्याची भीती ज्या कारणांमुळें उत्पन्न झालेली आहे ती कारणें, ती अमेरिकन जीवनाला लागलेली कीड नाहींशी व्हावी आणि ह्या चांगल्या शक्तींचा योग्य मार्गानें विनियोग करण्यांत यावा एवढ्याच हेतूनें मी हें सर्व चर्वित चर्वण केलेलें आहे. ह्या उदात्त आणि स्तुत्य सुधारणांचे अवशेष आतां इतके थोडे शिल्लक राहिलेले आहेत, आणि तेही नष्ट होण्याची इतकी जबरदस्त धास्ती वाटते आहे कीं, हें अमेरिकेनें सावध व्हावें ह्मणूनच केवळ मी ही धोक्याची सूचना दिलेली आहे. तसें जर अमेरिकेनें वेळींच केलें नाहीं, तर जें कांहीं महत्वाचें असें तिच्याजवळ उरलें आहे तें फक्त अमेरिकेतूनच नव्हे तर सर्व जगांतून कायमचें नष्ट होणार आहे ! जगाच्या चांगल्या बाजू प्रमाणें अमेरिकेच्या जीवनांतिलही जी चांगली बाजू असेल, तिच्याबद्दल केव्हांही मला पूर्ण आदरच वाटत आहे !

समाप्त

REFBK-0004606